
# आधारवड

अविनाश टिळक




श्री यशोदा प्रकाशन, पुणे


बालवाड़ी



# आधारवड

लेखक

श्री. अविनाश टिळक

सहायक

सौ. सुमन टिळक

श्री यशोदा प्रकाशन, पुणे.

# आधारवड

लेखक :
श्री. अविनाश टिळक
९, पुष्कराज हौसिंग सोसायटी,
सावरकर मार्ग,
डोंबिवली (पूर्व) – ४२१२०१

प्रकाशक :
सौ. सुमन जोशी
श्री यशोदा प्रकाशन,
'कृष्णा', पत्रकारनगर,
पुणे ४११ ०५३

हक्क :
सौ. सुमन टिळक
डोंबिवली– (पूर्व)– ४२१२०१

प्रथम आवृत्ती :
रविवार, २३ ऑक्टोबर १९९४

मुद्रक :
श्री. ग. दीक्षित
दी प्राज्ञ प्रेस, वाई–४१२८०३

मुखपृष्ठ व रेखाटने :
श्री. शिवाजीराव सुतार, वाई

मुखपृष्ठ व फोटो छपाई :
व्ही. जोशी अँण्ड कं., पुणे

किंमत– ६० रुपये

दादांच्यासारख्या समाजसुधारकांच्या
मायेची ऊब
दुर्दैवाने
ज्यांना मिळाली नाही
आणि
आपल्या चिमुकल्या मुठी
उघडायच्या आधीच
कचराकुंडीतून ज्यांना
देवाघरी जावे लागले
अशा
अनंत, अगणित
अर्भकांच्या स्मृतीस
सादर समर्पण !



# आशीर्वाद

वाईतील वेदशास्त्रसंपन्न म्हणून जी प्रख्यात विद्वान मंडळी होऊन गेली त्यामध्ये रविवार पेठेतील शंकरभाऊ ताटके हे अग्रस्थानी होते. वेदविद्येचा व धर्मशास्त्राचा त्यांचा सखोल अभ्यास होता. धार्मिक पौरोहित्य हा त्यांचा चरितार्थाचा मार्ग होता. अत्यंत मितभाषी, मधुर वाणी, संस्कृत विद्येत पारंगत व पौरोहित्य– कर्मातील प्रामाणिकपणा ही कै. शंकरभाऊ ताटके यांची ठळक वैशिष्टचे होती. ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांच्या समवेत सोरटीसोमनाथ येथील मंदिराच्या जीर्णोद्धार सोहळ्यामध्ये शंकरभाऊ ताटके यांचा सहभाग होता. वक्तशीरपणा व नियमित ठरावीक आहार यामुळे त्यांना दीर्घायुष्य लाभले.

प्रस्तुत पुस्तकातील श्री. रामकृष्ण शंकर ताटके हे शंकरभाऊ ताटके यांचे चिरंजीव. घरातील धार्मिक वातावरणाचा सुसंस्कार रामकृष्ण ताटके यांना लाभला. वडिलांच्या मार्गदर्शनाखालीच संस्कृत ग्रंथांचे अध्ययन व पठण करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. निःस्पृहपणा व समाधानी वृत्ती हे दोन्ही गुण कै. शंकरभाऊ ताटके यांच्याकडून त्यांच्या चिरंजीवांकडे आल्याचे आढळून येते. कालांतराने वाईतील वेदाध्ययनाची परंपरा हळूहळू लोप पावत चालली हे लक्षात येताच रामकृष्ण ताटके यांनी आंग्ल भाषेचे अध्ययन वाईमध्ये पूर्ण केले. वडिलांचे व मातोश्रींचे सुसंस्कार घेऊनच पुढील व्यवसायानिमित्त त्यांनी मुंबई येथे दीर्घकाळ वास्तव्य केले.

श्री. रामकृष्ण ताटके यांच्या जीवनकार्याचा अत्यंत सखोल असा आढावा प्रस्तुतच्या चरित्रग्रंथात घेण्यात आला आहे. धर्मशास्त्र अध्ययनाची परंपरा पाठीशी उभी असूनदेखील ताटके यांच्या मनाला त्यातून ठरावीक मर्यादा स्पर्श करू शकल्या नाहीत ही गोष्ट त्यांनी मुंबई येथील वास्तव्यात केलेल्या विविध स्वरूपी समाजकार्यातून आढळून येते. त्यांनी स्वतःच्या चरितार्थासाठी अनेक संस्थांमधून नोकरी केली याचा उल्लेख आढळतो व तरीदेखील सामाजिक कार्याचा ध्यास हे त्यांचे स्वभाववैशिष्टय ठळकपणे लक्षात येते. समाजकार्य करताना समोर येणाऱ्या अनेकविध आपत्तींशी झगडा करावा लागतो व त्यातून नैराश्य येण्याची शक्यता असते. श्री. रामकृष्ण ताटके हे या सर्वास अपवाद ठरले आहेत.

श्री. ताटके यांचे सामाजिक कार्य हे विशिष्ट जातिधर्मापुरते मर्यादित न राहता मानवतावादाच्या विचारावर स्थिरावले असल्याचे आढळून येते. धर्म ही बाब त्यांनी समाजकार्य करताना घराच्या उंबऱ्याच्या आतच जाणीवपूर्वक ठेवली. जो जन्मास आला त्यास जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी करत राहणे हा प्रमुख विचार त्यांच्या कार्याशी निगडित झालेला आढळतो. मुंबई येथील श्रद्धानंद महिलाश्रम या संस्थेची विश्वस्त या नात्याने त्यांनी जी धुरा सांभाळली ती अत्यंत यशस्वी रीत्या पूर्णत्वास नेली. "अनाथांचा नाथ" हे बिरुद त्यांच्या सामाजिक कार्याच्या पार्श्वभूमीवर त्यांना लाभणे हे उचित आहे. शासनाने "दलितमित्र" हा किताब देऊन त्यांचा बहुमान केला ही त्यांच्या कार्याची घेतली गेलेली दखल होय.

श्री. ताटके यांच्या सामाजिक कार्याच्या धावपळीच्या जीवनात त्यांच्या पत्नीने त्यांना केलेले सहकार्य ही बाब अत्यंत ठळकपणाने लक्षात येते. आपल्या पतीच्या विविधांगी कार्यामध्ये मूकपणाने सहभागी न होता सौ. लीलाबाई ताटके या सातत्याने सक्रिय राहिल्या. हा त्यांचा स्वभावविशेष ठरतो. श्री. ताटके यांच्या जीवनाकडे दृष्टी टाकल्यास काही देवत्वाचे गुण त्यांना लाभले आहेत याचा अनेकप्रसंगी अनुभव येतो. बालकापासून वृद्धापर्यंत सर्वांनाच आधार देणं हे कार्य एखाद्या

तटस्थ वटवृक्षासारखे असल्याचे यांच्या या चरित्रग्रंथातून पहावयास मिळते. दीर्घायुरारोग्याचा वारसा त्यांना त्यांच्या वडिलांकडून लाभला हे उघड सत्य आहे. पण त्याचबरोबर त्यांनी जे सद्‌गुण संपादित केले हे त्यांच्या जीवनातील वेगळेपण दाखवितात. प्रामुख्याने ऋजुता, मैत्री, करुणा आणि उपेक्षा या मूल्यांवर श्री. ताटके यांची नितान्त श्रद्धा असल्याचे जाणवते. उपेक्षा हे मूल्य ठरविणे ही बाब अत्यंत कठीण आहे. कारण देवत्वाचे गुण ज्या व्यक्तिमत्त्वात सामावले गेले तेथे उपेक्षा ही केवळ दुर्गुणांची ! त्यांचा त्याग करणे याचा अर्थ त्या जीवनात सद्‌गुणांचा प्रभाव निर्माण होणे हे ताटके यांच्या जीवन-कार्यातून आढळून येते.

प्रस्तुत चरित्रग्रंथाचे लेखक श्री. अविनाश टिळक व त्यांना साहाय्य करणारे सौ. सुमन टिळक व श्री. अनिल जोशी यांनी श्री. रा. शं. ताटके यांचे आदर्श जीवन शब्दरूप केले ही बाब अत्यंत औचित्यपूर्ण घडली असेच म्हणावे लागेल. प्रस्तुत चरित्रग्रंथातील भाषा प्रसंगानुरूप वापरली गेली असल्याचे आढळून येते. श्री. ताटके व त्यांची सहधर्म-चारिणी सौ. लीलाबाई यांना हे दीर्घायुरारोग्य ज्या सद्‌गुणांमुळे लाभले ते सद्‌गुण चरित्र वाचकांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतील.

स्थळ : वाई (लक्ष्मणशास्त्री जोशी)

दिनांक : २० डिसेंबर, १९९३

# पुरस्कार

मुंबईच्या श्रद्धानंद महिलाश्रमाचे खरेखुरे आधार श्री. दादा ताटके यांचे चरित्र लिहून श्री. अविनाश टिळक यांनी फार मोठी कामगिरी केली आहे. श्री. ताटके हे श्रद्धानंद महिलाश्रमाचे सचिव झाल्यापासून त्यांनी अनाथ आणि परित्यक्त मुलांना आश्रय तर दिलाच परंतु समाजातील अन्यायामुळे ज्या स्त्रियांना परित्यक्ता म्हणून जीवनातून उठावे लागले अशा स्त्रियांसाठी संस्थेच्या रूपाने माहेर-पणाची सावली उभी केली. एकेकाळी संस्थेत राहणं म्हणजे कायमस्वरूपी परावलंबी जिणं स्वीकारावं लागत असे, परंतु दादांनी मुंबईच्या वेगवेगळ्या कारखान्यांतून काम मिळवून ते या स्त्रियांना दिले. त्यामुळे संस्थेत राहूनही व्यवहार शिकण्याची संधी या स्त्रियांना मिळाली, इतकेच नव्हे तर, या स्त्रियांना उत्पन्नाचेही एक साधन निर्माण झाले. नंतरच्या काळात वृद्धावस्थेत येणारी स्त्रियांपुढची दुरवस्था, विशेषतः शहरात झपाट्याने कोसळणाऱ्या कुटुंब संस्थेमुळे निराधार झालेल्या वृद्ध स्त्रियांची संख्या लक्षात घेऊन त्यांनी त्यांच्यासाठी प्रथम मुंबईला आणि नंतर वसईला वृद्धाश्रमासाठी सुरुवात केली. श्री. ताटके यांचे हे संपूर्ण सामाजिक कर्तृत्व पाहू लागले की त्यांची कष्टाळू वृत्ती, नवीन कामे घेण्याची जिद्द यांमुळे आपण चकित होतो. आणि प्रश्न सोडविण्यापेक्षा उद्‌भवू नयेत म्हणून सामाजिक चळवळ बांधण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना फार चांगले यश लाभले आहे.

श्री. ताटके यांचे जीवनचरित्र वाचताना असे लक्षात येते की अगदी बालपणापासून त्यांच्या वाट्याला धडपड आणि परिश्रम आले. वाईचे मूळ घर सोडून नोकरीकरता ते मुंबईला आले. प्रदर्शनात स्टॉल सांभाळण्याची नोकरी मिळाली असताना डॉ. राजेंद्र प्रसाद यांना गरम दूध देऊन स्वागत करण्याची युक्ती या मुलाजवळ होती. त्याचप्रमाणे मुंबईला आल्यानंतर भायखळा मार्केटमधून कांदे, बटाटे घेऊन दादरला विकण्याचेही काम त्यांनी केले. व्ही. जे. टी. आय. मध्ये नोकरी लागली आणि पहिल्याच महिन्यात घरच्या माणसांनी परस्पर लग्न ठरवून तारीखही निश्चित केली. मुलाने मुलीला पाहिले नव्हते आणि मुलीने मुलाला. जुन्या पद्धतीत लग्न ठरले आणि जुन्या पद्धतीप्रमाणे ते यशस्वी झाले. मुंबईला त्यांचा संसार सुरू झाला. परंतु पहाटेपासून रात्रीपर्यंत त्यांची धडपड काही थांबली नाही. व्ही. जे. टी. आय.मध्ये संस्थेच्या अडचणी त्यांनी निभावल्या आणि त्यामुळे नोकरीमध्येही त्यांची प्रगती होत राहिली. दादांनी फॉर्मास्युटिकल्स कंपनीत नोकरी पत्करली. दुर्दैवाने कंपनी बुडण्याचा प्रसंग आला, पण याही परिस्थितीला तोंड देऊन त्यांनी ती कंपनी पुन्हा मार्गाला लावली. दादांना विमा कंपनीच्या कामाचा अनुभव पुष्कळच होता. परंतु आपण काहीतरी समाजकार्य करत रहावे ही इच्छा त्यांना गप्प बसू देत नव्हती. त्यामुळे १९५७ साली श्री श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कार्यकारिणीवर त्यांची निवड झाल्यावर ते काम करू लागले. या काळामध्ये अनाथ मुलांना परदेशी दत्तक देण्याची चळवळ सुरू झाली. भारतातील मुले परदेशात दत्तक द्यावी किंवा नाही, याविषयी दादांची मते स्पष्ट आहेत. शक्य असेल तर मुलाला संस्थेत ठेवण्यापेक्षा घरी ठेवावे, असे त्यांचे मत आहे. आणि हे घरसुद्धा शक्य तो भारतीय समाजातील घर असावे. अगदीच नाईलाज असेल तर मुलाला परदेशी दत्तक द्यावे, पण दत्तक दिले तरीसुद्धा परदेशातही त्या मुलावर देखरेख केली जावी आणि मुलाचे पुनर्वसन चांगल्या रीतीने होईल याची काळजी घ्यावी असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

या पुस्तकात दादांनी केलेल्या कामाची माहिती आणि त्यांना भेटलेल्या महिला आणि परित्यक्त मुलांच्या कथा यांचा समावेश आहे. आपल्या सामाजिक जीवनाला पुष्कळदा मतभेदाचा शाप आहे. या शापाला दादांनाही तोंड द्यावे लागले. परंतु या मतभेदातूनसुद्धा त्यांनी कुर्ला येथील जागा, वसई येथील जागा ताब्यात घेऊन संस्था काढल्या. त्या काळात श्रद्धानंद महिलाश्रमात ताराबाई बस्तीकर आणि त्यानंतर इंदिराबाई एडके संस्थेचे काम पाहात असत. समाजकल्याण खात्याचा प्रतिनिधी म्हणून संस्थेची तपासणी करताना संस्थेतील कागदपत्रे इतकी व्यवस्थित ठेवलेली असत की पाहणाऱ्याला समाधान वाटावे. वसईचा वृद्धाश्रम सुरू झाल्यावर प्रसिद्ध अभिनेत्री शांता हुबळीकर यांची व्यवस्था झाली. अर्थात, शांताबाईंच्या स्वभावामुळे त्याबाबतीतही मतभेद जाहीरपणाने व्यक्त झाले. दत्तक कायद्याविरुद्ध त्यांनी पुष्कळच काम केले. एक त्यागी समाजसेवक अशी दादांची प्रतिमा आजही महाराष्ट्रात आहे. श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कामाबरोबर त्यांनी रामकृष्ण चॅरिटीज ही संस्था सुरू केली. श्री. अरुण किर्लोस्कर यांनी या कामी दादांना खूप मदत केली. दादांबरोबर अरुण किर्लोस्कर यांचे संबंध अगदी घरगुती. परंतु प्रतिपालनाची कल्पना शास्त्रशुद्ध रीतीने अमलात यावी याकरिता दादांनी खूप खटपट केली. केवळ पाच हजार रुपयांच्या निधीवर सुरू केलेला रामकृष्ण चॅरिटीज ट्रस्ट अनाथ मुलांच्या मागे एक नवी शक्ती उभी करत आहे याचे श्रेय दादांना आहे. या कामाचा सत्कार करताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले होते, "काल शेळीमागे धावणारी मुले दादांमुळे आज शाळांमागे धावत आहेत."

१० जून १९३४ रोजी ते मुंबईत आले आणि ४ ऑगस्ट १९७५ ला नोकरीतून निवृत्त झाले. अत्यंत निर्व्यसनी अशा दादांना व्यसन फक्त संस्थेच्या सेवेच आहे. दादा परदेशी जाऊन आले पण तिथेसुद्धा चैन करण्यापेक्षा तेथील सामाजिक कार्य त्यांनी फार तपशिलवार पाहिले. संस्थेतून स्वेच्छेने निवृत्त होताना दादांनी जे पत्र पाठवले ते फार बोलके आहे. आपण केलेल्या कामापासून आपणाला वेगळे होण्याचा प्रसंग आला की मनाला होणाऱ्या यातना त्या पत्रात स्पष्ट होत

आहेत. दादा ताटके यांचा मुंबईत फार मोठा सत्कार झाला. त्या वेळी दादांची एक मानसकन्या बोलली, दादांनी आपल्याला मोठे कसे केले, हे सांगता सांगता भावनावेगाने ती गहिवरून गेली. तिचा कंठ दाटून आला आणि ती काही न बोलता तिच्या डोळ्यांवाटे अश्रू वाहू लागले. त्या वेळी मी म्हणालो की, 'दोन-तीन तास बोलूनसुद्धा आम्हाला जे सांगता आले नसते ते या आश्रमकन्येच्या अश्रूंनी दोन मिनिटांत केले आहे.' आज दादा निवृत्त झाल्यानंतर या पुस्तकाच्या रूपाने त्यांनी केलेल्या कामाचा एक आढावा प्रसिद्ध होत आहे. ही फार चांगली गोष्ट आहे. या पुस्तकामुळे ज्यांना या क्षेत्रात काम करायचे आहे त्यांना स्फूर्ती मिळेल अशी मला खात्री आहे. या पुस्तकाचे निवेदन केल्याबद्दल श्री. दादा ताटके आणि लेखन केल्याबद्दल श्री. अविनाश टिळक यांना मी आणि वाचक मनापासून धन्यवाद देतील.

**डॉ. शरश्चंद्र गोखले**

# " मनोगत "

तो दिवस मला अजून आठवतोय. १९९० चा जुलै महिना. मी टॉयफॉईडच्या आजाराने दोन महिने झोपून होतो. मित्र म्हणविणाऱ्या एका माणसाने केलेला दगाफटका, घरातील काही कौटुंबिक पेचप्रसंग, यांमुळे मी मनाने कडवट झालो होतो. अशा वेळी आजारपणात दादा मला बघण्यासाठी म्हणून आले. सामाजिक जबाबदाऱ्या कमी केल्याने निवान्तपणे बसले. त्या वेळी त्यांच्या बोलण्याने माझ्या मनाची मरगळ पार पळून गेली. बऱ्याच वेळा गढूळ पाणी प्राशन करावयास लागलेल्या एखाद्या तृषार्ताला स्वच्छ निर्मळ असे झऱ्याचे पाणी प्यायला मिळाल्यावर किती आनंद होईल ? तसा आनंद मला दादांच्या भेटीने झाला. तशी त्यांच्याशी कौटुंबिक ओळख होती. पण अगदी जुजबी. त्यांच्या गप्पांतून त्यांची समाजाविषयीची तळमळ पाहून त्याच समाजाचा घटक असलेल्या मला स्वतःची क्षुद्रता जाणवली. निदान या 'सद्‌गृहस्था'विषयी काही लिहावे असे मनाने फार घेतले. माझ्या पत्नीचाही तसा आग्रह होता. याच सुमारास तिची एक मैत्रीण सौ. अलका मुतालिक दादांचे एक भाषण ऐकून फार प्रभावीत झाली होती. दादांचे चरित्रच लिहिले पाहिजे ही मूळ कल्पना तिची.

आम्ही दादांच्या कुटुंबियांपुढे ही कल्पना मांडली. चरित्र लिहिण्याइतके काही दादा महान नाहीत ही त्यांची नम्रतेची भावना. कदाचित सर्वजण आमच्याविषयीही साशंक असावेत; कारण जरी हेतू प्रामाणिक होता तरी

शेवटपर्यंत तडीला नेण्याइतपत आमची कुवत होती का ? सौ. अलका तशी लिखाणाच्या कामात नवखी. मी प्रासंगिक लिखाण वृत्तपत्रातून करी. काही कथांना पारितोषिके मिळाली होती तरी पिंड ललित-लेखनाचा. चरित्रलेखनाचा अनुभव शून्य. त्यामुळे कुठल्या विश्वासावर ताटके कुटुंबियांनी परवानगी द्यायची ? शेवटी हस्तलिखित तर लिहून पाहू, बाकीच्या गोष्टी नंतर. एवढ्या मुद्द्यावर एकमत झाले.

पडत्या फळाची आज्ञा घेऊन कामाला लागलो. पण सौ. अलका श्रीसमर्थ संप्रदायाच्या कार्यात एवढी गुरफटली की सर्व लिखाणाची जबाबदारी माझ्यावरच आली. अनेकदा हे काम आपल्या कुवतीबाहेरचे आहे असे वाटून माझा चरित्रलेखनाचा निश्चय डळमळीत होई. अशा वेळी माझ्या पत्नीने धीर देऊन अक्षरश: मला घोड्यावर बसविले. पण काळजीने लगाम मात्र स्वत:च्या हाती ठेवला !

दादांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात मी एवढा पडलो की ते प्रेम हीच माझी शक्ती, प्रेरणास्थान बनले. हस्तलिखित तयार झाले. अनेकांनी बघितले. आवडले. पण प्रकाशनाचे काय ? दादा स्वत: प्रसिद्धीपराङ्मुख आणि मी भिडस्त स्वभावामुळे ‘माझे एवढे पुस्तक प्रकाशित करा हो’ असे कसे कोणाला म्हणणार ? अशा वेळी धावून आले ते वाईचे पत्रकार अनिल जोशी. त्यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. कै. लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्रस्तावना मिळविली. (शास्त्रीजींच्या दु:खद निधनाच्या दहा महिने आधीची ही घटना.) अनिलजींचे काका, सुप्रसिद्ध लेखक श्री. रामभाऊ जोशी यांनी पुस्तकावर योग्य ते संस्कार केले. डॉ. शरश्चंद्र गोखले यांनी पुरस्कार लिहिला. दादांना पितृस्थानी मानणाऱ्या सौ. अचला जोशी घरचे कार्य समजून आमच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या. थोडक्यात काय, ही सर्व “जोशी मंडळी” पाठीशी उभी नसती तर पुस्तक प्रकाशनाचा योग खडतर होता ! दादांचे प्रेम या समान धाग्यानेच आम्ही सर्वजण एकत्र गुंफले गेलो. हस्तलिखित वाचून डॉ. मकरंद ताटके व त्यांच्या पत्नी सौ. संध्या ताटके त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध लेखक श्री. वि. आ. बुवा, ब. ल. वष्ट, दादांचे मेहुणे डॉ. अरविंद प्राणी, सौ. माधुरी शेवडे या सर्वांनी बहुमोल सूचना

केल्या. सौ. विनिता ऐनापुरे यांनी तर आपलेपणापोटी चक्क हातात पेन्सिल घेऊन ऱ्हस्व-दीर्घापासून सर्व तपासून दिले. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. श्री. अरुण किर्लोस्कर यांनीही काही मौलिक सूचना केल्या.

आणि अनिल जोशी ? पुस्तकाच्या प्रूफ तपासणीपासून तो वाईच्या प्राज्ञ प्रेसमधून त्याची सुबक छपाई करण्यापर्यंतच्या प्रक्रियेत किती अनंत अडचणी असतात ? पण त्यांची मेहनत प्रचंड ! ( दादांच्याच तालमीत तयार झालेली ही मंडळी.) तेव्हा अनिल जोशींचे आभार मानणे वेडगळपणाचेच ठरेल. आपलेच पुस्तक हीच त्यांची सदोदित भावना. त्यांच्या मित्रत्वाचा लाभ झाला ही यानिमित्ताने झालेली माझी मोठीच कमाई.

पुस्तक लिहिताना अनेकांची पत्रे आली. दादांविषयी लिखाण असलेली अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिके, धर्मभास्कर, समाजस्वास्थ्य यांसारखी मासिके, श्रद्धानंद महिलाश्रम, रामकृष्ण चॅरिटीजचे अहवाल, दादांचे सर्व कुटुंबीय-आप्तेष्ट या सर्वांचा मला अतिशय उपयोग झाला. इच्छा असूनही स्थळाभावी सर्वांचा नामोल्लेख करता येत नाही म्हणून वाईट वाटते. पण या सर्वांचे मी हार्दिक आभार मानतो.

" दादा ताटके " हे व्यक्तिमत्त्व मला स्वत:ला जेवढे भावले त्याच्या पन्नास टक्केच मी कागदावर उतरवू शकलो ! यात माझ्या लेखन-सामर्थ्याचा दोष आहेच पण ज्या प्रमाणात दादांविषयीचा ' फीड बॅक ' मला अपेक्षित होता त्या प्रमाणात मी मिळवू शकलो नाही याची खंत वाटते ! पुष्कळ माणसे संकोचापोटी संपूर्ण माहिती देऊ शकली नाहीत. दादा स्वत: अनेकांनी आग्रह करूनही आत्मचरित्र का लिहीत नाहीत याचे उत्तर मला आपोआप मिळाले. तसे त्यांनी केले तर अनेक रहस्ये त्यांना उकलून दाखवावी लागतील आणि मग त्यात अनेक लब्ध-प्रतिष्ठितांचे बुरखे फाटतील ! असे असूनही त्यातला कोणताच भाग न आणता शक्य तितके साधे, सरळ व सोपे चरित्र वाचकांसमोर आणायचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. चिकित्सक बुद्धीने चरित्र न लिहिता एका विशिष्ट भक्ती-

पोटी, दादांविषयी वाटणाऱ्या आदरापोटी हे लिखाण घडले आहे. त्यामुळे चरित्रनायकास झुकते माप दिले गेले असल्यास तो दोष केवळ लेखकाचा. मात्र त्याला मोठे करताना दुसऱ्यांना क्षुद्र ठरविण्याचा प्रयत्न केलेला नाही एवढे मात्र प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते.

विकृती आणि विकार यांनी व्यग्र असणाऱ्या आजच्या समाजासमोर दादांसारख्या निःस्वार्थी व्यक्तीचे चरित्र मांडणे म्हणजे एक प्रकारचे 'अरण्यरुदनच' आहे. पण भवभूतीचा दुर्दम्य आशावाद मनी बाळगून केव्हा तरी समाजमनाला "मांगल्याचा शोध" घेण्याची निकड भासेल तेव्हा दादांसारख्या व्यक्तीची आठवण होईल. एवढीच माफक अपेक्षा ठेवून हे पुस्तक वाचकांच्या चरणांवर ठेवत आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

१ ऑक्टोबर १९९४ — अविनाश टिळक

## आनंदाचा अनुभव

'श्री यशोदा प्रकाशन', 'आधारवड' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन करीत आहे. हा योगायोग आहे. श्री यशोदा प्रकाशनाचा प्रारंभ चरित्र-ग्रंथाच्या प्रकाशनाने झाला. हे वैशिष्टय सांभाळले आहे. 'आधारवड' चरित्र– ग्रंथ प्रकाशनाने या परंपरेत मोलाची भर पडली आहे.

योगायोग म्हणता येईल अशाच घटना या ग्रंथप्रकाशनाच्या संदर्भात घडल्या.

दादा म्हणून सर्वपरिचित असलेले चरित्रनायक श्री. रामकृष्ण उर्फ बाळासाहेब ताटके मुळचे वाईकर. अर्धशतकाहून अधिक काळ मुंबईतील रहिवासी. कर्मभूमी मुंबई. चरित्र-लेखक श्री. अ. वि. टिळक डोंबिवलीचे रहिवासी म्हणजे मुंबईचेच. यांनी चरित्रलेखन पूर्ण केले आणि प्रकाशनाच्या सोपस्कारा-साठी त्यांनी ते श्री. अनिल जोशी यांच्याकडे पाठविले.

त्यावर प्रकाशनपूर्व काही संस्कार करावेत काय याचा सल्ला घेण्यासाठी हे हस्तलिखित पुणे येथे श्री. रामभाऊ जोशी यांच्याकडे दाखल झाले. श्री. दादासाहेब ताटके आणि श्री. रामभाऊ जोशी यांचा चाळीस– पंचेचाळीस वर्षांचा जुना स्नेह. त्यामुळे हे हस्तलिखित सल्लामसलतीसाठी आले असावे. त्या संबंधात चर्चा होत असताना श्री यशोदा प्रकाशनने 'आधारवड' चे प्रकाशन करावे असा मनोदय श्री. अनिल जोशी यांनी व्यक्त केला. योग जमून आला !

यात आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. दादांचे वडील वे. मू. शंकरभाऊ ताटके यांचा आणि जोशी कुटुंबाचा

किमान पन्नासहून अधिक वर्षांचा जिव्हाळ्याचा घरोब्याचा संबंध.

ताटके कुटुंबातील श्रीमंत मनाचे निरपेक्ष समाजसेवक आणि शेकडो निराधारांचे उद्धारकर्ते श्री. दादासाहेब ताटके यांच्या या चरित्रग्रंथ प्रकाशनाने हे ऋणानुबंध बळकट होत आहेत याचे समाधान या प्रकाश-कार्यात आहे. आनंद आहे.

या आनंदात अनेकांचा सक्रिय सहभाग आहे. दी प्राज्ञ प्रेसने नियोजित वेळेत ग्रंथाचे मुद्रण, छपाई पूर्णत्वास नेली. चित्रकार श्री. शिवाजी सुतार यांनी आकर्षक मुखपृष्ठ तयार केले. मुखपृष्ठाची विविध रंगातील सुबक, आकर्षक छपाई व्ही. जोशी पुणे यांनी करून 'आधारवड' चे बाह्यांग संपन्न बनविले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पूर्वीच लिहून दिलेली प्रस्तावना आणि डॉ. शरश्चंद्र गोखले यांचा पुरस्कार या ग्रंथाला अलंकार लाभले. हे उचित घडले.

श्री. दादासाहेब ताटके यांनी शेकडो नव्हे तर हजारो निराधारांशी लोभ जोडला. माणूस म्हणून त्यांना जीवनात उभे केले. संसारी बनविले. या साऱ्यांच्या मनाला 'आधारवड' प्रशांत सावली देईल. समाजसेवेची प्रेरणा देईल.

सुजाण वाचकांनी, समाज सेवकांनी 'आधारवड' संग्रही ठेवले पाहिजे. स्वाभाविक रीत्या हे घडावे अशी अपेक्षा आहे. वाचक या उपक्रमांत सक्रिय सहभागी होऊन श्री. दादासाहेबांच्या निरपेक्ष समाजसेवेचा आदर करतील असा विश्वास आहे.

गुरुवार
आश्विन शुक्ल १०
विजयादशमी
शके १९१६, पुणे

सौ. सुमन जोशी

## मी कृतज्ञ आहे.

ती. दादांच्या जीवनाचा पट अनेक रंगांनी रंगला आहे. त्यामध्ये अनेक प्रसंग. अनेक घटना, अनेक व्यक्ती, अनेक संस्था या सर्वांना बरोबर घेऊन दादांनी केलेली ही वाटचाल आहे. त्यांचा हा प्रवास अनुसरण्यास अत्यंत कठीण पण अत्यंत मार्गदर्शक आहे. त्यांच्या आचारविचारांचा मागोवा घेणे ही बाब सहजासहजी कवेत न बसणारी अशीच आहे. त्याचे कारण असे की दादांच्या कार्याचा व त्यामागील विचारांचा जो वेग आहे तो पकडणे ही गोष्ट अत्यंत कठीण.

पण हे सर्व साध्य केले ते माझे स्नेही व दादांचे चहाते श्री. अविनाश टिळक यांनी. सुमारे एक वर्षभर श्री. टिळक यांनी या चरित्रग्रंथासाठी अहोरात्र कष्ट केले. दादांचे कार्य आणि विचार व भावना यांना शब्दरूप केले. त्यामध्ये त्यांना साहाय्य झाले ते त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. सुमन टिळक यांचे. हे दांपत्य दादांच्या कार्याने प्रभावित झालेले. उभयतांस धन्यवाद देण्यास शब्द अपुरे आहेत.

दादांच्या या प्रवासात साथ करणाऱ्या त्यांच्या जीवनसाथी सौ. लीलाताई यादेखील या यशस्वी कार्याच्या मानकरी आहेत. जीवनाची खडतर वाट चालणारे हे दोन देह एकाच मनाचे आहेत म्हणूनच हे सर्व शक्य झाल. त्यांच्याबरोबर सारं कुटुंब समरसतेनं साथ देत राहिलं हे नाकारता येत नाही.

'आधारवड' या चरित्रग्रंथाचे हस्तलेखन पूर्ण झालं चि. डॉ. मकरंद व सौ. संध्या यांनी त्याचं वाचन केलं.

मुद्रणास अनुमती दिली. श्री. अरुण किर्लोस्कर यांनी काळजीपूर्वक वाचन करून सूचना दिल्या आणि मुद्रणप्रत सिद्ध झाली. श्री. रामभाऊ जोशी या सिद्धहस्त चरित्रलेखकाने या हस्तलिखितास चरित्रग्रंथाचा घाट दिला. सौ. सुमन जोशी यांनी श्री यशोदा प्रकाशनमार्फत या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनास अनुमती दिली. याची केवळ कृतज्ञता व्यक्त करणे एवढेच हाती आहे. 'आधारवड' या चरित्रग्रंथाचे सुबक मुद्रण करणारे श्री. ग. दीक्षित यांनी योग्य साथ दिली आणि माझे स्नेही श्री. शिवाजीराव सुतार यांनी मुखपृष्ठापासून आतील रेखाचित्रापर्यंत सर्व काम आत्मीयतेने केले आणि हे चरित्र आकारास आले. डॉ. शरश्चंद्र गोखले यांचा दादांशी असलेला सहवास दीर्घकाळचा आहे. दादांचे कार्य व प्रेरणा यांचा डॉ. गोखले यांना परिचय आणि आदर असल्यानेच त्यांनी या चरित्रग्रंथासाठी पुरस्कार लिहिला आणि ग्रंथास वेगळेपण आणले.

मला धन्यता व्यक्त करायची आहे ती नियतीची. आदरणीय तर्कतीर्थ शास्त्रीजी यांनी या चरित्रग्रंथाचे हस्तलिखित अत्यंत आवडीने वाचले आणि आशीर्वादाचे शब्द लिहिले. ही घटना डिसेंबर १९९३ मधील. या ज्ञानतपस्वीच्या हस्ते या चरित्रग्रंथाचे विमोचन व्हावे अशी मनापासून इच्छा होती पण नियतीला हे मान्य नव्हते. आज दादांच्या कार्याबद्दलचे शास्त्रीजींचे शब्द आणि भावना जवळ आहेत एवढेच.

अखेर मागणं एकच. ती. दादा शतायुषी व्हावेत. आणि सौ. आजी (सौ. लीलाबाई) सावलीसारख्या त्यांची सोबत करत रहाव्यात.

**अनिल जोशी–वाई**

# अनुक्रम


* श्री क्षेत्र वाई
* जन्मभूमी ते कर्मभूमी
* कलह जीवनाचा
* मानवतेचे मंदिर
* दत्तक विधान
* श्री रामकृष्ण चॅरिटीज
* निवृत्ती व नंतर
* संस्थांचा संस्थानिक
* दादा आणि कुटुंबीय
* जीवेत् शरदः शतम्

मातोश्री




सौ. अंबिकाबाई

वडील



वेदमूर्ती श्री. शंकर भाऊ

जीवन साथी



सौ. लीलाबाई ( पत्नी ), श्री. दादासाहेब

श्रद्धा





पूज्य स्वामी श्रद्धानंदजी



अंधळे मूल दत्तक घेतले

आश्रमात उमलणाऱ्या कळ्या



जीवनसुखाचे धागे गुंफणाऱ्या मानसकन्या



# आधारवड

## १.

श्री क्षेत्र वाई !

सातारा जिल्ह्यातील वाईची ख्याती दक्षिणेची काशी अशी आहे. कृष्णा नदीच्या दोन्ही तीरांवर विस्तारलेले हे एक तालुक्याचे शहर. भाविक जन कृष्णा हीच गंगा मानतात ! हा सारा आसमंत वाईचे खोरे या नावाने प्रतिष्ठित आहे. पांडवगड, वैराटगड, चंदनगड, वंदनगड यांनी वेढलेला हा हिरवागार, प्रसन्न आणि प्रशांत परिसर. पश्चिमेला मेणवली येथे नाना फडणवीसांची पेशवेकालीन भव्य देखणी वास्तू. जवळच भोगाव येथे कविश्रेष्ठ वामनपंडित यांची समाधी. त्यापलीकडे धौम्य मुनींचे धोम हे क्षेत्र. नृसिंह मंदिर आणि नवनाथ मंदिर. धोम धरणाचा प्रचंड जलाशय. तेथील डोंगराची चढण चढली की पांचगणी आणि महाबळेश्वर हा थंड हवेचा निसर्गरम्य परिसर. छत्रपती शिवरायांनी भवानी मातेची प्रतिष्ठापना केलेला किल्ले प्रतापगड. या किल्ल्याच्या पायथ्याशी अफझलखानाचा वध झाल्यानंतर छत्रपतींच्या मावळ्यांनी या किल्ल्याच्या उंच बुरुजावर रोवलेले अफझलखानाचे शिर पाहिले.

क्षेत्र महाबळेश्वरच्या पवित्र भूमीत उगम पावलेली कृष्णा नदी धोमच्या परिसरात डोंगरावरून खाली झेप घेते आणि वाई परिसर पवित्र आणि संपन्न बनवून संथपणे पुढील प्रवासाला निघते. वाईचा कृष्णाकाठ हा विलक्षण प्रेक्षणीय

आहे. कृष्णाकाठावर वेगवेगळ्या नावाचे सात फरसबंद घाट बांधलेले आहेत. यांतील काही घाट पेशवेकालीन सरदार रास्ते यांनी बांधल्याची इतिहासात नोंद आहे. प्रत्येक घाटावर मंदिरे आहेत. वाईत प्रवेश करताना प्रथम दर्शन घडते ते कृष्णामाईचे आणि मंदिरांचे. महागणपती, काशी विश्वेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, भद्रेश्वर मंदिर इत्यादींचे विशेष आकर्षण. दर बारा वर्षांनी येथील मंदिरात साक्षात गंगा अवतीर्ण होते अशी एक आख्यायिका आहे. गंगा अवतीर्ण होण्याच्या 'कन्यागत' या वर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून शेकडो कुटुंबे दर्शन आणि गंगापूजनविधीसाठी वाईला धाव घेतात. शेकडो वर्षांचा हा परिपाठ आहे. सात घाटांवरील कृष्णामाईचे उत्सव आणि त्या वेळी हजारो लोकांना उपलब्ध करून देण्यात येणारा भोजनप्रसाद, कथा-कीर्तन हे या क्षेत्राचे आणखी एक आकर्षण.

वाईला पौराणिक महत्त्व आहे तसे ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांना आणि त्यांच्या राजसत्तेला गिळंकृत करण्यासाठी विजापूरच्या आदिलशहाचा महाकाय आणि शूर सरदार अफझलखान पैजेचा विडा घेऊन विजापूरहून निघाला असताना त्याने आपल्या-बरोबरच्या प्रचंड सैन्याचा तळ वाई येथेच ठेवला होता. छत्रपतींच्या मध्यस्थ वकिलाची आणि खानाची बोलणी वाई तळावरच झाली. खानाने भेटीसाठी जावळीच्या खोऱ्यात प्रतापगडच्या पायथ्याशी यावे हा छत्रपतींचा मनसुबाही वाई तळावरच सिद्ध झाला. इ. स. १६५९ ची ही घटना. खान प्रतापगडच्या पायथ्याशी पोहोचल्यावर त्याची दगाबाजी त्याच्या अंगलट आली आणि छत्रपतींनी खानाचे शिरकाण केले. त्या वेळी वाई खोऱ्यात दबा धरून राहिलेले छत्रपतींचे सरनौबत नेताजी पालकर यांनी वाई तळावरील खानाच्या सैन्याची संपूर्ण धुळदाण उडवून प्रचंड लूट आणि युद्धसाहित्य याचा कबजा केला. 'प्रतापगडचे युद्ध' या पुस्तकात कॅप्टन मोडक यांनी लष्करी दृष्टचा त्याचे उत्तम विवेचन करून ठेवले आहे. अज्ञातवासी या कवीची 'वाईची लढाई' ही स्फूर्तिदायी कविता या मोहिमेचेच वर्णन करते.

वाईचे पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व हे असे सर्वमान्य आहे.

त्याचबरोबर वैदिकांची, विद्वानांची, तपस्वींची नगरी अशी ख्याती वाईने संपादन केलेली आहे. देशभक्तांची भूमी असाही लौकिक आहे. वाई येथील प्राज्ञपाठशाळा म्हणजे साक्षात सरस्वतीच्या निवासाचे मंदिर. प्रज्ञानंद सरस्वती या आपल्या गुरूंच्या प्रेरणेने तपस्वी नारायणशास्त्री मराठे यांनी १९१६ मध्ये प्राज्ञपाठशाळा सुरू केली. नारायणशास्त्री म्हणजेच नंतर नामकरण झालेले केवलानंद सरस्वती. कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे केवलानंद सरस्वती हे गुरू. केवलानंदांच्या सान्निध्यामुळेच ज्ञानयोगी तर्कतीर्थांचा महाराष्ट्राला आणि भारताला लाभ झाला. तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळेचा लौकिक संपूर्ण देशात आणि सातासमुद्रांपलीकडे आपल्या विद्वत्तेने आणि कार्याने पोहोचविला आहे. प्राज्ञपाठशाळेशेजारी ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांची समाधी आहे. या मंदिराच्या प्रांगणातच 'मराठी विश्वकोश' कार्यालय आहे. विश्व-कोशाचे आणि धर्मकोशाचे सर्व खंड वाई नगरातच निर्माण होत आहेत. महात्मा गांधी यांचा सांस्कृतिक वारसा जपणारे आचार्य विनोबा भावे हे वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी असून वेद-वेदांग, दर्शनवाङ्मय यांचा अभ्यास, व्यासंग, अध्यात्मसाधना त्यांनी वाईत कृष्णाकाठी अस-णाऱ्या प्राज्ञपाठशाळेतच केली. वाईची वैदिक परंपरा कमी कमी होत राहणे हा बदललेल्या काळाचा महिमा आहे. परंतु एक वस्तुस्थिती मान्य करावी लागते की एकोणिसाव्या शतकात किंवा विसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात ज्यांनी विद्वान-व्यासंगी असा लौकिक प्राप्त करून घेतला, त्यांतील बव्हंशी या ना त्या रूपाने वाईच्या प्राज्ञपाठशाळेशी ज्ञानसंपादनासाठी निगडित होते. यांतील काही ज्ञानोपासक, देशभक्त, समाजसेवक म्हणून मान्यता पावले. धार्मिक कर्मकांड, यज्ञयागविधी यांतील वंदनीय अध्वर्यू म्हणून महाराष्ट्राने अनेकांचा स्वीकार केला. त्याग, सेवा, नीती, धर्माचार, पावित्र्य याचे आधारवड वाईच्या सकस भूमीत ठायी ठायी उभे असलेले आढळतात.

० ० ० ०

या तीर्थक्षेत्री वेदमूर्ती, याज्ञिकी ब्रह्मवृंद बहुसंख्येने असायचे. भिक्षुकी

व्यवसायाला अनुकूल वातावरण होते. अन्य ठिकाणांहून अनेक धर्मश्रद्ध मंडळी गंगास्नान आणि धर्मकृत्ये यांसाठी वाईक्षेत्री नेहमीच येत असत. मोठ्या शहरांतील धनिक सहस्रभोजन घालण्याचे पुण्य वाईत सहस्र-भोजनाच्या पंक्ती घालून संपादन करीत असत. तसा तो स्वस्ताईचा काळ होता. दूध, तूप, भाजीपाला, फळफळावळ यांची रेलचेल असा-वयाची. गावात मोठमोठे वाडे, मंदिरे यांमुळे पंक्ती बसवण्यास मुबलक जागा होती. कष्टास तयार असणारे अनेक हात होते.

अशा पवित्र आणि शुचिर्भूत गावात वेदमूर्ती याज्ञिकी शंकरभटजी ताटके भिक्षुकीच्या आधाराने संसार करीत असत. सौ. अंबिकाबाई या त्यांच्या गृहदक्ष पत्नी. शंकरभटजी ऊर्फ भाऊ आणि सौ. अंबिकाबाई यांचं घर म्हणजे गोकुळ होतं. सतेज गौरवर्णी सौ. अंबिकाबाई यांच्या मुखावरील पतिव्रतेचं तेज आणि प्रसन्नता यांतून या दांपत्याच्या सुखाच्या संसाराचं दर्शन घडायचं. घराच्या अंगणावरून घराची शोभा आणि वैभव समजतं अशी जुनी म्हण आहे. भाऊ ताटके यांच्या घराचं अंगण या म्हणीची ग्वाही देणारं होतं. दोघेही पतिपत्नी कमालीचे आतिथ्यशील आणि हसतमुख. याच्या जोडीला भाऊंच्या मुखावरील पवित्र आचरणाचं, शुचिर्भूतपणाचं आणि विद्या-व्यासंगाचं गांभीर्य पाहिल्यानंतर त्यांच्या भेटीसाठी येणारा नतमस्तक झाला नाही तरच नवल ! अंगण ओलां-डून घराच्या ओसरीत गेलं की तेथे सतत वर्दळ दिसायची. नातलग पाहुण्यांचा, येणाऱ्या-जाणाऱ्यांचा राबता मोठा. भोजनासाठी कोणाची ना कोणाची नेहमी वर्दी.

भाऊंचा संसार असा होता. खाणारी तोंडे पुष्कळ पण कमवणारे कोणी नाही. एकटे शंकरभटजी. त्यांची भिक्षुकी सुरू होती. परंतु याज्ञिकीचे काम संपवून घरी परत येताना पंच्याच्या गाठोड्यात असायचे ते चार-सहा मुठी तांदूळ, गहू, सुपाऱ्या, नारळ एवढेच. कनवटीला फार तर चार–दोन आणे दक्षिणा. सत्यनारायण असो, अभिषेक असो किंवा श्राद्ध असो गुरुजींना चार आणे दक्षिणा द्यायची हा सर्रास परिपाठ होता. गरीब असला तरी चार आणे आणि गर्भश्रीमंत असला तरीही दक्षिणा चार आणेच. मुंज, लग्न असेल तर मात्र पाचपासून दहा

रुपयांपर्यंत दक्षिणा असायची. यामुळे भिक्षुकांच्या घरात सुपाऱ्या, खारका, खोबऱ्याचे तुकडे या वस्तूंनी तांबे भरलेले असले तरी धान्याच्या डब्यांत नेहमीच खडखडाट. दूध-दुभतं, भाजीपाला, धान्य यांची स्वस्ताई असली तरी खरेदीसाठी रोख पैशांची चणचण ही नित्याची बाब असायची. या स्थितीतही ताटके दांपत्य आपला संसार नेकीने आणि नेटकेपणाने करीत होते.

ताटके यांच्या घरात संसारवेलीवर फुले फुलत होती. या दांपत्याने सलगपणे सहा कन्यांना जन्म दिला. संसार आनंदात सुरू असला तरी त्यामध्ये अद्याप पुत्रजन्माच्या आनंदाची भर पडलेली नव्हती. त्यासाठी देवाला साकडं घातलं जात होतं.

प्रत्येक कन्येच्या जन्मानंतर ताटके दांपत्याची प्रार्थना देव ऐकत असेलही. परंतु देवाचं पंचांग आणि वेळापत्रक उमजणं हे संसारी जीवाच्या आवाक्याबाहेर नेहमीच राहिलेलं आहे. संसारी माणसाला मिळतं ते साकडं घातल्याचं समाधान. त्या समाधानात राहून तो संसाराचा गाडा रेटीत राहतो. परंतु देवाला घालण्यात येणारं साकडं किंवा देवाला करण्यात येणारी प्रार्थना याबाबत जाणकार असं सांगतात की देवाच्या घरी देर– म्हणजे उशीर असेल पण अंधार नाही. त्याच्या वेळापत्रकानुसार तो तुम्हाला प्रकाश दाखवतो.

ताटके दांपत्याला या प्रकाशाचे दर्शन ४ ऑगस्ट १९१५ रोजी त्यानं घडवलं. सहा कन्यांच्या जन्मानंतर ताटके कुटुंबाला पुत्रजन्माचा आनंद मिळाला. वंशाला दिवा मिळाला. या बालकाचे नामकरण ‘ रामकृष्ण ’ असे झाले. हेच आपले चरित्रनायक.

ईश्वरी संकेतानुसार या बालकाचा जन्म झालेला असल्याने स्वच्छ, सेवाभावी आणि आदर्श जीवनप्रवासासाठी परमेश्वराने जन्मतःच तशी शिदोरी या बालकाच्या स्वाधीन केलेली असावी. त्यांचा सारा जीवनप्रवास टप्प्याटप्प्यांवर हेच दर्शवितो. या बालकाच्या बारशापासून, नामकरणापासूनच त्याच्या चमत्कृतिपूर्ण जीवनाचा प्रवास सुरू झालेला आढळतो.

त्याचं असं झालं ! बाळाचं बारसं झालं. मोठ्या कौतुकानं ‘ रामकृष्ण ’

असं नामकरण झालं. बाळाची रीतसर वाढ सुरू झाली. ही वाढ होत असताना आश्चर्य असं की, बाळाच्या डाव्या गालावर एक केस उगवला आणि वाढू लागला. तोही पांढरा केस ! तातडीचा उपाय म्हणून केस छाटून टाकला. थोडे दिवस उलटल्यावर पहावे तर गालावर पांढरा केस उभा ! हा काय प्रकार आहे या काळजीने सर्वांना वेढल्याने काही अन्य उपचार सुरू झाले. देवदेवतार्चन झालं. घरगुती अन्य उपाय झाले तरी पांढऱ्या रंगाच्या केसाची वाढ थांबली नाही. घरात चिंतेचे वातावरण वाढत राहिले. कोणत्याच उपायाला हा उपटसुंभ पांढरा केस दाद देत नाही असे पाहून घरातील वयोवृद्धांनी बाळाचे पुन्हा बारसे करण्याचा घाट घातला. सहा कन्यांच्या जन्मानंतर नवस-सायासाने लाभलेला हा बालक असल्याने साग्रसंगीत पुन्हा बारसे झाले. या दुसऱ्या बारशाच्या वेळी बाळाचे नामकरण ‘ बाळकृष्ण ’ असे झाले. आश्चर्य असे की या दुसऱ्या नामकरणानंतर डाव्या गालावरील पांढऱ्या रंगाचा केस लुप्त झाला ! त्याचा पुन्हा कधी ठावठिकाणा समजला नाही. कोणीतरी जणू काही मुळापासून उपटून त्याला फेकून दिला ! या दुसऱ्या बारशाने आणि नामकरणाने घडले असे की, कागदोपत्री नाव रामकृष्ण. बाळकृष्णाचा झाला बाळासाहेब, बाळू. सर्वतोमुखी झालेलं नाव दादा ! पुढच्या आयुष्यात हा त्यावेळचा लहानगा बाळू किंवा वहिणींचा दादा वयानं, कर्तृत्वानं, कीर्तीनं आणि विशुद्ध आचरणानं मोठा झालेला असला तरी या दादांचं खरं मोठेपण— हे वडीलबंधूला दादा असं संबोधण्यात जो आशय आहे ते मोठेपण— यांना लाभलं ही आयुष्याची मोठी कमाई आहे.

शंकरभाऊंच्या प्रपंचात पुत्राची भर पडून आनंदाला बढती मिळाली असली तरी द्रव्यप्राप्तीची बढती झालेली नव्हती. उगवणारा प्रत्येक दिवस हा भिक्षुकीच्या कष्टाचा आणि कनवटीच्या काळजीचाच असायचा. त्यावर उतारा म्हणून घराच्या परसदारी ते भाजीपाला करीत असत. वडिलोपार्जित एक-दोन बिघे शेत होतं. शेती कुळाकडे असायची. या कुळाला कोणे एके काळी कर्जाऊ रक्कम देण्यात आली होती. मुद्दलाची परतफेड करणं कुळाला शक्य नसलं तरी तो दरवर्षी

एक-दोन गोणी भात, कमीअधिक ज्वारी-बाजरी आणून देत असे. पूर्वीची माणसं प्रामाणिक असायची. कृतज्ञ असायची. शंकरभाऊंनी एक-दोन गायी-म्हशी पाळल्या होत्या.

त्यामुळे घरात दूध-दुभत्याची वाण नसायची. भिक्षुकीतून मिळणारं आणि कुळाकडून मिळणारं धान्य यामुळं चूल थंडावण्याचा प्रश्न नव्हता. चणचण भासत असे ती रोख पैशांची. कुटुंब खाऊनपिऊन तसं सुखी वाटत असलं तरी ते मर्यादित सुख होतं. दावणीला गायी-म्हशी असल्यानं त्यांचा चारा, खुराक यांचा खर्च असायचा. त्यासाठी शंकरभाऊ पोतं भरून गाजरं खरेदी करायचे. त्या स्वस्ताईच्या काळात चार–सहा आण्याला पोतं भरून गाजरं मिळायची. गायी-म्हशींना हा गाजर-खुराक तीन-चार दिवस पुरत असे. त्यामुळे दुधाचा पुरवठा मनाजोगा व्हायचा. नदीकाठ हा हिरवळीनं भरलेला असल्यानं जनावरांच्या चाऱ्याची सोय व्हायची. रामकृष्ण थोडा मोठा झाला, शाळेत जाऊ लागला तेव्हा गायी-म्हशींना नदीकाठी चरावयास नेण्याचे काम शंकरभाऊंनी त्याच्याकडं दिलं. म्हशी नदीकाठी चरून झाल्यावर नदीच्या पाण्यात बैठक मारण्यासाठी गेल्यावर त्यांचं मनसोक्त डुंबणं होई. तोवर रामकृष्णाचा नदीकाठी बसून अभ्यास व्हायचा.

रामकृष्णाचं प्राथमिक शिक्षण सुरू झालेलं होतं. १९२३-२४ साली चौथी इयत्ता उत्तीर्ण झाली. चौथीनंतर इंग्रजीच्या शिक्षणासाठी विद्यालयात प्रवेश देण्याची पद्धती होती. प्राथमिक शिक्षणासाठी मासिक फी द्यावी लागत नसे. इंग्रजीसाठी मात्र पहिल्या इयत्तेपासून फी द्यावी लागायची. त्या काळात पहिलीची फी होती एक रुपया आठ आणे. सर्व इयत्ता उत्तीर्ण होऊन मॅट्रिकपर्यंत पोहोचण्याच्या वेळी मासिक फीचा आकडा चार रुपयांवर पोहोचायचा.

शंकरभाऊंची मासिक प्राप्ती जेमतेम २५–३० रुपये जमा होत असे. पण ती एकरकमी नव्हती. त्यातून प्रपंचाचा खर्च कसा तरी भागवावा लागायचा. वाण्याच्या दुकानातील सामान, तेल-मिरची आदी दैनंदिन गरजेच्या वस्तू रोखीने खरेदी कराव्या लागत असत. शंकरभाऊंची अशी पद्धत होती की वाण्याकडून उधारीने सामान आणावयाचे

आणि कनवटीला जमा होतील त्यानुसार पाच-दहा रुपये वाण्याला द्यायचे. तरीपण दर महिन्याला कमी-अधिक थकबाकी रहावयाचीच. स्वाभाविकच फी भरण्याच्या फंदात पडण्याऐवजी रामकृष्णाने मराठी सातवीपर्यंतचे म्हणजे व्ह. फा. उत्तीर्ण होईपर्यंतचे शिक्षण पूर्ण करावे आणि त्यानंतर प्राज्ञपाठशाळेत भिक्षुकीसाठी उपयुक्त अशी विद्या संपादन करावी असा मनसुबा शंकरभाऊंनी मनाशी योजिला होता. यामध्ये स्वाभाविकच त्यांचा व्यवहारी दृष्टिकोण होता. भिक्षुकीसाठी आवश्यक असणारी विद्या मुलाने संपादन केली तर कुटुंबखर्चासाठी त्याला हातभार लावता येणे शक्य होते.

रामकृष्णाचे वय आठ-दहा वर्षांचे होते. व्यवहारी विचार करण्याचे त्याचे वय नव्हते. इंग्रजी शिक्षणाच्या शाळेत प्रवेश करावयाचा आणि मॅट्रिकपर्यंतची मजल गाठावयाची असा विचार त्याचे मन करीत होते. प्राथमिक शाळेतले सवंगडी इंगजीचे शिक्षण घेण्यासाठी उत्सुक असल्याने रामकृष्णाच्या मनात त्याच विचाराने ठाण मांडणे हे स्वाभाविक म्हणावे लागेल. परंतु वडिलांना हे सांगणार कोण आणि कसे ? शंकर-भाऊंचा दरारा जबरदस्त. त्यांना विचारावे तर ते नकार देणार याची खात्री होती.

दरम्यान एक विलक्षण घटना घडून गेली. शंकरभाऊ भिक्षुकीच्या कामासाठी बाहेरगावी गेले होते. तीन-चार दिवसांनी परत येणार होते. हीच वेळ प्राथमिक शाळेतून शाळा सोडल्याचा दाखला घेऊन इंग्रजी शिक्षणाच्या शाळेत प्रवेश घेण्याची होती. हे घडावयाचे तर नियमा-नुसार प्राथमिक शाळेतून नाव काढण्यासाठी वडिलांच्या अनुमतीचे पत्र हेडमास्तरांना देणे बंधनकारक होते. तसे पत्र असल्याखेरीज हेडमास्तरांकडून शाळा सोडल्याचा दाखला मिळणे अशक्य होते. या सर्व गोष्टी वेळेवर झाल्या नाहीत आणि शाळाप्रवेशाची तारीख उलटली तर प्रवेश मिळणार नाही, ही भीती. घाई करावीच लागणार होती.

रामकृष्णाची मन:स्थिती अस्वस्थ बनली. उलटसुलट विचार करूनही मार्ग सापडत नव्हता. घरामध्ये अस्वस्थ मनाने येरझाऱ्या घालीत बसण्याव्यतिरिक्त गत्यंतर नव्हते. एक मन म्हणायचे, भाऊंचे बरोबर

आहे. इंग्रजी शिक्षण परवडावे कसे ? दशग्रंथी ब्राह्मण घराणे. भिक्षुकी करणे हा चरितार्थाचा व्यवसाय. पारंपरिक वेदविद्या शिकावी, अर्थार्जन करावं आणि प्रपंचाला मदत करावी हे उत्तम. त्याच वेळी दुसरं मन बंडखोरी करून उठायचं. भिक्षुकी मानवणार नाही. आणा-दोन आणे गोळा करीत राहण्यापेक्षा इंग्रजी शिकावं, मोठं व्हावं. नोकरी करावी. इंग्रजी शिकण्याच्या शाळेत गेलंच पाहिजे असं ते मन सांगे ! अंतर्मनातून कुठून तरी 'होकार' मिळत होता. कुठून अवसान आलं कुणास ठाऊक. मनात भीती होती पण 'होकारा'च्या तिरमिरीतून रामकृष्णानं हेडमास्तरांना देण्यासाठी चिठ्ठी लिहिली.

"माझ्या मुलाला इंग्रजी शिक्षणाच्या शाळेत घालण्याचे ठरविले आहे. कृपा करून त्याचे आपल्या शाळेतील पाचवीच्या वर्गातील नांव काढून शाळा सोडण्याचा दाखला द्यावा ही विनंती."

चिठ्ठीवर, मनातल्या मनात घोळून भाऊ नेहमी सही करतात त्या वळणाची मोडी अक्षरात सही ठोकली आणि तडक शाळेत जाऊन शाळा सोडल्याचा दाखला हस्तगत केला. त्याच पावली इंग्रजी शिक्षणाच्या शाळेत जाऊन प्रवेश निश्चित केला. इंग्रजी शिकण्याच्या हव्यासामुळे का होईना वडिलांची बनावट सही करण्याची रामकृष्णाच्या आयुष्यातील ही पहिली आणि अखेरची चूक !

नियतीच्या खुणा तशा कुणाला उमगत नसतात. रामकृष्णाच्या हाताने नियतीने ही चूक घडविली. चुकीचा तो क्षण हातातून निसटता तर पारंपरिक भिक्षुकी करीत वाई क्षेत्री आयुष्य व्यतीत करणे हेच नशिबी आले असते. परंतु नियतीची योजना काही वेगळीच असावी. नियतीला या मुलाच्या हाताने भविष्यकाळात अनेक अंधाऱ्या घरांतून दिवे लावायचे होते. असंख्य बेवारशी अर्भकांना प्रकाश दाखवायचा होता. क्रूर नराधमांच्या पाशवी वासनांची शिकार बनलेल्या अनेक दुर्दैवी महिलांना आधार द्यायचा होता. निराधार वृद्ध स्त्री-पुरुषांच्या हातात आधाराची काठी द्यायची होती.

रामकृष्णाने जाणतेपणाने आपल्या लहानपणी वडिलांची बनावट सही

करण्याचा गुन्हा केलेला असला तरी ती पहिली आणि अखेरची चूक होती. या मुलाने पुढच्या काळात– रामकृष्णाचा 'दादा' बनण्याच्या अवस्थेत पोहोचेपर्यंत भरभरून सामाजिक कार्याची पूर्तता करून या चुकीचे परिमार्जन केले. ती चूक होती तरी ती क्षुल्लक ठरविली. वडिलांची सही करून शाळेत प्रवेश मिळविला असला तरी या मुलाच्या मनात धाकधूक ठाण मांडून होती. वडील या गुन्ह्याला माफी देणार का आणि तशी माफी मिळाली नाही तर पुढे काय? या प्रश्नाने मनाची बेचैनी वाढली. परंतु आदर्श संस्कारघरात जन्मलेला हा मुलगा स्वतःशी प्रामाणिक होता. वडिलांशी आणि कुटुंबाशी प्रामाणिक होता. प्रामाणिकपणामुळे त्याच्या अंगी निर्भयता बाणली होती.

वडील बाहेरगावाहून परत येताच रामकृष्ण वडिलांच्या समोर उभा राहिला. नमस्कार केला आणि सांगितले– "भाऊ, माझ्या हातून एक अपराध घडला आहे. तुम्हाला न विचारता शाळा सोडल्याचा दाखला मिळवण्यासाठी चिठ्ठी लिहून मी तुमची खोटी सही केली आहे..."

"सही केलीस? का? कशासाठी?" भाऊंनी विचारले. रामकृष्णाने मग सर्व पाढा वाचला. भाऊ रोखून बघत होते. मिळेल त्या शिक्षेला सामोरे जाण्याची तयारी रामकृष्णाचे मन करीत होते. परंतु भाऊंच्या कानात नियती काय कुजबुजली कोण जाणे. रामकृष्णाच्या प्रामाणिकपणाने आणि निर्भयतेने बाजी मारली.

भाऊंनी रामकृष्णाच्या पाठीवरून हात फिरविला, प्रेमाने थोपटले आणि ते म्हणाले, "ठीक आहे. पहिली चूक केलीस, दुसरी करू नकोस." रामकृष्ण संभ्रमात पडला. दुसरी चूक म्हणजे काय हे त्याला उमजत नव्हते. पण ते क्षणभरच.

> "विद्या शिकून पुरी कर. कंटाळा करून अर्ध्यावर शिक्षण सोडू नको. दरवर्षी उत्तीर्ण झाले पाहिजे. त्याचबरोबर घरातली देवपूजा, यजमानकृत्ये करावी लागतील. वेद-विद्येचे शिक्षण घरी घेतले पाहिजे. घरातली आणि जनावरांच्या गोठ्यातली कामे पूर्ववत सुरू ठेव."– भाऊंनी दुसऱ्या चुकीचा खुलासा केला.

रामकृष्ण अपार आनंदला. देवघरात जाऊन त्यानं देवाला नमस्कार केला आणि भाऊंनी इंग्रजी शिकायला परवानगी दिल्याचे सर्वप्रथम देव्हाऱ्यातील देवाला कथन केले. मागोमाग मातोश्रींना आणि घरातील सर्व वडिलधाऱ्यांना नमस्कार करून ही खुषीची बातमी सांगितली. रामकृष्णाचे इंग्रजी शिक्षण मार्गस्थ झाले.



## २.

शिक्षण मार्गस्थ झाले पण मार्ग सरळ नव्हता.

आठ-दहा वर्षांचं वय. भाऊंच्या अटी. आर्थिक ओढाताण. किमान मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण करायचं हे एक दिव्य होतं. नगरपालिकेच्या रस्त्यावरील दिव्याच्या उजेडात अभ्यास करून काहींनी पुढच्या आयुष्यात दिगंत कीर्ती मिळविली, कर्तृत्वाचा हिमालय उभा केला अशा कथा आपण ऐकतो. या कथा त्या विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीच्या, जिद्दीच्या असतात. दारिद्र्याच्या कोंडीतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नाच्या त्या निदर्शक असतात.

दादा स्वतःच्या घरातील दिव्याच्या उजेडात अभ्यास करीत असले तरी जिद्दी बनण्याचे प्रसंग एकानंतर दुसरा असे येत राहिले. भाऊंच्या सर्व अटी सांभाळून शिक्षण पूर्ण करावयाचे तर जिद्द आवश्यकच होती.

भल्या पहाटे म्हणजे साडेतीन वाजता त्यांचा दिनक्रम सुरू व्हावयाचा. पहाटे स्नानादी सर्व विधी उरकले की भाऊंच्या सान्निध्यात वेदपठणाची संथा. शाळेचा अभ्यास. सूर्य उगवला की, ठरावीक घरांतील यजमानकृत्ये. हाती पळी-पंचपात्र घेऊन सोवळ्याने ही भ्रमंती करावी लागायची. या भ्रमंती-तील देवपूजेचा अखेरचा टप्पा ज्या घरी असेल तेथे त्या दिवशीचे सकाळचे भोजन.

सोवळे परिधान करून देवाची पूजा करावयाची ती उपाशी पोटी करावयाची असते ही रूढी सांभाळावी लागत असे. ही दगदग दमणूक करणारी असली तरी यजमानकृत्ये सांभाळणे

महत्त्वाचे होते. जेथे भोजन करावयाचे तेथे सुखाचा, सुग्रास घास मिळेल याची शाश्वती नाही. यजमानांच्या घरी भोजन घेताना 'पंक्ति-प्रपंचा'चा अनुभव मुकाटपणे सहन करावा लागायचा. पंक्तिप्रपंच याचा अर्थ भोजनासाठी पंगत बसली असताना एकाच पंगतीत एकाच्या पानात सुग्रास अन्न तर शेजारच्याच्या पानात शिळे अन्न ! एकाला पोळी तर दुसऱ्याला शिळी भाकरी ! अशी अवस्था. असे शिळे तुकडे मोडताना या मुलाच्या अंतःकरणात कालवाकालव होत असे. अन्नाचा घास डोळ्यांतल्या अश्रूंबरोबर पोटात घालावा अशी ही करुणाजनक स्थिती. परंतु याबाबत घरी किंवा बाहेर कुठे वाच्यता करता येणे कठीण. अन् वाच्यता केली तरी त्यातून निष्पन्न काय होणार ? निष्पन्न झालेच तर यजमानांचा राग.

या मानसिक कोंडमाऱ्यातून या मुलाने एक युक्ती काढली. कधी पोट बरोबर नाही, कधी आज भूक नाही अशा सबबी सांगून यजमानांच्या घरचे भोजन टाळणे सुरू केले. हळूहळू सकाळच्या जेवणावरील वांछाच उडून गेली. त्या कोवळ्या वयात 'एकभुक्त' राहण्याची सवय जडली. माणूस इंद्रियाला जे वळण लावील त्यानुसार इंद्रिये त्याला आयुष्यभर साथ देत असतात. या मुलाने दिवसात एकदाच म्हणजे रात्री भोजन करावयाचे असे जे वळण लावले तीच सोबत पक्की झाली. वयाची पंचाहत्तरी उलटली तरी त्यांच्या मनाने, जठराने त्याबाबत कधी कुरकूर केली नाही. सबंध दिवसभर शारीरिक, मानसिक कष्ट कितीही उपसावयाचे असले आणि उपसले तरी दुपारचा आहार फक्त एक-दोन वाटया भरून ताक प्राशन करणे एवढाच ! पहाटे साडेतीनपासून काम सुरू करणे आणि दिवसभर एकभुक्त राहणे ही बालपणापासून सुरू झालेली जीवनरीती, पुढे ते 'दादा' झाले, वय वाढले तरी अखंड सुरू राहिली.

त्याच्या अशा या संयमी सवयीमुळे असावे, त्यांच्या मनाची ऋजुता कमालीची वाढली. कोणाविषयी कटुता नाही की कोणाविषयी मनात किल्मिष नाही. बालपणी आणि पुढे ऐन तारुण्यात असताना ज्या परिस्थितीतून मार्गक्रमणा करावी लागली त्याबद्दल खंत नाही.

लहानपणी ‘ शिक्षा ’ म्हणून ‘ पथ्य ’ पाळावे लागले असले तरी याबद्दल त्यांचे मत असे की मिताहारामुळे दिवसभर ताजेतवाने राहून कामाचा उरक वाढतो !

वाई येथील द्रविड हायस्कूलमध्ये त्यांचे इंग्रजी शिक्षण सुरू होते. या हायस्कूलचे मुख्याध्यापक ढवळीकर हे भयंकर कडक शिस्तीचे भोक्ते. स्वतः वक्तशीर. विद्यार्थ्यांनी वेळेवर वर्गात उपस्थित असलेच पाहिजे, अभ्यासाचे कटाक्षाने पालन केले पाहिजे यावर त्यांचे बारकाईने लक्ष असावयाचे. यात ढिलाई झाली तर वेताच्या छडीने शिक्षा. प्रत्येक विद्यार्थ्याने ठरावीक गणवेशातच आले पाहिजे अशी कडक शिस्त. धोतर, साधा शर्ट (कॉलर नसलेला), कोट, टोपी हा गणवेश. यजमानांच्या घरातील पूजाअर्चा संपवून आणि शिस्त सांभाळून शिक्षण घेणे ही या मुलाची रोजची कसरत होती. ती त्याने केली. त्यातूनच त्याच्या अंगी शिस्त, टापटीप, वक्तशीरपणा हे गुण कायमचे मुरले. शिस्तशीर वागणे आणि अभ्यास यामुळे मुख्याध्यापक ढवळीकर यांची वेताची छडी आणि ताटके या विद्यार्थ्याच्या हाताचा तळवा यांची मॅट्रिकपर्यंत कधी भेट झालीच नाही.

विद्यालयातील शिक्षण शिस्तीनं सुरू होतं. पण फी, पुस्तके वगैरेंसाठी वडिलांवर आर्थिक भार पडत असल्याची जाणीव मनाला टोचणी देत होती. परंतु अर्थार्जनाचा मार्ग सापडत नव्हता. त्याचं संवेदनक्षम मन चिंता करीत होतं. देवपूजेच्या वेळी चिंतामुक्त होण्यासाठी कदाचित तो प्रार्थना करीत असावा. कारण एक दिवस चिंतामुक्त होण्याचा योग जुळून आला.

त्याचं असं झालं. ताटके कुटुंब राहात होतं त्याच आळीत— भीमकुंड आळीत— सोनोपंत कोठावळे हे एक सधन गृहस्थ राहात असत. एका कंपनीतील मोठ्या पदावरून निवृत्त झाल्यावर ते जन्मगावी राहण्यासाठी आले होते. टुमदार बंगला बांधून राहात होते. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एक शिष्यवृत्ती देऊ केली. ज्या विद्यार्थ्याला संपूर्ण रुद्र म्हणता येतो त्याच्यासाठी ही शिष्यवृत्ती होती. मात्र त्या विद्यार्थ्याने प्राज्ञपाठशाळेचे नारायणशास्त्री मराठे— केवलानंद सरस्वती— यांना रुद्र म्हणून

दाखवून त्यांचे प्रशस्तिपत्र मिळविले पाहिजे ही त्यांची प्रमुख अट होती. गरीब, होतकरू ब्राह्मण मुलास दरमहा साडेसात रुपये शिष्यवृत्ती देण्याची या सधन गृहस्थांची योजना होती.

रामकृष्ण ताटके या विद्यार्थ्याने या शिष्यवृत्तीचा लाभ संपादन व्हावा यासाठी मुख्याध्यापकांकडून त्यांच्या शाळेतील विद्यार्थी असल्याबद्दल पत्र मिळविले. तडक नारायणशास्त्री यांना भेटून स्पष्ट स्वरात रुद्र म्हणून दाखविला. देवपूजेच्या वेळी रुद्राची आवर्तने करणे हा या विद्यार्थ्याचा नित्यपाठ होता. त्यामुळे नारायणशास्त्रींसमोर रुद्र म्हणण्यात मनावर काही दडपण नव्हते.

"छान म्हणलास. शुद्ध आणि शास्त्रशुद्ध उच्चारांसह म्हणतोस तू. कुणाचा मुलगा तू ?"– नारायणशास्त्रींनी विचारले.

"शंकरभटजी ताटके यांचा मी मुलगा. मी रुद्र म्हणतो यासंबंधीचे प्रशस्तिपत्र द्याल का ?" रामकृष्णाची पृच्छा. "अवश्य देतो" असे म्हणून नारायणशास्त्रींनी रामकृष्णाला हवं असलेलं प्रशस्ति-पत्र दिलं.

या विद्यार्थ्यानं ते प्रशस्तिपत्र मुख्याध्यापकांच्या स्वाधीन करताच त्यांनी ते सोनोपंत कोठावळे यांच्याकडे पाठविले. सोनोपंतांनी या विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीत आठ आणे वाढ करून दरमहा आठ रुपये शिष्यवृत्ती देणे सुरू केले. आठ रुपये म्हणजे काही घसघशीत रक्कम नसली तरी त्या काळात एक रुपयाचेमुद्धा मूल्य मोठे होते.

प्रत्येक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेपासून दररोज अमावास्येच्या दिवसापर्यंत कृष्णाकाठावरील भीमाशंकर या मंदिरात जाऊन महादेवाला अभिषेक करण्यासाठी ही शिष्यवृत्ती होती. पंचोपचार पूजा, अभिषेकानंतर सोनोपंतांच्या घरी जाऊन तीर्थ द्यावे लागत असे. शिष्यवृत्ती देण्यातील 'गोम' अशी की, वाईमध्ये त्या काळात गुरुजींकडून अभिषेक करून घेतल्यानंतर चार आणे दक्षिणा देण्याची प्रथा होती. या हिशोबाने तीस दिवसांची दक्षिणा साडेसात रुपये होते. परंतु सोनोपंतांनी दक्षिणेचे रूपांतर शिष्यवृत्ती या नावाने केले होते. आठ आणे वाढवून दिले होते; पण ते यासाठी की, रोज दोन पैशांची खडीसाखर महादेवाला नैवेद्या-

साठी न्यायची. एक पैसा गुरवाला द्यायचा. विद्यार्थी दररोज नियमितपणे मंदिरात जातो किंवा कसे याची खातरजमा करून घेण्यासाठी गुरवाला रोज एक पैसा देण्याची योजना असावी. यजमानांचा हेतू काही का असेना, शिक्षणाच्या खर्चाचा भार वडिलांवर आता पडणार नाही हे या मुलाचे समाधान !

पूर्वी एकत्रकुटुंबपद्धती असायची. एकत्रकुटुंबाचा बारदाना मोठा. पण गैरसोय होत नसे. मोठी घरे, मोठे वाडे, प्रशस्त अंगण, पडवी, ओसरी, माजघर, कोठी, स्वयंपाकघर, परसदारी विहीर, घर दुमजली असले तर माडीवर मोठा दिवाणखाना, खोल्या असं सर्व प्रशस्त असल्यानं कुटुंबात कितीही माणसं, मुलं असली तरी गर्दी वाटायची नाही. ताटके हे एकत्रकुटुंबपद्धतीचे पुरस्कर्ते होते. कुटुंब मोठे होते. पाहुण्यांची सतत ये-जा असे. घरात सणवार, लग्नसमारंभ, बाळंतपणे हे सर्व सुरू असल्याने घरगुती कामात खंड नसायचा. शाळेतला अभ्यास नियमितपणे करावयाचा आणि घरातली कामे सांभाळायची. रामकृष्णाची तारांबळ उडत असे. इंग्रजी शाळेत प्रवेश घेण्याच्या वेळी घरातल्या कामात टाळाटाळ करायची नाही अशी भाऊंची ताकीद होती.

घरातील कामे उरकण्यात बराच वेळ खर्ची पडत असतानाही रामकृष्णाने शाळेच्या वर्गातील कामाचे झंगट स्वतःच आपल्या मागे लावून घेतले. वर्गशिक्षकांची हजेरी-पुस्तके भरणे, फी जमा करणे, पावती-पुस्तके लिहिणे, कॅटलॉग लिहिणे अशी कामे असावयाची. सहामाही परीक्षेच्या सुमारासच घरात नवरात्राची घाईगर्दी सुरू व्हायची. या सर्व कामांच्या रेटचामुळे शिक्षणाच्या काळात तीन-चार वेळेस सहामाही परीक्षा देता आली नाही. अगदी मॅट्रिकच्या वर्गात असताना सहामाही बुडाली तेव्हा तर फारच फरफट उडाली. कुटुंबाचा पसारा मोठा. सोयर-सुतकाचे वारंवार प्रसंग. असं काही घडलं की तिनीत्रिकाळ देवपूजा करण्याची जबाबदारी सांभाळावी लागायची.

पुढच्या आयुष्यात विविध सार्वजनिक कामांचा पसारा त्यांनी सांभाळला त्याचे मूळ या लहान वयातील उद्यमशीलतेत असले पाहिजे. कामे वेळच्या वेळी पूर्ण करण्याची सवय त्यातूनच अंगी बाणली. शाळेत

असताना वर्गसेक्रेटरीचे काम ते करीत असत. ज्या वर्गाची कामे वेळे-वर पूर्ण व्हावयाची— म्हणजे कॅटलॉग, प्रगती-पुस्तक भरणे वगैरे कामे ज्या वर्गाची पूर्ण होतील त्या वर्गाला महिनाअखेरीस सर्वांत अगोदर सुटी देण्यात येत असे. रामकृष्ण ज्या वर्गात असेल त्या वर्गाला हा बहुमान नेहमीच मिळाला. शाळेतले स्नेहसंमेलन असो अगर आपल्या पेठेतील गणेशोत्सव असो, सेक्रेटरीपद रामकृष्णाला सांभाळावे लागत असे.

याच्या जोडीला सवंगडी एकत्र करून देशभक्तिपर गाणी, ऐतिहासिक व्यक्तींचे चरित्रकथन, सुविचार-लेखन हाही उद्योग सुरू असे. तो पारतंत्र्याचा काळ होता. शाळेत कधी कधी हरताळ पाळण्याचे प्रसंग निर्माण होत असत. विचारमंथनासाठी हस्तलिखित मासिक काढण्याचा उपक्रम विद्यार्थी करीत असत. माधव पंडित, बंडू भाटे हे रामकृष्णाचे सहकारी. मासिकाचे नाव ‘भीमाशंकर’. म्होरक्या रा. शं. ताटके. हस्तलिखित अंक हा सुवाच्च अक्षरांत लिहिलेला, चित्रांनी सजविलेला असा सुरेख आणि वाचनीय असे.

ही सर्व कामे करून, घरच्या आणि बाहेरच्या अडथळ्यांच्या शर्यती पार करून १९३४ साली रामकृष्णाने अखेरीस मॅट्रिक उत्तीर्ण होण्याचे श्रेय संपादन केले. उच्च श्रेणीत उत्तीर्ण होऊन शाळेत दुसरा क्रमांक पटकावला.

आता पुढे काय ? हा प्रश्न उभा राहिला. वाईमध्ये वास्तव्य करून घरातली परंपरागत भिक्षुकी सांभाळावी अशी वडिलांची इच्छा. मॅट्रिकनंतर मुंबईला जाऊन काही नोकरी करावी अशी राम-कृष्णाची आकांक्षा. रामकृष्णाचे दोन मेहुणे त्या काळात मुंबईला असल्याने तो एक आधार त्याने गृहीत धरला होता. घरात अन्य कोणाची मदत यासाठी घेण्याचा प्रश्नच नव्हता. कारण

घरातील महिलांचा किंवा त्यांच्या मताचा आदर करावा अशी वहिवाट नव्हती. त्यामुळे मातोश्रींमार्फत आपली आकांक्षा वडिलां-पर्यंत पोहोचविणे शक्य नव्हते. अखेरीस एक दिवस मनाचा हिय्या करून तीन महिन्यांसाठी मुंबईला जाण्याची परवानगी रामकृष्णाने वडिलांकडून मिळविली. वाटखर्चासाठी म्हणून दहा रुपये उसने घेतले. वडिलांनी परवानगी दिली असली तरी तीन महिन्यांत काही जमले नाही तर वाईला परत यायचे, पुन्हा मुंबईचे नाव काढायचे नाही या अटीवर वडिलांनी परवानगी दिली होती !



# ३.

२० जून १९३४. अखेर हो ना हो ना करता करता दादांनी मुंबापुरीत पाय ठेवला. नशीब अजमावण्यासाठी. जून महिना म्हणजे मुंबईकरांच्या घालमेलीचा महिना. अस्वस्थतेचा महिना. पाऊस येतो की नाही ? अशा काळजीतच मुंबईकर हवालदिल असतो. मार्च-एप्रिलपासूनच तापायला सुरुवात होते. जूनमध्ये अगदी कहर होतो. मनस्वी उकाडा, घामाच्या धारा. वाईत उन्हाळा कडक असला तरी रात्र थंड असायची. संध्याकाळी कृष्णेवरून येणाऱ्या शीतल वाऱ्याच्या झुळकीने दुपारच्या रणरणत्या उन्हाचा दाह कमी व्हायचा; मुंबईचे वातावरण अगदी उलटे. दादांच्या मनाची अस्वस्थता आणि भवितव्यतेविषयी अनिश्चितता.

वडिलांकडून घेतलेल्या दहा रुपयांपैकी मुंबईपर्यंतच्या भाडे-खर्चातच पाच रुपये संपले. शिल्लक फक्त रुपये पाच. दादांची पाचावर धारण बसली. दादा सायनला मोठ्या बहिणीकडे उतरले होते. पण ती मंडळीही त्या काळच्या परिस्थितीनुसार फार मोठी मदत करण्याच्या परिस्थितीत नव्हती. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत नव्हती एवढेच. कोणाची ओळख नाही. कोणाचे मार्गदर्शन नाही. विल्सन, एलफिन्स्टन कॉलेजातील जागा भरल्या होत्या. स्कॉलरशिप नाही आणि आर्थिक पाठबळ तर नाहीच नाही. त्यामुळे कॉलेजशिक्षणाच्या आशा संपूर्णपणे मावळलेल्या होत्या. निराशेने सायन-माटुंग्याच्या रस्त्यांवरून भटकणे सुरू झाले. वडिलांना कबूल केल्याप्रमाणे दोन-तीन महिन्यांतच मुंबईतील

गाशा गुंडाळून वाईस जाऊन परंपरागत भिक्षुकीला लागण्याखेरीज अन्य पर्याय नाही ह्या जाणिवेने दादा व्यथित होत. रस्त्याने भटकता भटकता दादांना एक दिवस एक कांदे-बटाटेवाला माणूस दिसला. दादांनी उगाचच त्याच्याशी बोलणे वाढविले, माहिती काढली. भायखळा मार्केटला जाऊन स्वस्त दरात घाऊक भावात कांदे-बटाटे आणायचे आणि सायन–माटुंग्याच्या बाजूला येऊन थोड्या चढ्या भावाने विकायचे हा त्याचा उद्योग. थोडा-फार नफा मिळायचा. बुडत्याला कांद्याचा आधार !

दुसरे दिवशी दादा तडक भायखळा मार्केटला गेले. उरलेल्या पाच रुपयांपैकी चार रुपये भांडवलावर एक धडी म्हणजे दहा शेर कांदे-बटाटे खरेदी केले. मुंबईत कोणी ओळखण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे कांदे-बटाटे विकताना– तेसुद्धा एका दशग्रंथी ब्राह्मणाच्या मुलाला कोणी ओळखीचा भेटेल अशी भीती नव्हती. अर्थात, प्रामाणिकपणे असला धंदा करण्यात दादांच्या मनाला कोणताच कमीपणा वाटत नव्हता. मात्र आपल्यामुळे कुणाला उणेपणा यायला नको म्हणून दादा बहिणीच्या घरापासून शक्य तितके दूर जाऊन घराघरांतून कांदे-बटाटे विकू लागले. हळूहळू हा धंदा चांगलाच जमायला लागला. महिनाभरातच म्हणजे ३१ जुलैलाच दादांनी भाऊकडून भाड्याकरिता घेतलेले दहा रुपये मनिऑर्डरने पाठवून दिले. स्वतःजवळ रोख तीन रुपये शिल्लक ठेवले. विक्री करताना कांदे-बटाटे उरले तर घरी आल्यावर दादा ते बहिणीच्या हवाली करीत. स्वस्त मिळाले म्हणून आणले असं सांगायचे. त्यानंतरचा ऑगस्ट-सप्टेंबर महिना म्हणजे श्रावण-भाद्रपद. पूजा-अर्चा सांगणाऱ्या ब्राह्मणांचा, आजच्या भाषेत म्हणजे ‘बिझी सीझन !’ वाईला भाऊंकडे घेतलेले शिक्षण दादांच्या कामी आले. महादेवाच्या देवळात सोमवारी अभिषेक, हरतालिका, गणपती-पूजा सांगण्यास सुरुवात केली. वाईस अशा ‘कामगिरीचे’ मोल सहा पैसे ते दोन आणे. तर यासाठी मुंबईत सव्वा रुपाया; सव्वा पाच रुपये, सव्वा अकरा रुपये. चढत्या श्रेणीत मिळकत होऊ लागली. देवापुढील पानसुपाऱ्या, बदाम, खारका, गहू, तांदूळ हेपण भरपूर प्रमाणात मिळायचे ! एक

तरुण मुलगा स्वच्छ वाणीत, खड्या आवाजात पूजा सांगतोय हे बघितल्यावर दादांना बरीच 'बोलावणी' यायला लागली. गणपतीच्या एका दिवसातच सकाळी आठ ते दुपारी दोन-अडीचपर्यंत अर्धं पोतं गहू-तांदूळ, पानसुपाऱ्या, फळे आणि रोख सत्तर-ऐंशी रुपये घेऊन चक्क एक हमाल करून दादा या ऐवजासह दुपारी तीन वाजता बहिणीच्या घरी पोचले. सर्व हकीकत ऐकल्यावर बहिणीलाही खूप कौतुक वाटले. दादांनी सगळ्या वस्तू बहिणीच्या स्वाधीन केल्याच, शिवाय वर साठ रुपये दोन-अडीच महिन्यांच्या जेवणखर्चापोटी दिले तेव्हा तिचा ऊर भरून आला. अशीच समाधानकारक 'प्रॅक्टिस' चालल्यामुळे दादांनी दोन्ही महिन्यांत रुपये तीसच्या मनिऑर्डर्स वाईला वडिलांकडे पाठविल्या.

० ० ० ०

वर्तमानपत्रातील जाहिराती वाचून अर्ज खरडणे चालू होतेच. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये काँग्रेसचे अधिवेशन मुंबईत वरळीला भरणार होते. साताऱ्याची वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनी त्या अधिवेशनाच्या 'अब्दुल गफारखान नगर' मध्ये आपला स्टॉल मांडणार होती. कंपनीची जाहिरात व्हावी हा मुख्य हेतू. स्टॉलची उभारणी विम्याची जाहिरात करण्यासाठी होती. वर्तमानपत्रातील जाहिरातीप्रमाणे दादांनी स्टॉल-कीपरच्या 'पोस्टसाठी' अर्ज केला. अर्जात हेतुपूर्वक मूळ गाव 'वाई' असल्याचा उल्लेख केला होता. कंपनी साताऱ्याची असल्याने कंपनीला तेवढीच 'जवळीक' वाटावी ही इच्छा. मुलाखतीला आलेल्यांची अपेक्षा रोजी रु. १४–१५ तरी मिळावेत अशी होती. दादांच्या आयुष्यातील ही पहिलीवहिली नोकरीची मुलाखत होती. इंटरव्ह्यू म्हणजे काय असतं, काय विचारतात ह्याची सुतराम माहिती नाही. नोकरी पंधरा दिवसांची. परंतु वय काय, शिक्षण काय असे जुजबी प्रश्न विचारले गेले. इतर उमेदवार सर्वजण रोजची १४–१५ रुपयांची मागणी करायचे. दादा सात रुपयांवर तयार झाले. त्या काळात आजच्यासारखी विम्याची महती कोणाला जाणवलेली नव्हती. त्यामुळे स्टॉलकडे म्हणून सहसा कोणी फिरकत नसे. दादांनी

स्वत: विम्याची पत्रके वाचून काढली. पण त्यातील Whole Life, Endowment Policy वगैरे सारे त्यांच्या डोक्यावरून जाई ! काम फारसे नसल्याने दादा आजूबाजूच्या स्टॉलवरून नजर टाकत. त्या मंडळींशी गप्पा-गोष्टी करीत. त्यातून दादांचा नकळत फायदाच झाला. शेजारच्या स्टॉलवरील एक माणूस भांडून निघून गेला होता. त्यामुळे पंधरा दिवसांच्या अधिवेशनाच्या काळातील शेवटचे सात दिवस दादांना त्या स्टॉलचेही 'जादा' काम मिळाले. त्यामुळे पहिले सात दिवस वेस्टर्न इंडियाचे रोजी रु. ७/– प्रमाणे तर उरलेले १५ दिवस दोन्ही स्टॉलचे रु. ७+७ असे मिळून एकूण रु. २५०/–ची रक्कम दादांना एकहाती मिळाली ! सुदैवाने अधिवेशनाची मुदत पंधरा दिवसांवरून एकवीस दिवसांवर गेली. दादांनी एका वेळेला बघितलेली हीच मोठी रक्कम.

### डॉ. राजेंद्रप्रसादांची भेट

या अधिवेशनाच्या निमित्ताने आणखी एक फायदा झाला तो म्हणजे डॉ. राजेंद्रप्रसादांच्या भेटीचा. बिहारमध्ये त्या काळी एक मोठा भूकंप झाला होता. ज्या कंपन्यांनी बिहारच्या भूकंपग्रस्त लोकांना आर्थिक मदत दिली होती त्या स्टॉलसना ते सदिच्छा-भेट देणार होते. अर्थात, दादांच्या युनायटेड वेस्टर्न लाईफ इं. कंपनीने अशी मदत दिलेली असल्याने त्यांच्या स्टॉललाही बाबूजींची भेट होतीच. डॉ. राजेंद्रप्रसाद यांना गाईच्या दुधाचे अधिक प्रेम आहे अशी माहिती मिळविल्यानंतर इतरांना जे सुचले नाही ते दादांनी केले. एक स्टोव्ह, एक स्वच्छ फुल-पात्र आणि एका ओळखीच्या माणसाकडून गाईचे दूध आणून ठेवले. राजेंद्रबाबू आले. दोन्ही हात जोडून नमस्कार करीत चालले. कार्यकर्ते सांगतील त्या स्टॉलसना प्रत्यक्ष जाऊन भेट देत. असे करत करत दादांच्या स्टॉलपाशी आले. कंपनीची माहितीपत्रके बघितली. दादांनी त्यांना अभिवादन केले. सुहास्य वदनाने स्वीकार करून बाबूजी पुढे निघणार तेवढ्यात दादांनी त्यांना एक मिनिट थांबण्याची विनंती केली. काही तरी घेऊन जाण्याचा आग्रह केला. 'एवढ्या उशिरा काय घ्यायचं ?' (रात्र झालेली असल्याने) असे म्हटल्यावर दादा पटकन 'गोमाता का

दूध ' असे म्हणाले. " अरे वा, मग नाही कसं म्हणणार ? " असे बाबूजी म्हणाल्यावर दादांनी स्टोव्हवर मंद तापत ठेवलेले दूध स्वच्छ फुलपात्रातून देऊ केले. शेरेबुक पुढे ठेवले. प्रसन्न मुद्रेने दूध प्राशन करून शेरेबुकात हिंदीमध्ये " इतक्या रात्री उशिराच्या वेळीही माझा पाहुणचार या स्टॉलवर चांगला झाला. कंपनीस सुयश चिंतितो ", असा शेरा मारून स्वाक्षरी केली. दादांना खूप आनंद झाला.

दुसऱ्याच दिवसापासून दादांच्या स्टॉलचा भाव भलताच वधारला ! बाबू राजेंद्रप्रसादांनी स्टॉलला भेट देऊन उत्तम प्रशस्तिपत्रक दिल्याची बातमी हा हा म्हणता सगळीकडे पसरली. दादांच्या स्टॉलवरची वर्दळ खूपच वाढली. गिऱ्हाइकांची ये-जा सुरू झाली. अनेकांनी विम्याची माहितीपत्रके घेतली. खरं म्हणजे विमा काढायचा म्हणजे नेमकं काय करायचं हे दादांना तरी कुठं ठाऊक होतं ? पण जुजबी माहिती सांगून दादांनी सर्वांची नावे-पत्ते घेऊन ठेवले. कंपनीकडे पाठविले. कंपनीला लाख-दीड लाखाचे काम मिळाले. दादांची उमेदवारी यशस्वी झाली.

या अधिवेशनाच्या काळात अनेक अखिल भारतीय कीर्तीचे पुढारी दादांना जवळून बघायला मिळाले. सरोजिनी नायडूंशी तर चांगली ओळखच झाली. साऱ्या हिंदुस्तानावर ज्यांच्या नावाची मोहिनी होती त्या मोहनदास करमचंद तथा महात्मा गांधींचे दर्शनसुद्धा अगदी जवळून झाले. दादा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने, वक्तृत्वाने भारावून गेले. शेवटच्या दिवशी सर्व पुढाऱ्यांना मेजवानी होती, तेव्हा ती व्यवस्था सरोजिनी नायडूकडे होती. दादांच्या कामाचा उरक पाहून त्यांनी आपणहून दादांना मदतीला बोलावले. हे अधिवेशन दादांना चांगलेच लाभले. चार पैसे मिळाले; चार माणसांत कसे वावरायचे, बोलायचे याचा चांगला अनुभव पदरी पडला.

त्या वर्षीच्या दिवाळीत दादा वाईला परतले; थोडयाशा दिमाखात, थोडयाशा आत्मविश्वासाने. वाईत घरी पोहोचल्यावर त्यांनी आईला आणि भाऊंना नमस्कार केला. खिशातील बंद केलेले कागदी पाकीट भाऊंच्या हाती दिले. भाऊ उघडून पाहतात तो त्यात दोनशे रुपये ! भाऊ स्तिमितच झाले. दादांनी सर्व हकीकत सांगितली. त्यांना कौतुक

वाटले तसा अभिमानही. आई कौतुकाने म्हणाली, "बघा, म्हटलं नव्हतं हा काही कुठं गप्प, रिकामटेकडा बसणार नाही म्हणून." त्या दोघांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहून दादांनीही मनाशी खुणगाठ बांधली, की आता आपल्याला नक्कीच मुंबईला परत जायला मिळेल. झाले पण तसेच.

दिवाळी साजरी करून दादा लागलीच परत निघाले. भाऊ म्हणाले, "का रे लागलीच निघालास?" दादा म्हणाले, "अजून कायम नोकरीचे काही तरी बघितले पाहिजे." एवढेच संभाषण. कुणी काही मोडता घातला नाही.

० ० ० ०

## सुखद आश्चर्य– नोकरी पुन्हा सुरू

कुर्ल्याला बहिणीच्या बिऱ्हाडी येताच एक सुखद आश्चर्य दादांची वाट पाहात होते. अधिवेशनाच्या काळातील तपश्चर्येने हात दिला! पत्र होते वेस्टर्न इंडिया कंपनीचे. "आमच्या मुंबई कार्यालयातील एक माणूस रजेवर गेलाय. त्याच्या जागी एक महिन्याकरिता मासिक रुपये तीसवर आपली तात्पुरती नेमणूक केली आहे. तरी ताबडतोब मुंबई ऑफिसमध्ये श्री. टंकसाळे ह्यांना भेटावे."

१५ नोव्हेंबर १९३४ पासून आयुष्यातील तात्पुरत्या नोकरीसाठी मुंबईच्या गजबजलेल्या फोर्टभागामध्ये दादा जाऊ लागले. मुंबईत आल्यापासून चार महिन्यांच्या आतच नोकरी मिळाली. भले मग ती तात्पुरती–टेंपररी– का असेना! त्या दिवसांतील मंदीच्या काळात दादांना ही सुखाची पर्वणी वाटली असल्यास काही नवल नाही. त्या आनंदाच्या भरात दादांनी चक्क चार आण्यांचे पेढे आणले आणि घरात सर्वांना वाटले. मेहुण्यांच्या सल्ल्याने दादरला 'दि लक्ष्मी ट्युटोरिअल अ‍ॅण्ड कमर्शिअल इन्स्टिटयूट'मध्ये शॉर्टहॅण्ड व टायपिंग शिकण्यासाठी नाव नोंदवले. फी रुपये पाच. सकाळी ९ ते १० टायपिंग. ऑफिस सुटल्यावर पुन्हा संध्याकाळी ६ ते ७ शॉर्टहॅण्ड. भाजी-विक्री आता बंद. तेवढ्या तात्पुरत्या

नोकरीनेसुद्धा दादांच्या उत्साहाला केवढे उधाण आले ! नेहमीप्रमाणे पहाटे ३॥ वाजता उठून अंघोळ-पूजाअर्चा आटोपून ठीक सात वाजता दादा दादरला श्री. गोखले यांच्याकडे त्यांच्या चौथीत असलेल्या मुलीस गणित आणि भाषा विषय शिकवण्यास जात. आठ वाजता श्री. पंडित यांच्या दोन मुलींना इंग्रजी; तर संध्याकाळी शॉर्टहॅण्ड झाल्यावर जवळच राहणारे श्री. देव यांच्या मुलास गणित शिकविण्यास जात. या तिन्ही शिकवण्यांची मिळून प्राप्ती रुपये तीस. कष्ट प्रचंड. कुर्ला-दादर-फोर्ट-दादर-कुर्ला असे धावपळीचे जीवन. पण श्रम हा तर दादांचा श्वासच ! कष्टाची सवय बालपणापासून असल्याने दादांच्या आयुष्यात ' कंटाळा ' शब्दालाच जणू ' टाळा ' लावलेला होता. महिना साठ रुपयांची प्राप्ती होऊ लागली. सुदैवाने वेस्टर्न इंडियाची नोकरी पण पुढे चालू राहण्याचा योग आला. त्यालाही दादांचे श्रमच कारणी-भूत होते. काँग्रेसच्या अधिवेशनापासून बरीच जाहिरात झाली. त्यामुळे आपोआपच विम्याची गिऱ्हाइके वाढली. मुंबई शाखेचे काम वाढले तसे साताराच्या मुख्य कार्यालयातून श्री. ताटके यांची नोकरी पुढे चालू ठेवावी असा हुकूम आला. शिवाय एक ब्रँच मॅनेजर व दोन कारकून वाढलेल्या कामासाठी पाठविण्यात आले. त्यांतील ब्रँच मॅनेजर म्हणून आले होते ते नानासाहेब जोशी व दोघा कारकुनांची नावे होती भिडे व लिमये. (हेच लिमये पुढे नरूभाऊ लिमये म्हणून पत्रकार--राजकारणी या नात्याने प्रसिद्धीस आले.) दादांचे दुपारचे खाणे नसल्यामुळे लंच-टाइम असा नव्हताच. त्यामुळे दिवसभरातील आपल्या टेबलावरील काम ते पुरे करीतच, शिवाय नवीन नवीन गोष्टी शिकून घेत. त्यांची ही कष्टाळू वृत्ती पाहून ब्रँच मॅनेजर नानासाहेब जोशी यांना त्यांचे कौतुक वाटे. ते मूळचे वाईचेच होते हे नंतर उभयतांना समजले. दादांची चिकाटी पाहून नानासाहेबांनी आपणहून त्यांना अकौंटन्सी शिकविण्याची तयारी दर्शविली. काही तरी चांगले शिकायला मिळते आहे आणि तेसुद्धा फी-विना म्हणून दादाही आनंदले. पण आता वेळ कुठला काढायचा ? पहाटेपासून सारा कार्यक्रम आखीव होता. तरीपण रात्री ९॥ वाजता कुर्ल्याहून नानासाहेबांच्या माटुंग्याच्या

निवासस्थानी जायचे, रात्री ११॥ वाजेपर्यंत शिकवणी, मग तिथेच झोपणे व पहाटे उठून कुर्ल्यास परत येणे. अशी दिनचर्या झाली. पुढील आयुष्यात दादांनी जे अपरंपार कष्ट उपसले त्याचे मूळ या पूर्वाश्रमींच्या कष्टमयी जीवनक्रमात आहे. या काळात दादा ग्रँट रोडच्या हायकोर्ट प्लीडर्सच्या (एच. पी. ) क्लासेसना काही दिवस गेले. टायपिंगचा स्पीड वाढला. शॉर्ट-हँडची प्रगती वाढली. ग्रँट रोडचा क्लास मात्र पुरेसा वेळ नसल्याने चालू ठेवता आला नाही. एकीकडे हे सर्व चालू होते तर दुसरीकडे वृत्तपत्रातील 'वाँटेड'च्या जाहिराती बघून अर्ज खरडण्याचे काम चालू होते; त्यातूनच जमली ती व्ही. जे. टी. आय. मधील नोकरी!



## ४.

### "व्ही. जे. टी. आय." –नवी नोकरी

एप्रिल १९३५ च्या अखेरीस व्ही. जे. टी. आय. च्या प्रिन्सिपॉलच्या सहीचे पत्र आले. तेथे एक शॉर्टहॅण्ड टायपिस्टची जागा भरावयाची होती. युरोपिअन प्रिन्सिपॉल. हिंदुस्थानभर नावाजलेली संस्था. आजवर हा कृष्णेकाठचा 'वाईकर भटजी' धोतराचा काचा मारूनच नोकरीवर जात होता. कंपनी पण भटजींचीच. (सातारकर मंडळींचीच.) तोवर काही प्रश्न नव्हता. माटुंग्यात दोन-तीन वाईकर मंडळी होती. त्यांचा दादांनी सल्ला घेतला. पूर्वी व्ही. जे. टी. आय.-मध्ये नोकरीस असलेल्या एका नातेवाईकाचा विचार घेतला, सर्वांचा एकच सल्ला. आता धोतराला सुट्टी! इंग्लिश पद्धतीचे कपडे घालून जा. इंटरव्ह्यू १० मे रोजी होता. एक तर शर्ट-पँट शिवण्यास वेळ नव्हता, त्याहून महत्त्वाचे म्हणजे पैसेही नव्हते. दादांनी विचार करून एका लाँड्रीवाल्याकडून पाच रुपये डिपॉझिट ठेवून व एक रुपाया भाडे देऊन शर्ट-पँट आणि कोट आणला. मेहुण्यांचा टाय घेतला. त्यांच्याकडूनच बांधायचा कसा ते शिकून घेतले. अशा तऱ्हेनें वरातीचे घोडे सज्ज होऊन इंटरव्ह्यूच्या दिग्विजयासाठी निघाले. दादा व्ही. जे. टी. आय. मध्ये शिरले तेव्हा आणखी बरेच उमेदवार 'तयारीत' आलेले दादांना आढळले. तिथल्या युरोपिअन साहेबाने सर्वांना एकदमच डिक्टेशन घातले. सुमारे १० ते १५ मिनिटे. त्याचा प्रत्येक शब्द दादांनी अक्षरशः प्राण कानांत गोळा करून ऐकला. टाईप-

रायटरवर सर्वांकडून ठरावीक वेळेत ते डिक्टेशन टाईप करून घेतले गेले. नंतर प्रत्येकाला साहेबाने केबिनमध्ये बोलावून काही जुजबी प्रश्न विचारले. दादांना थांबवून घेतले. बाकीच्यांना चार-पाच दिवसांत तुम्हाला ऑफिसचे पत्र येईल असे सांगितले. थांबवून का घेतले असावे ? ह्या विचाराने दादा थोडेसे धास्तावलेच. दादांना पुन्हा केबिन-मध्ये बोलावण्यात आले. इकडचेतिकडचे प्रश्न विचारताना प्रिन्सिपॉलने अमुक अमुक ताटके आमच्या ऑफिसातून रिटायर्ड झाले ते तुमचे कोण ? असे विचारले. तसे दादांनी ते माझे चुलत आजोबा असे उत्तर दिले. (दादांना तशी थोडी त्यांची ऐकून माहिती होती. ) तिथे काम करीत असलेल्या हेडक्लार्कला ( त्यांचे नाव आपटे होते हे नंतर दादांना कळले ) तो साहेब म्हणाला, " हा मुलगा तरुण आहे. अनुभव नाही, पण स्मार्ट वाटतोय. इतरांच्या मानाने ह्याच्या टायपिंग-मध्ये चुकापण कमी दिसतात."

ब्रिटिश जमान्यात फॅमिली बॅकग्राउंडलाही महत्त्व असायचे. तेव्हा दादांचे उत्तम काम करून रिटायर्ड झालेले आजोबा दादांच्या कामी आले ! परिणामत: दादांना ५० रु. मासिक पगारावर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ट्रायल बेसिसवर घेण्यात आले. तीन दिवसांत तयारी असेल तर होकार कळवायचा होता. दादांनी आनंदाच्या भरात ' हो ' म्हणून सांगितले. पण त्यांच्या वेस्टर्न इंडियाच्या ऑफिसात उलटाच प्रकार झाला. मॅनेजर दादांवर संतापला. इतर क्लार्क्स नवीन होते; त्यातल्या त्यात दादाच ' सिनिअर ' होते ( म्हणजे अशी सर्व्हिस किती ? तर सहा महिन्यांहून कमीच. तो दादांना सोडायला तयार होईना. रीतसर नोटीस का दिली नाही म्हणून तो दादांवर डाफरला. दादांनी सर्व काही ऐकून घेतले. अशा प्रक्षुब्ध मन:स्थितीत हा गृहस्थ काही ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाही हे त्यांनी ताडले व गप्प राहिले. रात्री निवान्तपणे त्यांच्या घरी गेले. घरची परिस्थिती, अधिक पैसे मिळविण्याची आवश्यकता, त्यासाठी सकाळी उठल्यापासून आपण कसे धडपडतो हे सर्व त्यांना विनम्रपणे समजावले. रु. ३०/– वरून रु. ५०/– वरील उडी म्हणजे

त्या काळात मोठीच कमाई होती. तेव्हा माझ्या मार्गात अडथळा आणू नका अशी विनंती केली. अजून नोकरीत सहा महिनेपण पुरे झाले नाहीत तेव्हा नोकरीत कायम नसताना २४ तासांची नोटीस देता येते हेपण पटवून दिले. इतकेच काय पण त्याही पुढे जाऊन संध्याकाळी नवीन क्लार्क-मंडळींना त्यांच्या कामात मदत करेन असेही आश्वासन दिले. इतके झाले तेव्हा कोठे दादांना मॅनेजरने नोकरीतून रीतसरपणे मुक्त केले ! अशा प्रकारे दादा १३ मे १९३५ रोजी व्ही. जे. टी. आय.-मध्ये 'साहेबी' थाटात कामावर हजर झाले. खास अर्जंट ऑर्डर देऊन दोन शर्ट्स, दोन पँट्स शिवून घेतल्या. तसेच एक नवा कोरा टाय पण विकत घेतला. आणि 'पुरा साऽब' बनून दादांची नवी नोकरी चालू झाली.

**" लग्न ठरलंय्, ताबडतोब ये. "**

नव्या नोकरीचा एक आठवडा पार पडला. काम जमतंय असं वाटून थोडासा आत्मविश्वास आल्यावर दादांनी नव्या नोकरीसंबंधात वाईला सविस्तर पत्र लिहिले. नोकरी सुरू होती पण एक धर्मसंकट दादांपुढे उभे राहिले ! दीनवाणे तोंड करून आता दादांना नव्या युरोपियन प्रिन्सिपॉलसाहेबापुढे उभे राहावे लागणार होते ! सगळाच प्रकार अचानक आणि अनपेक्षितपणे घडला. नव्या नोकरीत रुजू होऊन जेमतेम तीन आठवडे उलटले असतील नसतील तोच मे महिन्याच्या अखेर खुद्द भाऊंचेच कार्ड. " ज्येष्ठ शुद्ध नवमी दि. ९ जून १९३५ रोजी तुझा विवाह मिरजेचे डॉ. रा. द. प्राणी यांच्या द्वितीय कन्येशी करणेचे निश्चित झाले आहे. जास्तीत जास्त रजा घेऊन वेळेवर यावे."

आजच्या घडीला आपल्यालाच काय पण दादांनासुद्धा या गोष्टीचे हसू येते. मुलाने मुलगी बघितलेली नाही; मुलाचा विचार काय तो ध्यानी घेतलेला नाही. संसार मांडण्यासाठी मुलाला जागा आहे–नाही हे तर दूरच. एकूण प्रकाराने दादा हबकलेच. खरं म्हणजे स्वत:चे लग्न म्हणजे आनंदाचे उधाण यावे असे ते वय ! पण दादांच्या डोळ्यांपुढे वाग्दत्त वधूचा चेहरा येण्याऐवजी प्रिन्सिपॉलसाहेबांचाच करडा चेहरा एकसारखा येत होता !

" रजा ? " म्हटल्यावर " वॉट् ? " म्हणून तो कसा पिसाळेल ह्याची चिंता होती. बरं, त्यात त्याची काही चूक नाही. अजून महिनापण नोकरीत पुरा झालेला नसताना आठवडा-दोन आठवड्यांची रजा मागणे म्हणजे जरा 'जास्तीचं' होतं. जमाना 'आजचा' नव्हता. इंग्रजी अमदानीतील कडक शिस्तीचा होता. लग्नाची निमंत्रणे भाऊंनी सगळीकडे पाठवून दिलेली होती. तेव्हा आता दादांच्या होय-नाहीचा किंवा त्यांच्या सोयीगैरसोयीचा प्रश्नच नव्हता.

मनाचा हिय्या करून दादा काही पत्रांवर सह्या घेण्यासाठी म्हणून प्रिन्सिपॉल डॉ. बर्ले ह्यांच्या केबिनमध्ये गेले. रजेचा अर्ज पुढे ठेवला. अपेक्षेप्रमाणे साहेब खवळलाच. लग्न ठरले होते तर नोकरीवर ताबडतोब कशाला रुजू झालास ? लग्न करूनच हजर व्हायचे ! दादांनी खुलासा केला की हजर झालो तेव्हा लग्नाविषयी काहीच कल्पना नव्हती. मग वडिलांचे कार्ड दादांनी पुढे केले. अर्थात, त्या 'मराठी' कार्डावरून साहेबाला थोडाच बोध होणार होता ? पण केवळ आपल्या विधानाची सत्यता पटावी एवढाच माफक हेतू. आता साहेबाच्या रागाची जागा विस्मयाने घेतली ! जरी हिंदू रीतीरिवाजांची त्याला थोडी माहिती होती तरीपण ज्या मुलाचे व मुलीचे लग्न होऊन आयुष्यभर एकत्र राहायचे त्या दोघांनी एकमेकांना 'बघितलेही' नसावं ह्याचे त्याला पराकोटीचे आश्चर्य वाटत होते. आपले वडील आपल्या मुलाच्या लग्नाचे ठरविताना त्याच्या हिताचाच विचार करतील ही मुलाची 'धारणा !' हे सगळे ऐकून साहेब चक्रावलाच. दादांनी पुढे सांगितले, की " निमंत्रणाप्रमाणे सगळी मंडळी वाईत जमतील आणि मी म्हणजे प्रत्यक्ष नवरा मुलगाच तेथे नसला तर मोठा गोंधळ माजेल. रजा नाही तर नोकरी सोडून का नाही आलास असेसुद्धा घरचे लोक खडसावून विचारतील ! आणि एवढ्या कष्टाने मिळालेली ही नोकरी घालवायची माझी इच्छा नाही." हे सांगताना दादांचा स्वर रडवेला झाला. डोळ्यांत अश्रू गोळा झाले. साहेबाला दादांची आणि एकूण हिंदू परंपरेच्या तत्कालीन विवाहपद्धतीचीच दया आली असावी. मोठ्या 'उदार' अंतःकरणाने त्याने फक्त ८ जून, ९ जून आणि १० जून अशी फक्त तीन दिवसांची

रजा मंजूर केली. ११ जूनला रविवार होता. कोणत्याही परिस्थितीत १२ जूनला (नव्या प्रवेश-परीक्षा सुरू होत असत म्हणून) हजर झालेच पाहिजे असे बजावले. रजा बिनपगारी आहे हे बजावून सांगायला साहेब विसरला नाही ! दादा 'थँक यू व्हेरी मच' म्हणून केबिनबाहेर पडले. दादांविषयी साहेबांचे मत तसे थोडेसे अनुकूल होतेच. त्यांच्या कामसू वृत्तीची, नवीन नवीन शिकण्याची उत्सुकता, वाटेल तितके कष्ट उपसण्याची तयारी या साऱ्या गुणांची शिफारस हेडक्लार्क श्री. आपटे यांनी केली होती.

**वधूपरीक्षा**

दादा इकडे व्ही. जे. टी. आय. मधील नोकरीच्या खटाटोपात होते तेव्हा त्यांच्या गावी त्यांची आप्तेष्ट मंडळी त्यांच्या लग्नाचा बार उडवून देण्याच्या विचारात होती. त्याचे असे झाले :

तत्कालीन भोर संस्थानात दरवर्षी रामनवमीचा उत्सव थाटात साजरा होई. दरवर्षी त्यासाठी वाईतून अनेक वैदिक, भोर संस्थानिकांच्या आमंत्रणानुसार या उत्सवाच्या दहा दिवसांत मुक्कामाला भोरलाच असत. या साऱ्या वैदिकांचे वास्तव्य, जेवणखाण इत्यादी सर्व सोयी संस्थानातर्फे असत. उत्सव-समाप्तीनंतर महादक्षिणा दिली जात असे.

दादांच्या त्या काळी होऊ घातलेल्या पत्नी— म्हणजे आजच्या सौ. इंदिराबाई ताटके— यांचे मोठे मामा श्री. गजाननराव महाजनी हे तेव्हा भोर संस्थानचे जेलप्रमुख (जेलर) म्हणून काम करीत. नात्या-गोत्यातील भाच्या-पुतण्या वा अन्य कोणी यांची लग्ने जमविण्यात त्यांचा मोठा सहभाग असे. कोणती मुलगी कोणत्या मुलाला योग्य होईल याची अटकळ अशी परिचयातील उपवर मुलं-मुली बघून ते मनाशी बांधत असत. अनेक लग्ने त्यांनी आजवर जुळविली होती.

दादांचे वडील शंकरभाऊ आणि त्यांचा चांगला स्नेह होता. राम-नवमीच्या दहा दिवसांत भाऊ हमखास एकदा तरी त्यांच्याकडे जात. गप्पागोष्टी होत. १९३५ च्या रामनवमीच्या उत्सवात असेच एकदा ते महाजनींच्या घरी गेले होते. नेहमीच्या गप्पा-गोष्टी होता होता

मुलांच्या विषयावर गप्पांची गाडी आली. दादांना म्हणजे त्या सर्वांच्या भाषेत वाळूला त्यांनी पाहिले होतेच. आता मॅट्रिक होऊन मुंबईत असतो, नोकरीनिमित्ताने तेथेच राहतो एवढा 'धागा' गजाननरावांना पुरेसा होता. आपल्या मिरजेच्या वहिणीच्या मुलीला– लीलाला– हा मुलगा 'योग्य' आहे असे त्यांच्या मनाने घेतले. खरं म्हणजे दादांना कसली नोकरी आहे, कुठे आहे याबाबत काहीही माहीत नसताना शंकरभटजींचे वाईचे मोठे घर, घरातील मंडळी, धार्मिक वातावरण इत्यादी जमेच्या बाबी त्यांना माहीत होत्या म्हणून बोलता बोलता "काय शंकरभाऊ, मुलगा आता मोठा झाला. विवाहाचा विचार करणार का ?" असे त्यांनी विचारल्यावर "एखादी योग्य वधू असेल तर विचार करू" असे भाऊंनी सांगितले. नेमक्या त्याच वेळी गजाननरावांकडे त्यांच्या मिरजेच्या बहिणीची मुलगी– लीला– आजोळी राहण्यास आली होती. गजाननरावांची बहीण कै. सौ. जानकीबाई मिरजेचे डॉ. रा. द. प्राणी ह्यांना दिली होती. व्यवसायाने ते डॉक्टर असले तरी ते चरितार्थासाठी. मुख्य आवड अध्यात्माची. घरी वातावरण अतिशय धार्मिक. म्हणूनच गजाननरावांना ताटके-प्राणी कुटुंबात असे संबंध जुळावेत असे वाटले असावे. ते शंकरभाऊंना म्हणाले, "अहो, शुभस्य शीघ्रम्. तुमच्या मोठ्या घराण्याला शोभेल अशी मुलगी आताच माझ्या घरात आहे. माझी भाचीच. मराठी ५ वी शिकलेली आहे." मग गजाननरावांनी डॉ. प्राणींच्या घरासंबंधीची इतर सर्व माहिती सांगितली. शंकरभाऊंना सर्व काही ठीकठाक वाटले. म्हणून ते म्हणाले, "असेल मुलगी घरात, तर घ्या बोलावून." मामांनी घरात जाऊन सर्व काही सांगितले. आवश्यक सूचना दिल्या. थोड्याच वेळात ४'-९" उंचीची, काळीसावळी पण नीटनेटकी, नऊवारी साडी चापूनचोपून नेसलेली वधू– लीला–, सर्व मंडळी बसली होती त्या खोलीत प्रविष्टली. सर्वांना नमस्कार करून बसली. मामा शंकरभाऊंना म्हणाले, "हं, शंकरभाऊ विचारा काही प्रश्न असतील तर."

शंकरभाऊंनी विचारले,

"हं मुली, शिक्षण काय ?"

" ५ वी पर्यंत."

मग तेथेच पडलेले एक वर्तमानपत्र भाऊंनी पुढे केले, आणि वाचायला सांगितले. लीलाताईंनी संतचरित्रे, धार्मिक वाङ्मय बरेचसे वाचलेले होते. वडिलच आवर्जून वाचून घेत. मिरजेसारख्या संस्थानी गावात त्या काळी आजच्यासारख्या मुलींसाठी स्वतंत्र शाळा नव्हत्या. म्हणूनच केवळ शिक्षण थांबलेले होते. नाही म्हणायला त्यांचे एक नातेवाईक कै. पंडित कानेटकर (जुन्या पिढीतील सुप्रसिद्ध कवी कै. गिरीश यांचे बंधू) वर्षातून तीन-चार महिने मिरजेतील अमेरिकन मिशनऱ्यांना मराठी शिकविण्यासाठी येत. तेव्हा ते लीलाताईंना थोडे इंग्रजी शिकवीत. तर्खडकरांची दोन-तीन भाषांतरे पण त्यांनी करून घेतली होती. त्यामुळे भाऊंनी वाचायला सांगितल्यावर लीलाताईंनी स्वच्छ वाणीने आठ-दहा ओळी वाचल्या असतील-नसतील भाऊ म्हणाले, " छान ! पुरे. घरात गेलीस तरी चालेल. " तशी लीलाताई सर्वांना नमस्कार करून घरात गेली.

बस्स्. एवढीच वधूपरीक्षा.

o o o o

भाऊ वाईला परतले.

" बाळूला मुलगी बघून आलो. करायचे का यंदा लग्न ?" त्यांनी पत्नीस– अंबिकाबाईंना विचारले. त्या म्हणाल्या,

" अहो, एवढी घाई कशाला ? अजून बाळू लहान आहे. नोकरीचा पण पत्ता नाही. "

" हं, नोकरी काय, आज नाही तर उद्या लागेल. नाही तर कबूल केल्याप्रमाणे तो येथे परत येऊन प्राज्ञपाठशाळेत जाईल. घरातच राहील. भिक्षुकी येतेच. आणखी शिकेल आणि तीच पुढे वाढवील. "

शंकरभाऊ शांत, सुस्वभावी असल्याने त्या काळात इतपत तरी 'सुसंवाद' झाला हे नवलच म्हणायचे. एरवी घरातील बायकांना तशी किंमत शून्यच. दादांच्या आईंना हेपण माहीत होतं की वेदमूर्तींच्या एकदा

मनात आलंय म्हणजे आता ते ब्रह्मवाक्यच. नवऱ्याशी वितंडवाद घालायची त्या काळी रीत नव्हती. आणि कुठे कुठे असली तरी दादांच्या आईचा स्वभावच मुळात शांत आणि सोशीक असल्याने त्यांनी तसा कधी वाद घातला नाही. बाळूचे वय लहान, अजून स्थिर नोकरी नाही म्हणून थोडे दिवस लग्न लांबणीवर टाकावे असे त्यांचे मत होते. ते रास्तही होते. पण तसा प्रत्यक्ष आग्रह त्यांनी धरला नाही.

घरात दोन जावा होत्या. एक मोठी, एक धाकटी. दोघी विधवा. जुन्या काळच्या भाषेत म्हणजे एक सोवळचा व एक सकेशा. दादांच्या आईंनी त्या दोघींचे मत घ्यावे असे सुचविले. त्याप्रमाणे भाऊंनी दोघींचा सल्ला घेतला. त्यांना मुलगी सर्वांनी बघावी असे वाटत होते. भाऊंनी ताबडतोब त्याप्रमाणे भोरला निरोप पाठवला. मुलगी आपल्या वडिलधाऱ्या माणसांसमवेत आली. गावातच ओळखीच्या एका ठिकाणी उतरली. भाऊंचे म्हणणे त्या मुलीस ती उतरली तिथे जाऊन सर्वांनी बघून यावे, तर घरातील सर्वांना मुलीने आपल्याच म्हणजे ताटक्यांच्याच घरात यावे असे वाटत होते. त्याप्रमाणे मुलगी आली. चार प्रश्न विचारणे, गाणे म्हणून घेणे इत्यादी सोपस्कार झाले. मुलगी सर्वांना तशी ठीक वाटली तरीपण डोळ्यांत खोड आहे, थोडीशी तिरळी असावी असे काहींचे मत पडत होते. ते पाहून शंकरभाऊंनी स्पष्टपणे सांगितले की, " म्हणून मी मुलगी जिथे उतरली तिथे प्रत्यक्ष जाऊन पहा असे म्हणत होतो. आता आपल्या घराला तिचे पाय लागले म्हणजे तीच आता या घरची लक्ष्मी ! " मुलीच्या घरी पसंती कळविली गेली. मुलीकडच्या मंडळींनी मुलगा मुंबईला असतो त्याला मुलगी दाखवायची का अशी पृच्छा केली तेव्हा, " तशी काही आवश्यकता नाही ", असा भाऊंनी परस्पर 'निकाल' दिला. आणि अशा रीतीने दादांचा विवाह ठरला !

हा सारा विवाहाचा प्रकार सविस्तर सांगण्याचा मुख्य हेतू म्हणजे तत्कालीन सामाजिक परिस्थिती लक्षात येते. कुटुंबप्रमुखाचा निर्णय हा शिरसावंद्य असे. प्रत्यक्ष दादांनी आयुष्यभर सोबत करणारी जीवनसहचरी बघितली नव्हती किंवा ज्याच्याबरोबर आपल्याला आपले

उभे आयुष्य घालवायचे आहे त्या लीलाताईंनीही आपल्या पतीला बघितले नव्हते. पण वडिलधारी माणसं जे काही करतील ते आपल्या हिताचेच असेल ही ठाम श्रद्धा. आजकाल विवाहेच्छू तरुण-तरुणी हॉटेलात जाऊन परस्पर-परिचय करून घेतात. आपल्या 'वेव्ह लेंथ्स' जुळतात की नाही हे पाहण्यासाठी हिंडणे-फिरणे होते. त्यानंतर लग्न होते. इतकं एकमेकांना पारखून घेतल्यावरही त्यांची कडाकडा भांडणे होतात, विकोपाला जातात. दोघेही आपापला तथाकथित 'ईगो' जपण्याच्या नादात आयुष्यभर एकमेकांना गमावून बसतात ! याउलट, लग्नाच्या दिवसापर्यंत एकमेकांना न बघितलेली दादा-लीलाताईंसारखी माणसं बघितली, त्यांचे दुधात साखर विरघळावी असं एकरूप झालेलं, एकमेकांसाठी समर्पित झालेलं जीवन बघितल्यावर नेमकं कोणाचं चूक कोणाचं बरोबर तेच कळेनासे होते. असो.

९ जून १९३५ चा लग्नाचा मुहूर्त निश्चित करण्यात आला. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी असं म्हणतात तशीच अवस्था या रामभटाची म्हणजे दादांची झाली. वाईहून मुंबईत आले तेव्हा मस्तकावर चांगली फूट-दीडफूट लांबीची शेंडी विराजमान होती. कानात भिकबाळी होती. युरोपियन साहेबाकडे नोकरी सुरू झाल्यावर या वाईकराची शेंडी निशाणीपुरती चार बोटांवर आली ! भिकबाळीने सूऽबाल्या केला. लग्नाच्या वेळी भाऊंनी शेंडीचे विचारले तर काय करायचे ? भिकबाळीचा प्रश्न नव्हता. म्हणून आख्ख्या लग्नात दादांनी एक वेगळीच शक्कल लढविली. एक नाटकच केले. केशव निमकर या जुन्या मित्राच्या साहाय्याने एक छोटे, नाटकात मिळते तसे गंगावनच शेंडीच्या जागी चपखल चिकटविले. लग्नात जसा पाठराखा असतो, तसा हा केशव निमकर 'शेंडीराखा' होता. सगळ्या लग्नाच्या धामधुमीत त्याची काळजी एकच. शेंडीचे काही बरेवाईट होत नाही ना !

लग्नसोहळा थाटात पार पडला. अगदी घोड्यावरून वरात निघाली. सर्वांनी १५–१६ दिवसांपर्यंत लग्नसोहळा साजरा केला. फक्त लग्नसमारंभाला उशिरात उशिरा येऊन, लौकरात लौकर निघणारा

माणूस एकच. तो म्हणजे खुद्द नवरदेवच ! नोकरीची टांगती तलवार डोक्यावर होती ना !

साऱ्या लग्नसमारंभात दादांनी आणि लीलाताईंनी एकमेकांना थोडेसे 'न्याहाळले' ते फक्त लग्नसमारंभानिमित्त मुद्दाम ठेवलेल्या पाटणकर-बुवांच्या गाण्याच्या वेळी. अगदी जवळून म्हणजे दहा-बारा फुटांच्या अंतरावरून. लग्नाच्या वेळी मुंडावळचांमुळे चेहरा नीटसा दिसलाच नव्हता !

**वचनपूर्ती– कर्तव्यतत्परता**

दादा साहेबाला दिलेल्या वचनाला जागून १२ जूनला वेळेवर कामावर हजर झाले. प्रवेश-परीक्षांची धामधूम चालू झाली आणि दादा कामात पूर्णपणे गुरफटून गेले.

घरी आल्यावर मात्र त्यांना वास्तवाची जाण होई. लग्न झाले खरे पण बिऱ्हाड मांडायला जागा कुठे होती ? बहिणीच्या घरात बायकोला आणून बिऱ्हाड थाटणे अशक्यप्रायच. मिळकत तुटपुंजी. नवी नोकरी सुरू होऊन जेमतेम महिना-दीड महिना झालेला. सहा महिन्यांचा प्रोबेशन पीरिअड होता. त्यानंतर काम बघून नोकरी कायम व्हायची होती. साहेबाची मर्जी राखणे नोकरीच्या दृष्टीने आवश्यक होते, म्हणून ऑफिसात दादा जिवापाड मेहनत घेत असत. दादा जेरीस आले होते. इतक्या अनिश्चिततेच्या फेऱ्यात असताना भाऊंनी आपले लग्न ठरविलेच कशाला ? असा प्रश्न दादांच्या मनाला सारखा पडे. मुलीकडील बाजू चांगलीच वरचढ. वडील डॉक्टर, चुलते वकील. आपण नुसते मॅट्रिक. घराणे भिक्षुकाचे. नोकरीत जेमतेम पन्नास रुपड्या मिळणार ! वाईला ठीक आहे पण मुंबईसारख्या शहरात एवढ्या तुटपुंज्या आमदनीत कसे भागायचे ? बिऱ्हाड नाही म्हणून सौ. लीलाताई जवळजवळ वर्ष-भर सासर-माहेर, वर्षसोहळे करीत राहिल्या.

पहिल्या दिवाळसणासाठी दादांना मिरजेला बोलावलेले होते. पण न्यूनगंडाने पछाडले गेल्यामुळे दादांनी जाण्याची हिंमतच केली नाही.

"अजून नोकरी कायम झालेली नसल्यामुळे रजा मिळणे अशक्य आहे; तेव्हा येऊ शकणार नाही" असे पत्र पाठवून ती वेळ दादांनी मारून नेली. दादांना मनोमन आपल्या बायकोची— लीलाताईंची दया यायची. एका सुखवस्तू घरातील मुलगी भिक्षुक-घरात येऊन पडली. घरात सोवळे-ओवळे, सासू-सासरे, चुलत सासवा, जुन्या पिढीतील सोवळ्या वृद्धा, या साऱ्यांच्या गोतावळ्यात तिची कुचंबणा होऊ नये ही प्रामाणिक इच्छा. बिऱ्हाड मांडता येत नाही त्यामुळे प्रत्यक्ष भेट नाही. काही सांगता येईना. शेवटी दादांनी एक युक्ती केली. दादांची मोठी विवाहित वहीण त्या वेळी वाईतच बिऱ्हाड करून होती. तेव्हा त्या बहिणीमार्फत दादांनी लीलाताईंना एकूण घर, घरातील माणसं, त्यांचे स्वभाव, आवडीनिवडी या साऱ्यांचे तपशील पत्रातून कळविले.

पण असे किती दिवस चालणार ? दादा नोकरीखेरीज वेळात वेळ काढून टायपिंगची कामे करू लागले. पहिल्या सहा महिन्यांचा प्रोबेशन पीरिअड संपला. प्रिन्सिपॉल बर्लेसाहेबांना दादांचे चोख काम, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा आवडला. दादांची नोकरी कायम झाली. पगारही दहा रुपयांनी वाढून पन्नासचा साठ झाला. दादांनी जागा शोधायला सुरुवात केली. नोकरी माटुंग्याला. बहिणी कुर्ला-शिवडीला. तेव्हा शक्यतो दादा माटुंग्याच्या आसपासच जागा बघू लागले. अखेर माटुंग्याच्या भिवंडी-वाला चाळीत १८'×१०' ची जागा घेतली. पार्टीशन घातल्यामुळे ८'×१०' आणि १०'×१०' अशा दोन खोल्या झाल्या. भाडे १७ रुपये. वर्षभरात नोकरीखेरीज कष्ट करून जमविलेल्या पैशातून भात-आमटीसाठी दोन पातेली, तोटी असलेले एक पाण्याचे पिंप, चहा-साखरेसाठी दोन पितळी डबे वगैरे आवश्यक जुजबी सामान खरेदी केले. एक गणपतीचा फोटो आणला. हार, हळदकुंकू, नारळ घेऊन यथासांग पूजा करून जागा ताब्यात घेतली. भाऊंना कळविले.

ही गोष्ट सप्टेंबर १९३६ मधील. दादांची आई सौ. अंबिकाबाई नवपरिणीत वधूला घेऊन दादांच्या रेल्वेमधील मेहुण्यांच्या सोबतीने आली. त्यांनीही वाईहून येताना आवश्यक भांडी-कुंडी आणली. दादांच्या

आईने हौसेने नव्या संसाराची मांडामांड करून दिली. दादांनी आईला व वायकोला मुंबईत हिंडवले. कुर्ल्याला, कॉटनग्रीनला दोघी बहिणींकडे नेऊन आणले. चांगली घरची सोबत मिळाल्यावर दादांची आई वाईला परतली.

इकडे दादा-लीलाताईंचा खऱ्या अर्थाने संसार सुरू झाला. लग्नानंतर जवळजवळ सव्वा वर्षानंतर !



## ५.

" कलह जीवनाचा "

संसार सुरू झाला पण घरात दोघेच. काही मौजमजेला जीवनात स्थान नव्हते. मिळकत तुटपुंजी. दादा एकटे होते तेव्हा ठीक होते. आता दोघे होते. मिळकतीचा जवळजवळ एकतृतीयांश भाग हा निव्वळ घरभाडे, वीज, पाणी यांसाठी खर्ची पडायचा. बिऱ्हाड मांडल्यावर ये-जा पण सुरू झाली. दादा काय किंवा लीलाताई काय, दोघांचाही स्वभाव लाघवी. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांची रीघ कधी थांबत नसे ! येणाऱ्यांना सौ. लीलाताईंच्या चेहऱ्यावरील हास्य आणि प्रसन्न भाव बघून आपल्यामुळे या दांपत्याला काही अडचण होतेय वा आर्थिक झीज सोसायला लागतेय याची सुतराम कल्पनाही येत नसे. दादा नेहेमीप्रमाणे पहाटे साडे-तीनला उठून, दिनचर्या आटोपून लवकर बाहेर पडत असत. अर्थार्जन वाढविण्यासाठी.

नोकरीव्यतिरिक्त काही जादा कामे करीत. यासाठी त्यांना काय काय करावे लागले असेल ! स्टेशनरी वस्तू, साबण घरोघरी जाऊन विकायचे. बेळगावचे लोणी मुंबईकरांना खूप आवडते असे लक्षात आल्यावर घरोघरी जाऊन लोणी-विक्री करीत असत. दिवसाकाठी ४०–४५ रत्तल लोण्याची विक्री त्यांनी केली. खात्रीचे लोणी घरबसल्या मिळते म्हणून गिऱ्हाईक खूष तर कमिशनपोटी चार पैसे कनवटीला लाग-तात म्हणून दादा खूष. कोणताही उद्योगधंदा त्यांनी हलका मानला नाही. जग काय म्हणेल ह्याची फिकीर कधी केली

नाही. भिवंडीवाला चाळीत दादांनी लग्नानंतर जुलै ते डिसेंबर १९३६ असे पाच-सहा महिने काढले. चाळ तशी ठीक होती पण सार्वजनिक संडास, सर्वत्र पडलेला केरकचरा यांमुळे राहणे नकोसे वाटे. वाईहून आई-वडील वा मिरजेहून कोणी अन्य नातेवाईक आले की दादांना ओशाळवाणे वाटे. पण इलाज नव्हता. याच सुमारास सिव्हिल सर्जन डॉ. भाटवडेकरांनी माटुंग्याला स्वतःची बिल्डिग बांधली होती. त्या घराची वास्तुशांत दादांच्या वडिलांच्या– भाऊंच्या हस्ते झाली होती. ताटके-भाटवडेकर कुटुंबांचा परस्परपरिचय होताच. कारण या डॉक्टरांची पत्नी वाईची माहेरवाशीण होती. तिचा भाऊ काही काळ वाईला असताना दादांच्याच शाळेत होता. डॉ. भाटवडेकर स्वतः सिव्हिल सर्जन असल्याने वारंवार त्यांच्या गावोगावी बदल्या होत असत. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची आबाळ होई. म्हणून त्यांनी आपल्या चार मुलांना माटुंग्याच्या बिल्डिगमध्ये ठेवले, व सोबतीला मुलांच्या वाईच्या आजीला म्हणजेच त्यांच्या सासूबाईंना ठेवले होते.

भाटवडेकर मंडळींची इच्छा दादांनी भिवंडीवाला चाळ सोडून त्यांच्या माटुंग्याच्या बिल्डिगमध्ये राहावयास यावे. दोन खोल्या. संडास-बाथरूम स्वतंत्र. म्हणजे आजच्या भाषेत सेल्फ कंटेन्ड दोन रूम्स. भाडे २२ रुपये. पण त्या काळात दादांना त्यांच्या आर्थिक कुवतीनुसार १७ रुपयांच्या जागेतून २२ रुपयांच्या जागेत राहावयास जाणे म्हणजे धाडस वाटत होते. पै-पै जमविता जमविता जीव मेटाकुटीस यायचा. तेव्हा घर-भाड्यापोटी दर महिन्याकाठी एकदम पाच रुपये जास्ती द्यायचे परवडण्यासारखे नव्हते. शिवाय भाटवडेकर म्हणजे बडी मंडळी. त्यांच्यापासून आपल्यासारख्या कारकुनी पेशाच्या माणसाने चार हात दूरच राहावे असे दादांना मनापासून वाटे. डॉक्टर म्हणजे त्या काळात बडी असामी समजली जात असे. स्वतःचे सासरे डॉक्टर आणि आपण किरकोळ कारकून याच न्यूनगंडापोटी दादांनी लग्नानंतर पहिली चार-पाच वर्षे मिरजेला जाण्याचेही टाळले होते! मग भाटवडेकरांचे शेजारी म्हणून जाण्याची बातच सोडा. दादांनी त्याप्रमाणे भाडे परवडणार नाही म्हणून येऊ शकत नाही असे स्पष्टपणे कळवून टाकले. पण

भाटवडेकर मंडळींना दादांचा शेजार हवाच होता. एक तर बिल्डिंग नवी. आजूबाजूला वस्ती कमी. मोकळी मैदानेच जास्त. (ही १९३६-३७ सालातील गोष्ट आहे.) त्यामुळे चारही मुलांना आणि त्यांच्या देखभाल करणाऱ्या आजींना सोबतीची नितान्त आवश्यकता होती. शेवटी भाटवडेकर कुटुंबातील वाईतील दादांचा वर्गमित्र, "तू आता जेवढे भाडे भरतोस, तेवढेच दे, पण राहायला येच' असा आग्रह करायला लागल्यावर दादांना तो प्रस्ताव मान्य करण्याखेरीज गत्यंतरच उरले नाही. अखेरीस १ जानेवारी १९३७ सालापासून दादा माटुंग्याच्या डॉ. भाटवडेकरांच्या बंगल्यात राहायला आले ते पन्नास-पंचावन्न वर्षे उलटली तरी त्याच जागेत वास्तव्य करून राहिले. भाटवडेकर-ताटके-संबंध कागदोपत्री मालक-भाडेकरू असले तरी सदैव आत्यंतिक जिव्हाळ्याचे राहिले. ती सारी मुलं दादांना आपले मामा मानायची.

माटुंग्याची ही जागा अत्यंत आटोपशीर, हवेशीर आणि स्वच्छ. (आजमितीसही आहे.) त्या काळी आजूबाजूला बरीच झाडी होती; झाडी कसली, जंगलच ते. व्ही. जे. टी. आय. च्या आजूबाजूला कस्टम अधिकाऱ्यांच्या बारा बंगल्यांची वस्ती सोडली तर सारा भाग निर्मनुष्य. रात्रीबेरात्री वाटमाऱ्या होत. क्वचित प्रसंगी खून पडत. रात्री ऑफिसात (व्ही. जे. टी. आय. मध्ये) कधी कधी उशिरापर्यंत बसावे लागले तर ऑफिसातील रखवालदार कंदील घेऊन दादांना घरापर्यंत सोबत द्यायचा.

लग्न झाल्यावर दादा वेळेनुसार कामावर हजर झाल्यामुळे प्रिन्सिपॉल डॉ. बर्लेसाहेबांचा दादांवर विश्वास बसला. आणि पुढे अनेक प्रसंगांनी तो वाढतच गेला. दादा वाईत ११–१२ जूनला आले आणि लगेच प्रवेश-परीक्षा सुरू झाल्या. त्यामुळे कामाची एकच धांदल उडाली. हळूहळू ऑफिस-रुटीनला दादा चांगले रुळले. सकाळी आठ वाजता ते ऑफिसात जात. डॉ. बर्ले येईपर्यंत आलेले सर्व टपाल सॉर्टिंग करून निरनिराळ्या विभागांकडे पाठविणे, ज्यांची उत्तरे देणे आवश्यक असे अशी पत्रे, डॉ. बर्ले यांजकडे घेऊन जाणे, त्यांनी प्रत्येक पत्रांवर उत्तरासाठी दिलेले डिक्टेशन उतरवून घेणे, साहेब कॉलेजचा राउंड

घेऊन, लेक्चर्स घेऊन परत येत तोवर सांगितलेला मजकूर स्वच्छ टाईप करून सहीसाठी तयार ठेवणे अशी कामे करीत करीत घरी जायला ५॥–६ वाजायचे. परीक्षांच्या दिवसांत तर दादांना रात्री ८–८॥ पर्यंत थांबावे लागे. इतर सहकारी दादांच्या आधीपासून पंधरा, पंधरा वीस-वीस वर्षे व्ही. जे. टी. आय. मध्ये होते. पण जेमतेम आपल्या नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त त्यांना काही माहीत नसे. अधिक माहिती न करून घेण्याकडेच त्यांचा कल असायचा. जादा काम अंगावर पडेल ही भीती ! याउलट, प्रत्येक नवी गोष्ट शिकून आत्मसात करण्याचा दादांचा परिपाठ होता.

सर्व कामे सांभाळणारे मुख्य आधारस्तंभ हेडक्लार्क श्री. आपटे अचानक टाइफॉईडने आजारी झाल्यावर डॉ. बर्लेनी त्यांचे काम करण्या-बद्दल विचारले, तेव्हा प्रत्येकजण अंग चोरू लागला ! त्यांनी दादांना विचारले, तेव्हा त्यांनी "मला त्यांच्या कामाची माहिती नाही पण कोणी शिकविले तर करण्याची तयारी आहे" असे नम्रपणे सांगितले. या उत्तरावरच साहेब खूष झाले. मार्चच्या पहिल्या आठ-वड्यात वार्षिक परीक्षा होत्या. दुसऱ्याच दिवसापासून साहेबांची 'शिकवणी' सुरू झाली. पेपर्स टाईप करणे, स्टेन्सिल काढणे, टाईम-टेबल तयार करणे, बसण्याची व्यवस्था इथपासून तो प्रवेश कसा द्यायचा, वेटिंग लिस्ट कशी बनवायची या साऱ्या गोष्टी दादांनी आत्म-सात केल्या. त्या वेळी दादांचे वय होते एकवीस वर्षांचे. पण हे सारे काम त्यांनी इतक्या चोखपणे, आवश्यक ती गुप्तता (secrecy) राखून केले की आपटेसाहेब रजेवरून परत आल्यावर साहेबाने दादां-विषयी मनापासून प्रशंसोद्‌गार काढले. दादांना अंगावर मूठभर मांस चढल्यासारखे झाले ! डॉ. बर्लेंच्या शिफारसीमुळे दादांचा पगार नोकरीत कायम झाल्यावर रु. ७५।– झाला आर्थिक लाभाचे समाधान होतेच पण मानसिक आनंद मोठा होता.

डॉ. बर्लेना १९४० मध्ये प्रिन्सिपॉलपदावरून निवृत्त व्हावे लागले. एव्हाना देशात स्वातंत्र्याचे वारे वाहायला लागून सर्वत्र काँग्रेसची प्रांतिक सरकारे स्थापन झाली होती. नवीन धोरणानुसार सर्व युरोपियन

लोकांना हळूहळू निवृत्त करण्यात येत होते. कै. बाळासाहेब खेरांचे प्रांतिक सरकार त्या वेळच्या मुंबई प्रांतावर आल्यावर डॉ. बर्ले निवृत्त झाले. या घटनेचे दादांना अर्थातच वैयक्तिक रीत्या खूप वाईट वाटले. त्यांच्या सहवासामुळे आणि एकूण अनुभवांमुळे दादांना ब्रिटिश लोकांचा वक्तशीरपणा, शिस्तप्रियता, गुणग्राहकता इत्यादी गुणविशेष मनापासून आवडले होते. हे सारे गुण मुळात दादांमध्ये होतेच, त्याला साहेबांचा सहवास अधिक पोषक ठरला. डॉ. बर्ले यांची दादांवर खास मर्जी बसली ह्याचे एक-दोन किस्से सांगण्यासारखे आहेत.

० ० ० ०

आपटे अचानक आजारी झाल्यावर दादांनी एखादे आव्हान स्वीकारल्या-प्रमाणे मेहनत घेऊन मार्चमधील परीक्षांची सर्व व्यवस्था अगदी जय्यत तयार ठेवली होती. पण दादांसारखा एक तरुण माणूस हे सगळे ' मॅनेज ' करतो हे न बघवणारी एक व्यक्ती होतीच. ऐन परीक्षा चालू असताना एक पेपर ' फुटल्याची ' तक्रार टेक्स्टाईल डिपार्टमेंटच्या एका वरिष्ठ प्राध्यापकाने डॉ. बर्ले यांजकडे नेली. मामला गंभीर होता. गोष्ट खरी असती तर त्यात दादांचा हलगर्जीपणा शाबीत झाला असता. नोकरी गेली असती. शिवाय नामुष्की. डॉ. बर्लेनी राउंड घेतला. दादांना ऑफिसात बोलावून घेतले व या प्रकाराबद्दल विचारले. दादा एकदम चकितच झाले. कारण सर्व पेपर्स व्यवस्थित सीलबंद करून स्वतःच्या हातांनीच त्यांनी सर्व स्टेशनरी कुलुपबंद केलेली होती. मनाशी दहा वेळा विचार करूनही त्यांना कोणत्याही प्रकारची गफलत आठवेना.

निर्धाराने त्यांनी डॉ. बर्लेना सांगितले की असे होणे कदापि शक्य नाही. तुम्हीच प्रत्यक्ष शहानिशा करा. मग त्यांनी त्या वरिष्ठ प्राध्यापकाला छेडले. त्याने दुसऱ्याचे नाव घेतले व त्याला बोलावण्यास ते निघाले. दादांनी डॉ. बर्लेना विनंती केली की त्यांना आता बाहेर सोडू नका. कृपया इथेच बसू द्या. त्यांनी दादांची विनंती मान्य केली. प्राध्यापकाला तेथेच बसायला लावून त्यांनी ज्यांचे नाव घेतले त्याला बोलावले. त्याने आणखी तिसऱ्याचे नाव घेतले. मग त्याला बोलावण्यात आले.

पण प्रत्यक्षात कोणीच कबूल करेना. जो तो दुसऱ्याचे नाव घेई. जो पेपर फुटला असे म्हणत होते तोच पेपर सर्व विद्यार्थिवर्ग लिहीत होता. मग मात्र डॉ. बर्लेंचा संताप अनावर झाला. त्यांनी एकेकाला फैलावर घेण्यास सुरुवात केली. ते काही कडक कारवाई करतील या भीतीनें दादाच मध्ये पडले. "ज्यांनी माझ्यावर खोटा आरोप केला त्यांनी तुमची व माझी माफी मागणे पुरेसे होईल" असे सुचविले. डॉ. बर्ले ठीक आहे असे म्हणाले. एकेकजण माफी मागून खजिल चेहऱ्यानें बाहेर पडला. जाताना एकजण चुकून अनवधानाने एका ज्येष्ठ कारकुनाला "तुझ्यामुळे आम्हा सर्वांना माफी मागावयाला लागली" असे पुटपुटला; त्याबरोबर या साऱ्या प्रकाराचे 'मूळ' सापडले ! अर्थात, ब्रिटिश शिस्तीनुसार त्याच महिन्याअखेर 'त्या' कारकुनास काढून टाकण्यात आले. एकंदरीत हे प्रकरण म्हणजे मोठी अग्निपरीक्षाच होती. दादा त्यातून चांगले तावूनसुलाखून बाहेर पडले. डॉ. बर्लेंचा दादांविषयीचा विश्वास अधिकच दुणावला !

० ० ० ०

एके वर्षी परीक्षेच्या आदल्याच दिवशी मुंबईत वादळी पाऊस रात्रभर पडला. रस्त्यात झाडे आडवी झाली. ठिकठिकाणी गुडघा गुडघा पाणी झाले. वाहने बंद. दादांना तर सकाळी उठून साडेसातपर्यंत इन्स्टिटयूटमध्ये जाणे भाग होते. कारण सेफच्या चाव्या दादांकडे व परीक्षेचे पेपर्स सेफमध्ये ! घरात रेनकोट नव्हता. छत्री तर वाऱ्यामुळे नक्कीच उलटणार. पण गेले हे पाहिजेच. दादांनी धारिष्टच केले. "काय एवढी जाण्याची निकड आहे का ? कशाला एवढया पावसात जाता ?" असे लीलाताई म्हणत होत्या. पण दादा आपल्याच नादात. त्यांनी पँट-बूट या नेहेमीच्या पोशाखाला रजा दिली. चक्क धोतर नेसून चप्पल घालून निघाले. घरापासून निघाल्यावर मुख्य रस्त्यावर आल्यावर एक व्हिक्टोरिआ (घोडयांची बगी) दिसली. व्हिक्टोरिआवाल्याला सर्व परिस्थिती, अडचण सांगितल्यावर तो सुदैवाने तयार झाला. भाडे तीन रुपये. (नेहेमी बारा आणे !) दादांचा जीव भांडयात पडला. वरातीप्रमाणे संथ गतीने गुडघाभर पाण्यातून ही 'शोभायात्रा'

इन्स्टिटयूटच्या अलीकडील वळणावर पोचली असेल नसेल एवढयात एक झाड काडकन आवाज करीत खाली पडत आहे असे पाहताच बगीवाल्याने चपळाईने लगाम खेचत खेचत घोडयास मागे मागे खेचले; त्यामुळे बगीवर झाड पडण्याचे वाचले; दादांचा प्राण वाचला ! आता एवढया प्रचंड 'व्यत्ययामुळे' बगी पुढे जाणे शक्यच नव्हते. दादा पैसे देऊन पायउतार झाले. बगीवाला तसा सज्जनच निघाला. बिचाऱ्याने दादा जास्ती पैसे देऊ करत होते तरी दोनच रुपये घेतले. धोतराचा काचा मारून दादा वळणावळणाने मार्ग काढीत इन्स्टिटयूटमध्ये ७–४० ला पोचले. ह्या 'एतद्देशीय' पोषाखात डॉ. बर्लेंनी दादांना कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे एवढया पावसातून येऊन दादांनी त्यांना चकितच केले होते. त्यांनी विचारल्यावर पँट न घालता धोतर का नेसले ह्याचा उलगडा केला.

कर्तव्यपूर्तीसाठी त्यांचे कष्ट सोसून येणे आणि कर्तव्यनिष्ठेची जबाबदारीची जाणीव या गोष्टी लक्षात आल्यावर डॉ. बर्लेसाहेबांना मनापासून गहिवरून आले. पावसाळयातील धोतर परिधान करण्याचा 'ॲडव्हांटेज' साहेब बऱ्याच दिवसपर्यंत आपल्या मित्रांना सांगत होता.

० ० ० ०

व्ही. जे. टी. आय. मध्ये गोल्डन ज्युबिली (१८८८–१९३८) इ. स. १९३८ मध्ये थाटाने साजरी करायची ठरले. तेव्हा समारंभ भव्य प्रमाणावर साजरा नि यशस्वी करण्यासाठी अनेकविध छोटया-मोठया कमिटयांची स्थापना करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड ब्रॅबोर्न यायचे होते. पण आयत्या वेळेस त्याना रजेवर जावे लागले. त्यामुळे त्यांच्याऐवजी ॲक्टिंग गव्हर्नर म्हणून नेमले गेलेले रॉबर्ट बेल ह्यांनीच समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून यावे असे ठरले. हा बदल अगदी ऐनवेळी झाला. त्यांचे अध्यक्षपदाचे भाषण समारंभाच्या दिवशी प्रोग्रॅम-कार्डाबरोबरच द्यायचे असे ठरले. भाषण छापायचे म्हणजे आधी ते लिखित स्वरूपात पाहिजे. अवधी अगदी थोडा होता. रॉबर्ट बेलनी डॉ. बर्लेंना फोनवरून सांगितले की तुमच्या स्टेनोला रात्री आठ वाजता इन्स्टिटयूटच्या कार्यालयात बोलवा म्हणजे

मी माझे भाषण देईन. डॉ. बर्लेना गव्हर्नरसाहेबांचे डिक्टेशन घ्यायचे म्हणजे दादांइतका योग्य माणूस आढळणेच शक्य नव्हते. दादांना निरोप गेला. दादा लगबगीने नियोजित वेळेच्या आधीच दहा मिनिटे ऑफिसात गेले. पण पुन्हा गडबड. गव्हर्नरसाहेबांचा निरोप– आयत्या वेळच्या कामांच्या गडबडीने "प्रत्यक्ष येता येत नाही. फोनवरच नोट्स देतो." दादा मनोमन हबकले. डिक्टेशन घेणे त्यांना सवयीचे होते. पण देणारा माणूस समोर असताना ठीक आहे. काही समजले नाही तर विचारून घेता येते. इथे तर डिक्टेशन फोनवरून आणि तेसुद्धा प्रत्यक्ष गव्हर्नरसाहेब घालणार! येरा-गबाळचाचे धावेच दणाणले असते! पण अशाच प्रसंगी दादांच्या अंगी अद्‌भुत शक्ती संचारल्यासारखी होते. दादांनी मनोमन कुलदेवतेचे स्मरण केले. त्या मनोबळाच्या जोरावर अक्षरशः कानात 'प्राण' आणून डिक्टेशन घेतले. किती वेळ? चक्क चाळीस मिनिटे. परत वाचायला सांगितले. दादांनी वाचल्यावर ते म्हणाले, "आता लगेच टाइप करून गव्हर्नमेंट हाउसवर ये; म्हणजे तपासून देईन. म्हणजे उद्याच छापावयास देता येईल."

गव्हर्नरसाहेबांचा हुकूम. होय-नाहीचा प्रश्नच नव्हता. दादांना गव्हर्नमेंट हाउस कुठं आहे तेच माहीत नव्हते. बरं, टाइप केल्यावर इतक्या रात्री ह्या माटुंग्याच्या ओसाड बाजूला टॅक्सी मिळणे दुरापास्त! एव्हाना रात्रीचे ९॥ वाजले होते. दादांपुढे मोठे धर्मसंकट उभे राहिले. मग एका साहेबांच्या 'कचाटच्यातून' सुटण्यासाठी त्यांनी दुसऱ्या साहेबांची मदत घ्यायचे ठरविले. ते इन्स्टिटयूटच्या आवारातच राहात असलेल्या डॉ. बर्लेसाहेबांच्या बंगल्यावर गेले. त्या वेळी दादांची बर्लेसाहेबांशी एवढी घसट वाढलेली नव्हती. पण हिय्या करून दादांनी त्यांना सर्व हकीकत सांगितली. अडचणी सांगितल्या. बर्लेसाहेब म्हणाले, "काही हरकत नाही. तू आधी टाइप कर. मग मला फोन कर." "पण साहेब दहानंतर आपल्याला इमर्जन्सीशिवाय फोन करता येत नाही ना?" असे दादा म्हणाल्यावर डॉ. बर्ले स्वतः खाली आले. रखवालदाराला त्यांनी दादांच्या देखत बजावले, की "ताटकेंचा फोन आला की मला लागलीच बोलव." दादा धावतच पुन्हा परत ऑफिसात आले. नवीन

कोरे कागद घेतले. तीन प्रती टाइप केल्या. एव्हाना १०॥ वाजले होते. ठरल्याप्रमाणे बंगल्यावर फोन केला. कपडे करतो नि येतो असा बर्लेसाहेबांचा निरोप. तोवर दादांनी ऑफिसात सर्व आवराआवर केली. दादांनी मोठा लिफाफा घेतला. त्यात टाइप केलेले कागद व इन्स्टिटय़ूटचा वार्षिक अहवाल आठवणीने ठेवला.

दहा मिनिटांत डॉ. बर्ले, मिसेस बर्ले व रखवालदार आले. रखवालदाराच्या हातात चहाचा ट्रे. बिस्किट्स व काही खाद्यपदार्थ होते. ते पाहून दादा आश्चर्यचकित झाले. मिसेस बर्ले म्हणाल्या, " मि. ताटके, तुम्ही आठ वाजल्यापासून काम करत आहात. जेवण झाले की नाही माहीत नाही. आता तेवढा वेळपण नाही. लगेच जायचंय. तेव्हा थोडे खाऊन घ्या." दादा मनोमन गहिवरले. हाताखालच्या यःकश्चित माणसाची एवढी कोण काळजी घेतो ? चहा झाल्यावर रखवालदार व मिसेस बर्ले बंगल्यावर गेल्या. दादा आणि बर्लेसाहेब त्यांच्या मोटारीतून गव्हर्नरसाहेबांकडे रवाना झाले. तिथे पोचले तेव्हा रात्रीचे ११॥ वाजले होते. तेथील रखवालदाराने हुकमाप्रमाणे ' मि. ताटके कोण ? फक्त त्यांनाच आत सोडण्याचा हुकूम आहे.' असे सांगितले. मग काय ? फक्त मि. ताटके आत आणि डॉ. बर्लेसाहेब गेटच्या बाहेर दरवाज्यात बसून ! दुसऱ्या एका गेटमनबरोबर दादांना गव्हर्नरसाहेबांकडे नेण्यात आले. दादांनी बेलसाहेबांना सर्व हकीकत सांगितली. लगेच सूचना गेल्या व बेलसाहेबांनी डॉ. बर्लेंना आत बोलावून घेतले. त्यांना वाटले होते की ताटके टॅक्सी करून एकटेच येतील. अर्ध्या तासात टाइप केलेले कागद तपासून परत मिळाले. बेलसाहेब स्वतः बाहेरच्या गेटपर्यंत निरोप देण्यास आले. त्यांच्या रखवालदारास नियमाप्रमाणे ड्युटी बजावली म्हणून रोख दहा रुपये बक्षीस दिले. डॉ. बर्ले नंतर अपरात्र झाली होती म्हणून दादांना माटुंग्याच्या घरापाशी गाडीने सोडून आपल्या बंगल्यावर परत गेले.

वरील घटना आजच्या काळात घडत आहे अशी नुसती कल्पना केली तरी आजच्या परिस्थितीत कोण कसा वागेल ह्याची आपोआप कल्पना येईल ! अधिक भाष्याची आवश्यकताच नाही. ब्रिटिश लोक कसेही

असले तरी त्यांच्या कर्तव्यतत्परता, शिस्त, गुणग्राहकता ह्या गुणांना 'सॅल्युट' केलाच पाहिजे.

अशा अनेक प्रसंगांमुळे डॉ. बर्लेची दादांवर खूप मर्जी बसली. इतकी की व्ही. जे. टी. आय. सोडून डॉ. बर्लेना जावे लागल्यावर त्यांच्या नवीन कामात मदतनीस (P. A.) म्हणून त्यांना आठवण झाली ती दादांचीच. त्याचे असे झाले–

स्वातंत्र्यपूर्व काळात प्रांतिक सरकारे येऊन मुंबई प्रांतात बाळासाहेब खेरांचे मंत्रिमंडळ आले होते. नव्या राष्ट्रीय धोरणानुसार हळूहळू युरोपियन ऑफिसर्सना रजा देऊन त्यांच्या जागी भारतीय माणसे नेमण्याचे ठरले. त्यानुसार डॉ. बर्ले यांनी व्ही. जे. टी. आय. च्या प्रिन्सिपॉलपदाची सूत्रे खाली ठेवली. पण नेमके त्याच सुमारास दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यामुळे तेव्हाच्या ब्रिटिश सरकारला 'वॉर टेक्निशिअन्स ट्रेनिंग स्कूल' स्थापन करण्याची आवश्यकता भासली. लढाई-साठी असे बरेच टेक्निशिअन्स सरकारला हवे होते. डॉ. बर्लेनी ही स्कीम राबवावी असे ठरले. त्याप्रमाणे डॉ. बर्लेना वरळीला समुद्राच्या टोकाला 'दि क्लिफ्' (The cliff) नावाची एक भव्य इमारत होती, तेथे ऑफिस व निवासस्थानासाठी मोठी आलिशान जागा फर्निचरसह देण्यात आली. त्यांची नेमणूक 'सिनिअर रिजनल इन्स्पेक्टर ऑफ वॉर टेक्निशिअन्स स्कीम' बॉम्बे, ह्या हुद्द्यावर गव्हर्नमेंट ऑफ इंडियातर्फे करण्यात आली. डॉ. बर्लेना एका विश्वासू मदतनीसाची नितान्त आवश्य-कता होती. त्यांना अर्थातच दादांची आठवण आली. म्हणून त्यांनी दादांना बोलावून घेतले; व त्यांच्याकडे काम करण्याबद्दल सुचविले.

हा दादांचा गौरवच होता. पण व्यावहारिक दृष्टचा पंचाईत अशी होती की ही नोकरी कायम स्वरूपाची नव्हती. युद्ध संपुष्टात आले की ही स्कीम गुंडाळली जाणार हे स्पष्ट होते. व्ही. जे. टी. आय. दादांना सोडायला तयार नव्हते आणि इकडे दादांनाही डॉ. बर्लेना नाही म्हणणे जिवावर आले होते. व्ही. जे. टी. आय. आणि डॉ. बर्ले यांच्या दरम्यान हा घोळ बराच काळ चालला. शेवटी वैयक्तिक रीत्या दादांनाच विचारण्यात आले तेव्हा त्यांनी सकाळी ८॥ ते २॥ व्ही. जे. टी. आय.

व दुपारी ३ ते ८ वरळीला डॉ. बर्ले यांच्याकडे काम करण्याचे कबूल केले. दुपारच्या लंचटाइमचे काय ? तेव्हा दुपारचे जेवण आपण घेत नाही हे वरिष्ठ अधिकाऱ्यांना दादांना त्या वेळी प्रथमच सांगावे लागले. ही तडजोड मान्य होऊन दादांच्या सर्व्हिसेस काही काळापुरत्या व्ही. जे. टी. आय. तर्फे ' वॉर टेक्निशिअन्ससाठी ' म्हणजे डॉ. बर्ले यांजकडे सुपूर्द करण्यात आल्या.

दादांना ह्या नव्या व्यवस्थेमुळे खूप कष्ट होत. धावपळ होई, पण दोन्हीकडील रुपये ७० + ७० असे मिळून रुपये १४०।– मिळू लागल्याने दादांना आर्थिक पाठबळ मिळाल्याचा आनंद झाला. घरची परिस्थिती ओढाताणीची झाली होती. त्यांचा चुलत भाऊ व मावस भाऊ वाईहून पुढील शिक्षणासाठी म्हणून दादांकडे माटुंग्याला आले होते. महायुद्ध सुरू असल्याने जीवनावश्यक वस्तूंचे भाव कडाडले होते. त्यावर आर्थिक मदतीचा हात मिळाल्याने दादांना बरे वाटलेच पण मनातून अधिक आनंद डॉ. बर्लेंसारख्या अधिकाऱ्याबरोबर काम करायला मिळणार ह्याचा झाला. त्यांच्याकडून दादा एवढ्या गोष्टी शिकले की आयुष्यभर त्यांना ती शिदोरी पुरली. कामाचा डोंगरच्या डोंगर कसा लीलया उपसावा ह्याचा वस्तुपाठच त्यांना मिळाला. आयुष्यात एवढ्या मोठ्या जबाबदाऱ्या दादा पेलू शकले ह्याचे थोडेसे ' रहस्य ' या डॉ. बर्लेंच्या व्यक्तिमत्त्वात आहे. अर्थात, घेणाऱ्यानेही ' घ्यावे ' लागते हे तितकेच खरे !

दादांनी डॉ. बर्ले यांच्याबरोबर काम करण्याच्या संधीचे खरोखरच सोने केले. ही जोडनोकरी वर्षभर टिकली. दादांच्या अपेक्षेप्रमाणे युद्धकाळापुरतेच या जादा नोकरीचे काम होते. काम संपल्याचा दादांना आनंद झाला नाही. एकच एक कारण म्हणजे डॉ. बर्ले ! अशी माणसं दादांना पुन्हा काही अनुभवायला मिळाली नाहीत !

इकडे घरच्या आघाडीवर उल्लेखनीय घटना म्हणजे १९४३ मध्ये दादांना पहिल्यांदा पितृपद प्राप्त झाले ! पहिले कन्यारत्न– चि. मृणालचा जन्म झाला. पाठोपाठ १९४४ मध्ये पुत्ररत्न– अनिलचा जन्म झाला. दादा-लीलाताईंना माता-पिता बनण्याचा आनंद झाला

खरा; पण बिऱ्हाड मांडल्यापासूनच उभयतांची शारीरिक आणि आर्थिक अशी ओढाताण फार झाली. दादांच्या दोन्ही वहिणींकडील आजारपणे, कॉटनग्रीनच्या मेहुण्यांचा टी. बी. ने दुःखद मृत्यू, अशा घटनांमुळे मनाला स्वास्थ्य कसे ते नव्हते. पैशाची चणचण इतकी भासायची की कुर्ल्याच्या वहिणीच्या आजारपणाच्या काळात खिशात पैसे नसल्याने दादा व लीलाताई कधी कधी माटुंगा ते कुर्ला चालत जात व चालत परत येत! या कालावधीत कुटुंबियांच्या आजारपणात दादांना प्रथमच कर्ज काढावे लागले. मनाविरुद्ध. पण एकदा गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर अशा गोष्टी अपरिहार्य आहेत ह्याची दादांच्या मनाला सवय करून घ्यावी लागली. नोकरीच्या ठिकाणी बर्लेसाहेब प्रिन्सिपॉलपदावरून गेल्यापासून दादांचे मन कामातून उडाल्यासारखे झाले. नवे भारतीय प्रिन्सिपॉल व नवी व्यवस्था अस्तित्वात आल्यापासून साऱ्या कामाचे स्वरूपच बदलले. नव्या प्रिन्सिपॉलसाहेबांना त्यांचा पी. ए. ग्रॅज्युएटच हवा होता. त्यामुळे नुसते मॅट्रिक पास दादा त्यांना चालण्यासारखे नव्हते. मग एम. ए. झालेली एक व्यक्ती पी. ए. म्हणून नेमली गेली. वास्तविक मासिक सभेची वा अन्य मीटिंगची त्याने लिहिलेली मिनिट्स बऱ्याच वेळा वरच्या पदाधिकाऱ्यांकडून "ताटक्यांकडून दुरुस्त करून घ्या", असे शेरे मारून परत येत. त्यामुळे दादाच वरच्या लोकांकडे जाऊन कमी-जास्ती सांगतात अशी काहींची भावना झाली. गटबाजी वाढली. दादांनी एकूण जाणले. या नव्या राजकारणात आपले काही निभावणार नाही. आपल्याला निव्वळ स्टेनो म्हणून राहावे लागणार. दादा पुन्हा बाहेर अर्ज टाकू लागले.



## ६.

**" बॉम्बे फॉर्मास्युटिकल कंपनी "**

एक दिवस दादांच्या खटपटीला यश आले. एके ठिकाणी मुलाखतीला बोलावणे आले. भायखळयाच्या माजगाव भागातील एका ऑफिसात श्री. बी. जे. श्रॉफ नामक गृहस्थांकडे इंटरव्ह्यूला जायचे होते. दादा तिथे पोहोचले तेव्हा आणखी चार-पाच जण तेथे इच्छुक म्हणून बसलेले आढळले. मुलाखतीच्या वेळी श्री. श्रॉफनी बाकीचे सर्व विचारून झाल्यावर एकदम विचारले, " व्ही. जे. टी. आय. मध्ये काम करता म्हणजे आपण प्रो. निगुडकरांना चांगले ओळखत असाल ?" "हो, चांगली ओळख आहे" असे दादा म्हणाले. मग श्री. श्रॉफनी सांगितले, की ५-६ महिन्यांपासून त्यांनी आणि निगुडकरांनी मिळून बॉम्बे फॉर्मास्युटिकल कंपनी काढलेली आहे. मग त्यांनी कंपनीचे कामकाज, प्रॉडक्ट्स वगैरेंची माहिती सांगितली. दादरला जाऊन श्री. निगुडकरांची भेट घ्यायला सांगितले. दादांना बघताच निगुडकरांना खूप आनंद झाला. दादा प्रि. बर्लेंचे वैयक्तिक मदतनीस असल्याने निगुडकरांना ते बरेच दिवसांपासून ओळखत होते. दादा निगुडकरांची हुशारी जाणून होते. त्यांच्या विषयात ते चांगले तज्ज्ञ मानले जात. कन्सल्टिंग केमिस्ट म्हणून अनेक ठिकाणी त्यांनी काम केले होते. दादांची कार्यक्षमता, वक्तशीरपणा वगैरे सर्व गुणांचा निगुडकरांना चांगलाच परिचय होता. आदर होता. त्यामुळे त्यांनी दादांची नेमणूक ताबडतोब पक्की करून टाकली. पगार ठरला दीडशे रुपये. धंद्याच्या

भरभराटीवर अधिक वाढ-भत्ते मिळण्याचे आश्वासन. हुद्दा ऑफिस मॅनेजरचा.

ही फॉर्मास्युटिकल कंपनी म्हणजे श्रॉफसाहेबांचे भांडवल व निगुडकरांची बुद्धी असा मिलाफ होता. कंपनीने प्रथम ॲंटीफ्लोजिस्टीन, ग्राईप वॉटर व मिल्क ऑफ मॅग्नेशिया असे तीन प्रॉडक्ट्स काढलेले होते. एक-दोन मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह्ज डॉक्टर्स, केमिस्ट्स यांजकडे जाऊन ऑर्डर्स आणण्यासाठी ठेवलेले होते, तर स्टाफपैकी काहीजण नाणावलेल्या डॉक्टर्स-ड्रगिस्ट्सना जाऊन भेटत असत. हे एकंदरीत पाहून दादांना व्ही. जे. टी. आय. सोडून चांगल्या ठिकाणी येऊन पडलो असे वाटले.

पण कालांतराने हे खरोखरीचेच ‘पडणे’ होते ह्याची कल्पना आली ! काही महिन्यांतच दादांचा भ्रमनिरास झाला. रेकॉर्ड, हिशेब, पत्र-व्यवहार ह्या सगळ्याच बाबतींत भलताच गलथान कारभार होता. कंपनीच्या मालाला तसा उठाव होता पण कोणतीच आर्थिक शिस्त नव्हती. कंपनी सुरू होऊन जेमतेम सहा-सात महिने झाले नव्हते तेवढ्यातच मुळात घातलेल्या भांडवलापैकी ६० टक्के भांडवल संपून गेले होते. विक्री झालेली होती तरी पैसे हातात पडलेले नव्हते. केमिस्ट्सनी माल घेतला होता तरी प्रत्यक्ष माल विकल्यावरच पैसे जमा करू असे ते म्हणत. मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह्जचा सुरुवातीचा उत्साह अशा परिस्थितीमुळे कमी झाला. परिणामी विक्री यथातथाच होऊ लागली. दादांना आपल्या भीषण भवितव्याची जाणीव झाली. व्ही. जे. टी. आय. सारख्या चांगल्या संस्थेतून नोकरी सोडून इथे येण्यात आपण मोठी घोडचूक केली ह्याची त्यांना फार टोचणी लागली. दादांची झोप उडाली. मन सैरभैर झाले. निराशेचे विचार एवढे बलवत्तर होत की कधी कधी आत्महत्या करावी इथवर मनाची मजल जाई.

याला कारणीभूत घरची परिस्थिती होती. मुलगा अनिल दीड वर्षाचा झाला पण तो खूप आजारी झाला. दादांच्या अशा मनःस्थितीत आणि धावपळीत त्याची आबाळ व्हायला लागली. लीलाताई भांबावून गेल्या. नेमकं काय करावं ते त्यांना उमगेना. भावाच्या सल्ल्यानुसार अनिलला

मिरजेला ठेवायचे ठरले. आजोबा स्वतः डॉक्टर. शिवाय त्या काळच्या मिरजेतील नामवंत डॉ. भडकमकरांसारख्या धन्वंतरीचेही उपचार चालू होतेच. दादांच्या काळजीपोटी मिरज-मुंबई फेऱ्या चालू होत्या. एवढासा मुलगा पण दादांना चांगलाच ओळखायचा. ते मिरजेला आले की त्यांना बिलगून असायचा. पण परमेश्वरी योजना काही विचित्र होती. कोणत्याही उपायांना यश न येता तो कोवळा जीव अखेर देवाघरी गेला !

दादा भांबावून गेले होते. कोणाची मदत घ्यावी तेच सुचेना. आजवर कोणाची मदत घेतलेली नव्हती. सर्व निर्णय स्वतःच घेतलेले. ना कोणा वडिलधाऱ्या माणसाचा सल्ला घेतला ना लीलाताईंना विश्वासात घेतलेले. व्ही. जे. टी. आय. मधील गटबाजीचा व राजकारणाचा उबग आला; या नोकरीत चार पैसे अधिक मिळतात अशा साध्या हिशेबाने दादा आले आणि गाळात रुतून बसले ! आपलेच दात नि आपलेच ओठ ! बोलणार कुणाला ?

नैराश्याचा झटका ओसरल्यावर दादांनी स्वतःच हातपाय हलवायला सुरुवात केली. आपली लढाई आपल्यालाच लढायला हवी हे त्यांनी मनी जाणले ! एके रात्री शांतपणे बसून सर्व केमिस्ट्स, डॉक्टर्स, स्टाफ-मेंबर्स ह्यांच्या समवेत केलेल्या चर्चेचा मनोमन आढावा घेतला. त्यानुसार काय करणे आवश्यक आहे, म्हणजे कंपनीची स्थिती सुधारेल ह्यासंबंधात एक मोठे टिप्पण तयार करून सर्वांसमोर मांडले. श्रॉफ फक्त भांडवल पुरवत; त्यांचे त्यांना इतर अनेक उद्योग होते. त्यामुळे अंतर्गत 'कारभाराविषयी' त्यांना एवढी माहिती नव्हती वा त्यांना अवगत करून देण्याची तसदी कोणी घेतली नव्हती. दादांनी अकौंटंटकडून हिशेब तयार करून पुराव्यानिशी मांडलेली स्थिती पाहून ते चक्रावलेच. सारा दोष निगुडकरांच्या माथी मारून धुमसत राहिले. निगुडकर पण खजील झाले. पण एकमेकांवर नुसती आगपाखड करण्यातही अर्थ नव्हता. यातून समझोत्याने मार्ग तर काढायला हवाच होता.

प्रथम सर्व हिशेब चोख ठेवण्याचे व युद्धपातळीवरून सगळीकडची उधारी वसूल करण्याची मोहीम आखण्यात आली. कंपनी बनवत असलेले

प्रॉडक्ट्स जोपर्यंत इतर कंपन्या, विशेषतः परदेशी, बनवितात तोवर आपल्या मालाचा उठाव होणे कठीण. तेव्हा तज्ज्ञ डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्यानुसार एखादे लिव्हर एक्स्ट्रॅक्ट, व्हिटॅमिन्सयुक्त टॉनिक काढावे— ज्याला मार्केटमध्ये मागणी असेल— असे ठरले. त्याप्रमाणे कंपनीने पुन्हा खटाटोप करून पॉलि-व्हिट-हेपर (Poly-Vit-Hepar) सारखी टॉनिक्स मार्केटमध्ये आणली. दादा आपल्या सहकाऱ्यांसमवेत सगळीकडे जाहिरात दौरा काढून हिंडू लागले. ओळखीच्या डॉक्टर्सना भेटले. ते कंपनीची व्हिटॅमिन्स 'प्रिस्क्राईब' करू लागले. या साऱ्याचा एकत्र परिणाम होऊन मालाला चांगली मागणी येऊ लागली. ऑर्डर्स मिळू लागल्या. प्रॉडक्शन वाढविण्याची निकड भासल्यावर पार्टनरशिप कंपनीचे रूपांतर प्रायव्हेट लिमिटेडमध्ये होऊन आणखी पन्नास हजार रुपये भांडवल घातले गेले. कंपनी हळूहळू चांगले बाळसे धरू लागली. नव्या व्हिटॅमिन्सचा परिणाम !

दादांना मार्केटिंग, अकौन्टन्सी ह्या गोष्टी तशा नवख्या होत्या. पण एकदा एखाद्या क्षेत्रात पडले की त्या त्या विषयाचा संपूर्णपणे अभ्यास करण्याची त्यांची अंगभूत सवय त्यांना या कंपनीचा कारभार बघताना किंवा खरं म्हणजे 'हाकताना' उपयोगी पडली. कंपनीची भरभराट होऊन २२॥ टक्के डिव्हिडंड देण्याइतकी कंपनी सुधारली. पण पुढे वैयक्तिक हेवेदावे, स्वार्थी राजकारण, डायरेक्टर्सनी एकूण घातलेल्या भांडवलाच्या तिप्पटीने पैसे मिळतात ह्या मोहाने एका मुलतान्याला वा अन्य शेअर-ब्रोकरला कंपनी विकण्याचा घातलेला घाट या साऱ्या गोष्टी बघून दादा वैतागले आणि राजीनामा देऊन बाहेर पडले. एकूण १ जानेवारी १९४६ पासून ३१ मे १९५४ पर्यंत त्यांनी तेथे काम केले आणि अनेक बरेवाईट अनुभव घेऊन कंपनी सोडली !

* * *

# ७.

"गुडविल इन्शुअरन्स कंपनी"

पूर्वीच्या नोकऱ्यांच्या अनुभवांच्या बळावर दादांना 'गुडविल इन्शुअरन्स कंपनीत' कंपनीचे ऑर्गनायझिंग सेक्रेटरी व ऑफिस सुपरिंटेंडेंट अशा दुहेरी हुद्द्यावर सिलेक्शन होऊन रु. ४००/– वर त्यांची नेमणूक झाली. अजून बॉम्बे फॉर्मास्युटिकल कंपनीने त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नव्हता. दादांनी राजीनामा मागे घ्यावा म्हणून खूप गळ घालण्यात आली. पण दादा आपल्या निर्णयावर ठाम राहिले. अखेर कंटाळून कंपनीने दादांचा राजीनामा स्वीकारला. नव्या कंपनीला ऑफिस व फील्ड-वर्कचा अनुभव असलेला माणूस हवा होता. तो दादांच्या रूपाने मिळाला. विम्याच्या कामाचा दादांना तसा पूर्वानुभव होताच. मुख्य म्हणजे दादांचा संबंध ह्या कंपनीबरोबर पूर्वीपासून तसा होताच. सौ. लीलाताईंच्या नातेवाइकांनीच ही कंपनी १९३५ मध्ये स्थापन केली होती. कंपनीचे मुख्य कार्यालय 'कुपवाड' येथे होते.

कुपवाड गाव तत्कालीन सांगली-मिरज संस्थानांमधील ब्रिटिश अखत्यारीखालील मुलखात होते. १९३७–३८ च्या सुमारास दादा घरोघरी जाऊन लोणी विकणे, साबण विकणे अशांसारख्या हर प्रयत्नांनी संसाराचा गाडा ओढण्यासाठी पराकाष्ठा करीत असत. त्याच सुमारास ह्या गुडविल कंपनीची विम्याची कामे दादा कमिशन बेसिसवर करीत. व्ही. जे. टी. आय. मध्ये असतानासुद्धा डॉ. बर्लेंच्या परवानगीने दादांनी विद्यार्थ्यांमध्ये 'अर्न व्हाईल यू लर्न'

या पद्धतीची योजना गुडविल कंपनीच्या वतीने राबविली होती. पुढे बॉम्बे फॉर्मामध्ये असतानासुद्धा दादा तेथील कर्मचाऱ्यांचे विम्याचे काम कमिशन-बेसिसवर करीत. दादांनी आता रीतसर या कंपनीत नोकरी घेतल्यावर कंपनीचा धंदा वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. प्रथमतःच त्यांच्या लक्षात आलं की लोकांना 'कुपवाड'सारखे आडगाव कोणत्या भागात आहे, मुंबई प्रांतातच आहे, का आणि कुठे कर्नाटकात आहे असा प्रश्न पडायचा. त्यामुळे कंपनीला विम्याचे काम द्यायला लोक बिचकत. तेव्हा दादांनी कुपवाडचे ऑफिस मुंबईला आणवले; आपोआपच कंपनीची विश्वासार्हता वाढली. साहजिकच विम्याचे कामही वाढले; त्यामुळे कंपनीच्या १९५५ च्या वार्षिक मीटिंगमध्ये दादांचा पगार रु. २००/– नी वाढविण्याचे व त्यांच्या दिमतीला मोटार-गाडी देण्याचे ठरले; पण कसचे काय नि काय ! १९ जानेवारी १९५६ रोजी अचानक वटहुकूम निघून लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी सर्व विमा-कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले. गुडविल कंपनी इतर छोटचा-मोठ्या विमा कंपन्यांसकट लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनमध्ये दादां-सकट फेकली गेली !

° ° ° °

**"लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया"**

दादांनी एल. आय. सी. मध्ये प्रदीर्घ काळ म्हणजे जवळजवळ १९–२० वर्षे सलग नोकरी केली. या कालावधीत दादांचे कर्तृत्व खऱ्या अर्थाने फुलावयाचे होते. आर्थिक स्थैर्य लाभले; पण नोकरीच्या सुरुवातीला तरी दादांना बराच झगडा करावा लागला. गुडविल कंपनीमध्ये दादा ऑफिस सुपरिंटेंडेंट व एजन्सी मॅनेजर अशा दोन्ही हुद्द्यांवर काम करीत; प्रत्येक पोस्टसाठी रु. २००/– प्रमाणे चारशे रुपये मिळत असत. नव्या नोकरीत त्यांना सांगण्यात आले की कोणत्या तरी एका पदासाठी त्यांना पूर्ण वेळ काम करावे लागेल. पसंती विचारल्यावर दादांनी अॅडमिनिस्ट्रेशनसाठी काम करण्याचे ठरविले; महिन्याच्या अखेरीस त्यांना पगार रु. २००/– च मिळाला. ते हतबुद्धच झाले. तेव्हा त्यांना सांगण्यात आले की पूर्वीच्या कंपनीत (गुडविलमध्ये) या

ॲडमिनिस्ट्रेशन सुपरिंटेंडेंट या पोस्टसाठी एवढाच पगार मिळत होता. दादांनी नियमाप्रमाणे पगार घेतला पण निषेध नोंदवून. मॅनेजमेंटला दादांनी बजावून सांगितले की अर्थमंत्र्यांनी (त्या वेळी सी. डी. देशमुख) रेडिओवरील भाषणात जाहीरपणे सांगितले होते, की राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी जे कोणी ज्या ऑफिसात (विमा कंपनीत) काम करीत होते त्यांचे आर्थिक नुकसान केले जाणार नाही. तेव्हा ह्या अभिवचनाचा आधार घेऊन दादांनी रु. ४००/– पगार कायम ठेवण्याबद्दल अनेक विनंतिपत्रे पाठविली; पण प्रगती शून्य.

नोकरशाही अशीतशी दाद देणार नाही हे लक्षात आल्यावर दादांनी शांतपणे बसून एक मोठे निवेदन तयार केले. त्यात आपल्यावर होत असलेल्या अन्यायांची संपूर्णपणे जाणीव दिली– ' गुडविलसारख्या लहानलहान विमा कंपन्या. त्यामध्ये असलेल्या खर्चाचे प्रमाण वाढू नये म्हणून पगाराची विभागणी करीत असत. आपल्या दोन वेगवेगळ्या हुद्द्यांवरील प्रत्येकी रु. २००/– पगार म्हणजे एका फुलटाइम सर्व्हिसचा पगार होता. तेव्हा माझ्यावरील अन्याय दूर करून माझा पगार रु. ४००/– अबाधित (protect) करावा.' दादांनी एल. आय. सी. बरोबर झालेल्या पत्रव्यवहाराच्या कॉपीज् आपल्या कैफियतीबरोबर जोडल्या. त्यात पुन्हा वेगळी टिप्पणी करून दाखवून दिले, की आपले पत्र ऑफिसला मिळाल्याबरोबर ' दुसऱ्याच ' दिवशी गेलेले आहे; पण ऑफिसचे उत्तर मात्र कमीत कमी दोन ते तीन आठवड्यांनंतर पाठविले गेले आहे. ह्या ' एफिशियन्सी'चाही विचार व्हावा. शेवटी एक गर्भित इशारा दिला, तो असा की जर माझे म्हणणे मान्य होत नसेल तर हेच निवेदन म्हणजे माझा ' राजीनामा ' समजावा !

दादांनी आपल्या निवेदनांच्या प्रती थेट त्या वेळचे डॉ. देशमुखांनंतरचे अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी, काकासाहेब गाडगीळ यांजकडे ' योग्य ' कारवाईसाठी धाडल्या. दादांच्या या ' पवित्र्याचा ' मात्र उपयोग झाला. मात्रा बरोबर लागू पडली. काकासाहेब गाडगीळांचा निरोप आला की ' ब्रीफ ' अतिशय छान झालीय, मात्र राजीनामा

देण्याची घाई करू नका. बहुधा त्यांच्यामुळेच सगळी चक्रे भराभर फिरली. चोवीस तासांच्या आत श्री. रा. शं. ताटके यांची नेमणूक रु. ४००/– या पूर्वीच्या पगारावर झाली पाहिजे असा अर्थमंत्र्यांच्या ऑफिसातून आदेश आला ! मग मात्र सगळं सुरळीत सुरू झालं.

आता दादांच्या कौटुंबिक परिस्थितीतही बराच फरक पडला होता. १९४७ साली दुसरी कन्या मंगला जन्मली, तर १९४८ मध्ये चि. मकरंदचा जन्म झाला. दादा नित्यनेमाने वाईला जात. आई-वडिलांना भेटून येत. घरात काही हवं-नको बघत. धाकट्या भावंडांची-बहिणींची शिक्षणे-लग्नकार्ये पार पाडण्यात लक्ष घालत. चुलत-मावस भावंडं दादांकडे शिक्षणानिमित्त-नोकरीनिमित्ताने येऊन राहात. भाऊ वाईला कोणी मोकळा दिसला, निरुद्योगी दिसला की म्हणत, " जा मुंबईला बाळूकडे. तो लावून देईल कुठे तरी. "

चि. मंगलेच्या जन्मानंतर दादांच्या एक काकी माटुंग्याला दादांकडे येऊन राहिल्या होत्या. त्या अखेरपर्यंत म्हणजे १९७३ पर्यंत दादांकडेच होत्या. त्यांचे सोवळे-ओवळे कडक असे. त्यांचे सोवळे-ओवळे आणि नव्या पिढीच्या मुलांचे आचार-विचार ह्यांमध्ये सौ. लीलाताई नेहेमी ' सुवर्णमध्य ' साधत. माटुंग्याच्या दोन खोल्यांच्या जागेत कधी कधी दहा-दहा, पंधरा-पंधरा माणसे राहात, पण सौ. लीलाताई सगळ्यांचे सगळे काही हसतमुखाने करीत. आर्थिक ओढाताण, कौटुंबिक कर्तव्ये, मुलाचे संगोपन, त्यांच्यावर उत्तम संस्कार, आवश्यक शिस्त, उत्तर आयुष्यातील दादांची वाढती सामाजिक कामे, त्यापायी येणाऱ्या जबाबदाऱ्या ही सारी ' कसरत ' खरोखरच लीलाताईंनी ' लीलया ' केली ! हे सगळं पार पाडताना त्यांना कमी का त्रास झाला असेल ? कुणी याचा विचार केला तर त्याला दादांपेक्षा लीलाताईंचेच अधिक कौतुक करावेसे वाटेल. माहेरी असताना त्यांचे ५ वी पर्यंतचे शिक्षण झाले होते. पण लग्नानंतर मोठ्या जिद्दीने त्यांनी ड्रॉइंगच्या परीक्षा दिल्या. हिंदी क्लासेसला जाऊन वर्धा राष्ट्रसभेची ' कोविद ' परीक्षा दिली. त्या काळात ही परीक्षा अवघड समजली जात असे. आणि ' कोविद 'चे महत्त्व एवढे होते की या परीक्षेचे प्रमाणपत्र देण्यासाठी वर्ध्याहून हिंदी

प्रचार समितीचे कोणी पदाधिकारी येत; उत्तीर्ण विद्यार्थ्याला प्रमाण-पत्रावरोबर शाल दिली जात असे. हे करता करता लीलाताईंनी शिवणाचाही कोर्स पूर्ण केला.

एल. आय. सी.च्या नोकरीत आल्यानंतर दादांच्या सामाजिक कार्याला वहर आला. तशी छोटी-मोठी सामाजिक कार्ये चालू होतीच. अनेक संस्थांशी दादा संबंधित होते. कित्येकदा आर्थिक स्वास्थ्याच्या अभावी सामाजिक कामाची ऊर्मी दादांना दाबून धरायला लागत असे. पण आता मात्र दादांना आर्थिक स्वस्थता मिळाली. कौटुंबिक आघाडीवरही निवान्तपणा होता. कुटुंबाच्या गरजांसाठी दादांना नोकरीखेरीज अधिक पैसा मिळविण्यासाठी पायपीट करायची गरज नव्हती.



# ८.

याच काळात दादांची श्रद्धानंद महिलाश्रम आणि श्री रामकृष्ण चॅरिटीज ही दोन्ही महत्त्वाची कार्ये सुरू झाली. १९५९ साली श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कार्यकारिणीवर निवडून आल्यावर दादा प्रत्यक्षपणे आश्रमात काम करू लागले. दादांच्या अथक श्रमांचे चीज होऊन या दोन्ही संस्थांची कामे मोठ्या प्रमाणावर वाढली. पण मुळात वृत्ती प्रसिद्धीपराङ्मुख असल्याने त्या प्रमाणात दादांच्या नावाचा बोलबाला झाला नाही; किंबहुना त्यांनी तसा होऊ दिला नाही ! दादांच्या कामाचा व्याप जसा वाढायला लागला तशी त्यांना येणारे व्यक्तिगत फोन, भेटायला येणारी मंडळी यांची संख्या वाढली. पुढे पुढे आश्रमातील कामानिमित्ताने रेडिओवर भाषणांची निमंत्रणे येऊ लागली; मासिकांच्या, वृत्तपत्रांच्या संपादकांच्या आग्रहामुळे आश्रमाच्या कार्यासंबंधात दादांच्या मुलाखती, लेख छापून येऊ लागले; विशेषत: आश्रमातून परदेशात मुलं दत्तक दिली जाऊ लागल्यावर जो गदारोळ माजला, टीका झाली त्याला उत्तर म्हणून दादांनी लेखणी हातात घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. त्याबद्दल दादांना मानधन मिळू लागले.

या कामाचे कौतुक ही फार दूरची बाब झाली; उलट, एल. आय. सी. च्या नोकरशाहीने लेख लिहिण्यापूर्वी ऑफिसची पूर्वपरवानगी का घेतली नाही ? मानधनाचा काही भाग ऑफिसला परत करावा लागतो, तो का केला नाही ? अशा विचारणा सुरू केल्या. दादांना अशा गोष्टी

अपेक्षित होत्याच. म्हणून त्यांनी आधीच एल. आय. सी. ची संपूर्ण नियमावली ( Rules and Regulations ) वाचून काढली होती. त्यातील संदर्भ देऊन दादांनी दाखवून दिले की शास्त्रीय (Scientific) विषयावर लेखन केल्यास पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते; शिवाय त्यासाठी मिळणारे मानधन ठेवण्याचीही मुभा असते. त्यानंतर पुन्हा अशी पृच्छा कधी झाली नाही ! गंमत म्हणजे असे मिळणारे मानधन दादा स्वतःसाठी कधीच ठेवून घेत नसत तर श्रद्धानंद महिलाश्रमाकडेच जमा करत. पण ह्या बाबी ऑफिसला सांगण्यात काहीच अर्थ नव्हता ! यामुळे एक झालं की हा माणूस काही तरी 'वेगळा' आहे ह्याची जाणीव नोकरशाहीला होऊ लागली. पगारासंबंधी स्वतःवर झालेल्या अन्यायाची कैफियत थेट अर्थमंत्र्यांपर्यंत मांडण्याची त्यांची धडाडी व सगळ्या लढाया एकाकी व एकहाती लढण्याची त्यांची जिद्द पाहून वेगवेगळ्या युनियन्सची मंडळी "आमच्याकडे या, आमच्याकडे या" अशी गळ घालत. पण राजकारणापासून दादांनी स्वतःला जसे कटाक्षाने दूर ठेवले तसेच त्यांनी स्वतःला युनियनच्या राजकारणापासूनही दूर ठेवले. कोणत्याच युनियनचे ते कधीच सभासद झाले नाहीत. दादांना भेटायला येणारे मोठमोठे लोक– मग त्यांत विजय मर्चंटसारखे समाजसेवक, महापौर, चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसची माणसं, अधिकारी, पदाधिकारी अशी बरीच मंडळी असत. रेडिओ, दूरदर्शन, वृत्तपत्रांचे संपादक वगैरेंचे फोन येत असत. त्यामुळे आणि दादांच्या सामाजिक कामांच्या बोलबाल्यामुळे त्यांच्याविषयीचा प्रारंभिक गैर-समज दूर होऊन त्यांच्या सहकाऱ्यांचा त्यांच्याविषयीचा आदर वाढला. त्यांचे सहकारी त्यांना मानू लागले आणि वरिष्ठांनाही त्यांची किंमत कळू लागली. इतकी सामाजिक कामे करूनही दादांचे ऑफिसचे काम चोख असे. जुन्या जमान्यातील फर्डे इंग्रजी व उत्तम ड्राफ्टिंग यामुळ वरिष्ठ मंडळी आवर्जून त्यांचा सल्ला घेऊ लागली. दादा स्वतःच्या सेक्शनचे काम सांभाळून इतर सेक्शन्सच्या कामालाही हातभार लावीत. त्यांचे वरिष्ठ कामकाजविषयक होणाऱ्या ऑफिसच्या मीटिंग्जना त्यांना आवर्जून घेऊन जाऊ लागले.


कलकत्त्याच्या ब्रँच मॅनेजरने ( दादांची नि त्याची प्रत्यक्ष ओळखही नव्हती.) दादांविषयी इंग्रजी वृत्तपत्रांतून, नियतकालिकांतून आलेली माहिती वाचून 'योगक्षेम' या नावाने एल. आय. सी. तर्फे निघणाऱ्या मासिकाच्या संपादकवर्गाला आवर्जून कळविले की असा माणूस आपल्या ऑफिसात आहे हे आपल्याला भूषणावह आहे; तेव्हा अशा समाज-कार्यकर्त्यांची माहिती आपल्याच कर्मचाऱ्यांना नाही असे कसे ? यानंतर भराभर चक्रे फिरली. आर. एस. ताटके ह्या कर्मचाऱ्याचा शोध घेतला गेला. बायोडेटा गोळा केला गेला आणि मग संपादकाने दादांची फोटोसकट माहिती छापली. त्यानंतर सर्व देशभर पसरलेल्या एल. आय. सी. कर्मचाऱ्यांना दादांची 'ओळख' झाली. पुढे तर खुद्द चेअरमनसाहेबांनी दखल घेतली. त्यांनी दादांना आपल्या चेंबरमध्ये बोलावून घेतले; दादांच्या सर्व्हिस फाईल्स आणि रेकॉर्ड त्यांनी मुद्दाम मागवून घेतले होते. दादांना ते म्हणाले, "मि. ताटके, जुलै १९५६ पासूनचे सर्व रेकॉर्ड बघितले. इतके उत्तम काम करूनही तुमच्यावर अन्याय झाल्याचे मला स्पष्ट दिसत आहे. ( ही प्रमोशन्स न मिळण्या-मागे दादांचा सुरुवातीचा झगडा आणि एकूण स्पष्टोक्तीपणा कारणीभूत होते. ) तुमच्या उत्तम कामाची पोच आणि ॲप्रिसिएशन म्हणून मी तुम्हाला ब्रँच मॅनेजरचे प्रमोशन देणार आहे. मात्र त्यासाठी बाहेरगावी जावे लागेल. पगारात सध्या दोनशे रुपयांची तरी वाढ होईलच. या 'ऑफर' बद्दल दादांनी मनापासून आभार मानले. माझ्यावर अन्याय ( injustice ) झाला त्याचे मला काही वाटत नाही असे सांगितले. पण ब्रँच मॅनेजरची पोस्ट मात्र नाकारली. कारण नोकरी आता एकच वर्षाची उरली होती. त्यामुळे आता त्या प्रमोशनचा दादांना काही फार आनंद नव्हता आणि त्यासाठी बाहेरगावी जाणे मुंबईतील सामाजिक कामांच्या जबाबदाऱ्यांमुळे परवडण्यासारखे नव्हते. काही का असेना, पण चेअरमनसारख्या उच्च पदाधिकाऱ्याने अशी वैयक्तिक रीत्या एवढी 'दखल' घ्यावी यात सर्व आले. मागचे सारे अन्याय वगैरे भरून पावले ! याचेच दादांना मानसिक समाधान लाभले. त्यानंतर ४ ऑगस्ट १९७४ ते ४ ऑगस्ट १९७५ असा वर्षभराचा काळ-

मेडिकल सर्टिफिकेट न देता भरपगारी रजा म्हणून मिळाली. आणि ५ ऑगस्ट १९७५ रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण झाली म्हणून एल. आय. सी. मधून दादा सन्मानाने निवृत्त झाले.

अशा प्रकारे दादांनी कुटुंबपोषणास आवश्यक अशा अर्थार्जनासाठी १९३५–३६ सालापासून विविध ठिकाणी नोकऱ्या केल्या. वास्तविक या साऱ्या नोकऱ्या त्यांनी केवळ चरितार्थाचे साधन म्हणून केल्या. पैसा जोडणे, बँक-बॅलन्स वाढविणे ह्या लौकिक अर्थाने यशाच्या म्हणून मानल्या जाणाऱ्या बाबी दादांच्या खिजगणतीतही नव्हत्या. खरं म्हणजे तशा संधी अनेकवार आल्या. तसाच व्यवहारी विचार मनात असता तर एक-दोन बंगले बांधणे शक्य होते; एखादी मोटार बाळगली असती ! डॉ. बर्लेसाहेबांची दादांवर एवढी मर्जी बसली होती की ते जेव्हा मोठ्या नोकरीनिमित्ताने परदेशी निघाले तेव्हा त्यांनी दादांना आपल्याबरोबर चलण्याचा खूप आग्रह केला. डॉ. बर्ले यांच्यावरील श्रद्धे-पोटी दादांची जाण्याची मानसिक तयारी पण झाली होती. तो काळ दुसऱ्या महायुद्धाचा होता. कोणी तरी दादांची ही परदेशगमनाची 'किंचित' तयारी बघून "बाळू लढाईवर चालला !" अशी आवई उठविली. वाईला पोचविली. ताबडतोब भाऊंचे खरमरीत पत्र. बेत रद्द !

दादांच्या आयुष्यातील, म्हणजे नोकरीसंबंधातील एका योगायोगाची गंमत वाटते, ती म्हणजे त्यांच्या नोकरीची सुरुवात वेस्टर्न इंडिया या 'विमा' कंपनीत झाली आणि नोकरीतील अखेरचा दिवसही त्यांनी 'विमा' कंपनीचाच निरोप घेऊन साजरा केला. विमा म्हणजे सुरक्षितता. नाही म्हटले तरी सुरुवातीच्या नोकऱ्यांच्या तुलनेत एल. आय. सी. च्या नोकरीने दादांना मोठ्या प्रमाणात स्थैर्य दिले. मुलांची शिक्षणे झाली. चि. मृणाल – मंगला या दोघींची लग्नकार्ये चांगल्या प्रकारे होऊन त्या सुस्थळी पडल्या. चि. मकरंदचे शिक्षण जवळपास पूर्ण होऊन तो यु. डी. सी. टी. या जगन्मान्य नामांकित शिक्षणसंस्थेतून डॉक्टरेट मिळविण्याच्या मार्गावर होता. इतर कुटुंबियांच्या बाबतीत बऱ्याचशा गोष्टी मनासारख्या करता आल्या. नोकरीच्या काळातच १९७३ साली

परदेशी संस्थांच्या निमंत्रणामुळे दत्तकविषयक प्रश्नांच्या संबंधात पहिल्या परदेशवारीचा योग आला. त्या संधीचा सदुपयोग करता आला. नोकरीनंतरच्या काळात मात्र सुदैवाने दादांनी अर्थार्जनासाठी कोठेही नोकरी केली नाही. तिन्ही मुले आपापल्या घरातून स्थिर झाली होती. दादा काय आणि लीलाताई काय दोघांच्याही वैयक्तिक गरजा माफकच. त्यामुळे नोकरीनंतरच्या काळात दादांनी स्वतःला आपल्या आवडीच्या सामाजिक कार्यात झोकून दिले. मुख्यत्वे श्रद्धानंद महिलाश्रम आणि श्री रामकृष्ण चॅरिटीज.



# १.

**" मानवतेचे मंदिर– श्रद्धानंद महिलाश्रम "**

सकाळच्या प्रहराची शांत वेळ. मुंबईच्या भायखळा भागातील एक गल्ली. एका कचराकुंडीपाशी कुत्र्यांचा कलकलाट. त्यांचा कचराकुंडीवर चढून काहीतरी विस्कटण्याचा प्रयत्न. आजूबाजूचे लोक हाडहूड करून कुत्र्यांना पिटाळतात. त्यांचा काय प्रयत्न होता हे कुतूहलाने पाहण्यासाठी कचराकुंडीत डोकावतात. एक प्लॅस्टिकचे आवरण दिसते. उघडून पाहतात तर त्यामध्ये गुंडाळून ठेवलेले एक गोजिरवाणे बालक. बहुदा एक-दोन दिवसांचे असावे. अर्धवट ग्लानीत निपचित पडलेले. मग जवळपासच्या बायका माहिती पुरवतात. पहाटेच्या वेळी नवजात बालकासारखा रडण्याचा आवाज येत होता खरा ! मग तो याच बाळाचा असावा ! लोक नीट न्याहाळतात. सुदैवाने अजून धुगधुगी असते. त्वरेने मग कोणी त्याला जवळच्या हॉस्पिटलमध्ये पोचवितात.

पुढे काय होणार त्या बाळाचे ?

o o o o

शांता त्या कुटुंबातील सर्वांत मोठी मुलगी. म्हणजे सोळा-सतरा वर्षांची; पाठीवर सहा-सात भावंडे. बाप रात्री येतो तो दारूच्या नशेत भेलकांडतच; आईची नि त्याची रोजची मारामारी. जेवायला कधी आहे, कधी नाही. आई सदा कातावलेली. काही मागावं तर बाप वसकन अंगावर येणारा. तशात तिला अरुण भेटतो. गोड गोड बोलतो. प्रेमाची,

मायेची भुकेली शांता अरुणच्या सतत प्रतीक्षेत राहते. तो एक-दोनदा तिला चौपाटीवर नेतो. भेळपुरी खाऊ घालतो. त्याचे लक्ष असते शांताच्या अपुऱ्या वस्त्रातून डोकावणाऱ्या तारुण्याकडे. समुद्राच्या साक्षीने संध्याकाळच्या अंधारात भितीच्या बाजूला तो शांताला फसवितो; तिला मात्र स्वर्गप्राप्तीचा आनंद वाटतो.

पुढे तो भेटेनासा होतो. निसर्ग आपले काम चोख बजावतो. आई-वडिलांच्या सारं काही लक्षात येतं. धक्के मारून ते तिला घराबाहेर काढतात.

कुठं जाणार ती शांता आता ? ज्या समुद्राच्या साक्षीने सारे काही घडले त्या सागराच्या उदरातच आपल्या उदरातील बाळासह तिने जीवाचा अंत करून घ्यायचा का ?

० ० ० ०

लक्ष्मीबाईंनी वैधव्य प्राप्त झाल्यावर दळण-कांडण करून शामला वाढविला. शामला मिलमध्ये नोकरी लागली. सून घरी आली. तीन मुलं झाली. शामच्या वाढत्या संसाराच्या गरजा भागविण्यासाठी लक्ष्मीबाई दळण-कांडण, धुणी-भांडी करतच राहिल्या. पण आता जीव थकला. हातपाय चालेनात. सांधे एकसारखे दुखायचे. काही तरी औषधपाणी करायला हवं होतं. पण मुलगा सून आपल्याच संसारात मग्न. लक्ष्मीबाईकडे लक्ष द्यायला कुणालाच वेळ नव्हता. हात कापायचे. हातातून काच-भांडी पडून फुटायला लागली. त्यामुळे लक्ष्मीबाईंची एकेक कामे सुटायला लागली; त्या नुसत्याच घरी वसू लागल्यावर सुनेचे डोके भडकले. ती एकसारखी त्यांच्यावर ओरडू लागली. डाफरू लागली. शाम परगावी गेला होता. ती संधी साधून नेसत्या वस्त्रानिशी सुनेने लक्ष्मीबाईंना हाताला धरून घराबाहेर काढले.

आता लक्ष्मीबाईंनी जायचं कुठं ?

० ० ० ०

"यत्र नार्यस्तु पूजन्ते, रमन्ते तत्र देवताः ।" असं आम्ही मोठ्या कौतुकाने म्हणत आपल्या प्राचीन संस्कृतीचे गोडवे गातो. मुलं म्हणजे

देवाघरची फुलं अशी सुभाषितं पेरून सभा-संमेलनांतून टाळ्या मिळवितो. पण त्यांच्यासाठी काही करायची वेळ आली की झटकन पळ काढतो ! आजच्या प्रगत समाजातही व्यभिचारातून, चोरट्या संबंधातून जन्माला ‘ घातली ’ गेलेली मुलं अजाण अर्भकं रस्त्याच्या कडेला, कचराकुंडीत सापडत असतात. छोट्या-छोट्या गोजिरवाण्या मुली पळवून नेल्या जातात. त्यांच्या ‘ तरुण ’ होण्याची सर्वच दुर्जन वाट पाहात असतात. कुटणखान्यात ‘ प्रेमळ ’ मावशीला विकत देऊन त्यांच्या जिवावर पैसे करतात.

लहान मुलं पळवून त्यांचे हात-पाय कापून वा अन्य तऱ्हेने त्यांना विद्रूप करून त्यांच्या ‘ दयनीय ’ अवस्थेकडे येणाऱ्या-जाणाऱ्यांचे लक्ष वेधून मिळालेली भीक आपल्या खिशात टाकतात. कोणी आपल्या पहिल्या बायकोला खुशाल वाऱ्यावर सोडून देतात. आयुष्यभर हाडाची काडं करून आणि कोंड्याचा मांडा करून वाढविलेली मुलं आपल्या मातांना त्यांच्या उतारवयात बिनदिक्कत ‘ रिटायर्ड ’ करून टाकतात ! अशा एक ना अनेक कहाण्या प्रत्यही आपल्या कानांवर पडत असतात. पण आपण मंडळी आजकाल इतकी काही संवेदनाहीन झालो आहोत की या साऱ्यांच्या करुण किंकाळ्या जणू काही आपल्या ‘ कानांसाठी ’ नाहीतच अशीच आपण समजूत करून घेतो ! मग या साऱ्या निराश्रितांना आधार तो कोणता ? कुठल्या आशेवर त्यांनी या जगात किमान जगण्याची अपेक्षा धरायची ?

त्यांची काळजी घेणारे कोणी या भूतलावर आहे का ? आहे ! याचे उत्तर म्हणजे श्रद्धानंद महिलाश्रमासारख्या सेवाभावी संस्था. अशा संस्था कोणाच्या जिवावर चालतात ? याचे उत्तर म्हणजे निरलस, निःस्वार्थी समाजसेवकांच्या जिवावर. अशा श्रद्धानंद महिलाश्रमात दादांनी जवळजवळ तीन तपे घाम गाळून, रक्त आटवून अविरत काम केले. श्रद्धानंद महिलाश्रम आणि दादा हे एक अतूट नातेसंबंध असलेले कोडे आहे.

मुंबापुरीसारख्या प्रचंड वस्तीच्या महानगरात शांतता लाभणे दुर्लभच. पण माटुंग्याचा काही भाग त्याला अपवाद. अशा शांत वातावरणात

श्रद्धानंद महिलाश्रमाची वास्तू मोठ्या दिमाखात उभी आहे. बाहेरून बघितलं तर इतर चार दगडविटांच्या इमारतींसारखी इमारत. पण हजारो निराधारांना 'आधार' देणारे, बेघरांना 'घर' देणारे हे एक मानवतेचे मंदिर आहे. भगवान शंकर, राम, कृष्ण या देवतांच्या मंदिरांत ज्या भक्तीने आपण प्रवेश करतो त्याच श्रद्धेने या 'मानवतेच्या मंदिरात' कुणीही आदरपूर्वक जावे इतके पावित्र्य या वास्तूमध्ये आहे. दादांच्या आयुष्याचा कोना नि कोना ज्या संस्थेने व्यापला त्या संस्थेच्या या दगडी इमारतीचे आजच्या मानवता-मंदिरात रूपांतर कसे झाले हे पाहायचे तर स्थापनेपासून त्याचा मागोवा घेणे अगत्याचे आहे.

**स्थापना**

मुंबईमध्ये एकेकाळी निराधार स्त्रियांची काळजी घेण्यासाठी मुसलमान, पारशी समाजाच्या संस्था होत्या; पण हिंदू स्त्रियांसाठी अशी संस्था नव्हती. तेव्हा अशा पतित, निराधार स्त्रियांना आधार ठरेल अशी संस्था सुरू करण्याची कल्पना सुमारे ७०–७२ वर्षांपूर्वी म्हणजे १९२२ साली तत्कालीन थोर समाजसेवक आणि हिंदुधर्माचे कट्टर अभिमानी कै. स्वामी श्रद्धानंदांच्या मनात प्रथम आली. त्या दृष्टीने त्यांनी मुंबईत काही सहकाऱ्यांबरोबर बोलणी केली; पण काही मूर्त स्वरूपात येण्यापूर्वीच दुर्दैवाने २३ डिसेंबर १९२६ रोजी स्वामीजींची हत्या झाली. ही हत्या कशी व का झाली याचा इतिहास साऱ्या भारतवर्षाला माहीत आहे.

त्यांच्या कार्याचे चिरंतन स्मारक व्हावे आणि त्यांच्या इच्छेची पूर्ती व्हावी या उद्देशाने त्यांच्या अनुयायांनी पुढाकार घेऊन 'दि हिंदू वुमेन्स रेस्क्यू होम सोसायटी' या नावाने एक संस्था दि. २२ डिसेंबर १९२७ रोजी स्थापन केली. यथाकाल संस्था रजिस्टर्ड झाली. या संस्थेतर्फे 'श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम' सुरू झाला. कै. लाला लजपतराय, पंडित मदनमोहन मालवीय अशा थोर पुढाऱ्यांचा या कार्याला पाठिंबा होता. पुढे मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री झालेले पण त्या वेळी सॉलिसिटर असलेले बाळासाहेब खेर, डॉ. मुकुंदराव जयकर (पुणे विद्यापीठाचे

पहिले उपकुलगुरू), प्रख्यात धन्वंतरी डॉ. उदगावकर, सुप्रसिद्ध पत्रकार श्री. शं. नवरे, सॉलिसिटर पंड्या असे मातब्बर लोक संस्थापक सदस्य होते. अर्थात, यामागचे प्रेरणास्थान डॉ. जयकर होते.

सुरुवातीला माटुंगा हिंदुसभेने आश्रय दिलेल्या चार महिला व चार बालके घेऊन म्हणजे त्यांना आश्रय देऊन दादर येथील "शांतिकुंज", नायगाव क्रॉस रोड, दादर येथील जागेत आश्रमाने आपला संसार थाटला. पहिल्या तीन वर्षांतच १५२ महिला व ७९ मुलांना प्रवेश देण्यात आला. या महिलांमध्ये ७८ विधवा व बाकीच्या विवाहित/अविवाहित स्त्रिया होत्या. यांपैकी बहुसंख्य महिला पतित, बदमाष गुंडांच्या तावडीतून सोडविलेल्या, नवऱ्यांनी टाकलेल्या अशा होत्या. तर काही कोर्टाकडून, पोलिसांकडून आलेल्या स्त्रिया होत्या.

श्रीमती लक्ष्मीबाई कोल्हटकर या सुरुवातीला संस्थेच्या व्यवस्थापिका होत्या. त्या मिरजेच्या. संस्थेच्या संस्थापक सभासदांपैकी डॉ. उदगावकर हे मिरज तालुक्यातील 'उदगाव' या गावचे. त्यांनी बालपणीच वैधव्य आलेल्या या लक्ष्मीबाईंना त्यांच्या आप्तेष्टांच्या परवानगीने मुंबईत आणले. बाईंचे स्वतःचे थोडेसे नर्सिंगचे शिक्षण झाले होते. त्यांच्यावरच आश्रमाच्या व्यवस्थापनेची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी अत्यंत निरलस बुद्धीने आश्रमात काम केले.

१९३१ साली महिलांकरिता शिवण क्लास सुरू करण्यात आला. मग त्यांना घरगुती कामांसाठी इतरत्र पाठविण्यास सुरुवात झाली. हळूहळू कपडे शिवणे, दोऱ्याची बटन्स-गुंड्या तयार करणे, लोणची, पापड, मेतकूट तयार करणे असे उद्योग सुरू करण्यात आले. १९३३ साली आश्रम लक्ष्मीनारायण लेन, माटुंगा येथे भाड्याच्या जागेत हलविला गेला. १२ जानेवारी १९३५ रोजी सध्याच्या इमारतीचा पाया घालण्यात आला व २२ फेब्रुवारीला नवीन वास्तूचे उद्‌घाटन तत्कालीन गव्हर्नरसाहेबांच्या पत्नी मिसेस लॉर्ड ब्रेबर्न यांच्या हस्ते झाले. वास्तूची जागा मुंबई पालिकेकडून रु. २१७/- च्या लीजवर मिळाली होती, तर इमारतीचा खर्च रु. ८०,०००/- आला.

प्रथमतः महिलांसाठी आणि मुलांसाठी दोनच विभाग या वास्तूत सुरू करण्यात आले. पुढे १९३६ साली ‘ बाँबे चिल्ड्रन्स ॲक्ट ’ खाली संस्थेस मान्यता मिळाल्यावर तीन वर्षांखालील बालकांसाठी स्वतंत्र विभाग ‘ अर्भकालय ’ म्हणून सुरू करण्यात आला. मुलींच्या शिक्षणाची सोय अर्थातच बाहेरच्या शिक्षण संस्थांमधून म्हणजेच म्युनिसिपल स्कूल्स, हायस्कूल्स व विशेष प्रगती दाखविल्यास एस्. एन्. डी. टी., रुईया कॉलेज इत्यादी महाविद्यालयांतून करण्यात येत असे. जुन्या अहवालांवरून अशा तऱ्हेचे शिक्षण लहान प्रमाणावर का होईना पण आश्रमाच्या मुली घ्यायच्या असे उल्लेख आढळतात. संस्थेला त्या वेळी पगारी नोकर ठेवण्याची ऐपत नव्हती. त्यामुळे महिलांना, प्रौढ मुलींना घरोघरी पाठवून देणग्या मिळविणे, धान्यबाजार करणे, कापड-बाजारात निरनिराळ्या व्यापाऱ्यांकडे जाऊन रोख वा वस्तूंच्या स्वरूपात मदत मिळविणे, संस्थेतील वयस्कर बायकांकडे स्वयंपाक-बाजारहाट सोपवून आश्रमाची सर्व कामे सर्वांकडून करून घेणे ही सारी ‘ सर्कस ’ लक्ष्मीबाई करत असत. दादांच्या शब्दांत म्हणजे त्या एक नुसती संस्था चालवत नव्हत्या तर मोठे ‘ संस्थानच ’ चालवत होत्या. याच लक्ष्मीबाईंमुळे दादांचा महिलाश्रमाबरोबर ऋणानुबंध आला. तो योगायोगसुद्धा अगदी घरगुती स्वरूपातच आला.

**‘ आश्रमाशी दादांचा संबंध– एक योगायोग ’**

१९३५–३६ साली आश्रम आपल्या स्वतःच्या नव्या वास्तूत आला. तेव्हा आश्रमातील मुलींचा विवाह वैदिक पद्धतीने व्हावा अशी कल्पना लक्ष्मीबाईंच्या मनात आली. १९३७ मध्ये अशा विवाहाचा योग आला. या होणाऱ्या विवाहास लागणारे पाट, ताम्हण, होमकुंड, पळी-पंचपात्री इ. वस्तूंचे काय ? कुठून आणाव्यात बरं या वस्तू ? असा त्यांच्या मनात प्रश्न आला. दादा लग्नानंतर भिवंडीवाला चाळ सोडून ज्या बिल्डिंगमध्ये माटुंग्याला राहायला आले त्याचे मालक होते डॉक्टर भाटवडेकर. आश्रमाच्या जवळच ही बिल्डिंग आहे. त्यांची व श्रीमती लक्ष्मीबाईंची थोडीशी ओळख. त्या डॉक्टरांकडे या वस्तूंची विचारणा करण्यासाठी म्हणून आल्या. डॉक्टरांच्या घरी या वस्तू नव्हत्या म्हणून

त्यांनी सांगितले की त्यांच्याच तळमजल्यावर ताटके राहतात. ते स्नान-संध्या, पूजा, वैश्वदव करतात. त्यांना विचारा. लक्ष्मीबाई ताटक्यांच्या बिऱ्हाडी आल्या. दादांचे वय त्या वेळी २०–२२ वर्षांचे. दिसावयाला पोरसवदा. त्यामुळे त्यांना पाहून लक्ष्मीबाई संभ्रमात पडल्या. दादांनी काय काम आहे वगैरे चौकशी केल्यावर त्यांनी सांगितले–

"इथे कोपऱ्यावरच श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम आहे. तेथील मी व्यवस्थापिका. आश्रमात वैदिक पद्धतीने प्रथमच एक लग्न होणार आहे. तुमच्याकडे पूजा-वैश्वदेव होतो असे डॉ. भाटवडेकर म्हणाले.

"हो, आम्ही वाईचे. माझे वडील दशग्रंथी ब्राह्मण आहेत."– दादांनी सांगितले.

"तरीच" बहुधा दादांचे कोवळे वय बघून याच्याकडे अशी धार्मिक कृत्ये कशी काय होत असतील अशी त्यांना शंका आली असावी.

"काय काय हवं होतं आपल्याला ?"– दादा

लक्ष्मीबाईंनी काय काय हवं ते सांगितले आणि म्हणाल्या, "मिळतील का या वस्तू ? काम झाल्यावर लागलीच आणून पोचवीन."

"हो, देऊ की."

"आपल्या घरी कोण कोण असते ?"

"मी आणि माझी पत्नी."

"तिचे माहेर कुठलं ?"

"मिरजेचं."

"आं ? मिरजेची ? म्हणजे आमच्या गावची. कोणाकडची ?"

"डॉ. प्राणी ह्यांची मुलगी."

"अरे वा ! म्हणजे आमच्या बन्याचीच."

आता डॉक्टरांना (दादांचे श्वशुर) बन्या म्हणतात हे दादांना काय माहीत ? आणि सासऱ्यांना 'बन्या' म्हणून ओळखणारी ही बाई कोण ? पण दादांनी काही विचारले नाही. त्यांनी सौ. ला बाहेर बोलावले. लीलाताई बाहेर आल्या.

" शंकाच नको. बन्याचीच मुलगी ही. "

लीलाताईंनी त्यांना वाकून नमस्कार केला. मग गप्पा मारता मारता कळलं की दादांचे श्वशुर– डॉ. प्राणी व लक्ष्मीबाई यांची फार पूर्वी-पासूनची म्हणजे अगदी भातुकली खेळण्यापासूनची जुनी ओळख आहे. त्यांचे बिऱ्हाडंच लक्ष्मीबाईंच्या माहेरच्या वाड्यात होते. अर्थात एवढी ओळख न निघती तरी दादांनी सर्व वस्तू दिल्याच असत्या. जाताना त्या म्हणाल्या–

" बन्याची मुलगी म्हणजे आमची माहेरचीच मुलगी; म्हणजे तुम्ही आता आमचे जावईच झालात ! "

या " धाग्याने " दादा आश्रमांशी जोडले गेले. त्या वेळी दादांचा आश्रमातील पहिल्या लग्नाला अप्रत्यक्षपणे 'हातभार' लागला. पण त्या वेळी त्यांना कल्पना तरी असेल का, की भविष्यकाळात आश्रमातील शेकडो लग्ने प्रत्यक्ष त्यांच्याच हाताने लागणार आहेत ? अनेक परित्यक्त शकुंतलांची कन्यादाने करणारे आणि सासरी जाणारी कन्या बघताना शोकाकुल होणारे आश्रमाचे 'कण्वमुनीच' ते ठरणार आहेत !

नियतीची योजना म्हणतात ती अशी.

यानंतरच्या काळात आश्रमात सौ. लीलाताईंना रामनवमी, कृष्णजयंती, मंगळागौर, संक्रांत अशा निमित्ताने वरचेवर बोलावणे येऊ लागले. श्रीमती लक्ष्मीबाई कधीकधी दादांना हक्काने आश्रमाची चार कामे सांगत व करवून घेत. आणि हा 'सासुरवास' दादा आनंदाने सहन करीत. या लक्ष्मीबाई अखेर २७ फेब्रुवारी १९४८ रोजी वारल्या. पण त्यांनी केलेल्या कामाची बूज दादांच्या मनात सतत होती. वेळोवेळी संस्थेच्या अहवालांतून, भाषणांतून अनेकदा त्यांचा अत्यंत आदराने आणि गौरवाने त्यांनी उल्लेख केलेला आढळतो.

* * *

# १०.

## " आश्रमाच्या कार्यकारिणीत प्रवेश "

१९५३ मध्ये संस्थेचा रजत-जयंती समारंभ झाला. खरं म्हणजे दादा त्यांच्या स्वभावधर्मानुसार श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कामात गुंतून जायचे. पण १९४० ते १९५० या दशकात दादा संसारात स्थिरावले नव्हते. संसाराचा गाडा ओढणे, इतर ऐहिक जबाबदाऱ्या पार पाडणे आणि त्यासाठी अर्थसंपादन ह्या चक्रात पूर्णपणे अडकून गेले होते. नोकऱ्यांच्या शोधात होते. आयुष्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसत नव्हती. १९५० च्या दशकानंतर दादा आयुष्यात बऱ्यापैकी स्थिरावले. म्हणून १९५३ मध्ये आश्रमाच्या साहाय्यक व्यवस्थापिका श्रीमती राधाबाई बापट यांच्या आग्रहावरून दादा संस्थेचे आजीव सभासद झाले.

श्रीमती लक्ष्मीबाईंमुळे त्यांचा परिचय झालेला होताच. या रौप्यमहोत्सवी समारंभात दादांनी एक साधे स्वयंसेवक म्हणून काम केले. कार्यकारिणीचे सभासद, इतर महनीय व्यक्ती जवळून बघितल्या. पण प्रत्यक्ष ओळख मात्र कोणाचीच झाली नाही. ओळख करून देणे-घेणे हा आता रुजलेला प्रकार त्या काळात कमीच होता. संस्थांमध्ये तर दुर्मिळच होता! १९५३–५६ या काळात श्रीमती ताराबाई बस्तीकर या समाजकार्यकर्त्या अल्प मोबदला घेऊन पूर्ण वेळ आश्रमात राहूनच काम करीत असत. त्यांचाही दादांना परिचय होताच. मधून मधून आश्रमाच्या कामासंबंधात त्यांच्याशी बोलणे होई. शक्य ती कामे दादा करीत. त्यांनी

१९५६ मध्ये राजीनामा दिला. त्यांच्या साहाय्यक श्रीमती राधाबाई बापट यांच्या सूचनेवरून व त्या वेळच्या कार्यकारिणीचे सदस्य, कायदे-शीर सल्लागार व माटुंगा शाखा हिंदुसभेचे अध्यक्ष श्री. भागवत वकिलांच्या आग्रहाने दादांनी कार्यकारिणीवरील जागेसाठी प्रथमच झालेल्या निवडणुकीत भाग घेतला. कार्यकारिणीवर ते जास्तीत जास्त मतांनी निवडून आले. ही घटना आहे १९५७ सालची.

१९५७ पर्यंत दादा आश्रमाच्या कामात प्रत्यक्षपणे संबंधित नव्हते. राधाबाईंच्या आणि त्यापूर्वीच्या काळात लक्ष्मीबाईंच्या सूचनेवरून आपुलकीपोटी काही कामे करीत इतकेच. आता अनेक नोकऱ्या बदलत बदलत दादा एल. आय. सी. च्या नोकरीत स्थिर झाले होते. त्यामुळे ते आश्रमाच्या कामकाजात अधिकृतपणे भाग घेऊ लागले. प्रथम कार्यकारी मंडळाचा सभासद, १९५९ पासून सतत पंचवीस वर्षे संयुक्तपणे अथवा स्वतंत्रपणे मानद सचिव, त्यानंतर उपाध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी विश्वस्त, पुन्हा सर्वांच्या आग्रहास्तव मानद कार्यवाह व अखेरीस १९९०–९१ या वर्षात अध्यक्ष अशा विविध भूमिकांतून दादा आश्रमाच्या कामात सहभागी राहिले. खरं म्हणजे आश्रमाच्या कामात पंचवीस वर्षे भाग घेतल्यावर १९८४ साली दादांनी नव्या दमाच्या कार्यकर्त्यांनी पुढे यावे म्हणून आपली ‘खुर्ची’ खाली करण्याचा निर्णय घेतला होता. पण सर्वांच्या सततच्या आग्रहाने तर कधी आश्रमापुढे उभ्या ठाकलेल्या जटिल समस्यांमुळे दादांना बाजूला होताच आले नाही. दादा आश्रमात सेक्रेटरी असोत वा ट्रस्टी असोत; पद कोणतेही असले तरी आश्रमात आणि आश्रमा-बाहेर ‘दादा ताटके’ याच एकमेव ‘पदाने’ ते वावरले. त्यांच्या कर्तृत्वामुळे आश्रमाबाहेर दादांच्या नावाचा एक दबदबा निर्माण झाला. त्यांच्याविषयी सर्वांच्या मनात एक प्रकारची आदरयुक्त भीती-भक्ती राहिली. बाहेरच्यांना त्यांचा धाक एवढा, की आश्रम-कन्येकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमतही कोणाची होत नसे.

आता मात्र अगदी निग्रहपूर्वक ते संस्थेच्या प्रत्यक्ष कारभारापासून मुक्त झाले आहेत. वास्तविक आजही त्यांचा उत्साह, कष्ट करण्याची क्षमता,

एखाद्या पंचविशीतील मुलाला लाजवील अशीच आहे. पण पंचाहत्तरावी पार केल्यानंतरची कुटुंबियांची "दादा आता बसा ना, किती दमायचे ? आता थोडी विश्रांती घ्या ना !" अशी एकसारखी विनवणी आणि आपण बाजूला राहून "सांगेन गोष्टी युक्तीच्या चार" या भूमिकेत राहायची ही गेल्या अनेक वर्षांपासूनची त्यांची आंतरिक इच्छा यांचा परिपाक म्हणजे त्यांची 'निवृत्ती' !

या तीन तपांच्या काळात दादांनी संस्थेकरता काय काय केले नाही. या श्रद्धानंद महिलाश्रमाचा असा एकही कोपरा नाही की जो दादांना परिचित नाही. आपल्याच घरात काय कुठं आहे याचा आपल्याला पत्ता नसतो. मग एवढ्या प्रचंड वास्तूतील काय म्हणून लक्षात ठेवणार ? पण दादांना अगदी मध्यरात्री जरी उठवून ( आजच्या घडीलासुद्धा ! ) विचारले की, " दादा, मी एक देणगीदार आहे. मला तुमच्या संस्थेला काही वस्तू देणगी म्हणून द्यायच्यात. पैसे पुष्कळ आहेत तुमच्याकडे. तर कोणत्या वस्तू देऊ ?" दादा झटकन काय 'हवं' आहे, म्हणजे कोणत्या गोष्टींची संस्थेला गरज आहे, हे क्षणार्धात सांगतील ! कुठल्या मजल्यावरच्या कुठल्या कोपऱ्यात पाण्याचा कूलर हवा आहे, माँटेसरीचा नवीन खेळ कोणता हवा आहे, किंवा संगीत क्लासला तबला-पेटी यांपैकी काय जुनं झालंय म्हणून नवीन घेण्याची आवश्यकता आहे ह्या सगळ्या बारीक गोष्टी त्यांच्या जिभेवर असतात ! इतके ते आश्रमाच्या जीवनाशी एकरूप झालेले आहेत !

पण दादांची खरी 'काँट्रिब्युशन' बघायची असेल तर महिलाश्रमाच्या वास्तूतच शिरले पाहिजे; कारण या वास्तूच्या रोमारोमांत दादा भिनले आहेत !

**'श्रद्धानंद महिलाश्रम'**

तसं श्रद्धानंद महिलाश्रम कोणीही जाऊन पूर्वसूचनेने बघून येऊ शकतं; तिथला परिचारकवर्ग मोठ्या अगत्याने सर्व माहिती देईलच. पण हीच वास्तू दादांबरोबर पाहण्याचा कुणाला योग आला तर या वास्तूच्या साऱ्याच परिसराला 'परिसस्पर्श' झाल्याचे त्याला जाणवेल !

दादांच्या आगमनाबरोबर साऱ्या आश्रमवासियांच्या चेहऱ्यांवर विलक्षण प्रसन्नता येतेच; पण सारी अचेतन वास्तूच 'चार्ज' झाल्यासारखी म्हणजे भारून गेल्यासारखी सजीव, टवटवीत भासायला लागते !

आश्रमाच्या प्रवेशद्वाराशी असलेल्या वॉचमनचा सलाम घेतला की आजूबाजूच्या वृक्षवल्ली, फुलझाडे बघून मन प्रसन्न होते. वास्तूत शिरताक्षणीच आपल्याला प्रथम स्वामी विवेकानंदांचा पुतळा आणि कार्यालयात स्वामी श्रद्धानंदांचा पुतळा दिसतो; हे पुतळे बघितल्या-वर नकळतच माणूस सश्रद्ध बनतो. आतील छोटेखानी हॉलच्या बाजूस जिना आहे. तेथून वरच्या मजल्यावर तसेच तेजपाल हॉलकडे जाता येते. सर्व भिंती देणगीदारांच्या नावांच्या फलकांनी भरून गेल्या आहेत. दर्शनी हॉलच्या एका बाजूला स्वागतिका बसते तर समोरच विक्रेता विभाग आहे. आश्रमातील मुली ज्या ज्या वस्तू बनवितात त्या येथे विक्रीसाठी ठेवण्यात येतात. यांमध्ये लहान मुलांचे तयार कपडे, नॅपकिन्स, टॉवेल्स, टेबलमॅट्स, हातरुमाल, दरवाजा-खिडक्यांचे पडदे, भरतकामाच्या वस्तू, विणकामाच्या वस्तूंचे विविध नमुने अशा अनेक वस्तूंचा समावेश असतो. एके काळी ह्या वस्तू 'इंडियन कौन्सिल फॉर सोशल वेल्फेअरच्या' रिहॅबिलिटेशन एम्पोरियममध्ये विक्रीसाठी ठेवल्या जात असत. या साऱ्याच वस्तू सुबक असतात. एरवीसुद्धा घ्याव्याशा वाटतात. पण विशेषत: या वस्तू बनविणाऱ्यांच्या करुण कथा ऐकल्या किंवा त्यांपैकी काहींना प्रत्यक्ष बघितलं की या वस्तू आवर्जून घ्याव्याशा वाटतात.

आश्रमाची आतील वास्तू इंग्रजी U म्हणजे घोड्याच्या नालाच्या आकाराची आहे. तळमजल्यावर प्रशस्त स्वयंपाकगृह आहे. कामाच्या सोयीच्या दृष्टिकोणातून आणि लहान मुलं-मुली, तरुण मुली आणि वयस्क स्त्रिया यांच्या वयांचा विचार करून त्यांची वेगवेगळ्या विभागांत विभागणी करण्यात आलेली आहे.

**१) महिला विभाग**

या विभागात निराधार, पतित, परित्यक्ता, बलात्कारित, कुमारी माता, घरातून हाकलून दिल्या गेलेल्या किंवा घरच्या जाचाला-

अत्याचाराला कंटाळून पळून आलेल्या, गुन्हेगार–कोर्टाकडून–पोलिसांकडून आलेल्या– अशा विविध प्रकारच्या स्त्रियांची सोय केलेली आहे.

२) **अर्भकालय**

या विभागात जन्मतःच पोरकी झालेली, अनैतिक संबंधातून रस्त्यावर टाकली गेलेली, दारिद्र्याच्या वणव्यात पोळल्यामुळे वाऱ्यावर सोडली गेलेली, रिमांड होम, कोर्ट यांजकडून आलेली अशा सर्व प्रकारच्या मुला-मुलींचा समावेश असतो. वयोगटानुसार अशा मुला-मुलींची विभागणी करण्यात येते.

| | |
|---|---|
| १) एक दिवसाच्या अर्भकापासून ते एक वर्षापर्यंतची मुलं– | बाल-बालिका शुश्रूषागृह |
| २) १ ते ३ वर्षांपर्यंतची मुलं– | बालक-बालिका परित्यक्त मुलांचा विभाग |
| ३) ३ ते ६ वर्षांपर्यंतची मुलं– | बालवाडीच्या वयाच्या मुलांना वसईचा वृद्धाश्रम |
| ४) ७ ते १० वर्षांपर्यंतच्या मुली– | बालिका विभाग |

(साधारणपणे ५ वर्षांनंतरची मुलं आश्रमात ठेवली जात नाहीत, त्यांची सोय इतर संस्थांमधून करण्यात येते; फक्त मुली आश्रमात ठेवल्या जातात.)

| | |
|---|---|
| ५) ११ ते २० वर्षांपर्यंतच्या मुली | विद्यार्थिनी-गृह. |
| ६) २१ ते २५ वर्षांपर्यंतच्या मुली | अनुचितनया विभाग |
| ७) २६ ते ६० वर्षांपर्यंतच्या स्त्रिया | महिला विभाग |
| ८) ६१ वर्षांवरील महिला | वसई वृद्धाश्रम |

नवजात अर्भकापासून ते एक वर्षाच्या तान्ह्या बाळाला सांभाळणे फार कठीण असते. यासाठी आश्रमात खास शुश्रूषा विभाग सुरू करण्यात आला. त्यात ४० बालकांची सोय करता येते. क्षणिक मोहाच्या पापापोटी, भेकड नराधमांनी केलेल्या अत्याचारापोटी जन्मलेली ही अर्भकं जन्मजात माता-पित्यांच्या नैसर्गिक मायेच्या उबेला पारखी झालेली

असतात. प्रत्येक बालकासाठी स्वतंत्र पाळणा किंवा छोटी कॉट असते. कॉटच्या कडा मुद्दाम थोड्या उंच ठेवलेल्या आहेत; म्हणजे मूल थोडेसे जास्ती उंचीचे असले तरी पडायची काळजी नाही. या मुलांच्या आहारासाठी एक सुसज्ज छोटेसे स्वयंपाकघर या विभागाला जोडलेले आहे. तेथे दुधाच्या बाटल्या स्वच्छ धुऊन उकळलेल्या पाण्यातून निर्जंतुक केलेल्या असतात. त्यातून दूध गरम करून दिले जाते. या बालकांच्या दुधाच्या वेळांची व्यवस्थित नोंद केलेली असते.

स्वयंपाकघरासारखेच एक छोटेसे दालन या विभागात आहे. नवजात आणि आजारी अर्भकांची तेथे सोय केली जाते. अधिक काळजी घेतली जावी म्हणून एका लांब लाकडी टेबलासारख्या जागेवर एक मऊसा बिछाना, त्याभोवती तिन्ही बाजूंनी आडोसा, आत अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचा झोत, या प्रकाशझोतामुळे बाळाला पूर्ण संरक्षण मिळते. अपुऱ्या दिवसांच्या वा अति-अशक्त अर्भकांसाठी 'इनक्युबेटर्स'ची पण सोय केलेली आहे. हा संपूर्ण विभाग निर्जंतुक केलेला असतो. पूर्वी हॉस्पिटल्स, कोर्ट यांजकडून आलेल्या मुलांची फार आबाळ व्हायची. ज्या महिलेला बेअब्रूच्या भीतीपोटी जन्मलेल्या मुलाचा त्याग करायचा असायचा अशी महिला त्या नवजात बाळाला अंगावरचे दूध द्यायला तयार नसायची; मग मॅजिस्ट्रेट-पोलिस-अनाथाश्रम या सोपस्कारात त्या बाळाची अक्षरशः एवढी परवड व्हायची की, त्या धावपळीत ती मुलं कधी कधी मृत्युमुखी पडायची; सुदैवाने यदाकदाचित जगली तर आश्रमात आणेपर्यंत अर्धमेली व्हायची. डीहायड्रेशन व्हायचे; अशा मुलांसाठी दादांनी देणग्या मिळवून, आश्रमातील भगिनींच्या सहकार्याने सर्व सुविधांनी सुसज्ज असे एक छोटेखानी हॉस्पिटलच आश्रमात १९७९ पासून सुरू केले. रोजच्या रोज येणाऱ्या लेडी डॉक्टर्स, त्यांना मदतनीस म्हणून नेमलेल्या पगारी परिचारिका, आयांचे शिक्षण देऊन तयार केलेल्या आश्रमकन्या असा एकूण २०-२५ जणांचा सेवकवर्ग त्यांच्या त्यांच्या पाळ्यांप्रमाणे २ ते ४ तास काम करतो. दर आठवड्याला किंवा जरुरीप्रमाणे अधिक वेळा अनेक बालरोगतज्ज्ञ सर्व बालकांची तपासणी करण्यासाठी येतात; वेळप्रसंगी सलाईन देण्याची व ऑक्सिजन

लावण्याचीही सोय केलेली आहे. अशी सर्वतोपरी काळजी घेतल्याने मुलांच्या अपमृत्यूची भीती पूर्वीपेक्षा खूपच कमी झाली आहे.

१९६६ पासून या विभागातून कायदेशीरपणे मुलं दत्तक दिली जात आहेत.

१ ते ३ वर्षांच्या मुलांच्या विभागातील मुले रांगती—बोलती असतात. म्हणून या मुलांना १ वर्षाखालील मुलांपासून वेगळे ठेवण्यात येते कारण समज नसल्यामुळे ही मुलं पाळण्यातील मुलांना ओढण्याची आणि त्यामुळे अपघात घडण्याची शक्यता असते. दादांनी ह्या मुलांची देखभाल करण्यासाठी शक्यतो आश्रमातील स्त्रियांचीच नेमणूक करण्याचा कटाक्ष ठेवला. कारण या स्त्रिया विपरीत परिस्थितीतून आलेल्या असल्यामुळे इतर कोणाहीपेक्षा त्या अशा बालकांची काळजी अधिक चांगल्या प्रकारे घेतात. प्रत्येक महिलेच्या ताब्यात दोन-दोन मुलं दिली जातात. आवश्यकतेप्रमाणे आश्रमाबाहेरूनही प्रशिक्षित दाया-नर्सेस घेतल्या जातात. अशा मुलांना मऊ भात, भाज्या, दूध दिले जाते. ३ ते ६ वयोगटातील मुलं पूर्वी माटुंग्याच्या आश्रमातच असत. वृद्ध स्त्रियांसाठी १९६६ साली वसईला वृद्धाश्रम सुरू करण्यात आला. काही दिवसांच्या अनुभवानंतर दादांना असे आढळून आलं की आयुष्यक्रम अगदीच नीरस आणि बेचव होऊ लागलाय. एकमेकीं-समोर स्वतःचीच रडगाणी गाणाऱ्या, आपल्याच दुःखांची कर्मकहाणी सांगत बसणाऱ्या वृद्धा एकमेकींनाच कंटाळू लागल्या ! सुरुवातीला कुणी सहानुभूतीने दुसऱ्याची कहाणी ऐकून घेईल. रोज रोज तीच ती कथा आणि त्याच त्या व्यथा ऐकायच्या म्हणजे सगळीच वेडी व्हायची ! यावर विचार करून दादांनी एक नामी उपाय शोधून काढला. ३ ते ६ या वयोगटातील मुलांचा विभागच त्यांनी वसईला हलविला. पाहता पाहता तेथील वृद्धांचे करपलेले जीवनच पालटून गेले; लहान मुलांच्या खोड्या पाहताना, त्यांचे खेळ बघताना, त्यांना मायेने गोंजारताना, त्यांना गोष्टी सांगत झोपवताना, त्यांचे बोबडे बोल ऐकताना त्या वृद्धा आपापली दुःखे विसरल्या; व्याधी विसरल्या. त्यांच्या जगण्याला आता एक ' प्रयोजन ' मिळाले. नवा अर्थ मिळाला.

वृद्धापकाळात त्यांच्या चित्तवृत्तींना नवे कोंब फुटले. त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर टवटवी आली. म्हणूनच दादा या आश्रमाला कौतुकाने 'आज्या-नातवंडांचे' घर असे सार्थपणे म्हणतात ! येथील आज्यांची संख्या ५० तर बालकांची संख्या २० ते ३० आहे.

६–१० या वयोगटात फक्त मुलीच असतात. सहा वर्षांवरील मुलगे दुसऱ्या मुलांच्या संस्थेत पाठविले जातात. या वयोगटातील मुलींना प्राथमिक शाळांतून पाठविले जाते. त्यांना शारीरिक स्वच्छता, निगा राखणे, अंघोळ करणे, कपडे बदलणे यांपासून सर्व गोष्टी शिकवल्या जातात. शाळेत जाताना गटागटाने जाणे, वाहनांकडे लक्ष देऊन चालणे, रस्ता क्रॉस करणे इत्यादी गोष्टी मुंबईच्या अवाढव्य विस्तारामुळे शिकवाव्या लागतात. या विभागात ७५ मुली असतात. शाळेतील अभ्यास, वेळापत्रकाप्रमाणे रोज लागणारी पुस्तके, वह्या या सर्व बाबी देखभाल करणाऱ्या सेविका आवर्जून पाहतात. या सर्व मुलींचे जेवणखाण मुख्य स्वयंपाकगृहात तयार होते व सर्वांना एकाच पंक्तीत जेवणगृहातील प्रशस्त दालनात वाढले जाते.

वयोगट १० ते २० या विभागास 'विद्यार्थिनी-गृह' असे म्हटले जाते. या वयोगटातील मुलींसाठी एक खास वसतिगृह बांधलेले आहे. त्यांच्यासाठी एक वेगळा नोकरवर्ग ठेवलेला असतो. एक असिस्टंट सुपरिंटेंडंट व एक मदतनीस अशा दोन पगारी सेविका असतात. यामध्ये १०० ते ११० विद्यार्थिनी असतात. ७–८ मुलींचा एकेक गट करून त्यांच्यापैकीच एकीला गटनायिका म्हणून नेमण्यात येते. फरशा धुणे, धुणी-भांडी करणे, ताक घुसळणे, लोणी काढणे, धान्याची निवड, रोजच्या भाज्या निवडणे, पंक्तीतून वाढणे अशी सर्व कामे या वयोगटातील मुलींकडून मुद्दाम करवून घेतली जातात. ही सर्व घरगुती कामे पाळ्या लावून दिवसातून कमीत कमी ३–४ तास तरी करावी लागतात. मुख्य हेतू हा की भावी काळात उत्तम गृहिणी बनण्यास त्यांनी सिद्ध असावे. त्यांच्या जडण-घडणीचे, संस्कारग्रहणाचे हेच वय असते म्हणून ही खबरदारी. अर्थात, हे करताना त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होणार नाही; अभ्यास बुडणार नाही ह्याची काळजी घेण्यात येते.

२१ वर्षांवरील पण ६० वर्षांच्या आतील स्त्रियांना शिक्षण पूर्ण झाल्यावर 'आफ्टर केअर-सेक्शन' या विभागात ठेवण्यात येते. या सुरुवातीच्या काळातच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळायची असते. त्यांचे लग्न, नोकरी या दृष्टीने त्यांच्या भवितव्याची काळजी घेण्यास सुरुवात होते; जेणेकरून त्यांच्या आयुष्यात स्थैर्य निर्माण होईल.

यांपैकी काही मुली त्यांच्या किशोरावस्थेत काही चुका करून बसलेल्या असतात. त्यांच्या पालकांनी समाजाच्या भीतीपोटी काही ठरावीक काळापर्यंत त्यांना आश्रमात ठेवलेले असते. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांचे पालक त्यांना घेऊन जातात. काही मुलींना कुठे ना कुठे तरी नोकरी मिळते; तर काहींची लग्ने जमविण्यात आश्रमाला यश येते. दादांसारखे समाजधुरीण समाजातील तरुणांना संधी मिळेल तेव्हा आश्रम-कन्येच्या अगतिकतेची परिस्थिती समजावतात. काही 'वाट चुकलेले' तरुण समाजाची सहानुभूती घालवून बसलेले असतात; तर काही पूर्वायुष्यात बऱ्याच चुका करून 'वाल्याचे वाल्मीकी' होण्याच्या प्रयत्नात असतात. अशा परिस्थितीतील तरुण आश्रमातील मुलींशी आनंदाने विवाह करतात. दादांच्या अनुभवाप्रमाणे काही ध्येयवादी तरुण आश्रमातील मुलींचा पूर्वेतिहास माहीत असूनही आपणहून त्यांच्याशी लग्न करण्यास पुढे येतात.

पण ज्यांची लग्ने होत नाहीत, नोकरीही मिळत नाही अशा निराधार तरुणींचे काय? अशा तरुणींना दादा 'आधारवड'च वाटतात. अशा मुलींना ट्रेनिंग देऊन आश्रमातच अर्धवेळ नोकरी दिली जाते. या महिला आश्रमात निरनिराळ्या प्रकारची कामे करतात. मुख्य स्वयंपाकगृहात दूध, भाज्या, धान्य इत्यादी आवश्यकतेनुसार आणणे; विद्यार्थिनी-गृहात, खास शुश्रूषागृहात त्याचे वाटप करणे, सर्वांसाठी चहा, जेवण, नाश्ता बनविणे, कोठीघर, स्वयंपाकघराची स्वच्छता राखणे, ६ ते १० वयोगटातील मुलींची व्यवस्था बघणे, इत्यादी कामांचा त्यात समावेश असतो.

काही स्त्रिया आश्रमातच शिवणकामाचे शिक्षण घेऊन सरकारी परीक्षेस बसून एक वर्षाचा डिप्लोमा मिळवितात. एस. एस. सी. झाल्यानंतर

नर्सिंग, डी. एड. करतात. काही आवडीनुसार भरतकाम, गायन, वाद्य-संगीत इत्यादी कलाविषयांचे शिक्षण आश्रमातच घेतात. आश्रमातच अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांची जेवणखाण, राहाणे, आवश्यक कपडालत्ता आदी जीवनावश्यक बाबींची सोय आश्रमच विनामूल्य करतो. अशा स्त्रियांना आश्रम म्हणजे 'तुम ही हो माता, पिता तुम ही हो' असा सबकुछ असतो.


पण ज्यांना नोकरी मिळते त्यांना मात्र नियमाप्रमाणे आश्रमात राहता येत नाही. मग अशा स्त्रियांनी जावे कुठे ? दादांनी या आवश्यक बाबींकडेसुद्धा नंतर लक्ष पुरविले; आणि अशा अल्पवेतन मिळविणाऱ्या स्त्रियांसाठी महिलाश्रमातर्फेच कुर्ला येथे हॉस्टेल बांधले. त्यांना परवडेल अशा माफक पैशात तेथे अशा नोकरीवाल्या स्त्रियांच्या राहण्या-जेवण्याची सोय केली.

ह्यापेक्षा अधिक वयाच्या म्हणजे ६० वर्षे वयावरील स्त्रियांसाठी श्रद्धानंद महिलाश्रमाने दादांच्या पुढाकाराने वसईला वृद्धाश्रम सुरू केला.

आज वृद्धत्व हे एका अर्थाने शाप ठरू पाहात आहे. वृद्धाश्रमाची गरज ही एकत्र कुटुंबसंस्थेच्या मोडकळीची परिणती आहे. अलीकडच्या शिक्षणव्यवस्थेमध्येदेखील ह्याकडे लक्ष पुरविले गेल्याचे दिसत नाही. नातवंडांना आजी-आजोबा हवेत आणि जीवनाच्या संध्याछायेत वावरताना आजी-आजोबांना नातवंडांचा सहवास हवा. पण समाज-व्यवस्थेत या गोष्टी मोजल्या जात नाहीत हे खेदाने म्हणावे लागते.

वृद्धाश्रमामध्ये प्रविष्ट झालेल्या महिलांच्या तोंडून ज्या कथा-कहाण्या ऐकावयास मिळतात त्यांमध्ये त्यांच्या वेदनांची गाथा असते. हयातभर कष्ट उपसूनदेखील आपल्या पोटच्या लेकरांनी आपणास घराबाहेर कसे काढले याच्या इतिहासाची उजळणी या महिला एकमेकींपाशी करताना दिसतात. शारीरिक आणि मानसिक वेदनांची परिसीमा झालेली असते. एक वृद्धा दुसरीच्या वेदनांची सौम्यता पटविताना

आपल्या वेदनेची तीव्रता कथन करते. पुष्कळ वेळा या वृद्धांना वेदना इतक्या असह्य ठरतात की त्या तासन् तास मूक अवस्थेतच असतात. आपल्या लेकरांच्या वागण्याचे असह्य प्रकार सांगण्याचा त्यांना संकोच वाटतो. आणि त्या वेदना आणि ते शब्द तसेच गिळावे लागतात. अशा वेळी मन बोलत राहतं ते त्यांच्या नजरेतूनच ! कोणी वेदनांना अश्रूंची वाट दाखवितं तर कोणी आपल्याच पदरात तोंड दडवितं. अशा वृद्धांचं आश्रयस्थान ठरलंय ते वसईच्या वृद्धाश्रमात !



# ११.

आश्रमात निराधार स्त्रियांची व्यवस्था होते. पण ज्या स्त्रिया दारिद्र्याशी सामना करीत आहेत, ज्यांच्या घरी कमावणारा कर्ता माणूस कोणी नाही अशा स्त्रियांचे काय ? त्यांनी आपले, आपल्यावर अवलंबून असलेल्या मुलांचे पालनपोषण कसे करायचे ? आश्रम सर्वांना तर आपल्या छायेत घेऊ शकत नाही. तरीसुद्धा आश्रमाने अशा गरजू स्त्रियांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. १९५३ साली सुरू केलेल्या या विभागात प्रथम प्रिमिअर ऑटोमोबाइल्सकडून व नंतर वैयक्तिक ओळखीच्या जोरावर दादांनी क्रॉम्पटन ग्रीव्हज या विख्यात कंपनीकडून कामे मिळविली. प्रिमिअर ऑटोमोबाइल्स १९७८–७९ मध्ये बंद झाल्यावर क्रॉम्पटनचे काम वाढविण्यात आले. साधारणपणे स्त्रियांना झेपतील अशा प्रकारची म्हणजे कॉईल वाईंडिंग व स्टेटर माऊंटिंगची कामे त्यांना देण्यात येतात.

आश्रमाचा तळमजला, पहिला व दुसरा मजला यांवर ही परिश्रमालयाची वर्कशॉप्स चालतात. साधारणपणे वर्कशॉप म्हटले की तेलकट जमीन, डागाळलेल्या भिंती, अस्ताव्यस्त पडलेला माल असेच दृश्य कोणाच्याही नजरेसमोर येते. आश्रमाचे सदर वर्कशॉप या कल्पनेला धक्का देणारे आहे. जमिनी स्वच्छ, भिंती लख्ख, कंपनीकडून आलेला कच्चा माल (तांब्याच्या तारांची भेंडोळी वगैरे) व्यवस्थितपणे एका ठिकाणी लावून ठेवलेला. पूर्ण झालेले काम दुसऱ्या बाजूला ठेवलेले. प्रशस्त अशा मोठ्या हॉलमध्ये इंग्रजी U अशा

आकारात टेबले मांडली जातात; आणि त्याभोवती तारांची भेंडोळी करण्याची स्त्रियांची कामे चाललेली असतात. कंपनीचा ( क्रॉम्पटन ग्रीव्हज ) ट्रक माल घेऊन येतो आणि तयार झालेला माल घेऊन जातो. गंमत अशी की ट्रकची ही वर्दळ आश्रमवासियांना जाणवणार नाही अशा कौशल्याने केली आहे. ट्रकचा मार्ग संपूर्णपणे बाहेरच्या बाहेर काढलेला आहे. काम चालू असताना चक्क चांगली चांगली गाणी, वाद्यसंगीत ऐकवण्यात येते. एक तर त्यामुळे काम करणाऱ्या महिलांची चांगली करमणूक होते व त्यांच्या आपापसातील वायफळ गप्पांना पायबंद बसतो.

ह्या परिश्रमालयात एकूण १५० गरजू स्त्रियांना काम पुरविले जाते. ज्या प्रमाणात काम त्या प्रमाणात दाम अशी पद्धत आहे तरीपण साधारपणे रुपये १२००-१५०० ची मासिक प्राप्ती प्रत्येकीला होऊ शकते. ज्या कुटुंबातील कर्तासवरता पुरुष अपघाताने म्हणा वा अन्य कारणाने अकाली मृत्युमुखी पडला असेल त्याच्या विधवेला आपला विस्कटलेला संसार सावरण्यासाठी हे परिश्रमालय म्हणजे वरदान आहे ! अशा कामात ती चार पैसे कुटुंबासाठी मिळवू शकते. आपले दुःख संपूर्णपणे नाही तरी कामाच्या काळात थोडेफार विसरू शकते. निदान त्या दुःखी अवस्थेपासून दूर राहू शकते.

या परिश्रमालयाच्या बाबतीत दादांनी एक कठोर शिस्त पाळलेली आहे. ही नोकरी कायम स्वरूपाची नाही. अशा निराधार कुटुंबात जर दुसरी एखादी व्यक्ती कामाला लागली, कमावती झाली तर अशा महिलेला दुसऱ्या एखाद्या अधिक गरजू स्त्रीसाठी आपली जागा खाली करावी लागते.

ही झाली श्रद्धानंद महिलाश्रमाची ढोबळमानाने ओळख. महिलाश्रमाने पुढे वसईचा वृद्धाश्रम आणि कुर्ल्याला नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी हॉस्टेल सुरू केले.

माटुंग्याच्या आश्रमात ६० वर्षे वयापर्यंतच्याच स्त्रियांना आश्रय मिळत असे. त्यावरील वयाच्या स्त्रियांनी काय करायचे ? अशा स्त्रिया सतत

आश्रमात प्रवेश मागण्यास येत. त्यांना नकार देऊन परत पाठवणे दादांच्या जिवावर येई. एकदा तर सत्तरीच्या घरातील चांगल्या घराण्यातील वृद्धा आश्रमाच्या दारातच घेरी येऊन पडली. तीन दिवसांची भुकेली ती स्त्री एक बालविधवा होती. जुन्या काळच्या परिस्थितीत अशा बालविधवांच्या भवितव्याचा कोणी विचारच करीत नसत. ना पुर्नविवाहाचा ना पुनर्वसनाचा. तीस-चाळीस माणसांच्या एकत्र कुटुंबपद्धतीत कोठे तरी ती खपून जाई. तशीच उपरोक्त बालविधवा दिवस-रात्र रांधा आणि वाढा करत आयुष्यातील उमेदवारीचे दिवस काढीत होती. तशातच कुटुंबातील कोणा दुष्टाची नजर तिच्या शरीरावर पडली! दिवसरात्र काबाडकष्ट करून घायकुतीला आलेले 'शरीर' रात्री त्या नराधमाच्या स्वाधीन करावे लागे. कोणाकडे बोलायची चोरी! पोटाला मिळणारी अर्धी-मुर्धी भाकरी, नेसायला मिळणारे विटके वस्त्र ही "चैन" पण बंद व्हायची! जीव द्यायला मन घाबरायचे. तारुण्य ओसरले तसे हे 'भोग' संपले. नंतर काही काळ बरा गेला. जोपर्यंत हात–पाय चालत होते तोवर त्या कुटुंबात आश्रय होता. वृद्धापकाळात त्या बाईचा आता कोणताच 'उपयोग' नव्हता; अडचणच होत होती. अशा वेळी नेहमी होतं तेच झालं. एक दिवस सरळ धक्के मारून ती 'अडगळ' बाहेर काढली गेली. दोन-तीन दिवस भीक मागत हिंडता हिंडता कोणी तरी आश्रमाचा पत्ता त्या बाईला सांगितला. कसा बसा पत्ता शोधीत ती आश्रमात आली. अतिश्रमाने आणि दोन-तीन दिवसांच्या उपासमारीने आश्रमाच्या पायरीवरच कोसळली! दादांनी कार्यकारिणीच्या संमतीने 'स्पेशल केस' म्हणून त्या वृद्धेला आश्रमात आश्रयार्थ ठेवले. बदलत्या काळानुसार आणि विशेषतः एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस आल्यावर अशा 'रिटायर्ड' केल्या गेलेल्या स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढणारच हे जाणून दादांनी १ जानेवारी १९६४ पासून माटुंग्याच्या आश्रमाच्या एका खोलीत "वृद्ध आणि अपंग" विभाग सुरू केला.

आश्रमाच्या वाढत्या पसाऱ्यात हा विभाग विकसित होणे शक्यच नव्हते. दादांनी या समस्येवर गंभीरपणे विचार केला. त्यांनी एखादी बाब

गांभीर्याने घेतली की ते ती तडीस लावणारच. वसईच्या वृद्धाश्रमाची इमारत कशी बांधली गेली ह्याची हकीकत अन्यत्र येणार आहेच. पुनरोक्ती न व्हावी म्हणून सध्या एवढेच नमूद करावे लागेल की जून १९६७ पासून वसईच्या निसर्गरम्य वातावरणात वृद्धाश्रम सुरू झाला आणि माटुंग्याचा वृद्ध स्त्री-विभाग तिकडे हलविण्यात आला.
या वृद्धाश्रमात ५० महिलांची सोय होऊ शकते. समाजाच्या एकूण गरजेच्या तुलनेत ही व्यवस्था अत्यंत अपुरी आहे ह्याची दादांना स्वतःला फार खंत वाटते. पण . . . . .

हा विभाग पूर्णपणे निराधार वृद्धांसाठीच आहे. त्यामुळे साठी उलटलेल्या पण निदान प्रवेश घेण्याच्या वेळी तरी स्वतःची कामे स्वतः करू शकतील अशाच वृद्ध महिलांना सहसा दाखल करून घेतले जाते. माटुंग्याच्या आश्रमातील ज्या मध्यमवयीन स्त्रियांना बाहेर नोकरी मिळण्याची शक्यता नाही, इतरत्र कुठे जाण्यासारखा आधार नाही अशा स्त्रियांना योग्य प्रकारचे शिक्षण देऊन वसईच्या आश्रमात काम करण्यासाठी पाठविण्यात येते. सहा महिने, त्या व्यवस्थित काम करतात ह्याची खात्री झाल्यावर त्यांना अल्पसे वेतन दिले जाते. अन्न-वस्त्र-निवारा तर त्यांना आश्रमात प्रवेश केलेल्या दिवसापासूनच असतो. तरी पण त्यांना या अल्पस्वल्प वेतनाचेही अप्रूप वाटते. खास शिक्षण देऊन एक प्रौढ महिला 'गृहमाता' म्हणून नेमली जाते.

प्रत्येक वृद्धेला वैयक्तिक उपयोगासाठी कॉट, गादी, उशा, चादरी, ब्लँकेट्स, ताट-वाटी, पाणी पिण्यासाठी फुलपात्र इत्यादी वस्तू दिल्या जातात.

वसईची इमारत दुमजली आहे; त्यातल्या त्यात अपंग बनलेल्या वृद्ध महिलांना तळमजल्यावर व त्यापेक्षा चांगली स्थिती असलेल्या महिलांना पहिल्या मजल्यावर ठेवण्यात येते. दोन्ही ठिकाणी प्रशस्त बाथरूम-संडास, स्नानास गरम पाण्याची सोय, सकाळी चहा-न्याहरी, दुपारी जेवण, सायंकाळी चहा-कॉफी वा फळफळावळ. सर्व स्त्रिया

वृद्ध असल्याने रात्री पचनास हलकी अशी मूग-खिचडी, उपासाच्या दिवशी उपवासाचे पदार्थ अशी सर्व सोय असते.

आजारी पेशंटसाठी आश्रमाने नेमलेल्या डॉक्टरांपैकी कोणी येतात; अधिक आजारी झालेल्या महिलांची व्यवस्था वसई, विरार, बोरीवली वा मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये आजाराची गंभीरता पाहून केली जाते. पण वृद्ध स्त्रियांना नेणे-आणणे फारच जिकिरीचे असते. सुदैवाने आता वसईलाच मोठे जनरल हॉस्पिटल झाले आहे. आश्रमाने या हॉस्पिटलला दोन लाख रुपये दिलेले आहेत; करार असा की दहा वर्षांच्या काळात आश्रमातील वृद्धांची आश्रमात किंवा हॉस्पिटलमध्ये गरज असेल त्याप्रमाणे त्यांनी व्यवस्था पाहायची.

सुरुवातीला दादांनी बघितलं, की या वृद्धांचं जिणं फारच कंटाळवाणं होत आहे. केवळ मरण येत नाही म्हणून जगत राहायचे ! तसं खरं म्हणजे धार्मिक पुस्तकांचे, कथा-कादंबऱ्यांचे सार्वजनिक वाचन केले जाते. रेडिओ, टी. व्ही. असतो. प्रसंगानुरूप बाहेरच्या भजनी मंडळांचे कार्यक्रम केले जातात. अंगात ताकद असेल तर बाहेर फिरून येता येते; वृद्धाश्रमाच्या सुंदर आणि प्रशस्त प्रांगणात मुद्दाम वाढविलेली झाडे-फुलझाडे पाहात वेळ घालविता येतो. इतके असूनही वृद्धांचे जीवन नीरस, रूक्ष आणि कंटाळवाणे होत असलेले दादांना जाणवत होते. जीवनरस न मिळालेल्या वृक्षाप्रमाणे सुकत चाललेल्या वृद्धा बघून दादांना अचानक एक कल्पना सुचली. ताबडतोब त्यांनी ती अमलात आणली. त्यांनी माटुंग्याच्या आश्रमातील बालवाडीची– ३ ते ६ वयोगटातील मुलं वसईच्या आश्रमात आणली. मग मात्र अगदी जादूची कांडी फिरविल्यासारखा फरक पडला ! देणग्या मिळवून मुलांसाठी घसरगुंडी, झोपाळे आदी सोयी आवारात केल्या. त्यामुळे या बालकांचे खेळ, पळापळ, गडबड, गोंगाट ऐकता ऐकता, त्यांना गोष्टी सांगता सांगता वृद्धा आपल्या यातना विसरल्या ! एकाकीपण सरले. जुन्या वठलेल्या वृक्षांना पालवी फुटली. आयुष्याची सरती संध्याकाळ सुखात जाऊ लागली.

निसर्ग-नियमानुसार प्रत्येकाच्या आयुष्यात येणारी 'वृद्धावस्था' अटळ

असते. व्याधी, मुला–सुनांनी न विचारणे, पदोपदी अपमान, घरात सर्वांनाच वाटणारी अडगळ, ह्या सर्वच वृद्धांना, आर्थिक सुबत्ता असूनही कमी-अधिक प्रमाणात जाचणाऱ्या बाबी आहेत; त्यातून धनिकांतील धनिक सुटत नाहीत की नाटककार वि. वा. शिरवाडकरांनी रंगविलेला 'नटसम्राट' सुटत नाही! मग निराधार, निष्कांचन, सर्वस्वी पराधीन अशा वृद्धांची काय दुर्दशा असेल? अशा जराजर्जरांसाठी श्रद्धानंद-सारख्या संस्था आपापला 'खारीचा' वाटा उचलतात ही केवढी दिलासा देणारी गोष्ट आहे! यातून कुणी स्फूर्ती घेतली तर ठीक आहे. एरवी सारा 'हवाला' त्या परमेश्वरावर!



## १२.

### कुर्ला हॉस्टेल – मुलींचे वसतिगृह

आश्रमातील मुलींची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी दादांसारखे समाजधुरीण सर्वतोपरी मेहनत घेतात. यथावकाश काही मुली एस. एस. सी. होतात. नर्सिंग शिकतात. शिवणकाम भरतकामाचे कोर्सेस पुरे करतात. त्यांना नोकऱ्या मिळतात. त्यानंतर मात्र आश्रमाच्या नियमांप्रमाणे त्यांना इच्छा असली तरी आश्रमात राहता येत नाही. बाहेर कोणी नातेवाईक नसतात; आणि असले तरी जागेची समस्या. दोन खोल्यांची जागा त्यांची त्यांनाच पुरी पडत नाही, मग या मुलींना कुठला आधार मिळणार? कोणा कुटुंबात पेईंग गेस्ट म्हणून राहावे तरी थोडे धोक्याचे आणि पैशानेही न परवडणारे. अशा परिस्थितीतील तरुण मुलींनी काय करायचे ?

ही परिस्थिती जाणून दादांनी अल्पवेतनवाल्या तरुण मुलींसाठी हॉस्टेल सुरू करायचे ठरविले. दादांची पायपीट सुरू झाली. मुंबईत त्यातल्या त्यात मध्यवर्ती ठिकाणी वैयक्तिक ओळखीमुळे दादांनी कुर्ला येथे जागा मिळविली. देणग्या मिळविल्या. केंद्रीय सरकारची अशा कामात होऊ शकणारी मदत लक्षात घेऊन त्यांच्याबरोबर दीर्घकाळ पत्रव्यवहार केला. मोठमोठ्या अधिकारपदावरील व्यक्तींच्या गाठी-भेटी घेतल्या. मुंबईसारख्या महानगरीतील महिलांसाठी अशा वसतिगृहांची आवश्यकता पटवून दिली. संपूर्ण योजना पटवून दिली. अखेर १५ मे १९७२ रोजी वसतिगृहाच्या

इमारतीचा पायाभरणी समारंभ श्रद्धानंद संस्थेच्या तत्कालीन अध्यक्षा श्रीमती माणेकलाल प्रेमचंद यांच्या शुभहस्ते केला. ६ ऑगस्ट १९७३ रोजी संस्थेच्या कार्याध्यक्षा श्रीमती कुसुमबेन शहा यांच्या हस्ते इमारतीची वास्तुपूजा झाली.

१ जानेवारी १९७४ पासून हे वसतिगृह प्रत्यक्षात सुरू झाले. प्रत्येक मजल्यावर १० खोल्या असून, प्रत्येक खोलीत तिघीजणी. अशा प्रकारे ३० खोल्यांतून ९० मुलींची सोय होते. संपूर्ण इमारत चारमजली असली तरी तळमजला संपूर्णपणे स्टेट बँक ऑफ इंडियाला भाड्याने देण्यात आला आहे.

मुख्यतः कमी उत्पन्नवाल्या मुलींसाठी ही योजना असल्याने, मासिक प्राप्ती रु. ६००/– ते रु. २,५००/– या उत्पन्नगटातील मुलींनाच प्रवेशासाठी अर्ज करता येतो. मुंबईत कोठेही राहण्याची सोय नसलेल्यांना परगावी असलेल्या पालकाचे संमतिपत्र, उत्तम वर्तणुकीचे व निरोगी असल्याचे दाखले, नोकरी करत असलेल्या संस्थेचे सर्टिफिकेट पासपोर्ट-साईज फोटो अर्जासोबत जोडावे लागतात. रीतसर मुलाखत घेऊनच प्रवेश दिला जातो.

प्रवेश दिल्यापासूनची सर्व व्यवस्था आश्रमाने नेमलेल्या मेट्रन पाहतात. प्रवेश घेणाऱ्या तरुणीला कॉट, टेबल, खुर्ची, गादी, टेबललॅम्प, गोदरेजचे कपाट इत्यादी वस्तू पुरविल्या जातात. प्रत्येक रूममध्ये सिलिंग फॅन्स, ट्यूबलाईट्स, वॉशबेसिन व ड्रेसिंग टेबल असते. कोणाला इस्त्री करायची असल्यास खोलीच्या बाहेर व्हरांड्यात स्वतंत्र टेबल असते.

इथे राहणाऱ्या नोकरीवाल्या स्त्रियांसाठी ब्रेकफास्ट, चहा, जेवण यांसाठी स्वतंत्र डायनिंग हॉल असून आश्रमातर्फेच कँटीन चालविण्यात येते. इथे काम करण्यासाठी माटुंग्याच्याच आश्रमातील प्रौढ मुली नेमण्यात येतात. कँटीन-प्रमुख म्हणून एक असिस्टंट–मेट्रन नेमलेली असते. दिवसा येथे राहणाऱ्या मुली नोकरीसाठी बाहेर जातात म्हणून रात्रीचे जेवण हॉस्टेलमध्येच घेतले पाहिजे असा दंडक आहे. मुख्य हेतू हा की त्यांनी रात्री ठरावीक वेळेच्या आत यावे, शिवाय एकत्र

जेवण्याने ओळखी होतात. घरगुतीपणा येतो. ओळखी झाल्यामुळे एकमेकींना एकमेकींची मदत होते. संपूर्ण ९० जणींची वसाहत एक कुटुंब म्हणून राहायला शिकते. कुर्ल्याचे वसतिगृह हे एक कुटुंब बनविण्याची किमया दादांच्या शिस्तशीर योजनेमुळे सिद्ध झालेली आहे. यातून समाजसेवेचे वेगळे दर्शन घडते.





संध्या छायेतील
प्रवाशांचे
निवासस्थान

निरागस बालकांच्या सहवासात रमलेल्या महिला



श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌ची वाई बालवाडी



उद्‌घाटन- नॉर्वे येथील महिला मनोगत व्यक्त करताना, शेजारी श्री. दादासाहेब, ककलेक्टर व्ही. पी. राजा व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.



श्रद्धानंद महिलाश्रम, माटुंगा

वाईच्या किसन वीर महाविद्यालयात




विज्ञान प्रयोगशाळा उद्घाटन

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. दादासाहेब व प्राचार्य आनंदराव कदम

गौरव




उपराष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते दादांचा सत्कार

## १३.

### महिलाश्रम आणि दादांचा सहभाग

श्रद्धानंद महिलाश्रम आणि वसई व कुर्ला येथील दोन वास्तू. येथे राहण्या-जेवण्याची उत्तम व्यवस्था झाली असली तरी त्या वास्तूंचे स्वरूप उत्तम प्रकारचे लॉजिंग-बोर्डिंग एवढेच असू नये ही काळजी घ्यावी लागणार होती. माटुंगा अणि वसई या दोन्ही वास्तू सुविधांच्या दृष्टीने आदर्श म्हणता येतील. पण दादांचे वैशिष्ट्य हे की त्या वास्तूंत राहणाऱ्या महिलांना त्यांनी उत्तम माणूस म्हणून घडविले. महिलाश्रमातील, चारशेच्या वर इन्-मेट्स्-रहिवाशी ह्या एक कुटुंब म्हणून वावरतात. आपला काळाकुट्ट भूतकाळ विसरून ताठ मानेने, खंबीरपणे या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात ठामपणे उभे राहणे यासाठी जी जिद्द लागते, स्वत्वाची भावना लागते ती दादांनी या समाजाच्या दृष्टीने पतित असलेल्या स्त्रियांच्या ठायी जागविली.

दादा आश्रमाच्या कार्यकारिणीवर १९५७ पासून काम करू लागले. १९५९ पासून १९९१-९२ पर्यंत जवळजवळ तीन तपे कोणत्या ना कोणत्या रूपाने आश्रमाच्या कार्याशी निगडित राहिले. दादांच्या पूर्वीही अनेक निरलस कार्यकर्ते होते, पण क्रिकेटच्या भाषेत सांगायचे म्हणजे एवढी 'लाँग इनिंग'- दीर्घ खेळी, कोणी खेळले नाहीत. दादा आश्रमात आले तेव्हा ते ४२-४३ वर्षांचे असतील. जगातील अनेक बऱ्या-वाईट गोष्टींचा अनुभव गाठीशी घेऊन त्यांना एक प्रकारे परिपक्वता प्राप्त झाली होती.

१९५३ पासून आश्रमातील घडामोडी दादा पहात होते. आश्रमवासीयांच्या मानसिकतेचा त्यांनी मनोमन अभ्यास केला. त्यामुळे कार्यकारिणीवर आल्यावर त्यांनी प्रथम कोणती गोष्ट केली असेल तर आश्रमाच्या नावातील अनाथ या शब्दाचे उच्चाटन. कोणाला फारसे माहीत नसेल की 'हिंदू वुमेन्स रेस्क्यू होम सोसायटी'ने स्थापन केलेल्या महिलाश्रमाचे मूळ नाव 'श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम' असे होते. यातील 'अनाथ' हा शब्द दादांना फार खटकायचा. अनाथ म्हटलं की पाहणाऱ्याचा दृष्टिकोण निव्वळ दयेचा वा अनुकंपेचा असतो. आश्रमातील स्त्रियांच्या मनात एक प्रकारच्या असहायतेची भावना निर्माण होते. तेव्हा त्या स्त्रियांच्या मनात अनाथ शब्दामुळे आलेली बोच काढून टाकून, त्यांच्या मनात आत्मविश्वासाची, आत्मसन्मानाची भावना निर्माण करण्यासाठी दादांनी कार्यकारिणीच्या सभासदांना विश्वासात घेऊन, पटवून देऊन 'अनाथ' शब्दाला १९५९ मध्ये कार्यवाहपदावर येताच कायमचा 'अर्धचंद्र' दिला! नवीन बारसे 'श्रद्धानंद महिलाश्रम' असे आजच्या सुपरिचित नावाने झाले.

ह्या आश्रमकन्यांचा आत्मसन्मान जपण्यासंबंधातील एक आठवण उद्धृत करण्यासारखी आहे. आश्रमात अनेक प्रकारच्या देणग्या वस्तूंच्या स्वरूपात येतात. काही कापडगिरणीमालकांनी अनेक नव्या कोऱ्या झुळझुळीत साड्या आश्रमाकडे देणगीदाखल पाठविल्या. अशा साड्या सणासुदीला आश्रमकन्यांना वापरायला देतात. पूर्वी आश्रमकन्या दिवाळीत भाऊबीज-निधी गोळा करण्यासाठी घरोघरी हिंडत असत. अशाच एका प्रसंगी तरुण आश्रमकन्यांना दिवाळीत नव्या कोऱ्या साड्या नेसायला मिळाल्या होत्या. आनंदाच्या भरात त्या भाऊबीज-निधी गोळा करायला गेल्या. आश्रमाची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे अलीकडे ही प्रथा बंद झालेली आहे. आश्रमासाठी आर्थिक मदत मागायला आलेल्या अनाथ मुली आणि इतक्या नव्या कोऱ्या झकपक साड्या नेसलेल्या! एका गृहिणीचे पित्त खवळले. तिने रागाच्या भरात आश्रमकन्यांना खूप चापले. 'एवढ्या उंची साड्या नेसता अणि आश्रमासाठी भीक मागता. लाज नाही का वाटत?' वगैरे वगैरे.

त्या मुली हिरमुसल्या. आश्रमात परतल्या. साड्या सोडून नेहमीचा युनिफॉर्म घालून सणावारी मुसमुसत बसल्या. नंतर दादांच्या कानावर ही हकीगत गेली. दादांनी मुलींची समजूत घातली. त्यांना धीर दिला. त्यांना विश्वासात घेऊन ज्या घरी त्यांचा अपमान झाला होता त्या घराचा पत्ता घेतला. त्या घरी ते लगोलग गेले. त्या बाईंना व्यवस्थित समजावून सांगितलं, की 'भाऊबीज-निधी गोळा करायला आलेल्या मुली आश्रमाच्याच आहेत. वास्तविक त्यांनी अशा झकपक साड्या नेसून हिंडायला नको होतं. पण त्यांचे अल्लड वय तुम्ही लक्षात घ्या. कधी नव्हे त्या नव्या कोऱ्या साड्या नेसायला मिळाल्या. नटायची, मुरडायची या वयात स्वाभाविक आवड; त्यामुळे त्या नादात त्यांना भान राहिले नाही. आपल्याला नसली मदत करायची तर नका करू. पण कृपया त्यांचा अपमान करू नका. अजून जग न बघितलेल्या अजाण मुली आहेत त्या.'

दादांच्या बोलण्याने ती गृहिणी वरमली. एरवी दिली नसती त्याच्या दुप्पट रक्कम तिने भाऊबीज-निधीला दिली. आश्रमकन्यांचा आत्मसन्मान जतन करण्याची ही जी दादांची आपुलकी ती खरोखरच लोकविलक्षण आहे. त्यामुळे प्रत्येक आश्रमकन्येला दादांच्या रूपाने आपला पिता आपल्या पाठीशी उभा आहे, खंबीरपणे उभा आहे, संकटांवर संकटे कोसळली तरी हा पिता आपल्या वात्सल्याच्या गोवर्धनगिरीखाली सर्वांना सांभाळून घेईल ह्याची खात्री असते. दृढ विश्वास असतो.

## वसई वृद्धाश्रम

संवेदनक्षम आणि भावनाप्रधान दादांना नुसत्या भावनेने प्रश्न सुटत नसतात याचे वास्तव भान होते. दयाभावना, आपुलकी यांबरोबर व्यवहाराच्या कठोर पातळीवर उतरल्यावरच समस्या सोडविता येतात हे दादा कधीही विसरले नाहीत.

आश्रमात एक सत्तरीची वृद्ध निराधार स्त्री आश्रमाच्या पायरीवरच कशी कोसळून पडली ह्याची हकीगत आधी आली आहेच. त्या बाईची दया आली, स्पेशल केस म्हणून तिला आश्रमात ठेवून घेतले हे

ठीक आहे. पण त्यामुळे मूळ प्रश्न कसा सुटणार? आश्रमाच्या नियमाप्रमाणे ६० वर्षे वयापर्यंतच्या स्त्रियांनाच आश्रमात प्रवेश होता. आश्रमाच्या कामाचाच पसारा एवढा वाढला होता की या वृद्धांसाठी काही सोय आश्रमात करणे शक्य नव्हते. तेव्हा त्यांचा प्रश्न कसा सोडवायचा या विचाराचा भुंगा त्यांच्या डोक्याला सतत त्रास देत होता. त्यांची दया येते पण प्रत्यक्षात त्यांच्यासाठी काही करता येत नाही म्हणून दादा अगतिक बनले होते.

अशा परिस्थितीत एक दिवस श्रद्धानंद महिलाश्रमाच्या ऑफिसात काम करताना काही जुने रेकॉर्ड बघत असताना दादांना एक नोंद अशी दिसली की एकदम आर्किमिडीजप्रमाणे आनंदाने बेहोष होऊन 'युरेका, युरेका' (सापडले! सापडले!) असे ओरडावेसेच त्यांना वाटले. त्या नोंदीने त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर सापडल्याचा आनंद झाला. ती नोंद होती १९४१ साली राधाबाई मर्कटी या एका कोळणीने आश्रमाला वसईची तिची जागा दान केल्याबद्दलची.

वसई! मुंबईपासून दूर, शांत, निसर्गरम्य ठिकाण. मग तिथेच का नाही वृद्धांसाठी आश्रम उघडायचा? मुंबईच्या धकाधकीपासून दूर अशा ठिकाणी त्यांना आपली आयुष्याची संध्याकाळ निवांतपणे घालविता येईल. दादा स्वतःच्या कल्पनेवर खूप झाले. लागलीच कामाला लागले. जागा बघून आले. प्लॅन काढून घेतले. कार्यकारिणीपुढे स्कीम सर्व बारीकसारीक तपशीलांसह मांडली, उत्साहाने दादा बोलत होते. पण कार्यकारिणीची मंडळी राजी नाहीत असं बघून दादा हताश झाले. एकतर वसई एवढी दूर. वसईरोड स्टेशनपासून आश्रमाची जागा दूर. बांधकाम कसे करणार? सगळी जबाबदारी कोण घेणार? असे सर्वांचे म्हणणे. दादा म्हणाले, 'एवढंच ना? मी घेईन सगळी जबाबदारी. फक्त तुम्ही स्कीम मंजूर करा.'

स्कीम मंजूर झाली. पण दादांना लवकरच जाणवलं की मामला काही साधा नाही. जागा कागदोपत्री दान केली होती तरी त्या जागेवर मर्कटीबाईंनी राहण्यापुरते बांधकाम करून घेतले होते. आश्रमाशी झालेल्या कराराप्रमाणे ज्या जमिनीचा पट्टा आश्रमाकडून तिने लीजवर घेतला

होता, त्यावर ती भाजीपाला काढत असे. त्यापोटी रु. २५/- ती आश्रमाला देत असे. आता पंचाईत अशी होती की जागा सोडण्यास ती वृद्धा तयार नव्हती आणि कोर्टकचेऱ्या करण्यात दादांना स्वारस्य नव्हते. वृद्धाश्रमाच्या आड एक वृद्धाच येत होती! दादांनी त्या वृद्धेच्या मुलांचा पत्ता मिळवला आपली योजना त्यांना समजावून सांगितली. सुदैवाने मुले समंजस होती. संपन्न होती. त्या जागेचा त्यांना मोह नव्हता. त्यांनी आईची समजूत घातली. दादांच्या कामाची निकड सांगितली. ती राजी झाली. मामलेदार कचेरीत खेटे घालून दादांनी जागा निर्वेध करून घेतली.

प्रश्नचिन्हांचा प्रवास मात्र न संपणारा होता. प्रश्न पैशाचा होता. त्यासाठी झोळी घेऊन फिरण्याची दादांची तयारी होती. पुढचा प्रश्न सिमेंटचा होता. त्या १९६५-६६ च्या दिवसांत सिमेंटवर कंट्रोल होते. कोट्याप्रमाणे २०-२५ गोणी मिळणार! त्याने काम कसे पुरे व्हावे? मग दादांना ए. सी. सी. मध्ये काम करणाऱ्या नटवर्य दाजी भाटवडेकरांची आठवण आली. दादा त्यांना भेटले. हाती घेतलेल्या कामाचे स्वरूप सांगितले. सिमेंटची अडचण सांगितली. मग दाजींनी उपाय सुचविला. सिमेंटचा कंट्रोल शहरांना लागू होता. दादांनी जर सिमेंट ठाणे जिल्ह्याच्या कोट्यातून उचलले तर प्रश्न सुटणार होता. त्या वेळी हायवे नसल्याने ठाणे-वज्रेश्वरी-विरार-वसई असा सिमेंटचा 'प्रवास' करणे भाग होते. मार्ग खर्चाचा होता. पण इलाज नव्हता. पैशाचा प्रश्न देणग्यांच्या द्वारे सोडवायचा होता. ती गोष्ट दादांच्या एव्हाना चांगलीच अंगवळणी पडली होती. कॉन्ट्रॅक्टर छोटालाल हा दादांचा वैयक्तिक स्नेही. श्रद्धानंद महिलाश्रमातील कार्याविषयी व वैयक्तिक दादांच्या कामाविषयी त्याला आस्था होती. त्यापोटी तो वर्षभर न पैसे घेता काम करण्यास तयार झाला. त्याचे पैसे त्यानंतर द्यायचे ठरले. अशा अडचणींची अडथळा शर्यत ओलांडल्यावर कामास दादांनी हात घातला!

२० मार्च १९६६ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मंत्री श्री. भाऊसाहेब वर्तक यांच्या हस्ते पायाभरणी झाली. जवळजवळ सव्वा वर्षाच्या अवधीत प्रशस्त दुमजली बांधकामाचे काम पुरे होऊन १० एप्रिल १९६७ रोजी

वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर संस्थेचे एक संस्थापक व सर्वांत वयोवृद्ध कार्यकारी सदस्य श्री. नयन पंड्या यांच्या हस्ते वास्तुपूजा करण्यात आली. मर्कंटीबाईंनी जागा दान केली होती. त्यांना आमंत्रित करायला दादा स्वत: गेले.

वृद्ध स्त्रियांचा आश्रम. कोणत्या क्षणी कोणत्या गोष्टीची गरज पडेल ते सांगता येत नाही. अशा वेळी शेजारपाजारचे लोक उपयोगी पडतात. हा हेतू मनात ठेवून दादांनी वृद्धाश्रमाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या मुस्लिम दर्गा व ख्रिश्चन चर्च यांच्याशी संबंधित असलेल्या मंडळींनासुद्धा आवर्जून बोलावले.

या वृद्धाश्रमाचे काम सुरू झाल्यापासून म्हणजे साधारणपणे १९६४ पासून त्या आश्रमाची घडी नीट बसेपर्यंत म्हणजे जवळजवळ सात-आठ वर्षे दादा प्रत्येक रविवारी माटुंग्याहून आपले नेहमीचे कार्यक्रम आटोपून पहाटे ५॥ वाजता निघत. वसईरोड स्टेशनला सकाळी मिळेल त्या वाहनाने (बहुतेक वेळी पायी चालत) आश्रमाच्या साईटवर जात असत. उन्हातान्हातून हिंडत. साईटवर जाऊन कामावर देखरेख ठेवीत. वेळापत्रकानुसार सर्व गोष्टी होतात की नाही ह्याची खात्री करीत. केवढे अविश्रांत परिश्रम त्यांनी घेतले असतील ह्याची आज कुणाला सांगितल्याशिवाय कल्पनाच येणार नाही. आपल्या कामावर नितांत श्रद्धा असणाऱ्यांनाच अशी कष्टप्रद कामे जमू शकतात.

### कुर्ला हॉस्टेल

असेच अविरत परिश्रम दादांनी कुर्ल्याचे हॉस्टेल बांधताना घेतले. मुंबईत नोकरी करणाऱ्या तरुण मुलींना, विशेषत: अल्प वेतनावर काम करणाऱ्यांना, मुंबईसारख्या महानगरीत राहणे आर्थिक दृष्ट्या किती कष्टप्रद आहे ह्याची दादांना जाणीव होती. आश्रमातील मुली स्वत:च्या पायावर नोकरी मिळवून उभ्या राहतात ह्याचा दादांना परमावधीचा आनंद होई, पण दुसऱ्याच क्षणी त्यांना खिन्नता येई; कारण अशा मिळवत्या मुलींना नियमाप्रमाणे आश्रम सोडावा लागे. नातेवाईकांचा आधार नसलेल्या अशा मुलींचा निवासस्थानाचा प्रश्न बिकट होता. स्वतंत्रपणे राहणे खिशाला परवडणारे तर नव्हतेच, खेरीज धोकादायकही होते. या मुलींच्या

भवितव्याविषयीच्या विचारमंथनातून हॉस्टेलची कल्पना पुढे आली. ही कल्पना सर्वांना पटवून आश्रमातर्फेच राबवण्याचे ठरले.

दादांची जागा शोधण्यासाठी पायपीट सुरू झाली. विलेपार्ले येथे आश्रमाला देणगीदाखल मिळालेला जमिनीचा एक पट्टा होता पण त्याचा ताबा मिळविण्यासाठी कोर्ट-कचेऱ्या चालू होत्या. शक्यतो मुंबईत मध्यावर जागा असणे आवश्यक होते. असा एका जमिनीचा पट्टा कुर्ल्याच्या पश्चिम बाजूला लालबहादूर शास्त्री मार्गावर उपलब्ध होता. श्री. कोटीभास्कर नावाच्या गृहस्थाचे फोनिक्स केमिकल्सचे गराज-कम-वर्कशॉप तेथे होते. त्याला ती जागा विकायची होती. तिचा भाव होता रु. १२० /- स्क्वेअर यार्ड. आजच्या तुलनेत स्वस्त असली तरी आश्रमाला परवडण्यासारखी नव्हती. दादांनी त्या सद्गृहस्थांना भेटून ही जागा घेण्यामागची कल्पना समजावून सांगितली. हे एक निव्वळ लोकहिताचे– चॅरिटेबल– काम आहे हे पाहून त्यांनी दर कमी केला. या सर्व कामात त्यावेळचे आश्रमातील एक ट्रस्टी कै. जयंतीलाल जगजीवन मुलजी दादांच्या पाठीशी ठाम उभे होते. त्यांनी स्वत: ३ लाख रुपये घातले.

केंद्रीय सरकारच्या समाजकल्याण खात्याबरोबर या कामासाठी दादा सतत संपर्क साधून होते. भारत सरकारने या संबंधात योजना बनविण्यास सांगितल्यावर दादांनी इमारतीच्या आराखड्यासह सर्व तपशीलवार योजना बनवून दिली. या स्कीमच्या संबंधात दादांना एकदम तातडीने दिल्लीला जाण्याची वेळ आली. ज्या सेक्रेटरीने बोलावले होते त्याच्याकडे भेटण्यासाठी आश्रमाच्या अनुमतीने गेले तर तो सेक्रेटरी एका सेमिनारमध्ये गुंतलेला. बाकीच्या मंडळींनी ऑफिसच्या नेहमीच्या खाक्यानुसार आपल्याला काहीच माहीत नसल्याचा आव आणला. दादांचा वेळ महत्त्वाचा होता. तो सेक्रेटरी उशीरा परत आला. ऑफिसातील टायपिस्ट जागेवर सापडेनात. तेव्हा दादांनी स्वत: काही कागदपत्र टाईप केले. काहींच्या नकला काढल्या आणि त्या सेक्रेटरीच्या मागे लागून काम तडीस लावले. पुरे केले. मगच ते मुंबईला परतले. एखादे काम पुरे करायचे म्हणजे अशी तडफ लागते! नाही तर सेंट्रल गव्हर्मेंटच्या ऑफिसात बसून स्वत: टाइपिंग करत बसायची दादांना काय गरज होती?

संस्थेच्या हितासाठी एखादी गोष्ट करणे आवश्यक आहे असे पटल्यावर दादांनी कधी वैयक्तिक मानापमानाचा विचार मनात आणला नाही. या धावपळीमुळेच भारत सरकारच्या गळी दादा आपली स्कीम उतरवू शकले. आणि त्यातून कुर्ल्याच्या हॉस्टेलसाठी चार लाखांची ग्रँट मिळवू शकले.

### विलेपार्ले इस्टेट – तेजपाल हॉल

अशाच स्वरूपाची धडपड दादांना संस्थेला दान मिळालेल्या विलेपार्लेच्या जागेबाबत करावी लागली. श्री. तेजपाल या धनिक सद्‌गृहस्थाने त्याच्या तेजपाल इस्टेटमधून आश्रमाला एक जमिनीचा पट्टा दिला होता. पैशाच्या अभावी या जागेचा संस्थेला काही उपयोग करून घेता येईना म्हणून संस्थेने १९५० पासून २० वर्षांच्या कराराने ती जागा एका गृहस्थास भाडेपट्ट्याने दिली, त्याने नंतर त्याच शर्तीवर ती जागा आणखी एका त्रयस्थाला दिली, संस्थेच्या अनुमतीने. त्या त्रयस्थाने त्या जागेवर अनेक भाडेकरूंना जागा बांधून दिल्या. जवळ जवळ ५७-५८ भाडेकरू तेथे राहू लागले. परिणाम व्हायचा तोच झाला. १९७०-७१ साली मुदत संपल्यावर जागेचा ताबा संस्थेकडे यायला पाहिजे होता तो आला नाही. वास्तविक वृद्धाश्रम बांधण्यासाठी या जागेचा उपयोग झाला असता. पण सलोख्याने बोलणी करून काहीच यश मिळेना. दादा आणि त्यांचे आश्रमातील इतर पदाधिकारी अनेक संबंधितांना भेटले. फलनिष्पत्ती काहीच नाही, शांततेच्या मार्गाने काहीच होत नाही ह्याची खातरजमा झाल्यावर त्या जागेचा कबजा मिळावा म्हणून आश्रमातर्फे कोर्टात फिर्याद गुदरण्यात आली.

अशा प्रकारच्या दाव्यांचा निकाल केव्हा लागेल ते एका परमेश्वरालाच माहीत! दादांनी आश्रमातर्फे कोर्टात अनेक खेटे घातले, वकिलांकडे हेलपाटे मारले; पण वेळ बरबाद होण्यापलीकडे काहीच होईना. जागा ताब्यात येईना आणि कोर्टाचा निर्णय केव्हा येतो ते उमजेना अशा कात्रीत दादा सापडले! अखेर कार्यकारिणीच्या विचाराने आणि संबंधित श्री. आर. एल. तेजपाल यांच्या पूर्वसंमतीने ती जागा 'जशी होती तशाच स्थितीत म्हणजे भाडेकरूंसह'

मध्यस्थातर्फे एका बिल्डरचे कोटेशन मान्य करून ७,२५,००० /- रुपयांना हस्तांतरित केली. १९७६ पासून १९८२ पर्यंत कोर्टकचेऱ्या करून अखेर एवढा तरी संस्थेचा फायदा करून देता आला म्हणून दादांना मानसिक समाधान लाभले. नंतर मग आणखी देणग्या मिळवून आश्रमात वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांकरिता सर्व सोयींनी युक्त असा सुमारे ३०० लोकांना बसता येईल असा तेजपाल हॉल दादांनी १९८७-८९ मध्ये बांधून घेतला. १९७६ पासून सुरू असलेल्या या दाव्याची अथपासून माहिती दादांखेरीज कोणालाच नसल्याने कोर्टात तारखा लागल्या की अजूनही दादाच जातात. मग भले ते पदाधिकारी असोत वा नसोत!

दादांच्या तीन तपांच्या आश्रमातील वास्तव्याच्या काळात त्यांनी आश्रमासाठी काय काय केले हे सांगणे महाकठीण, त्यापेक्षा काय नाही केले हे सांगणे सोपे होईल! संपूर्ण आश्रमाचा फेरफटका केला आणि कोणाही एखाद्या वयस्क महिलेला विचारले तर किल्ली द्यावी तशी दादांच्या कामांची यादी ती घडाघडा पाठ म्हणून दाखवेल. आफ्टर केअर सेक्शन, बालक मंदिर, प्रायमरी स्कूल, खास शुश्रूषागृह, व्होकेशनल क्लासेस, नर्सरी स्कूल असे काय काय म्हणून सांगावे!

वसईचा वृद्धाश्रम, कुर्ला हॉस्टेल ह्यांकरिता दादांनी जेवढे शारीरिक परिश्रम घेतले त्याच्या हजारपटीने अधिक परिश्रम आणि विशेषत: मानसिक परिश्रम दादांनी 'दत्तक-प्रथे' बाबत घेतले. ज्या काळात कायदेशीरपणे दत्तक-प्रथा समाजाने स्वीकारलेली नव्हती त्या काळी अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांचा त्यांनी फार सूक्ष्मतेने अभ्यास केला. इतका की १९५६ च्या 'हिंदू ॲडॉप्शन्स ॲंड मेंटेनन्स ॲक्ट' या कायद्यात त्यांनी सुचविलेली सूचना तत्कालीन कायदेमंत्री श्री. हरिभाऊ पाटसकर यांना पटल्यामुळे १९५९ मध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती मान्य होऊन १९६२ च्या कायद्यात ती अंतर्भूत करण्यात आली. कोणतीही डिग्री-डिप्लोमा नसूनही या विषयात दादा दिग्गज मानले जातात ही वस्तुस्थिती आहे.

★ ★ ★

## १४.

### देणग्या – आर्थिक पाया

नेपोलियन म्हणत असे की सैन्ये पोटावर चालतात! गर्भितार्थ असा की युद्ध करताना जिवाची कुर्बानी करणाऱ्या सैनिकाचे पोट, खाऊन-पिऊन तृप्त असले पाहिजे तरच अंगी बळ येईल; लढाईसाठी त्याचे बाहू मजबूत होतील. निराधारांचे प्रेम कोणाला वाटेल, अर्भकांना मायेची ऊब द्यावीशी वाटेल; पण हे केव्हा शक्य आहे? अंतःकरणात जी माया आहे तशीच माया खिशात पण असायला हवी! आश्रम चालवायचा तर हाताशी पैसा असणे अत्यावश्यक आहे; किमान गरजांसाठी तरी.

दादा १९५९ पासून आश्रमाच्या कार्यात सक्रिय भाग घेऊ लागले; त्या वेळी आश्रमाच्या सेवकवर्गाचा सर्व मिळून मासिक पगार दोन हजाराच्या घरात होता. पण तेवढेसुद्धा वेळच्या वेळी उभे करणे कठिण जात असे. एकदोघांच्या देणग्या मिळावायच्या; मग पाच-सहा लोकांचे पगार भागवायचे; पुन्हा देणग्या मिळवायच्या की मग इतरांचे मासिक वेतन असा प्रकार चाले. पैसे मिळविण्यासाठी अनेक गोष्टी केल्या जात. आश्रमाच्या प्रशस्त पटांगणात जाई-जुई, जास्वंद, चमेली, तगर अशी फुलझाडे जोपासण्यात येत. त्या फुलांचे हार बनवून आश्रमाच्या मुली घरोघर विकावयास नेत. जैन लोकांत पर्युषण पर्वाचे मोठे माहात्म्य आहे. आश्रमाच्या

शेजारी जैन-मंदिर आहे. पर्युषण काळात आश्रमाच्या मुली आलटून पालटून पेट्या घेऊन देवळात उभ्या राहत. पेटीत पैसे गोळा होत. नवरात्राच्या दिवसांत अशाच प्रकारे हाजीअलीजवळच्या महालक्ष्मी मंदिरात पेट्या घेऊन मुली उभ्या राहात. दसऱ्यापासून दिवाळीपर्यंत आश्रमाच्या मुली घरोघरी हिंडून पैसे गोळा करीत. पण अशा उपायांनी धनसंचय असा कितीसा होणार?

दादांनी आपल्या आश्रमातील सहकाऱ्यांच्या साहाय्याने लोकसंपर्क सतत वाढविण्यास सुरुवात केली. मोठमोठे धनिक, व्यापारी, उद्योजक यांना आग्रहाने आश्रमातील कार्यक्रमांच्या निमित्ताने आमंत्रित करण्यास सुरुवात केली. संस्था, तिचे कामकाज आणि आश्रमाचा उदात्त हेतू बघून कोणीही प्रभावित होई, देणगी देऊन जाई.

मुंबई महानगरपालिका ग्रँटच्या स्वरूपात पूर्वी सात हजार रुपये देत असे. दादा सेक्रेटरी झाले तेव्हा ही रक्कम रु. दहा हजार होती. महापौर बदलून नवीन व्यक्ती त्या पदावर विराजमान झाली की दादा तिला आग्रहाने तिच्या सोईने आश्रम दाखविण्यास घेऊन येत. त्या दिवशी ते (नोकरीत असताना) मुद्दाम रजा घेत. आश्रमाचे सर्व विभाग स्वत: हिंडून दाखवत. कुतूहलाने विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर, पूर्ण माहिती देत. नवीन उपक्रमांच्या योजना सांगत. मेयर खूष होऊन चांगले शेरे देत. ग्रँट वाढवून देण्याचे आश्वासन देत. मग कामाच्या गर्दीत त्यांना विस्मरण होई. दादा महापालिकेच्या ऑफिसात वारंवार खेटे मारत असत. आश्वासनाची पूर्तता करून घेत असत. परिणामी १० चे २० हजार, ४० हजार, ८० हजार, ९९ हजार व अखेरीस एक लाखापर्यंत ग्रँट वाढली. लाखाची गोष्ट इथेच संपली! कारण याहून अधिक ग्रँट कॉर्पोरेशनच्या नियमात बसत नाही.

रिमांड मुले, कोर्ट-कमिटेड मुली, निराधार मुली अशांकरिता सरकारच्या समाजकल्याण विभागातर्फे प्रथम रु. १८ ते २० मिळत. ते वाढत वाढत आता दरडोई रु. १२५ मिळतात.

वैयक्तिक स्वरूपांच्या देणग्यांसाठी दादांनी आपली झोळी सर्वत्र

फिरविली! चांगल्या कामासाठी पैसा कमी पडत नाही. समाजाची धारणा चांगली आहे, फक्त चिकाटीने त्याच्या मागे लागावे लागते. आपणहून खिशातून पैसा काढून देणारे थोडे; पण नसतात असे मात्र नाही. त्याचाही सुखद अनुभव दादांना अनेकदा आला. अनेकदा दूर दूर ठिकाणी जावे लागले.

एका प्रसंगी मंगलोर-काननगडच्या परिसरातील 'आनंदाश्रम' या आध्यात्मिक स्वरूपाच्या आश्रमात जाण्याचा योग आला. तेथे निवास करणाऱ्या संतप्रवृत्तीच्या मातार्जींच्या आग्रहाने दादांना जाणे भाग पडले. दादा लीलाताईंना घेऊन गेले. मातार्जींनी श्रद्धानंद महिलाश्रमातील दादांच्या कार्याची महती ऐकली होती. त्यांच्याच माहितीच्या दोन-तीन मुली आश्रमात होत्या. त्या आश्रमातून सुटीच्या दिवसांत काननगडास जात तेव्हा माताजी त्यांच्या तोंडून सारखे दादांचे नाव ऐकत. त्यांची शिस्त, आश्रमासाठी अहोरात्र ते घेत असलेले कष्ट वगैरे सर्व ऐकून माताजींनी आपल्या सेक्रेटरीमार्फत दादांना दोन-तीनदा बोलावले होते. पण दादांना आपल्या कामातून कुठली सवड व्हायला? माताजी वृद्ध, आजारी असल्याने मुंबईला येऊ शकत नव्हत्या. अखेरीस त्या फार आजारी झाल्याचे कळल्यावर दादा तिकडे गेले. आनंदाश्रमाच्या निसर्गरम्य परिसरात राहिले. मातार्जींशी चर्चा झाल्या. त्यांच्या तेथील कामाची माहिती दादांनी करून घेतली. मातार्जींनी विचारल्यावरून स्वत:ची आणि आश्रमाच्या कामाची सविस्तर माहिती सांगितली. त्यांचा निरोप घेऊन परतले. स्टेशनवर माताजींचा सेक्रेटरी दादांना सोडण्यास आला होता. प्रथेप्रमाणे त्याने माताजींनी दिलेले प्रसादाचे पाकीट दादांकडे दिले. दादा प्रवासात ते उघडून पाहतात तर त्यात श्रद्धानंद महिलाश्रमासाठी रु. ५०,००० चा चेक होता. दादा भारावून गेले.

अशा अनेक कथा आहेत. यामुळे आश्रमाची आर्थिक स्थिती एवढी भरभक्कम झाली की देणगीदारांचे फलक आता पूर्ण भरून गेले आहेत! आता आश्रम आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. सर्व देणग्यांवर व्याज मिळतेच; शिवाय कुर्ल्याच्या लेडिज

हॉस्टेलच्या जागेतील तळमजल्यावर स्टेट बँकेला जी जागा दिली आहे त्यामधून दरमहा रु. २५,०००/- भाड्यापोटी मिळतात. खरं म्हणजे ही हॉस्टेलची इमारत बांधून झाल्यावर अनेकांचे मत तळमजल्यावरील जागेत डिपार्टमेंटल स्टोअर करावे किंवा दुकानांना गाळे भाड्याने द्यावेत असे होते. ह्या योजनेप्रमाणे आश्रमाला आर्थिक लाभ नक्कीच झाला असता. पण हॉस्टेल तरुण मुलींसाठी होते. दुकानांच्या वर्दळीचा त्यांना उपद्रव झाला असता. त्यापेक्षा बँक बरी. ठरावीक वेळेपुरतेच काम. दिवसा बँक चालू तेव्हा हॉस्टेलच्या मुली नोकरीवर गेलेल्या, आल्यावर बँकेची अजिबात वर्दळ नाही, उलट बँकेचाच गुरखा अहोरात्र पहाऱ्यावर म्हणजे अधिक सुरक्षितता. हा सर्व विचार करून दादांनी बँकेलाच जागा दिली.

## सांस्कृतिक जडणघडण

दयाबुद्धी, माणुसकीची भावना, निराधारांना आसरा, अशा व्यावहारिक दृष्टिकोणातून आश्रम आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवून आश्रमवासीयांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था झाली. पण नुसत्या खाण्यापिण्याचा आणि राहण्याचा प्रश्न सुटला की संपले का? वास्तविक आश्रम म्हणजे तीन-चारशे जणींची एक छोटीशी वसाहत. 'माणूस नावाचे बेट.' या भवसागरात देहरूपाने ते तगले असते. पण दादांनी आश्रम म्हणजे एक सांस्कृतिक केंद्र बनविण्याचा सतत प्रयत्न केला. तीन-चार जणांच्या कुटुंबात जो एकोपा-जिव्हाळा असतो तसाच 'भाव' जतन करण्याचा प्रयत्न दादांनी जाणीवपूर्वक केला. प्रत्येकीला 'माणूस' म्हणून स्वतःची स्वतःला ओळख करून दिली. दादांचे वैशिष्ट्य असे की आश्रमाचे सारे वातावरण एक मोठे एकत्रित कुटुंब या पद्धतीने संस्कारित केले आहे.

लग्न झालेल्या मुलीला माहेर असते. लग्नानंतर माहेरी सणसमारंभ होतात. पहिले बाळंतपण कौतुकाने माहेरघरी होते. नेमकी हीच परंपरा आश्रमाने जतन केली आहे. आश्रमातून विवाह होऊन सासुरवाशीण झालेल्या आश्रमवासी कन्या मंगळागौर, संक्रांत सणांसाठी

हक्काने माहेरी आश्रमात येतात. विवाहानंतर इतरत्र जाण्याची सोय नसेल तर पंधरा दिवस माहेर म्हणून राहण्यास येतात. पहिले बाळंतपण या माहेरी होते. अर्थात हे सारे काही आश्रम स्वखर्चाने करतो. नाही तर माहेर कशाला म्हणायचे?

विवाहित आश्रमकन्या मुंबईत वा नजीकच्या परिसरात राहत असेल तर तिला गणपती उत्सव, बक्षीस समारंभ, वर्धापन दिन, स्वामी श्रद्धानंदांची पुण्यतिथी इत्यादी कार्यक्रमांना आवर्जून बोलावण्यात येते. या सर्व कारणांमुळे आश्रमवासिनी एकत्र येतात. खेळ, गप्पागोष्टी रंगतात. आपली सुखदुःखे एकमेकींना सांगतात. गंमती-जमती सांगून एकमेकींना हसवतात. त्यामुळे परस्पर-सामंजस्य वाढते. जिव्हाळा वाढतो. विवाहित वा नोकरीनिमित्ताने आश्रमाबाहेर पडलेल्या स्त्रियांना आश्रमात राहत असलेल्या आपल्या भगिनींसाठी काहीतरी करावेसे वाटते! नेमकी हीच भावना सर्वांच्या मनी जतन व्हावी हेच दादांचे ईप्सित असते.

वर उल्लेखिलेल्या कार्यक्रमांखेरीज गुढीपाडवा, दीपावली (भाऊबीज), दसरा, होळी, काकड-आरती, अन्नकोट इत्यादी सर्व सणही उत्साहाने साजरे केले जातात. आश्रमकन्यांचे विवाह धार्मिक विधी, होमहवन वगैरेंसह यथासांग करण्याकडे दादांचा कल असतो.

दादांच्या कारकीर्दीत मुलं कायदेशीरपणे दत्तक देण्यात येऊ लागली. आश्रमात असलेल्या प्रार्थनामंदिरात दत्तक घेणाऱ्या मातापित्यांना स्नान करून पाटावर बसवतात. काही जुजबी धार्मिक विधी करूनच मूल त्यांच्या ओटीत घातले जाते. असे समारंभ धार्मिक रीत्या करण्यामागे दादांचा मुख्य उद्देश संस्कार हाच असतो. खेरीज आश्रमकन्येशी विवाह करणारा तरुण वा दत्तक घेणारे आई-वडील ह्यांच्या मनावर चार लोकांच्या साक्षीने झालेल्या समारंभाचा थोडा का होईना, मानसिक दबाव राहतोच. त्यामुळे दत्तक घेतलेले मूल वा पदरात घेतलेली आश्रमकन्या ह्यांच्या बाबतीत काही वावगे करून चालणार नाही, अशा प्रकारचे एक नैतिक बंधन संबंधित व्यक्तींवर राहते हे महत्त्वाचे!

आश्रमकन्यांची सर्वांगीण वाढ व्हावी यासाठी दादा सदोदित प्रयत्नशील राहात. एकामागोमाग एक असे अनेक उपक्रम सुरू करताना आश्रमाच्या वास्तूची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. तिन्ही बाजूंनी मजल्यावर मजले वाढले. मधले पटांगण दादांनी आर्वजून मोकळे ठेवले. संध्याकाळच्या वेळात सर्वांनी खेळावे हा मुख्य हेतू. योगासने, दोरीचा मल्लखांब, कबड्डी, लेझीम इत्यादी खेळ मुली खेळतात. आश्रमात मुद्दाम खेळांच्या विविध स्पर्धा भरविल्या जातात आणि त्यांना प्रोत्साहन दिले जाते. शाळा-कॉलेजांतील स्पर्धांमधूनही भाग घेण्यासाठी त्यांना उत्तेजन दिले जाते.

आश्रमात शिवणकाम, भरतकाम यांबरोबर संगीतासाठी शिक्षक नेमलेले आहेत. आश्रमाचा वर्धापन दिन, गणेशोत्सव, संक्रांत अशा प्रसंगी मुद्दाम कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. मान्यवर पाहुणे बोलावण्यात येऊन त्यांच्यापुढे आश्रमकन्यांचे ' विविध गुणदर्शन ' सादर केले जाते. विविध धार्मिक सणांबरोबरच पंधरा ऑगस्ट व सव्वीस जानेवारीचे समारंभही राष्ट्रीय सण म्हणून साजरे केले जातात. आश्रमवासीयांसाठी ( वसईच्यासुद्धा ) करमणूक म्हणून बाहेरचे ख्यातनाम गायक-वादक, भजनी मंडळे, नकलाकार, जादूचे प्रयोग असे कार्यक्रम सादर केले जातात. सारांश, एखाद्या सर्वसामान्य कुटुंबातून एखाद्या मुलीची जशी शारीरिक, मानसिक, सांस्कृतिक जडण-घडण होते, तशीच आश्रमकन्येची व्हावी अशी दादांची इच्छा असते. आणि त्यासाठी आटोकाट प्रयत्न चालू असतो.

१९५९ मध्ये दादांनी कार्यवाहपदाचा स्वीकार केल्यापासून माटुंग्याचा महिलाश्रम, वसईचा वृद्धाश्रम आणि कुर्ल्याचे वसतिगृह ही जणू आपली तीन अपत्येच मानली. मृणाल, मंगला आणि मकरंद ह्या त्यांच्या मुलांसारखेच या तिन्ही अपत्यांचे पित्याच्या ममतेने आणि दक्षतेने त्यांनी संगोपन केले. पहाटे ३॥ वाजता उठून स्नान, पूजा-अर्चा, जप-तप वगैरे आवरून दादा ( नोकरीच्या ) काळात बरोबर सकाळी सातच्या ठोक्याला आश्रमात हजर होत ते नऊ वाजेपर्यंत काम करीत. नंतर घरी जाऊन कपडे बदलून

ऑफिसची कागद-पत्रे, बॅग घेऊन ऑफिसला फोर्ट भागात जात. संध्याकाळी परस्पर ऑफिसातून आश्रमात जात. पुन्हा दोन तास काम. सकाळी फाईल्स बघणे, नवीन केसेस् आलेल्या असल्यास त्यांची नोंद करणे, आलेल्या कामकाजविषयक पत्रांची उत्तरे सांगणे, संध्याकाळी त्यांवर सह्या करणे, आलेल्या लोकांच्या भेटी, त्यांची कामे ऐकून त्यांना योग्य ते मार्गदर्शन अशा विविध कामांत त्यांना वेळच अपुरा पडे.

आश्रमाची कामे फार साचली असे दिसले की हा गृहस्थ नैमित्तिक रजा घेऊन कामांचा निचरा करीत असे. कोणी महनीय पाहुणे आश्रमात यायचे आहेत वा आश्रमाच्या कामासाठी कोणाला मंत्रालयात वा अन्यत्र भेटायला जायचे असल्यास ऑफिसात रजा टाकून दादा जात असत. ऑफिसातून मिळणाऱ्या लीव्ह-टूरसारख्या सवलतींचा फायदा घेऊन मौजमजेसाठी साईट सीईंगला कुटुंबियांना घेऊन जाणे त्यांना कधी जमलेच नाही! त्यांच्या बहुतेक रजा आश्रमाच्या कामासाठीच खर्ची पडत. परदेशातील आश्रमातील दत्तक बालकांच्या संदर्भात आणि तदनुषंगाने इतर चर्चासत्रांच्या निमित्ताने नोकरीच्या कालखंडात दादांना परदेशी जाण्याची संधी १९७३ साली मिळाली. तेव्हा ४५ दिवसांची रजा घेऊनच ते गेले.

७ सप्टेंबर १९९१ रोजी दादांनी आश्रमाचा (वयाची ७५ वर्षे पार केल्यावर) आणि आश्रमाच्या कामाचा अधिकृतपणे निरोप घेतला. आश्रमात सतत २५ वर्षे या ना त्या पदावर कामे केल्यावर १९८४ मध्ये दादांनी 'स्वेच्छापूर्वक' (हा शब्द महत्त्वाचा आहे!) आश्रमातील कार्यापासून बाजूला होण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. वयोमानपरत्वे बाजूला. नवीन नवीन माणसांना संधी मिळावी हा उद्देश. हा प्रयत्न अयशस्वी म्हणण्याचे कारण एवढेच की, त्यांच्यावर विलक्षण प्रेम-माया असणाऱ्या त्यांच्या सुहृदांनी त्यांना तसे करू दिले नाही आणि पुढील सात वर्षे या ना त्या पदांवर दादा आश्रमाशी संबंधित राहिले.

★ ★ ★

## १५.

आश्रमाच्या भरभराटीत सर्वांचाच सहभाग होता हे खरं असलं तरी सिंहाचा वाटा दादांचा होता ही वस्तुस्थिती आहे आणि त्यांचे काम जवळून पाहिलेल्यांना व डोळसपणे बघणाऱ्यांना ती अमान्य न व्हावी! तीन तपांच्या कालखंडात दादांनी आश्रमाचे अक्षरश: प्रचंड वटवृक्षात रूपांतर केले. आश्रमाची आर्थिक स्थिती भक्कम केली. इतकी की नुसत्या येणाऱ्या व्याजावर आणि कुर्ला हॉस्टेलच्या भाड्यावर आश्रमाचा दैनंदिन कारभार सुरळीत चालावा; देणगी मिळाली नाही तरी! आश्रमाला अनेक माणसं, हितचिंतक जोडून दिले. हितचिंतकांत अगदी आश्रमाला दूध पुरविणाऱ्यापासून ते वाणीसामान विकणाऱ्या वाण्यांचाही समावेश होता.

दूधवाले सणासुदीला आश्रमासाठी श्रीखंड पाठवून देतात. कोणी गोडाधोडाचे जेवण पाठवितात. श्रावणात दर शुक्रवारी गरमागरम चणे पाठवितात. आंब्याच्या मोसमात हितचिंतकांकडून इतके आंबे येतात की दादा अभिमानाने सांगतात की, 'तुम्ही घरी आंबे काय खाल? त्यापेक्षा जास्ती आंबे आश्रमातील 'माझ्या' मुली खातात! दिवाळीत इतके फटाके देणगीदाखल येतात की त्यांचा आवाज-रोषणाई बघून एखाद्या बिगर माहीतगाराला वाटावे की कोणा जहागीरदाराचेच हे घर आहे! माटुंगा, कुर्ला व वसईच्या आश्रमांतील दारे-खिडक्यांचे झुळझुळीत पडदे बघितल्यावर लक्षात येते की हे सगळे परदेशी बनावटीचं दिसतंय. ही सारी दादांच्या परदेशवारीची देणगी.

कापड दुकानदार, कारखानदार एवढे प्रभावित होतात की त्यामुळे आश्रमकन्यांना नव्या-कोऱ्या साड्या सणासुदीला वा अन्य कार्यक्रमांना नेसायला मिळतात.

याचा अर्थ असा नाही, की दादांचे आश्रमातील जीवन सुखाचे होते, आलबेल होते. तसे मुळीच नाही! अनेक प्रकारच्या कटकटींना दादांना सतत तोंड द्यावे लागले. देणगीदार चमत्कारिक अटी घालत. आश्रमासाठी म्हणून काम करायला आलेली मंडळी गैरवर्तन करत. पैशाचे व्यवहार संशयास्पद असत. आश्रमात आश्रय दिलेल्या मुलींचे पालक शिव्याशाप घालत. नवऱ्याच्या जाचाला कंटाळून, बाप पैशाच्या लोभाने विक्रय करायला निघाला म्हणून अनेक मुली घरातून पळून आश्रमात आल्या की मग ही मंडळी दादांना 'तुम्ही या मुलींना फूस लावून आणलंत; याचा बदला घेऊ, सूड घेऊ' अशा धमक्या द्यायची. एक-दोन प्रसंगी तर दादांच्या जिवावरच बेतले होते. अशा प्रसंगी दादा स्वत: स्थिरचित्त राहिले तरी सौ. लीलाताईंच्या आणि मुलांच्या मनाची किती उलघाल होत असेल ह्याची कल्पनाच करवत नाही.

ज्या मुलींची मायेने देखभाल करायची त्यांनीच क्षणिक मोहाला बळी पडून कुकर्मात पडावे, फूस लावणाऱ्या परक्या माणसाचा हात धरून पळून जावे अशा घटना आश्रमात घडल्या आहेत. पतितांचा उद्धार करावा, त्यांनी स्वावलंबी बनून ताठ मानेने जगात जगण्यास शिकावे हा मनातील हेतू. अशा दुर्दैवी घटनांनी दादांच्या मनाला केवढे क्लेश होत असतील! पण त्याहून अधिक विषण्णता काही पालक दत्तक घेतलेली मुलं सारखी आजारी पडतात म्हणून आश्रमात परत करावयास येतात तेव्हा येते.

गोजिरवाणी मुलं परत करू पाहणाऱ्या पालकांची कठोर शब्दांत निर्भर्त्सना करावी, कानउघाडणी करावी, का त्यांची कीव करावी तेच दादांना समजत नाही. दादांना यापेक्षा अधिक वाईट वाटतं ते प्रतिष्ठित म्हणून समाजात मिरवणाऱ्या आणि आपल्या विवाहबाह्य भानगडीतून जन्माला आलेल्या मुलांना निराधार म्हणून आश्रमात टाकून देणाऱ्या मंडळींचे!

आश्रमात एकदा कुठलासा कार्यक्रम होता. सगळ्यांची इच्छा एका सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्याला प्रमुख पाहुणा म्हणून बोलवावं अशी होती. दादांनी मूक संमती दिली. सर्वजण उत्साहाने त्या अभिनेत्याला (खरं म्हणजे दांभिक सोंग चित्रपटांतून सजविणाऱ्या नटाला) आमंत्रण देण्यासाठी गेले. त्या नटाने नम्रतेने नकार दिला. सर्वजण हिरमुसले. दादा मनोमन म्हणाले असतील, 'बाबांनो कसं सांगू तुम्हाला? तो नट कसा येईल? त्याच्या पापातून जन्माला आलेली दोन मुलं बेवारशाचे जिणे जगतायत्!' समाजातील अशा प्रकारचे अनेक ढोंगी दादांना वैयक्तिकपणे माहीत आहेत पण नियमांनुसार पाळावी लागणारी गुप्तता आणि नैतिकतेचे बंधन म्हणून दादांना तोंड शिवून गप्प बसावे लागते! त्यांनी आत्मचरित्र लिहावे म्हणून कितीतरी मोठमोठी मंडळी दादांना आग्रह करतात. जाहीर समारंभातून आग्रह करतात. पण दादा हसण्यावारी सोडून देतात. कारण खोटं बोलायची सवय नाही आणि खरं सांगायची सोय नाही!

एका प्रसंगात मात्र दादांना निष्कारण निंदानालस्ती सहन करावी लागली. ती म्हणजे प्रख्यात अभिनेत्री कै. शांता हुबळीकर यांच्याबाबत घडलेली घटना! या बाबतीत थोडीशी पूर्वपीठिका सांगणे आवश्यक आहे.

माणसं घडविणाऱ्या दादांना 'माणूस' सिनेमाने कीर्तीच्या शिखरावर पोचलेल्या शांता हुबळीकरांनी मात्र माणुसकीची वागणूक दिली नाही हे दुर्दैव. या शांताबाई सिनेमात अनेक बरेवाईट अनुभव घेऊन, नवरा, मुलं, नातेवाईकांनी दूर लोटल्यावर आश्रमात आश्रयासाठी येऊन राहिल्या. वयाच्या ६१ व्या वर्षी नवऱ्याने टाकलेली स्त्री म्हणून, तिच्या विवाहित मुलाने घरातून घालविल्यामुळे निराधार म्हणून, आश्रमात प्रवेश घेत्या झाल्या. कुणी त्यांना ओळखले नाही. एक तर दादांचा आणि सिनेमाचा संबंधच नव्हता.

शातांबाईंनी आपले नाव शांताबाई गिते असे सांगितले होते. दादांनी रीतसर फॉर्म वगैरे भरून झाल्यावर त्यांना वसईच्या वृद्धाश्रमात

प्रवेश दिला. सुमारे १३-१४ वर्षांच्या वास्तव्यानंतर शांताबाईंनी वृत्तपत्रांतून 'पूर्वीचे कलाकार आर्थिक विपन्नावस्थेमुळे निराधार असतील तर सरकार त्यांना आर्थिक मदत करणार असल्याचं' वृत्त वाचलं. तेव्हा शांताबाईंनी दादांना या योजनेचा लाभ मला घेता येईल का, असे विचारले. हे कसं शक्य आहे? असे दादांनी विचारल्यावर त्यांनी आपण शांताबाई गिते म्हणजेच जुन्या जमान्यात 'शांता हुबळीकर' या नावाने गाजलेल्या सिने-अभिनेत्री असल्याचे रहस्य प्रथमच प्रकट केले.

दादांसकट सर्व आश्रमवासीयांना, पदाधिकाऱ्यांना तेव्हा आश्चर्याचा धक्काच बसला! दादांनी सर्व माहिती मागवली. माटुंग्याच्या आश्रमात सरकारी सेवकांना बोलावून घेतले. शांताबाईंचे जुने फोटो, वर्तमानपत्रांतील कात्रणे वगैरे गोळा करून त्यांचे फॉर्म्स भरून दिले. याच सुमारास लोकसत्तेच्या 'चौफेर' सदरातून शांताबाई वृद्धाश्रमात राहात असल्याची माहिती आली. मग काय? जागोजागी सत्कार, थैल्या मिळू लागल्या. सरकारी मदत मिळाली. एवढ्या मोठ्या नटीवर वृद्धाश्रमात जीवन कंठण्याची वेळ आली म्हणून साहजिकच सर्वांच्या सहानुभूतीला उधाण आलं. 'असतील शितं तर जमतील भुतं' या उक्तीप्रमाणे सर्व स्तुतिपाठक भोवताली जमू लागले.

बाई तशा निराधार राहिल्या नाहीत. त्यांनी आश्रम सोडून मुलाजवळ राहण्याचे ठरविले. दादांनी व इतरांनी आश्रम सोडून जाण्यातील धोका सांगितला. पण आता काही ऐकण्याच्या मन:स्थितीत त्या नव्हत्या. नियमानुसार पुन्हा आश्रमात प्रवेश मिळणार नाही हे पण समजावून सांगितलं गेलं. पण व्यर्थ. अखेर कायमचे सांभाळण्याच्या लेखी शर्तीवर, त्यांचे सर्व व्यक्तिगत सामानसुमान घेऊन, त्यांचा मुलगा त्यांना घेऊन गेला. याच नशेत 'माणूस' मधील 'कशाला उद्याची बात' या गाजलेल्या गाण्याच्याच शीर्षकाखाली त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. शब्दांकन दुसऱ्या लेखिकेने केले होते. दुर्दैवाने या आत्मचरित्रात श्रद्धानंद महिलाश्रमाविषयी, तेथील एकूण

व्यवस्थेबद्दल, जेवायला मिळणाऱ्या कदान्नाबद्दल, दादांवर वैयक्तिकपणे आणि आश्रमातील इतर पदाधिकाऱ्यांबद्दल बरेच टीकात्मक लिहिण्यात आले. (पृष्ठ क्रमांक १०८, १०९, ११०, १२२)

हे असं का झाले? ह्याचे मुख्य कारण म्हणजे समजूतदारपणाचा बाईंच्या ठिकाणी असलेला अभाव! धोक्याचा इशारा दिलेला असतानाही त्या आश्रम सोडून ज्या मुलाकडे गेल्या होत्या त्याने दोन-तीन महिन्यांतच त्यांना हाकलले. पुन्हा त्यांनी श्रद्धानंद महिलाश्रमात प्रवेश मागितला. नियमाप्रमाणे स्वखुशीने लेखी पत्राने आश्रम (पुन्हा न प्रवेश मागण्याच्या अटींसह) सोडलेला असल्याने, व्यवस्थापनाने अर्थातच प्रवेश नाकारला! ही रागाची भावना कडवट टीकेच्या पाठीमागे होती. मुंबईत इतर दोन-तीन ठिकाणी प्रवेश मिळविण्याचा बाईंनी प्रयत्न केला, पण तो व्यर्थ ठरला. पुढे पर्वतीपायथा पुणे येथे पुणे महिला मंडळाने चालवलेल्या वृद्धाश्रमात पूर्ण पैसे भरून प्रवेश दिला गेला.

पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यातील श्रद्धानंद महिलाश्रमावर व दादांवर वैयक्तिकपणे झालेल्या टीकेमुळे सर्वजण प्रक्षुब्ध झाले. आश्रमाच्या वकिलामार्फत श्रीमती शांताबाई, प्रकाशक व इतर संबंधितांना कायदेशीर नोटिसा पाठवण्यात आल्या! व्यक्ती आणि संस्था या दोन्हीतर्फे जबर नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली! मग मात्र शांताबाई गडबडल्या. आश्रमाच्या वकीलांबरोबर, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत प्रकाशकांनी चर्चा केली. शांताबाईंनी ६ नोव्हेंबर १९९० च्या हस्ताक्षरित पत्रानुसार बिनशर्त माफी मागितली! 'श्रद्धानंद आश्रम' ही १४ वर्षे माझी माता आहे व अनंतकाळचे आदरणीय ठिकाण' अशी भलावण त्या पत्रात केली आहे. उद्वेगाच्या भरात आपण काहीतरी बोलून गेलो व तसे शब्दांकन केले गेले याची स्पष्ट कबुली त्या पत्रात आहे. आश्रमासंबंधीचा आक्षेपार्ह मजूकर पुढील आवृत्तीतून प्रकाशकांनी व आश्रमाच्या वकिलांनी परस्पर ठरवून काढून टाकावा असे अधिकार शांताबाईंनी उभयतांना दिले.

वास्तविक ज्या ठिकाणी शांताबाई १३-१४ वर्षे शांतपणे निराधार

म्हणून राहिल्या त्या संस्थेबाबत, तेथील सेवकवर्गाबद्दल, आश्रमातील जेवण्याखाण्याबाबत त्यांनी टीका करायला नको होती. आश्रम जर त्यांच्या दृष्टीने एवढा वाईट होता तर पुन्हा मुलाने घालवून दिल्यानंतर त्याच आश्रमात पुन्हा प्रवेश मागण्याचे काहीच कारण नव्हते. पुन:पुन्हा स्वत: पत्राने व मध्यस्थातर्फे तीनतीनदा आश्रमाचे उंबरठे झिजवण्याचे काहीच कारण नव्हते. जो मजकूर लिहिला गेला त्याची छाननी करण्याचे कष्ट इतर संबंधितांनी घ्यायला हवे होते. दादांवर व आश्रमावर मात्र निष्कारण चिखलफेक झाली.

शांता हुबळीकर प्रख्यात अभिनेत्री. भोवती प्रसिद्धीचे वलय. त्यातून वृद्धाश्रमात १३-१४ वर्षे काढलेली वृद्धा. दादा साधे समाजसेवक. विनावेतन काम करणारे. त्यांची किंमत कोणाला? त्यामुळे ज्यांना कोणतीच पार्श्वभूमी माहीत नाही अशा लोकांची सहानुभूती स्वाभाविकपणेच शांताबाईंकडेच झुकणार. वास्तविक सिनेसृष्टीत एवढा पैसा मिळवूनही नवऱ्याने, मुलाने, इतर नातेवाईकांनी त्यांना त्यांच्या गरीब स्वभावाचा म्हणा वा अव्यवहारी दृष्टिकोणाचा म्हणा, पण गैरफायदा घेऊन अक्षरश: नागवले होते. ते किडुकमिडुक घेऊन रस्त्यावर उघड्या पडलेल्या या निराधार स्त्रीला आश्रय दिला तो या आश्रमानेच. त्यांना सरकारी आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे हे समजल्यावर सर्व सरकारी फॉर्म्स भरण्यापासून ते सरकारी सेवकांना आश्रमात बोलावून प्रत्यक्ष पुरावे-माहिती देण्याचे काम आनंदाने केले ते दादांनीच. पण प्रत्यक्षात त्याचे फळ दादांना काय मिळाले? संस्थाचालकांची अशी अनेक दुखणी असतात. सामन्यजनांच्या कहाण्या पडद्याआड राहतात, पण शांताबाईंसारख्या पडद्यावरच्या अभिनेत्रीची कहाणी वाचून सत्य परिस्थिती समजावून न घेता लोक खुशाल संस्थाचालकांवर दुगाण्या झाडतात! अशी ही जगाची उफराटी तऱ्हा!

दादांच्या श्रद्धानंदातील अनुभवांची शिदोरी प्रचंड आहे. सर्व प्रसंग शब्दांकित करावेत असे सर्व अनुभव बोलके आहेत. हृदयाला पाझर फुटतील अशा करुण कहाण्या आहेत. अनेक नामवंत

नाटककारांनी यातील प्रसंगांवरून नाटके बेतलेली आहेत. कधी कधी दादांच्या इच्छेविरुद्ध! नैतिकतेचे कठोर पालन करणारे दादा याबाबत मात्र अवाक्षरही काढत नाहीत. एरवी त्यांच्या जागी असणाऱ्या दुसऱ्या कोणा महत्त्वाकांक्षी प्रसिद्धीची लालसा असणाऱ्याने केवढी सवंग लोकप्रियता मिळविली असती.

कोणत्याही प्रकारच्या मानसन्मानाची अपेक्षा न धरता, स्वतःचा अल्पस्वल्पही स्वार्थ न साधता वर्षानुवर्षे असा निष्काम कर्मयोग करणाऱ्या माणसाला 'पैसा हाच परमेश्वर' मानणाऱ्या आजकालच्या जगात कोणीही ठार वेडेच म्हणतील! स्वातंत्र्यपूर्व काळात अशा 'वेड्यांची' संख्या तुलनेने अधिक होती. आज 'शहाण्यांची संख्या' प्रचंड प्रमाणावर वाढलेली असल्याने दादासाहेबांसारखे 'वेडे' व्यक्तिमत्त्व अधिकच वंदनीय वाटते!



## १६.

### दत्तकविधान

‘दैव जाणिले कुणी’ असं म्हणतात ते किती विलक्षण खरं आहे हे ‘सँट्रीन’ आणि ‘डेव्हिड’ या दोघा बहीण-भावंडांकडे बघितलं की पटतं. हिंदुस्थानातील कुठल्या तरी कचराकुंडीत जन्मत:च मृत्यूची वाट बघत असलेली ही मुलं! त्यांचं नशीब बलवत्तर. कोणी तरी त्यांना श्रद्धानंद महिलाश्रमात पोचविले. त्यांचे भाग्य त्याहून थोर म्हणून दादांनी सर्वांचा विरोध पत्करून त्यांना एका निपुत्रिक फ्रेंच जोडप्याच्या स्वाधीन केले. कायदेशीरपणे दत्तक देऊन. १९६६-६७ मधील या घटना आहेत. ती दोन्ही बाळं आपल्या आईवडिलांच्या कुशीत सुरक्षित, सुखकर आणि समृद्ध जीवन जगत आहेत. त्यांचा भविष्य नसलेला भूतकाळ पार पुसला गेलाय आणि त्यांचा वर्तमानकाळ भविष्याची सोनेरी स्वप्नं पाहात आहे! हे सारे कशामुळे शक्य झाले तर दादांच्या दत्तक योजनेमुळे!

० ० ० ०

दादांच्या आयुष्यातील श्रेष्ठ कार्य कोणते असे कोणी विचारल्यास क्षणाचाही विलंब न लावता देता येणारे उत्तर म्हणजे त्यांचे दत्तक योजनेसंबंधातील कार्य! श्रद्धानंद महिलाश्रमात दादा येण्यापूर्वी मुलं दत्तक दिली जात नसत असे नाही; पण औरस संततीचे सर्व हक्क प्राप्त करून कायदेशीर अधिकार प्राप्त करून देण्याच्या कार्याचा

'ओनामा' त्यांनीच घातला. पहिले-वहिले मूल कायदेशीरपणे परदेशात दत्तक म्हणून पाठवताना जन्मदात्या आईला झाल्या नसत्या एवढ्या प्रचंड प्रसववेदना दादांना झाल्या. ती सारी कथाच मोठी मननीय आहे.

तत्पूर्वी दत्तक म्हणजे काय? त्या संबंधातील आपल्या पूर्वकल्पना, परंपरांचा मागोवा घेणे अप्रस्तुत ठरणार नाही. दत्तकाची व्याख्या काय तर साधारणपणे जन्माने तिऱ्हाईत असणाऱ्या व्यक्तीस समाजाने किंवा कायद्याने मान्य केलेल्या संलग्नीकरणाच्या पद्धतीने पुत्राचा वा कन्येचा दर्जा व अधिकार देण्यास संमती देणे म्हणजे दत्तक अशी सर्वसाधारण व्याख्या मानण्यात येते. कायद्याच्या दृष्टीने दत्तक म्हणजे काय? तर रक्ताच्या नात्याने 'पालक-बालक' संबंध नसलेल्या दोन व्यक्तींमध्ये तसा संबंध प्रस्थापित करणे. म्हणजेच आपल्याला जन्मजात मिळणारे हक्क, जन्माने तिऱ्हाईत असलेल्या एखाद्या व्यक्तीस प्रदान करणे.

कोणतीही नवीन सुधारणा आपल्याकडे आली की तिचे मूळ परदेशातच असल्याची सहज भावना होते. ही आपल्या गुलामी वृत्तीचे द्योतक आहे. तसं पाहिलं तर दत्तक-कल्पना सर्व जगाच्या आधी आपल्या भारतवर्षातच जन्मली असावी आणि नंतर इतर देशांनी ती कल्पना 'दत्तक' घेतली असावी! कारण आपल्या प्राचीन वेदवाङ्मयापासून दत्तकसंबंधात उल्लेख आढळतात. दत्तकमीमांसा, दत्तकसिद्धांतमंजिरी, दत्तकचंद्रिका, व्यवहारमयुख, मिताक्षरा, दायभाग आदी ग्रंथांमधून दत्तकासंबंधात सर्व ऊहापोह आहे. श्रुतिस्मृती ग्रंथात दत्तकाची फक्त व्याख्या आहे. तर वसिष्ठांच्या धर्मसूत्रात त्यासंबंधी चर्चा आहे. पुरातन काळापासून दत्तक घेणे ही एक वैयक्तिक गरज समजली गेली आहे. निपुत्रिक अवस्थेत मरणे म्हणजे पिंडदान कोण करणार? वंश कसा वाढणार? अशांसारख्या वैयक्तिक स्वरूपाच्या गरजेतून दत्तक-पुत्राची आवश्यकता भासू लागली. गंमत म्हणजे पुरातन काळात कन्या दत्तक घेतल्याचेही उल्लेख आहेत. उदाहरणार्थ, दशरथकन्या शांता व पांडवमाता

पृथा (कुंती) यांना अनुक्रमे लोमपाद व कुंतिभोज राजांनी दत्तक घेतले होते.

पाश्चिमात्य देशांतून या कल्पनेचा उदय अलीकडचा दिसतो. अमेरिकेतील मॅसॅचूसेट्स संस्थानात १८५१ साली, स्वीडनमध्ये १९१७ साली तर इंग्लंडमध्ये १९२६ साली या स्वरूपातील कायदे संमत केलेले आढळतात. भारतात दत्तक परंपरा पुरातन असली तरी कायदा अगदी अलीकडचा म्हणजे १९५६ सालचा आहे (Hindu Adoption and Maintenance Act, 1956). जम्मू-काश्मीर राज्य वगळता बाकी सर्व भारताला (अर्थात हिंदू) हा कायदा लागू पडतो.

दत्तक-विधान ही गोष्ट भारतात तरी नवी नाही. शेकडो वर्षांपासून समाजात मुले दत्तक देण्याचे-घेण्याचे व्यवहार चालू होते. जुन्या काळात अविभक्त कुटुंबपद्धती प्रचलित होत्या. एवढ्या मोठ्या 'बारदानात' एखादे जोडपे अपत्यहीन असेल तर कुटुंबातील भाचा, पुतण्या निवडून दत्तक घेतला जाई. त्या वेळी दत्तक आईवडिलांची आवड, निवड, मुलाचे वय यांपैकी काही काही विचारात घेतले जात नसे. गंमत अशी की दत्तक जाणारा मुलगा विवाहितसुद्धा असे! चाळिशीच्या काकूला पंचविशीचा पुतण्याही दत्तक दिला जात असे! एकत्र कुटुंबपद्धतीतील स्थावर-जंगम मिळकत इतर ठिकाणी जाऊ नये; ती आपल्याच कुटुंबात राहावी हा एकच प्रधान हेतू असे. सारांश, 'दत्तक' हा विषय वैयक्तिक पातळीवरच होता. तो समाजाचा एक प्रश्न आहे ही जाणीव समाजात जागृत झाली नव्हती. दादांसारख्या समाजसेवकांना मात्र अहोरात्र समाजातील दुःखांची स्पंदने त्यांच्या हृदयाला भिडत असल्यामुळे हा विषय सामाजिक आहे आणि म्हणून समाजानेच तो सोडविण्यासाठी पुढे आले पाहिजे ह्याची रास्त जाणीव झाली.

जसजसा काळ बदलत गेला तसतशी अनेक कारणांनी एकत्र कुटुंबपद्धती बदलत गेली. आता तर पूर्णपणे कोसळली आहे! सारडा (शारदा) अॅक्टप्रमाणे मुलीचे विवाहाचे वय १४ झाले. १९५६ च्या हिंदू कोड बिलान्वये ते १८ झाले. विवाहमर्यादा वाढत गेली. पूर्वी बालविधवांचे प्रमाण बरेच होते. त्यांना शिक्षण नव्हते की पुनर्विवाहाचा कायदा नव्हता. तरुण वय, निसर्ग स्वस्थ बसू देत नाही. मग व्यभिचार

त्यांतून मुलाचा जन्म, जन्मास घालणाऱ्या पुरुषाचा नेहमीसारखाच 'विश्वामित्री' पवित्रा! मग समाजाच्या भीतीने अशी मुलं कुमारी मातांनी सोडायची तरी कुठे? पुरातन काळात पांडवमाता कुंतीने मार्ग दाखवलाच आहे! मग अशी मुलं नदीकाठी, जंगलात, रस्त्यावर, गटाराच्या बाजूला, कचराकुंडीत जाऊ लागली! त्यांच्या आयुष्याची दोरी बळकट असलीच तर श्रद्धानंदांसारख्या आश्रमात येऊ लागली.

आधुनिक काळात लोकसंख्येची प्रचंड प्रमाणात वाढ झाली. बेकारी वाढली. स्त्रीस्वातंत्र्याचा अर्थ विसरून स्वैराचारात रूपांतर होऊ लागले. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात राहत्या जागा अपुऱ्या पडू लागल्या. जागा नाहीत म्हणून लग्ने लांबणीवर पडू लागली. तरुण-तरुणींचे विवाह वेळीच होऊ शकत नाहीत तर दुसऱ्या बाजूस तारुण्यसुलभ भावना गप्प बसू देत नाहीत. त्यामुळे विवाहबाह्य संबंधातून जन्मलेल्या परित्यक्त मुलांची संख्या वाढू लागली.

अशा परित्यक्त मुलांची काळजी घेणाऱ्या संस्थांची संख्या आधीच कमी त्यातून पैशाअभावी फारच थोड्या अर्भकांची सोय अशा संस्था करू शकत होत्या. परिणामी अशी 'देवाकडून आलेली मुलं परत देवाघरी' जाऊ लागली! ही परिस्थिती उघड्या डोळ्यांनी पाहताना दादांसारख्या संवेदनाक्षम समाजसेवकांचे मन विषण्ण होऊ लागले. त्यांच्या मनात येई– ही अजाण बालके जन्माला आली त्यात त्यांचा काय दोष? गुन्हा करणारे औट घटकेचे सुख भोगतात आणि नामानिराळे होतात. त्यांनी जे काय पाप केले ते त्यांच्याबरोबरच. त्यांच्या 'कर्मानुसार' त्यांना शिक्षा देणारा केवळ एक परमेश्वरच! पण जन्मलेल्या निष्पाप मुलाला जगण्याचा अधिकार खचितच आहे. अशा मुलांना जगविण्यातच माणसाची माणुसकी आहे.

अशा अनाथ बालकास किमान माणसासारखे जगवता यावे इतपतसुद्धा सोयी महिलाश्रमासारख्या संस्थांना करता येत नाहीत. मुख्य कारण पैसा. अशा संस्था मुख्यत्वे तुटपुंज्या सरकारी अनुदानावर व लोकाश्रयावर चालत असल्याने अशा सर्वच बालकांची सोय करू शकत नाहीत. बरे, प्रवेश मर्यादित प्रमाणात दिला तरी घरात एखाद्या नवजात बालकाची जशी देखभाल होईल तशी व्यवस्था संस्थेकडे असणे अशक्यच. आवश्यक

वैद्यकीय उपचाराअभावी कधी कधी यांतील मुले मृत्युमुखी पडतात. कशीबशी ती वाढविली जातात. ह्या साऱ्या परिस्थितीतून दत्तक देण्याच्या कल्पनेचा उदय झाला!

मग ज्या पति-पत्नीस मुलाबाळांची आवड आहे, आर्थिक परिस्थिती चांगली आहे, केवळ शारीरिक दोषांमुळे— वैद्यकीय सल्ल्यानुसार— त्यांना अपत्यप्राप्ती होऊ शकत नाही, शकणार नाही अशा कुटुंबात दत्तक देता येईल का ह्याचा विचार सुरू झाला.

१९५६ च्या 'हिंदू अॅडॉप्शन व मेन्टेनन्स अॅक्ट' प्रमाणे प्रथम फक्त हिंदू मुलांनाच हिंदू माता-पित्यास दत्तक देण्यास कायदा मान्यता देत होता. (The law demands that the giver, taker and child should be Hindus.) त्यामुळे फक्त आईबापच मुलांना दत्तक देऊ शकायचे. श्रद्धानंदसारख्या संस्थेत आलेल्या अनेक निराधार मुलांना आपला धर्म माहीत नसतो. आई-वडिलांचा पत्ताही माहीत नसतो. मग ज्यांना माता-पिता दोन्ही नसतील तर त्यांना दत्तक देण्याचा अधिकार कोणाचा? का अशी 'अनाथ' मुले दत्तक देऊच नयेत? कायद्यातील अशा त्रुटींचा दादांनी खोलवर अभ्यास केला. न्यायालयाशी हुज्जत घातली. संस्थेतर्फे व कायदेपंडितांतर्फे हा प्रश्न तत्कालीन कायदेमंत्री कै. हरिभाऊ पाटसकर यांजकडे नेला. त्यांच्या समक्ष बोलणी केली. या साऱ्या मंथनातून दादांच्या अथक प्रयत्नांना यश लाभले व १९५६ च्या कायद्यात दुरुस्ती केली गेली. हिंदू मुलांप्रमाणेच हिंदू पद्धतीने संगोपन केलेल्या मुलालाही तो कायदा लागू करण्यात आला व फलस्वरूप आई-बापाखेरीज कोर्टाने नेमलेल्या 'गॉर्डिअनकडे' (मग ती व्यक्ती वा संस्था असो) दत्तक देण्याचा अधिकार आला. म्हणजे पर्यायाने श्रद्धानंदसारखी संस्था मुले दत्तक देण्यास मोकळी झाली. दादांच्या आजवरच्या यशातील हा मोठाच शिरपेच होता!

पण तरीसुद्धा येथील म्हणजे भारतातील कुटुंबे दत्तक घेण्यास पुढे येईनात हे पाहून दादा मोठे अचंबित झाले. आपला समाज रूढी-परंपरांचा केवढा दास आहे हे त्यांच्या अनुभवास आले! नातेवाईकांचे मूल दत्तक घेताना वर्ण, रूप, गुण ह्या सर्व गोष्टींकडे संपूर्ण दुर्लक्ष करणारे जोडपे आश्रमातील बालक दत्तक घ्यायचे म्हणजे भलतीच खळखळ

करताना दिसायचे! नवी साडी घेताना एखादी स्त्रीसुद्धा एवढी चिकित्सा करीत नसेल! आश्रमाचे मूल घेताना रंग-रूप, अवयवांचा रेखीवपणा यांची चिकित्सा असायचीच; खेरीज मुलाचे आई-बाप, धर्म, जात, जन्मठिकाण, जन्मतिथी, वार, दिनांक, वेळ यांचीही अशी जोडपी काटेकोर चौकशी करत! त्याप्रमाणे ज्योतिषाकडून पत्रिका करून मागत. ती जमली तर ठीक नाही तर मूल दत्तक घेण्यास नकारघंटा!

या साऱ्या परिस्थितीमुळे दादा विषण्ण झाले. दिवसेंदिवस अशा निराधार बालकांची संख्या वाढतच होती. संस्थेची अपुरी जागा, तुटपुंजा पैसा यामुळे त्यांची बेचैनी अधिकच वाढत होती. या मुलांचे काय होणार अशी काळजी त्यांना लागून राहिली आणि अशा वेळीच एक देवदूत अवतरला!

## देवदूत

१९६५ सालातील एका सुप्रभाती एक फ्रेंच जोडपे भारतातील निराधार मुलांच्या संस्था पाहण्यासाठी व जमल्यास एखादे मूल दत्तक घेता येईल काय अशा सुप्त हेतूने आश्रमात आले. पूर्वसूचना नसतानाच ते दांपत्य आले. सुदैवाने त्या वेळी दादा तिथेच होते. दादांनी जातीने सर्व संस्था फिरून दाखविली. अर्भकालयात गेल्यावर व तेथील मुलांची हकीकत कळल्यावर त्या महिलेने– जिचा विवाह होऊन १५-१६ वर्षे झाली होती पण मूल नव्हते– या अर्भकालयातील एखादे मूल दत्तक मिळू शकेल का अशी विचारणा केली. दादांनी पोलिसांकडून कोर्टामार्फत आलेली एक दोन-अडीच महिन्यांची मुलगी दाखविली. मुलगी काळीच होती. दादांनी 'ही घ्याल का?' असं विचारताच त्या फ्रेंच यशोदेला जणू मातृप्रेमाचा पान्हाच फुटला! त्या महिलेने पटकन त्या छोट्या मुलीला उचलले. छातीशी धरले. तिचे पटापट मुके घेतले. ती मुलगी हुंकार देते की नाही ते बघितले आणि दादांकडे बघत मोठ्या आशेने 'नेऊ का?' म्हणून विचारले.

अनेक दिवस नाही तर अनेक वर्षे दादा या क्षणाची वाटच पाहत होते. तो सुवर्णक्षण अचानक दाराशी आला होता! मनोमन दादा प्रभावित झाले तरी पण वास्तवतेचे त्यांचे भान कधीच सुटत नाही.

ते म्हणाले, 'मला आश्रमाच्या कमिटीची परवानगी घ्यावी लागेल, आपली सर्व माहिती मिळवावी लागेल.' दत्तक घेण्याच्या सुप्त हेतूने ते जोडपे हिंदुस्थानात आलेले असल्याने त्यांनी सर्व माहिती आणली होतीच. उभयतांनी थोडी बातचीत केली. सर्व कागदपत्र त्यांनी दादांना दाखविले. नकला पाहिजे होत्या म्हणून बाहेर जाऊन नकला काढून आणल्या. कार्यकारिणीच्या सभेस अवधी असल्याने तुम्ही भारतातील इतर ठिकाणांचा दौरा आटोपून या, तोवर मी परवानगी घेऊन ठेवतो असे आश्वासन दादांनी दिल्यावर हर्षोत्फुल्ल अंत:करणाने ती उभयता गेली.

दरम्यानच्या काळात दादांनी हिंदुस्थान सरकारच्या फ्रान्समधील सेवकवर्गातर्फे (Embassy) या कुटुंबाची माहिती मिळविली. ती त्या फ्रेंच जोडप्याने दिलेल्या कागदपत्रांतील माहितीनुसार तंतोतंत बरोबर ठरली.

ही सर्व माहिती, अर्ज, कागदपत्र, आणि दत्तकप्रस्ताव दादांनी कार्यकारिणीच्या बैठकीत ठेवला. एका अनाथ मुलीचे कायदेशीर पुनर्वसन होणार ह्या आनंदात असतानाच कार्यकारिणीने साफ नकार दिल्यावर दादा हतबुद्धच झाले. निराशेचा पहिला धक्का सोसल्यावर दादांनी पुन्हा पुन्हा युक्तिवाद केले. सर्व Arguments संपली. राहिला तो फक्त 'Adamenteness!' त्याला दुर्दैवाने दादांकडे काही उत्तर नव्हते. अखेरीस मी 'कार्यवाह-पदावरून (office bearer) शब्द दिला आहे, तेव्हा एक अपवाद (exception) म्हणून मान्यता द्या, पुन्हा कोणास शब्द देणार नाही, असे दादांनी मोठ्या लीनतेने सांगितले. तेव्हा कोठे मान्यता मिळाली.

पुढील सभेच्या वेळी दादांनी ते फ्रेंच दांपत्य हजर केले व सर्वांसमक्ष ते भाग्यवान बाळ त्या उभयतांच्या हवाली केले. योगायोगाने नेमका तोच दिवस त्या पुरुषाचा जन्मदिवस होता. त्याने आनंदाने Birthday Gift म्हणून ती मुलगी आपल्या पत्नीच्या हाती सोपविली. दादांचा जीव भांड्यात पडला. एका प्रयोगशील उपक्रमाची ती निव्वळ सुरुवात होती ह्याची त्यांनाही त्या वेळेस कदाचित कल्पना नसेल!

त्यानंतर एका वकिलास, वकीलपत्र व संस्थेच्या नावे मुखत्यारपत्र देऊन ते कुटुंब फ्रान्सला परत गेले. कोर्टाची ऑर्डर, पासपोर्ट, व्हिसा इत्यादी

सर्व उरकून एस्कॉर्टची व्यवस्था झाल्यावर ते बाळ सन १९६६ मध्ये फ्रान्सला रवाना झाले. त्या फ्रेंच कुटुंबाचे नाव होते श्री. व सौ. स्टेकॉय. ज्या मुलीला दत्तक घेतले तिचे नाव (आश्रमातील) होते मेघा. गंमत म्हणजे दोन वर्षानंतर त्याच फ्रेंच कुटुंबाचे विनंतिपत्र आले की 'मुलीची वाढ, प्रगती छान आहे पण तिला एकाकी वाटते; तेव्हा तिला भाऊ हवा. एक मुलगा दत्तक द्या.' या खेपेला दादांनी कार्यकारिणीच्या सभासदांना व्यवस्थित पटवून दिले. परदेशातील कायदे मागवून त्यांचा पूर्ण अभ्यास केला. त्यांच्या आधारे योग्य पद्धतीने निवेदन करून ते कार्यकारिणीपुढे सादर करून तिची संमती मिळविली व मुलगा 'चंद्रदीप' फ्रान्समध्ये आपल्या बहिणीकडे– मेघाकडे– रवाना झाला. आता त्यांची नावे सँड्रिन व डेव्हिड अशी आहेत. त्यांची उत्तम प्रगती झाली आहे.

त्याच सुमारास इतर देशांतील पालकांकडूनही दत्तकसंबंधात सतत विचारणा होऊ लागली. तेव्हा दादांची उत्सुकता वाढली. हे लोक आमची मुले का मागतात? त्यांना मुले का होत नाहीत? होत नसतील तर त्यांच्याच देशांतून त्यांना मुले दत्तक म्हणून मिळत नाहीत का? तिकडे दत्तकाचा कायदा आहे ना? यात काही राजकारण तर नाही?

दादांच्या नेहमीच्या स्वभावधर्मानुसार या साऱ्या समस्यांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. तेव्हा त्यांना आढळून आले की डेन्मार्क, स्वीडन, नेदरलँड्स यांसारख्या युरोपखंडातील देशांत विवाहपूर्व स्त्रीपुरुषसंबंधांना मज्जाव नाही. त्यामुळे संततिनियमनांच्या साधनांचा (Oral tablets वगैरे) मुक्त वापर केल्यामुळे स्त्रीला वंध्यत्व अथवा पुरुषांमध्ये नपुंसकत्व वा पौरुषाचा अभाव हे तेथील दांपत्याला मुले न होण्याचे प्रमुख कारण आहे. कुटुंबनियोजनामुळे तेथे कोणत्याही कुटुंबात जास्ती मुले होत नाहीत. जी असतील त्यांचे पालनपोषण करण्याइतपत आई-वडिलांची आर्थिक स्थिती चांगली असते. तशी नसली तरी तेथील सामाजिक कायद्यांची रचनाच अशी आहे की स्वत:जवळच मुले ठेवून त्यांचे शिक्षण, औषधोपचार इत्यादी साऱ्या बाबींची काळजी तेथील शासन (सरकार) घेते. कुटुंबात मुले मर्यादित असल्याने त्यातून मुले दत्तक देण्यास कोणीच तयार

होत नाहीत. त्यामुळे अधिक लोकसंख्या असलेल्या कोरिया, जपान, व्हिएतनाम, भारत इत्यादी देशांतील मुलांसाठी अपत्यहीन जोडप्यांची दत्तकासाठी मागणी असते. त्यातही कोरिया, जपान वा व्हिएतनाम या देशांतील संततीवर युद्धाचे विपरीत परिणाम झालेले आढळतात. या पार्श्वभूमीवर भारतातील मुले बुद्धीने वा शारीरिक दृष्ट्या अधिक 'नॉर्मल' असतात. फक्त विवाहबाह्य अशा अनैतिक संबंधातून त्यांचा जन्म झालेला असतो इतकेच.

त्यात राजकारण तर तिळमात्र नाही वा फसवणूक नाही. आपल्या देशातील कायद्यानुसार एकदा दत्तक घेतलेला मुलगा मंदबुद्धी, वेडा, दुर्वर्तनी निघाल्यास त्याचा दत्तक बाप मृत्युपत्र करून त्या मुलाला काहीही मिळू नये अशी व्यवस्था करू शकतो. म्हणजे दत्तक जाऊनसुद्धा तो मुलगा उघड्यावर पडतो. याउलट, पाश्चात्त्य देशांतील कायद्यानुसार आई-वडील व दत्तक पुत्र ह्यांचे पटले नाही तरी मिळकतीचा ५० % भाग त्या दत्तक मुलासाठी ठेवावाच लागतो. ही सुरक्षितता परदेशी दत्तक जाणाऱ्या मुलांच्या दृष्टीने खचितच स्वागतार्ह आहे.

पाश्चात्त्य देशांतून प्रत्यक्ष जाऊन आलेल्या अनेकांच्या सत्यकथांनुसार असे दिसून आले की या मुलांची सर्वतोपरी वाढ होण्यासाठी घेण्यात येणारी काळजी, त्यांना दिली जाणारी प्रेमळपणाची वागणूक, शिक्षणासाठी उपलब्ध असणाऱ्या सुविधा, आपल्या देशातील मध्यमवर्गीयांनासुद्धा देता आल्या नसत्या! हे सगळे ऐकल्यावर दादांना साहजिकच आंतरिक समाधान लाभले. परदेशांत दत्तक गेलेली मुले खरोखरच भाग्यवान ठरली, हे पाहिल्यावर त्यांना कार्यकारिणीचा विरोध असतानाही आपण वैयक्तिक हिमतीवर घेतलेल्या निर्णयाचे समाधान वाटले!

पण दादांना या कामात लाभलेले समाधान सुखासुखी मिळालेले नव्हते. अनेक लोकांचा विरोध सहन करायला लागला. कमिटीच्या लोकांचा प्रामाणिक विरोध होता. दादांवर वैयक्तिक राग नव्हता. दादांनी अनाथ अर्भकाचे भले त्यांना समजावून सांगितल्यावर, पटवून दिल्यावर दादांना त्या कमिटीच्या मंडळींनी एकमुखी पाठिंबाच दिला. परंतु तथाकथित समाजधुरिणांनी मात्र दादांना परदेशी मुलं पाठविण्यावरून कडवा विरोध केला. मासिके-वृत्तपत्रे यांद्वारे दादांवर आग पाखडली.

दादा मात्र शांत होते. अविचल होते. टीकेचा मुख्य सूर धर्मांतर होते हा होता. महाराष्ट्र शासनाचाही ह्या मुद्द्यावर विरोध होता. कोणत्याही मायनॉर (अज्ञान) मुलाचा धर्म बदलावयाचा कुणालाही हक्क नाही असा आपल्याकडे कायदा आहे व प्रत्येक वेळी याच कायद्यावर बोट ठेवून दादांच्या कार्यात अडथळा येई. वास्तवात आश्रमात येणारी अर्भके कुणा तरी अनामिकांच्या पापातून निर्माण होऊन टाकलेली असतात. मग ती मुलं पोलिसांकरवी आश्रमाकडे येतात. अशा बाळांच्या बापाचा सोडाच, पण आईचाही पत्ता नसतो. मग त्याच्या धर्माचे नाव काय सांगणार कप्पाळ! कोर्ट, पोलिस त्यांच्या पद्धतीने शोध करतात पण अशा व्यक्तींचा शोध कधीच लागत नाही हे सर्वांनाच निश्चितपणे ठाऊक असते. अशा मुलांना नाव-गाव-धर्म यांची बिरुदावली न दिली जाता फक्त बिल्लानंबर दिला जातो. हे अर्भक आश्रमाला अठरा वर्षांपर्यंत सांभाळावे लागते. मग समजा, असे नुसते बिल्लानंबर धारण करणारे मूल परदेशी गेले तर त्याचा 'धर्म' कसा काय बदलणार?

मुळातच ज्याला धर्म नाही त्याच्या धर्मांतराचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे अनेक उदाहरणांनी दादांनी कोर्टाच्या जबानीत सांगितले. त्याहून महत्त्वाची बाब अशी की आपल्याकडील श्रद्धानंदांसारखे आश्रम वा तत्सम संस्था अजूनही धर्माच्या नावावरच चालतात. समजा, एखादे अर्भक श्रद्धानंद आश्रमाकडे आले आणि आश्रमात जागा नसेल तर ते मूल एखाद्या ख्रिश्चन किंवा मुसलमान संस्थेने चालविलेल्या आश्रमात दिले जाते. मग त्याचा डेव्हिड नाही तर करीम होतो! म्हणजे ज्याचा मूळ धर्म माहीत नाही त्याच्यावर आश्रम चालविणाऱ्यांचा धर्मच चिकटवायचा असाच नाही का अर्थ होत? मग दत्तक दिल्यावर त्याचा धर्म बदलतो म्हणून कावकाव करण्यात काय अर्थ आहे?

दुसरा आक्षेप होता राजकीय स्वरूपाचा. अशी अर्भके परदेशात दत्तक म्हणून वाढविण्याने भारताची प्रतिमा डागाळते असे काहींचे म्हणणे. दादांनी दाखवून दिलं की त्या काळात प्रसिद्ध झालेल्या सरकारी अहवालानुसार भारतात प्रतिवर्षी एक वर्षाखालील वय असलेली दहा लाखांहून अधिक मुले पुरेशा आहाराअभावी (malnutrition) मृत्युमुखी पडतात. अशा

परिस्थितीमुळे देशाची 'प्रतिमा' परदेशात काय उजळणार आहे? तिसरा सामाजिक आक्षेप असा होता की आपली बालके परदेशात नेऊन त्यांना कामगार म्हणून स्वस्त मजुरीच्या दरात राबवतील. हा आक्षेप अगदीच बिनबुडाचा होता. कारण असे असेल तर दत्तक घेण्यासाठी प्रचंड खर्च करण्याची परदेशातील पालकांना गरजच काय? खेरीज दत्तक घेणाऱ्या पालकांनी वेळोवेळी मुलांच्या प्रगतीचा अहवाल त्या त्या संस्थांना पाठविणे आवश्यक असते. त्याआधारे आपण वस्तुस्थिती पाहू शकतो.

असा सर्व युक्तिवाद केल्यावर दादांना मुलं परदेशी दत्तक म्हणून पाठवण्याबाबत शासनाकडूनही 'हिरवा कंदील' मिळाला. दादांवरची वा इतर या क्षेत्रात काम करणाऱ्या तत्सम संस्थांवर होणारी जाहीर टीका कमी झाली. योग्य वेळी हाच प्रश्न (म्हणजे मुले परदेशी दत्तक देण्याबाबतचा) दादांनी नेटाने वेळोवेळी कार्यकारिणीसमोर आणला. देशातील परिस्थिती, परित्यक्त मुलांची संख्या, संस्थेची आर्थिक परिस्थिती, इतर देशांतील कायदे, मुलांचे एकूण भवितव्य, ह्या सर्वच मुद्द्यांबाबत साधक-बाधक चर्चा केली. कायदेशीर, सामाजिक व राजकीय आक्षेप दादांनी खोडून काढले. याचा परिपाक म्हणून डिसेंबर १९७० मध्ये आश्रमातील मुले कायदेशीरपणे दत्तक देण्यास कार्यकारिणीने एकमुखी मान्यता दिली. १९७१-१९७३ पर्यंत जवळजवळ शंभर मुले दत्तक म्हणून परदेशी गेली.

सर्व परदेशी, विशेषत: युरोपात दत्तक दिल्या गेलेल्या मुलांच्या सुदैवाने दादांना १९७३ साली युरोपियन देशांत जाण्याची संधी मिळाली. वस्तुस्थिती प्रत्यक्ष डोळ्याने पाहता आली, तेव्हा दादांना मोठेच मानसिक समाधान लाभले. मनोमन त्यांनी परमेश्वराचे आभारच मानले.

अनाथ मुलं परदेशी पाठविण्याची वेळ का आली, ह्याचा कोणी गांभीर्याने विचार करत नाही. आपल्या समाजातील पुढारलेले लोकसुद्धा आश्रमातील अर्भकं घ्यायला तयार व्हायचे नाहीत. कोणत्या धर्माचे असेल कुणास ठाऊक, असं म्हणून अंगावर शहारे आणायचे! तेव्हा दादांना टाहो फोडून सांगायला लागायचे, की 'बाबांनो, 'मानवता आणि केवळ मानवता' हाच साऱ्या जगाचा सनातन आणि चिरंतन असा धर्म

आहे.' माणुसकीपेक्षा धर्माला अधिक प्राधान्य देऊ नका! आपण आपल्या देशातील आपल्याच मुलांची काळजी नाही घेतली तर काय त्या अर्भकाला आपल्या डोळ्यांदेखत मरू द्यायचे? अनाथ अर्भकांची ही संख्या सतत वाढतच आहे.

आश्रमातील मुलं कोठे तरी जाऊन त्यांची माणूस म्हणून जगण्याइतपत सोय झाल्याखेरीज नवीन मुलांना जागा कशी होणार? हॉस्पिटलमध्ये एक रोगी बरा होऊन रोगमुक्त होऊन गेला की त्याच्या जागी नवीन रुग्णाईत आणता येतो! नवीन रुग्णाला जागा मिळावी म्हणून जुन्याला कोणी मरू देत नाहीत. डॉक्टर हा रोग्याला रोगमुक्त करणे, त्याला उपचार करून जगविणे हाच आपला आद्य धर्म मानतो. तसंच आश्रमांच्या बाबतीत आहे. कोणत्याही प्रकारे 'देवाकडून' आलेले मूल 'देवाघरी' आले तसेच परत पावली परत पाठवायचे नाही. तर जन्माला आलंय म्हणून त्याला जगण्याचा जन्मसिद्ध हक्कच आहे, या भावनेतून प्रथम त्याला जगविण्याचा प्रयत्न करणे समाजाचे कर्तव्य आहे. आपण धर्म आणि रूढींच्या जोखडातून अजून बाहेर आलो नाही. परदेशात धर्मापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व देतात. तेव्हा इथे उकिरड्यावर पडलेले माणसाचे पोर कुत्र्याकडून चघळले जात असल्याचे भीषण दृश्य बघणे चांगले, का तेच परदेशांतील आपल्या दत्तक माता-पित्यांच्या छायेत सुखात बागडताना बघणे चांगले? प्रत्येकानेच आपल्या मनाला हा प्रश्न विचारावा आणि मग दादांच्या परदेशी मुलं पाठविण्याच्या निर्णयाचा तटस्थपणे विचार करावा! कोणात्याही धर्मापेक्षा 'मानवताधर्म' हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे कोणत्याही सुज्ञास समजून येईल!

पिकतं तिथं विकत नाही! ही गोष्ट झाली परदेशांतील दत्तकाबाबतची. खुद्द आपल्या देशातील स्थिती काय? पिकतं तिथं विकत नाही, हेच अखेर खरं ठरणार काय? परदेशांतील लोकांना मानवताधर्म उमगतो मग आपल्या लोकांना मानवतेचा साक्षात्कार केव्हा होणार? आपल्याच घरातील इतस्ततः पडलेल्या वस्तू व्यवस्थित जागच्या जागी ठेवणे हे घरात राहणाऱ्या माणसांचे कार्य आहे. इतक्या सहजतेने आपल्याच समाजातील अर्भकं बेवारशी पडून राहू देणे आपल्याला भूषणावह आहे

का? अशा विचारांचे भुंगे आपल्या समाजमनाला का लागू नयेत? अशा प्रकारचे विचार दादांच्या मनात एकसारखे येत आणि समाजाच्या उदासीनतेने ते व्यथित होत.

आपल्या समाजाची एक गंमत आहे. परदेशी अनुकरण हा कदाचित अनेक वर्षे पारतंत्र्यात खितपत पडल्यामुळे आपल्यात भिनलेला एक दुर्गुण असावा. एखाद्या स्वकीय माणसाने केलेल्या चांगल्या उल्लेखनीय बाबीकडे आमचे पटकन लक्ष जात नाही. तीच गोष्ट एखाद्या परकीयाने केली की त्याचे अनुकरण करण्याची आपल्याला तीव्र इच्छा होते! श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे दादांनी परदेशात आपली अनाथ अर्भकं पाठविण्यास सुरुवात केली. सर्वांचा विरोध पत्करून ही योजना धडाडीने राबविली. यशस्वी केली. ही एका अर्थी इष्टापत्तीच ठरली! ह्या गदारोळाच्या निमित्ताने समाजाचे विचारमंथन झाले. ह्या निमित्ताने का होईना, पण दत्तकाच्या प्रश्नाची पुन्हा पुन्हा चर्चा होऊ लागली.

दादांना आपले प्रसिद्धीपासून दूर राहण्याचे पथ्य मोडण्याची वेळ आली. किंबहुना समाजानेच ती त्यांच्यावर आणली! मग लेख, चर्चासत्रे, परिसंवाद, रेडिओवरील भाषणे, टी. व्ही. वरील मुलाखती ह्या साऱ्या माध्यमांद्वारे दादांनी अक्षरशः रान उठविले! नातेवाईकांची मुले दत्तक घेण्यातील फायदेतोटे त्यांनी समजाविले. कधी कधी नात्यातील मूल दत्तक घेतले तरी त्याचा नैसर्गिक ओढा आपल्याच जन्मदात्या आई-वडिलांकडे राहतो. त्याच्या दत्तक आई-वडिलांना त्याच्याकडून अपेक्षित प्रेम, ममता मिळत नाही. उलटपक्षी दत्तक देणारे आई-वडील त्यांच्या मुलाला हेतुतः त्यांच्या 'कह्यात' ठेवतात आणि दत्तक आई-वडिलांतर्फे मिळणाऱ्या इस्टेटीवर डोळा ठेवून बसतात! अशी उदाहरणे समाजात शेकड्यांनी दाखविता येतात. याच्यापेक्षा ज्याला नैसर्गिक आई-वडील नाहीत त्या मुलाला आपले दत्तक आई-वडील हेच सर्वस्व वाटतात. मागे दोरच नसल्याने त्याला दुसरे कोणतेही व्यवधान नसते. स्वार्थ नसतो. त्यामुळे आणि केवळ त्यामुळेच असे बालक आपल्या दत्तक

आई-वडिलांना अपेक्षित माया-प्रेम देऊ शकते! त्यांचा आधार बनते. ही गोष्ट अनुभवांनी सिद्ध झालेली आहे. या साऱ्या गोष्टी संधी मिळेल तेव्हा दादांनी पटवून दिल्या. याचा सुपरिणाम लवकरच दिसायला लागला. आपल्याच देशातून अपत्यहीन माता-पित्यांकडून आश्रमाकडे दत्तकासाठी मागण्या येऊ लागल्या. तेव्हा दादांचा हर्ष गगनात मावेना!

पण इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. दादांना दत्तक प्रश्नाची खाचखळग्यांतून जाणारी गाडी मुख्य रस्त्यावर आणून मार्गी लावण्यास अपरंपार कष्ट पडले. रक्त आटवावे लागले. ह्याची कारणे अनेक आहेत. मुख्य कारण म्हणजे कायद्याच्या किचकट बाबी आणि गुंतागुंतीची कार्यपद्धती.

कोर्ट-कमिटेड मुलं घ्यायला सुरुवातीच्या काळात दोन-दोन वर्षांपर्यंतचा दीर्घ कालावधी लागायचा. नको असलेली मुलं त्यांच्या आया म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये टाकून जातात. कधी चोरून, कधी चुकवून. ही बेवारशी, अनाथ, निराधार मुलं मग पोलिसांच्या ताब्यात जातात. पोलिस ती मुलं मॅजिस्ट्रेटपुढे हजर करतात. चौकशी होते. नेहमीप्रमाणे आई-वडिलांचा पत्ता लागत नाही. ते अर्भक 'बेवारशी' म्हणून जाहीर (declare) होते. त्यानंतर श्रद्धानंद, मानवसेवा संघ आदी संस्थांकडे पाठवतात.

या दरम्यानच्या काळात या अर्भकांचे किती शारीरिक हाल होत असतील? प्रभादेवी, बेलासिस् रोड इथल्या हॉस्पिटलांत श्रद्धानंद वा मानवसेवा संघ यांसारख्या रिमांड वॉर्डात ही मुलं ठेवली जातात, पण या साऱ्या सोपस्कारात ती बिचारी अर्भकं मरतातही. ज्यांच्या आयुष्याची दोरी बळकट, ती जगतात! ह्या अर्भकांना आवश्यकता असते ती त्यांच्या जन्मदात्या आईच्या कुशीची, तिने मायेने थोपटण्याची. ती उणीव ह्या संस्था कशा भरून काढणार? दादांनी त्यावर बराच विचार करून बऱ्याच देणग्या मिळवून आश्रमातच एक हॉस्पिटल उभं केलंय.

आईची माया अर्भकाला देणं आपल्याला जमणार नाही. पण निदान शारीरिक हाल तरी होणार नाहीत. परिस्थितीवर मात करण्यासाठी दादांसारख्या

मंडळींनी आणखी एक उपाय काढला. जेव्हा म्युनिसिपल हॉस्पिटलमध्ये एखादी बाई बाळंतीण होते व तिला ते मूल नको असते तेव्हा तिने तसे डिक्लरेशन द्यायचे. म्हणजे आपल्याला मूल नकोय, आपला त्याच्यावर हक्क नाही ते कुणाला दत्तक वगैरे द्यायचे असेल तर माझी हरकत नाही वगैरे वगैरे... म्हणजे निदान अशा प्रकरणात तरी पोलिस यंत्रणा टाळता येते. अर्थात यामुळे मूल ताब्यात घेणाऱ्या संस्थेची जबाबदारी आणि मुख्यत: काळजी वाढते. हल्ली त्यामुळे संस्थेत सात दिवसांची मुलेसुद्धा येतात. आई तसे डिक्लरेशन देते. नाही तरी जबरी संभोगातून, अनैतिक संबंधातून जन्माला आलेले ते मूल तिला नकोच असते. ती त्याला दूध देत नाही. हॉस्पिटलमधून डिसचार्ज मिळालेला म्हणून त्यांची जबाबदारी संपलेली. पाच-सात दिवसांच्या अर्भकाला तर तासातासाला दुधाची गरज असते. मुलाला संस्थेत आणल्यावर दुधाची बाटली द्यावी तर त्याच्यात पिण्याची ताकद नसते. त्यामुळे डीहायड्रेट होऊन मुलं मरून जातात. समजा, अशी मुलं दत्तक गेलेली असतील म्हणजे दत्तक जाण्याच्या प्रक्रियेमध्ये (प्रोसेस) असतील आणि दत्तक घेणाऱ्या आई-वडिलांनी औषधोपचार, हॉस्पिटल यांसाठी खर्च सोसण्याची तयारी दाखविली तर त्या मुलाचे नशीब.

ह्या बाबतीतही दादांचा अनुभव असा की भारतीय पालक अशा वेळी आर्थिक साहाय्य करण्यास का कू करतात. याउलट, परदेशी दत्तकेच्छू जे प्रतिनिधी इथे असतात ते मात्र असा खर्च करायला कबूल असतात. कारण कुठलंही मूल मिळालं तरी चालेल, पण ते नॉर्मल असावं एवढीच परदेशी दत्तकेच्छूंची इच्छा असते. त्यांना मुलं दिली की टीका करायला तेवढे लोक पुढे सरसावतात! यातून मार्ग काढा म्हटलं की यांचा पाय मागे. दादांनी आपल्या परदेशदौऱ्यात डेन्मार्क, स्वीडन, हॉलंडसारख्या देशांतील वर्ल्ड चिल्ड्रनसारख्या संस्थांपुढे वरील अडचणी मांडून त्यांच्याकडून देणग्या मिळविल्या. वैद्यकीय साधने मिळविली. परिणामत: आज श्रद्धानंदमधील चाळीस बालकांचीच का होईना, पण सर्वतोपरी काळजी घेण्यास सुसज्ज असे शुश्रूषागृह (हॉस्पिटल) दिमाखात उभे आहे! त्यात अनेक नामवंत चिल्ड्रन स्पेशालिस्ट डॉक्टरांचा सहभाग आहे.

परित्यक्त, निराधार अशा बालकांसाठी दत्तक हाच एक मार्ग आहे का? नाही. दादांसारख्या समाजसेवकांनी आणि इतर समाजसेवी संस्थांनी अनेक इतर मार्गांचाही विचार केला. मुलांसाठी कायदेशीर पालकत्वाची योजना राबविणे, आपल्या मुलांप्रमाणे वाढविली जातील अशा कुटुंबातून अल्प किंवा दीर्घ मुदतीने संगोपनासाठी देणे, घरकुले तयार करणे व त्या त्या ठिकाणी छोट्या छोट्या गटाने मुले वाढविणे, कमी खर्चाच्या बोर्डिंग होममध्ये व्यवस्था करणे, सकाळपासून सायंकाळपर्यंत त्यांच्या पालनपोषणाची इतरत्र सोय करून मुक्कामास पुन्हा संस्थेत किंवा घरात ठेवणे वगैरे वगैरे. पण अनुभवाने ह्यांतील कोणत्याही कल्पना पूर्णांशाने प्रत्यक्षात अवतरत नाहीत. बालकांना कायमचा आश्रय मिळवून देत नाहीत, असे दादांसारख्या अनेक समाजसेवकांच्या अनुभवास आले. कागदावर या योजना चांगल्या दिसतात; पण प्रत्यक्षात मुलांना दुसऱ्या कुटुंबातून सापत्न भावाने वागविले जाते. चीड आणणारी गोष्ट म्हणजे अशा मुलांना चक्क घरकामासाठी वापरले जाते. असा प्रकार वारंवार दिसायला लागला.

कायदेशीर पालकत्व देणे हे त्या मानाने पुष्कळच चांगले. पण या योजनेत मुलाला फक्त पालक (Guardian) मिळतो, घराण्यातील स्थान वा अधिकार मिळत नाही. दुर्दैवाने पालकाचे मूल सज्ञान होण्यापूर्वीच पालकाचे निधन झाले आणि त्या पालकाच्या कुटुंबातील इतर घटकांनी त्या मुलास बाळगण्याचे नाकारले तर त्या मुलास घराबाहेर पडण्याची वेळ येईल. पायाखाली जमीन व डोक्यावर आकाश एवढेच त्याचे 'नैसर्गिक पालक' उरतील. तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीने मूल दत्तक घेणे हाच मार्ग त्यातल्या त्यात पुष्कळसा निर्धोक (full proof) वाटतो. ह्यातसुद्धा अजिबात दोष नाहीत असे नाही. पण नैसर्गिक आई-वडील असतानादेखील मुलांची परवड होताना आपण पाहतो, तेव्हा दत्तक योजनेतील दोष त्या मानाने क्षम्य ठरतात!

तेव्हा दत्तक योजना समाजाच्या सर्व थरांतून जास्तीत जास्त प्रमाणात राबविणे, त्या दृष्टिकोणातून समाजमनाची तयारी होणे गरजेचे आहे. दादा ह्यासाठी सदैव सिद्ध असतात. पूर्वी कटाक्षाने प्रसिद्धीपासून दूर

राहणारे, स्वतःला दूर ठेवणारे दादा आता मिळेल तिथे मिळेल तेव्हा आपली निकडीची कामे बाजूस सारूनसुद्धा सभा, परिसंवाद, व्याख्यानमाला, नभोवाणी, दूरदर्शन अशा कोणत्याही ठिकाणी आवर्जून जातात. आपल्या संस्थेची माहिती सांगतात. आपले ह्या क्षेत्रातील अनेकविध अनुभव सांगतात. हे सारे सांगताना अपरिहार्यपणे 'मी' डोकावला तरी त्यात 'अहं' नसतो. त्यांच्या तळमळीच्या बोलांनी, परिणामकारक वक्तृत्वाने श्रोत्यांचे अंतःकरण हेलावून जाते. अनेक विनापत्य कुटुंबांना आशेचा किरण दिसतो. त्याच तिरमिरीत ती माणसे श्रद्धानंद महिलाश्रम पाहायला जातात. तेथील अॅडाप्शन सेंटरमधील गोजिरवाणी, घट्ट मुठी वळून पाळण्यात झोपलेली अजाण अर्भकं बघतात. कुणाच्या पाळण्यावर बिल्ला असतो. परमेश्वरी कृपा त्यांच्यावर 'झालेली' असते. दत्तकाची प्रक्रिया चालू असते. त्याला घर मिळालेले असते. इतर मुले आश्रम बघायला येणाऱ्या माणसांकडे बघतात. खरं म्हणजे पाच-सहा दिवसांची ती अजाण अर्भकं काय बघणार? परमेश्वरच त्यांच्या 'नेत्रांतून' बघत असतो. दादा त्या मुलांची हकीकत सांगतात. कोणी तरी आश्रमाच्या पायरीवर त्यांना ठेवून गेलेले असते, तर कोणी कचराकुंडीत! अपत्यहीन स्त्रीला वाटते की परमेश्वराने आपली कूस न उजवून आपल्यावर अन्याय केला खरा; पण त्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे अशा सद्हेतूनेच जणू आपल्याला आश्रमात येण्याची सद्बुद्धी दिली! बिल्ला नसलेल्या एखाद्या पाळण्याजवळ ती जाते. घट्ट मूठ वळलेल्या त्या मुलाला गोंजारते. घट्ट मुठीत त्या मुलाचे 'तकदीर' असते. ती घट्ट मूठ सोडवून ती स्त्री वात्सल्याने त्या मुलाचा हात आपल्या हाती घेते. त्या क्षणी एका यशोदेला 'पान्हा' फुटलेला असतो. कारण त्या वेळी तिला तिचा 'कान्हा' भेटलेला असतो. ते अनोखे मायलेकरांचे मिलन पाहताना बाजूला उभ्या असलेल्या दादांच्या डोळ्यांत आनंदाश्रू जमा झालेले असतात! कोणाला कळणार नाही अशा तऱ्हेने चष्मा काढून रुमालाने ते हळूच डोळे पुसतात!

★ ★ ★

## १७.

### ‘श्री रामकृष्ण चॅरिटीज्’

१९७८ सालामधील गोष्ट. सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील एक गाव. त्याचे लोहोम फाटा असे नाव आहे. तिथं एक छोटासा समारंभ चालला होता. लोहोम फाट्यावरील शिक्षण विभाग खंडाळा मंडळाच्या वतीने बांधण्यात आलेल्या ‘पंचक्रोशी’ विद्यालयाच्या पाच नव्या खोल्यांच्या इमारतीचे उद्‌घाटन होते. व्यासपीठावर दोन गोऱ्या मड्डमसाहेबा बसल्या होत्या. मराठीत चाललेली भाषणं त्यांना उमगत होती की नव्हती देव जाणे!

सकाळपासून काही झोपड्यांतून जाऊन गोरगरिबांची घरं त्यांनी जवळून पाहिली होती. आपले पाश्चात्त्य पद्धतीचे पोषाख सांभाळत वाकून झोपडीत शिरायचं आणि ओटीवर आपली ‘मिडी’ सांभाळत बसायचं म्हणजे त्यांना एक कसरतच झाली होती. समारंभाला जमलेली धोतरं-मुंडासेवाली खेडूत मंडळी त्यांच्याकडे कुतूहलाने बघत होती. तितक्याच अचंब्याने त्या दोघी सर्वांकडे पहात होत्या. एकीच्या मनात काय आलं कुणास ठाऊक, पण तिने शेजारी बसलेल्या मैत्रिणीच्या कानात काहीतरी सांगितलं. त्या दोघी श्रोतृवृंदातील एका स्त्रीकडे सारखं मधून मधून पहात होत्या. समारंभ संपला, किलकिले डोळे करून बघत असलेल्या त्या स्त्रीची त्यांनी चौकशी केली. ती खेडूत स्त्री एका डोळ्याने अधू आणि एका डोळ्याने अंध असल्याचे त्यांना समजले. तावडतोब त्यांनी त्या स्त्रीवर डॉक्टरी उपचार व्हावा म्हणून आर्थिक मदत देऊ केली. पैशाची सोय झाल्यामुळे तिची अंध

‘दृष्टी’ आता जगाचा प्रकाश पाहण्याच्या दृष्टिपथात आली होती. त्या सुदैवी खेडूत महिलेचे नाव होते श्रीमती उर्मिला विष्णू लिमण.

त्या गोऱ्या मड्डमसाहेबा होत्या, युरोपातील नॉर्वे देशाच्या रहिवासी. कुठं जगाच्या नकाशावरील हिंदुस्थान देश आणि कुठं त्या देशाच्या महाराष्ट्र भागातील एक खेडं आणि कुठं तो नॉर्वे देश! ओळख-पाळख नाही, भाषा परक्या, त्यामुळे संवाद नाही. पण दु:खांना भाषा कळते ती फक्त हृदयातील मायेची, भूतदयेची. या दोन भाषिकांत ‘सेतू’ बांधणाऱ्या रामाचे नाव होते रामकृष्ण शंकर तथा दादा ताटके.

या पंचक्रोशीत विद्यालयाच्या बांधकामासाठी दादांनी आपल्या श्री रामकृष्ण चॅरिटीजतर्फे रु. ३० हजार बिनव्याजी दिलेच; पण आपल्या ओळखीच्या जोरावर आजवर नॉर्वेच्या ‘अॅडाप्स जॉन फोरम्’ या संस्थेतर्फे रु. ५७ हजार मिळवून दिले होते. त्या समारंभात आणखी रु. ५५ हजारांचा निधी चेकरूपाने देण्यात आला होता. त्या दोन युरोपियन स्त्रिया होत्या मिसेस फ्ली रूसडॉल आणि मिसेस परीन फिंगन्यू. त्या दोघी त्या संस्थेच्या पदाधिकारी होत्या आणि दादांबरोबर धुळीच्या आणि खाचखळग्यांच्या रस्त्याने ‘यातायात’ करून इथवर आल्या होत्या. दादांनी आपल्या मधुर वाणीने आणि गोरगरिबांच्या कळकळीने श्री रामकृष्ण चॅरिटीज् या उभ्या केलेल्या संस्थेतर्फे एक विलक्षण शिक्षणयज्ञ चालू केला होता. त्याच्या उभारणीसाठी अनेक देशी-परदेशी संस्थांचे आर्थिक साहाय्य मिळविले होते. या संस्थेची स्थापना, जोपासना कशी झाली? ही संस्था कशी निर्माण झाली? तिची ध्येय-धोरणे कोणती? हे जाणून घेण्यासाठी २० वर्षे मागे जावे लागेल.

## पूर्वपीठिका

श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कामात अहोरात्र स्वत:ला बुडवून घेतल्यावर पुन्हा श्री रामकृष्ण चॅरिटीज् हे दादांचे कोणते काम? असा प्रश्न

कोणालाही पडणे स्वाभाविकच आहे. काय म्हणून त्यांनी ही जास्तीची जबाबदारी आपल्यामागे लावून घेतली? त्याला उत्तर एकच. ते म्हणजे दादांच्या ठायी असलेलं प्रचंड सामाजिक मन. श्रद्धानंद महिलाश्रमात नवजात अर्भकापासून ते कोणत्याही वृद्ध निराधार स्त्रीची काही ना काही सोय केली जाते. ५ वर्षे वयापर्यंतच्या मुलांची आश्रमात सोय केली जाते. त्या वयानंतर त्यांना इतर तत्सम संस्थांमधून पाठविले जाई. त्यावरील वयाच्या मुलांची आश्रमात सोय होत नसे. इतर जे जे अनाथाश्रम वा त्या प्रकारच्या संस्था असत, त्यांतून फक्त निराधार मुलांची सोय होत असे.

मग ज्यांना आई-वडील आहेत पण अठरा विश्वे दारिद्र्यामुळे त्या पालकांना इच्छा असूनही आपल्या मुलांचे शिक्षण करता येत नाही अशा मुलांनी काय करायचे? पैसा नाही म्हणून शिक्षण नाही आणि पुरेसं शिक्षण नाही म्हणून नोकरी-धंदा नाही. हा तिढा सोडवायचा कसा? मुंबईसारख्या मोठ्या शहरांतून इतकी दुर्दशा दिसत नाही. पण दादा जेव्हा जेव्हा वाईला जात, आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतील जीवन पहात तेव्हा ह्या दु:स्थितीची त्यांना प्रकर्षाने जाणीव होई. त्यांच्या मनात कालवाकालव होई. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी आपण त्यांच्यासाठी काहीच करू शकलो नाही? ही मुलं अशीच वाढायची? शिक्षण, संस्कार यांच्या अभावी जर ही मुलं चोरी, वाटमारी अशा कुमार्गाकडे वळली तर तो दोष कुणाचा? प्रत्येक वेळी प्रचलित सरकारवर टीका केली म्हणजे आपले काम संपले का? समाजात वावरणारी व्यक्ती म्हणून समाजाचे आपण काहीच ऋण लागत नाही का?

असा प्रश्न समाजातील प्रत्येकाला पडला पाहिजे. पण... झाडावरील फळ खालीच का पडते, वर का जात नाही? असा प्रश्न एखाद्या न्यूटनच्याच मनाला सतावतो. झाडाखाली बसून शेकडो फळे अंगावर पडली तरी सर्वसामान्यांच्या मनात त्याबद्दल कोणतीही संवेदना क्षणमात्रही उमटत नाही! सामान्य परिस्थितीत असूनही डोळसपणे समाजातील स्पंदने अनुभवणारी दादांसारखी माणसं विरळाच.

अशा गरीब कुटुंबातील मुलांसाठी आपण काहीतरी केलं पाहिजे ही

भावना दादांच्या अंतर्मनात फार काळ दडून बसली होती. दादांनी या दृष्टिकोणातून १९६० साली एक प्रयत्न केला. कुठून तरी सुरुवात करायची म्हणून त्यांनी ताटके घराण्यापासूनच सुरुवात केली. ताटके घराण्यातील कोणत्याही गरीब, होतकरू मुलाला आर्थिक अनुकूलता नाही म्हणून शिक्षण घेता आले नाही असं होऊ नये म्हणून त्यांनी पुढाकार घेऊन एक कायम स्वरूपाचा निधी स्थापन करण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने त्या प्रयत्नाला यश आले नाही. मनातील प्रार्थनेला परमेश्वर केव्हा तरी 'ओ' देतो यावर दादांची श्रद्धा होती. तसा योग अचानकच आला. मात्र त्याला कारणीभूत ठरली ती एक करुणाजनक घटना. ती म्हणजे त्यांच्या मुलीसमान मानलेल्या प्रमिलेचा मृत्यू!

प्रमिला ही दादांची मानसकन्या. किर्लोस्कर कुटुंबातील मुलगी. खरं म्हणजे दादांचा आणि या कुटुंबाचा नातेसंबंध असा काही नाही. असलाच तर पूर्वजन्मीचा ऋणानुबंधच. प्रमिलेचे वडील जी. टी. हॉस्पिटलमध्ये अत्यवस्थ होते तेव्हा चार मुली व मुलगा यांच्या काळजीने त्यांचा प्राण टांगणीला लागला होता. मी यथाशक्ति त्यांच्या संगोपनाकडे बघेन असे दादांनी सांगितल्यावर त्यांनी शांतपणे डोळे मिटले.

त्यानंतर त्यांची मुलं– नलुताई, सरोज, शालिनी, प्रमिला आणि भाऊ अरुण ही दादांच्या देखरेखीखाली वाढली. दादांनी त्यांच्या कुवतीनुसार शक्य ते सर्व केले. यथावकाश त्यांची लग्नकार्ये होऊन सर्वजण मार्गी लागले.

प्रमिला थोडीशी दुर्दैवी ठरली. दादांनी तिला टायपिंग शिकविले. टाटा इन्स्टिट्यूटमध्ये खास व्यवस्था करून 'चाइल्ड केअर'चा इंटेंसिव्ह कोर्स करून घेतला. सोशल सर्व्हिस लीगतर्फे चालवल्या जाणाऱ्या वर्गात नाव दाखल करून तिच्याकडून टेलरिंग व एम्ब्रॉयडरीचा कोर्स पूर्ण करून घेतला. तिच्या संमतीने तिचा विवाह करून दिला. कन्यादान अर्थातच दादांनीच केले. दुर्दैवाने नवरा-बायकोत सतत कलह होऊ लागले. बारीकसारीक गोष्टींवरून मतभेद होऊ लागले. दादांनी अनेक प्रयत्न केले पण दिलजमाई झाली नाही. अखेर प्रमिला माहेरी आली. दादांच्या घरी. दादांच्या मृणाल, मंगल, मकरंद या मुलांबरोबर राहू लागली. सर्वांबरोबर तिची चांगलीच गट्टी जमली.

या काळात दादांच्या माटुंग्याच्या घरी त्यांची वाईची एक काकी येऊन राहिली होती. ती सोवळी होती, आणि सारे सोवळे-ओवळे अगदी कडक होते. ती जुन्या वळणाची असल्याने नवरा टाकून आलेली प्रमिला त्या काकूंना अजिबात मानवेना. घरातली शांतता धोक्यात आल्याने दादांनी तिला श्रद्धानंद महिलाश्रमात ठेवली. दादा त्या वेळी माटुंग्याच्या हिंद नाईट हायस्कूलचे मॅनेजिंग ट्रस्टी होते. आश्रमाच्या कमिटीची खास परवानगी घेऊन दादांनी तेथील नाईट हायस्कूलला घालून तिला एस्. एस्. सी केली. पण दुर्दैवी वैवाहिक जीवनानंतर तिचे आयुष्य वैफल्यग्रस्त झाल्याने तिच्या मनाचा समतोल एकदा ढळला तो कायमचाच! अखेरीस त्याच नैराश्यग्रस्त अवस्थेत ती पुण्याला भावाकडे – अरुणकडे – गेली असतानाच तिचा १ डिसेंबर १९६८ रोजी आकस्मिक मृत्यू झाला.

या प्रमिलेने तिला घेऊन दिलेल्या एजन्सीखाली एक विमा पॉलिसी घेतली होती. त्यावर वारस (nominee) म्हणून तिने दादांच्या मुलाचे मकरंदचे नाव घातले होते. मकरंदचे खरे नाव दिगंबर. (जन्मल्यावर अक्षरावरून 'द' आले म्हणून आजोबांच्या इच्छेनुसार ठेवलेले.) पण घरात मृणाल, मंगल असा 'म'कार असताना हा मध्येच शिरलेला 'द' काही प्रमिलेला मानवेना! त्याच्यावर तिचा फार जीव. तिनेच त्याला 'मकरंद' ह्या नावाने हाक मारायला सुरुवात केली. हे नाव नातेवाईकांत आणि परिचितांत एवढे रुळले की मूळ दिगंबर नावाचा सर्वांनाच विसर पडला! ते केवळ कागदोपत्रीच राहिले.

या छोट्या मकरंदाला पमाताई (प्रमिला) आपली सख्खी बहीण नाही हे कितीतरी वर्षे माहीत नव्हते. या जिव्हाळ्यापोटीच तिने स्वतःच्या बहिणी व भाऊ असतानासुद्धा विम्याच्या पॉलिसीवर नॉमिनी म्हणून नाव मात्र मकरंदाचे घातले. कोणी सांगावे? कदाचित पित्याच्या वात्सल्याने ज्या दादांनी तिचे व तिच्या भावंडांचे संगोपन केले त्यातून थोडेसे तरी उतराई होण्याचा तिचा विचार असेल. तिच्या अकाली मृत्यूनंतर विम्याचे रुपये पाच हजार मकरंदच्या म्हणजे दादांच्या हातात आले. (त्या वेळी मकरंद इंटर सायन्सच्या वर्गात होता.) दादांनी त्यांच्या निर्मोही स्वभावानुसार ते पैसे प्रमिलेच्या सख्ख्या भावाला – अरुणला –

देऊ केले. तो पठ्ठ्याही तसाच नेकबहाद्दर. हे पैसे पमाताईने मकरंदसाठी ठेवले आहेत, तेव्हा ते त्यालाच मिळायला हवेत हा त्याचा हट्ट. त्याच्या बहिणीपण पैसे घेईनात. दादांसमोर मोठे धर्मसंकट उभे राहिले. मृताच्या इच्छेनुसार पैसे तर घेतले पाहिजेत पण घेणेही इष्ट वाटेना. वास्तविक मकरंदच्या शिक्षणासाठी त्यांना या पैशाचा विनियोग करता आला असता. कोणालाच त्यात वावगे दिसले नसते. या विचारमंथनातून दादांना वाट सापडली. हे प्रमिलेचे पैसे गरजू मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावेत असा त्यांनी मनाशी निर्णय केला. आणि यातूनच 'श्री रामकृष्ण चॅरिटीज्' या कल्पनेने जन्म घेतला. दादांनी प्रमिलेच्या पाच हजारांत स्वत:चे पाच हजार घातले आणि २९ नोव्हेंबर १९६९ रोजी हा विश्वस्त निधी चालू केला.

इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. अशा प्रकारची योजना श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे राबवण्याचा प्रयत्न दादांनी केला होता. पण कमिटीचे मत पडले की आधीच संस्थेच्या कामाचा एवढा व्याप वाढलाय त्यात आणखी वाढ नको. हा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर दादांनी श्री रामकृष्ण चॅरिटीज्च्या कामाला हात घातला.

या ट्रस्टचे नाव 'श्री रामकृष्ण चॅरिटीज्' असे ठेवण्यात दादांचा एक निश्चित विचार होता. त्यांचे स्वत:चे नाव रामकृष्ण. मृत व्यक्तीच्या अंतिम इच्छेनुसार पैसे घेतले म्हणून मृतात्म्यास समाधान पण त्याचबरोबर तो पैसा स्वत:साठी न वापरता चांगल्या परोपकारी कामासाठी वापरायचा ही इच्छा कसोशीने पाळली.

श्री रामकृष्ण चॅरिटीज् म्हटले की कोणालाही एकदम रामकृष्ण मिशनशीच संबंधित ही संस्था आहे असे वाटते. पण तसा काही संबंध नाही. ताटके 'दादा' या नावानेच एवढे सुपरिचित आहेत की त्यांचे नाव 'रामकृष्ण' आहे हे कोणाच्या लक्षात येत नाही. खऱ्याखुऱ्या 'मिशनरी' वृत्तीने चाललेले हे काम आहे. मात्र प्रसार फक्त मानवधर्माचा!

या ट्रस्टचे सुरवातीला तीन विश्वस्त होते. एक दादा स्वत:, दोन चि. दिगंबर ताटके (म्हणजे कै. पमाताईने ज्याच्यासाठी पैसे ठेवले

पण स्वत:साठी घेण्याचे ज्याने निग्रहाने नाकारले तो पमाताईचा लाडका मक्या) व तिसरे ताटकेकुटुंबाच्या प्रत्येक बऱ्यावाईट घटनेचे साक्षी असलेले दादांचे दीर्घकालीन स्नेही श्री. दत्तात्रय प्रल्हाद कर्वे. ट्रस्ट रजिस्ट्रेशन करताना आणखी दोन नावे मुद्दाम मोकळी ठेवली गेली. (ट्रस्टवर ट्रस्टी घेण्याची तरतूद आहे.) हेतू हा की पुढेमागे कै. प्रमिलाच्या भावंडांपैकी कोणी राजी झालं तर त्यांचा समावेश करता यावा.

आज रुपयाची किंमत बदलत आहे. तरीसुद्धा ट्रस्ट स्थापन केला (१९६९-७०) तेव्हासुद्धा दहा हजार रुपये म्हणजे काही एखादी फार मोठी संस्था सुरू करता यावी एवढी मोठी रक्कम खचितच नव्हती. छोटा ओनामा म्हणून गरीब होतकरू मुलांना त्यांच्या परीक्षांचा निकाल बघून पंचवीस रुपयांची बक्षिसे देण्यास सुरुवात करण्यात आली. कै. प्रमिला किर्लोस्कर हिच्या स्मरणार्थ तिच्या मृत्युदिनी श्रद्धानंद महिलाश्रमास देणगी दिली जात असे. एक डिसेंबर १९६९ म्हणजे ट्रस्टच्या स्थापनेपासून ३१ मार्च १९७६ पर्यंतच्या काळात वार्षिक अहवालांप्रमाणे १३५-३६ बक्षिसे दिलेली आढळतात. पण ट्रस्टच्या कामाने खरी भरारी मारली ती 'स्पॉन्सरशिप' योजनेच्या अंमलबजावणीनंतरच. या स्पॉन्सरशिपला कारणीभूत झाली ती दादांची परदेशयात्रा.

अकरा युरोपियन देशांच्या दौऱ्यातून दादांना मुख्यत्वे जाणवले ते हे की तेथील पालक संपन्न आर्थिक परिस्थितीमुळे दत्तक मुले घेण्यास उत्सुक आहेत. दत्तक दिलेल्या मुलांचे पालनपोषण ते मायेने करतात. त्या मुलांची प्रगती पाहून दादांना समाधान वाटले. त्याही पुढे जाऊन काही पालक त्यांना दोनाहूनही अधिक मुलं दत्तक मागणारे भेटले. तशी तेथील देशांच्या कायद्यातून तरतूदही होती. मग दादांनी अशा पालकांना दोनहून अधिक मुलं दत्तक घेण्यातील त्रुटी समजावून सांगितल्या. मुलामुलांतील कलह, तुलना, मालमत्तेसाठीची भांडणे, दत्तक मुलांच्या मातापितरांना वृद्धापकाळी होऊ शकणारा संभाव्य त्रास वगैरे वगैरे.

त्यापेक्षा अशा पालकांनी आपल्याकडील धनसंपत्तीचा विनियोग तिसरे मूल दत्तक घेण्याऐवजी स्पॉन्सरशिप योजनेकडे केला तर ते उभयतांनाही


समाधानाचे होईल असे त्यांनी सुचविले. म्हणजे असं की गरीब व गरजू विद्यार्थ्यांना ठरावीक कालावधीपर्यंत ठरावीक रक्कम त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी द्यायची. हीसुद्धा मर्यादित अर्थाने दत्तक योजनाच! वाटल्यास शैक्षणिक दत्तक योजना म्हणा. दादांच्या कळकळीच्या समजावण्याने सर्वांना ही योजना आवडली. त्यांच्यापैकी अनेकांनी दादांचे कार्य भारतात येऊन प्रत्यक्षपणे बघितलेले असल्याने दादा स्वत:च पुढाकार घेऊन काम करणार असतील तर भरघोस आर्थिक साहाय्य करण्याचे कबूल केले. अशा प्रकारे श्री रामकृष्ण चॅरिटीज्च्या उपक्रमात एक नवीनच अध्याय उघडला गेला.

ही 'स्पॉन्सरशिप' योजना म्हणजे काय? शब्दकोशाप्रमाणे त्याचा अर्थ गॉडफादर किंवा गॉडमदर. मराठीत त्याला 'दत्तक पालक' योजना असे म्हटले जायचे. पण हा शब्द दादांना स्वत:ला खटकत होता. कारण यात 'दत्तकाचे'ही अधिकार नाहीत की 'पालकाचे'ही नाहीत. वाई येथील एका समारंभात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'अनुग्रहीत' हा शब्द सुचविला व दादांना तो एकदम मान्य झाला. प्राचीन काळात ऋषिमुनी चालवत असलेल्या आश्रमात शिक्षण घेणाऱ्यास 'अनुग्रहीत' असेच म्हटले जायचे.

स्कॉलरशिप व स्पॉन्सरशिपमध्ये फरक आहे. पहिल्या प्रकारात फक्त बुद्धिवान हुशार मुलांचा विचार होतो. मग तो कितीही धनवान का असेना? तर दुसऱ्या प्रकारात एखाद्या मुलाची म्हणजे त्याच्या कुटुंबाची कमी प्रतीची आर्थिक स्थिती हाच मुख्य निकष असतो. त्याचप्रमाणे दत्तक योजना व ही अनुग्रहीत योजना ह्यांत मोठा फरक आहे. पहिल्या योजनेत पालक मुलाचे संगोपन, शिक्षण, कायदेशीर वारसा हक्क देणे अशा जबाबदाऱ्या उचलतो तर दुसऱ्या योजनेत पालक मुलाच्या फक्त शिक्षणविषयक योजनेचीच जबाबदारी उचलतो. पालकाच्या स्थावर मालमत्तेशी मुलाचा काहीही संबंध येत नाही.

दादांनी परदेशांतील दौऱ्यात तेथील कुटुंबांना या स्पॉन्सरशिप योजनेची

## अपेक्षापूर्ती




अनुग्रहीत योजनेतील विद्यार्थिनी सुनिता म्हेत्रे
शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत ११ वी आली.

## स्वावलंबन



वाई येथील शिवण कामाचा वर्ग

## माळावर उभे राहिलेले विद्यामंदिर



श्री रामकृष्ण चॅरिटीज्च्या साहाय्याने
लोहोम येथील विद्यामंदिर उभे राहिले.

अमृत महोत्सवानिमित्त वाई येथे सन्मान



ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ जोशी यांच्या हस्ते दादांचा सत्कार
उजवीकडे खा. प्रतापराव भोसले व सौ. लीलाताई

कल्पना पटवून दिल्यानंतर पैशाचा ओघ सुरू झाला. आता ही योजना राबवायची कशी नि कुठे? या साऱ्या बाबींचा विचार दादांच्या मनात तयारच होता. कोणतीही योजना कार्यान्वित करण्यापूर्वी तिची सर्व बाजूंनी छाननी करण्याची, त्यातील बारीकसारीक तपशील तपासूनच पुढे जाण्याची एक शिस्तच दादांनी स्वत:ला लावून घेतली होती.

त्यांनी पाहिले की मोठ्या शहरांतून विशेषत – पुणे-मुंबईसारख्या शहरांत – शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांसाठी तशा सुविधा पुष्कळच प्रमाणात उपलब्ध असतात. अनेक सामाजिक व शैक्षणिक विश्वस्त संस्था असतात. मोठमोठ्या औद्योगिक कंपन्या अशा सुखसोयी पुरवितात. खेड्यापाड्यांतून मात्र अशा सुखसोयी अभावानेच आढळतात. दादांनी आपल्या लहानपणी दारिद्र्याचे चटके सोसले होते. कोठावळ्यांची स्कॉलरशिप आठवणीत होतीच. केवळ पैशाची सोय नाही म्हणून शिक्षणापासून वंचित राहणारे अनेक सखे व सोबती बघितले होते. मग त्यांच्या मनाने घेतले की ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाचा विचार करायचा तर आपल्या गावापासून का सुरुवात करू नये? त्यांनी या विचारातून प्रथमत: वाईची निवड केली. तेथील शाळाप्रमुखांची व शिक्षकांची भेट घेतली. त्यांना विश्वासात घेऊन योजना समजावून सांगितली. त्या सुमारास म्हणजे १९७५-७६ च्या सुमारास वाईमध्ये चार शाळा होत्या व सुमारे तीन हजारांवर विद्यार्थी होते.

या योजनेप्रमाणे प्रत्येक स्पॉन्सरर एका विद्यार्थ्यामागे प्रत्येक महिन्याला रु. ५०/- रामकृष्ण चॅरिटीजूला देतो. त्यांतील रु. ४०/- त्या विद्यार्थ्याला दिले जातात. रु. ५/- प्रशासकीय कामासाठी तर उरलेले रु. ५/- रिझर्व्ह फंडासाठी म्हणून वेगळे ठेवले जातात.

हे रु. ४०/- थेट त्या मुलाकडे व त्याच्या पालकाकडे जातात का? नाही. कारण सरळच आहे. आधी मुळात गरिबी, त्यामुळे असा पैसा हातात आला की तो घरकामासाठी वापरला जाण्याची शक्यता, त्याहून वाईट म्हणजे व्यसनासाठी खर्च होण्याची शक्यता.

म्हणून हे पैसे शाळेतील विद्यार्थ्यांच्या बचत योजनेत 'संचयिकेत' जमा होतात. मुलांना फक्त मुख्याध्यापकांच्या परवानगीनेच औषधे, वह्या, पुस्तके, पेन्सिली, फौंटन पेन्स, पादत्राणे, छत्री आदी सुयोग्य कारणांसाठीच पैसे काढता येतात. अर्थातच खरेदी केलेल्या वस्तूंची बिले शाळेत सादर करावी लागतात. (हल्ली ट्रस्टच अशा वस्तूंची घाऊक खरेदी करून त्यांचे वितरण करतो.)

या सर्व खर्चाचा तपशील विविध शाळांच्या मुख्याध्यापकांकडून मागवून ट्रस्टच्या ऑफिसमधून त्याची इंग्रजी स्टेटमेंट्स स्पॉन्सरर्सकडे स्मरणपूर्वक पाठविली जातात. अखेर या साऱ्या गरीब, होतकरू विद्यार्थ्यांचा तोच खरा हितचिंतक आहे. त्याच्या रूपाने परमेश्वरच या विद्यार्थ्यांचा वाली आहे ह्या वास्तवाचा दादांना कधीही विसर पडत नाही. म्हणून तर १९७६ नंतरचे सर्व वार्षिक अहवाल व ताळेबंद बारीकसारीक हिशेबांसह दादा इंग्रजीत छापतात. का तर सर्व परदेशस्थ स्पॉन्सरर्सना त्यांनी दिलेल्या पैशाचा योग्य रीतीने विनियोग होतो की नाही हे कळले पाहिजे.

या स्पॉन्सरशिपचा कालावधी सर्वसाधारणपणे पाचवीपासून तो विद्यार्थी एस्. एस्. सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करेपर्यंत असतो. त्याला वर नमूद केल्याप्रमाणे आर्थिक मदत देण्यात येते. एस्. एस्. सी. नंतर त्याने स्वयंपूर्ण व्हावे अशी अपेक्षा असते. काही अपवादात्मक विद्यार्थ्यांच्या बाबतीत १२ वीपर्यंत ही मदत दिली जाते. कधी कधी शालान्त परीक्षेनंतरही काही मुलांना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने एक-दीड वर्षापर्यंतचे अल्प मुदतीचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण करावयाचे असल्यास ट्रस्टतर्फे तशी व्यवस्था केली जाते. ह्याचा फायदा घेऊन बऱ्याच मुलांना टर्नर, फिटर, वेल्डिंग, सुतारकाम, शॉर्टहँड, टायपिंग, मुलींसाठी नर्सिंग, शिवणकाम वगैरे छोटे व्यावसायिक कोर्सेस पूर्ण करून या अफाट विश्वात स्वत:च्या पायांवर उभे राहायला मदत मिळते. शहरातील लोकांना सहसा कल्पना येणार नाही. पण ज्यांनी भारतातील खेडी, तेथील पराकोटीची दरिद्री अवस्था बघितली असेल त्यांनाच दादांनी ट्रस्टतर्फे दिलेल्या मदतीचा

केवढा मोठा आधार या ग्रामीण भागातील मुलांना आहे याची कल्पना येईल.

या विद्यार्थ्यांच्या निवडीबाबतही दादांनी काही निश्चित अशी मार्गदर्शक तत्त्वे स्वत:समोर ठेवली. या बाबतीत शाळाप्रमुखांशी केलेली सल्लामसलत फार उपयुक्त ठरली. साधारणपणे वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुक्यांतील २००० लोकवस्तीपेक्षा कमी वस्तीची गावे त्यांनी या योजनेसाठी निवडली. एका शाळेतून कमीत कमी २० व जास्तीत जास्त ४० एवढ्याच मुलांना या योजनेखाली अंतर्भूत करावयाचे. जास्तीत जास्त शाळांना लाभ मिळून योजना अधिकाधिक व्यापक व्हावी अशी कल्पना. हेतू हा की अशा छोट्या गावात बहुतेक सर्वजण एकमेकांना ओळखतात. त्यामुळे तेथील शिक्षकाला गरजू मुलांची, त्यांच्या पालकांच्या खऱ्याखुऱ्या आर्थिक स्थितीची कल्पना असते. उदाहरणार्थ, एखाद्या कुटुंबात एकाहून अधिक व्यक्ती कमावत्या असतील तर तो शिक्षक अशा कुटुंबापेक्षा ज्या कुटुंबात एकच व्यक्ती कमावती असेल अशा कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाला ट्रस्टच्या दृष्टिकोणातून अधिक प्राधान्य देईल. त्यानंतर त्या विद्यार्थ्याविषयी बाकीची माहिती गोळा करून तो शिक्षक एका विवक्षित तक्त्यात भरून ती माहिती ट्रस्टच्या ऑफिसकडे पाठवतो. त्या माहितीची छाननी करून त्या त्या मुलासाठी ट्रस्ट स्पॉन्सरर मिळवतो.

अशा स्पॉन्सरर्ससाठी दादांनी काही महत्त्वाच्या सूचना सुरुवातीपासूनच केलेल्या आढळतात. त्या अशा :

१. अनुग्रहीत विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही भेटी, पार्सले थेट त्यांच्या पत्त्यांवर पाठवू नयेत. कारण त्यामुळे निष्कारण कस्टमच्या कटकटी उद्भवतात.

२. त्याचप्रमाणे डॉलर्स, पौंड अथवा इतर प्रकारच्या चलनी नोटा विद्यार्थ्यांकडे थेट पाठवू नयेत. एक तर अशा नोटा पाठविणे हे येथील पोस्टखात्याच्या परदेशी विनियम नियमांच्या चौकटीत बसत नाही, खेरीज गहाळ होण्याचीही शक्यता असते.

३. ज्या काही देणग्या पालकांना पाठवायच्या असतील त्या त्यांनी ट्रस्टच्या नावेच पाठवाव्यात. ट्रस्ट रीतसर पालकांच्या नावे सदर देणग्या पाठविण्याची व्यवस्था करेल.

या सूचनांमागील हेतू स्पष्ट आहे. दिलेली देणगी ज्या त्या मुलाकडे व्यवस्थित पोहोचती व्हावी. देणगी / बक्षीस मिळाल्यावर तो मुलगा साहजिकच आनंदून जाईल. पुन्हा पुन्हा अशा भेटवस्तू मिळत राहाव्यात असे त्याला वाटले तर त्यात गैर काहीच नाही. पण त्या हव्यासाने त्याने तशी मागणी आपल्या परदेशी पालकाकडे थेट करणे चुकीचे होईल. त्यातून त्याला तशी चटक लागण्याचा संभवही नाकारता येत नाकही. म्हणून अशा अपप्रवृत्ती मुळातच टाळाव्यात याच सद्हेतूने सर्व देणग्यांची वितरणव्यवस्था ट्रस्टमार्फतच करण्याचा दंडक दादांनी सुरुवातीपासूनच घालून घेतला. मात्र याचा अर्थ असा नाही की मुलांनी आपल्या 'पालकांना' पत्रे लिहू नयेत. उलटपक्षी मुलांनी वेळोवेळी आपल्या पालकांना पत्रे लिहावीत, आपली प्रगती, ठळक घटना कळवाव्यात अशीच ट्रस्टची इच्छा असते; फक्त पत्रातून त्यांनी कोणत्याही वस्तूची मागणी करू नये अशी रास्त अपेक्षा असते.

ट्रस्ट पालकांना मुलांच्या प्रगतीविषयी, शैक्षणिक निकालांविषयी वेळोवेळी माहिती पुरवतो. पालकांनी आणखी मुले दत्तक ( शैक्षणिक विषयांपुरती ) घेण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्यांना आर्थिक अहवालासह योग्य मुलांची माहिती कळविली जाते.

१९७५ साली सुरू केलेली ही योजना एखाद्या बीजांकुराचा वृक्ष व्हावा तशी आता फोफावलेली आहे. प्रथमवर्षी या योजनेखाली केवळ २५ मुले होती ती आजमितीला म्हणजे मार्च १९९४ अखेरीच्या अहवालानुसार १८४८ च्या आसपास पोचली आहेत. म्हणजे एवढ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांना शैक्षणिक पालक लाभले आहेत. केवळ चौदा विद्यार्थ्यांना या योजनेचा सुरुवातीस लाभ मिळू लागला. आणि दहा वर्षांत म्हणजे १९८५ पर्यंत हा आकडा १००० च्या घरात गेला. आज म्हणजे १९९४ / ९५ या शैक्षणिक वर्षात ही संख्या १८४८ पर्यंत पोचली आहे.

स्पॉन्सरशिप योजना मार्गी लागली. परदेशी पालकांचा प्रतिसाद वाढू लागला. कामातील प्रगती बघण्यासाठी दादांच्या वाईला फेऱ्या सुरू झाल्या. १९७५ ला नोकरीतून निवृत्त झाल्यापासून श्रद्धानंद महिलाश्रमाचे काम बघता बघता ते रामकृष्ण चॅरिटीज्‌च्या कामात पूर्णपणे गुरफटून गेले. संत गाडगेबाबांनी म्हटल्याप्रमाणे ईश्वराने दिलेले आयुष्य भाड्याच्या तट्टूसारखे आहे. त्याच्याकडून सतत काम करून घेतले पाहिजे अशीच दादांची धारणा असावी. बालपणापासून एवढ्या कष्टांत आयुष्य घालविल्यानंतर निवृत्तीनंतर तरी त्यांनी इतर पेन्शनर लोकांसारखे जीवन व्यतीत करायला काहीच हरकत नव्हती. सुदैवाने मृणाल-मंगला या दोन्ही मुलींची लग्नं होऊन, मुलगा मकरंद पण डॉक्टरेट पूर्ण करण्याच्या मार्गावर होता. आराम करायचा दूरच पण स्पॉन्सरशिप योजनेमुळे दादांचे वैयक्तिक काम कितीतरी पटींनी निवृत्तीनंतर वाढले. वयाची साठी उलटून गेली तरी त्यांच्या उत्साहाचे कारंजे थुईथुई नाचत होते. नवीन नवीन कल्पना काढायच्या. त्यातून नव्या योजना राबवावयाच्या आणि त्या कामात स्वत:ला झोकून द्यायचे हा तर त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव झाला होता. एरवी रामकृष्ण चॅरिटीज्‌ची स्पॉन्सरशिप योजना चालू करून पुन्हा बालवाडीच्या (मॉंटेसरी स्कूल) फंदात पडायला दादांना कोणी सांगितले होते?

दादा असेच एकदा वाईला आलेले असताना गावाच्या बाहेर फिरण्यासाठी गेले. तेथे शेतांच्या बाजूला चिखलात तीन-चार वर्षांची किंवा त्याहून थोडी मोठी मुलं खेळत होती. त्यांच्या अंगावरच्या अपुऱ्या वस्त्रांतून त्यांच्या 'स्थिती' चे यथार्थ दर्शन होत होते. दादांनी मुलांना जवळ बोलाविले. संकोचाने म्हणा वा भीतीने म्हणा, पण मुलं काही जवळ येईनात. एकदोनदा असे झाल्यावर दादांनी युक्ती केली. एक दिवस खूप गोळ्या-चॉकलेट्स घेऊन ते गेले. त्या आमिषाने मुलं जवळ आली. तेव्हा दादांनी विचारले, 'का रे मुलांनो, तुमच्यापैकी शाळेला कोण कोण जाते?' मुले गप्प. त्यांच्या चेहऱ्यावर काही तरी 'नवीनच' ऐकल्याचा भाव होता.

'शाळा' हा शब्द त्यांच्या शब्दकोशात कुठला असायला? दादांनी त्यांना खाऊ दिला. दादांनी सांगितले म्हणून त्या मुलांनी आपल्या घरच्यांना बोलावले. त्यांना दादांनी विचारले, 'का रे बाबांनो, ह्या पोरांना शाळेत का नाही पाठवत? नुसतीच चिखलात खेळत पडलीत. ती चार अक्षरं तरी शिकतील.' तेव्हा त्या खेडुतांनी दिलेलं उत्तर दादांना बरंच काही सांगून गेलं. ती माणसं म्हणाली, 'दोन येळंला न्हाई पोटाला गोळा, कसली आलीया गरीबाला शाळा?'

झालं. त्या क्षणापासून दादांची नेहमीची 'अस्वस्थता' पुन्हा सुरू झाली. अनुग्रहीत योजनेखाली आपण शाळकरी मुलांसाठी काही करू शकलो. पण अजून शाळेचं वय व्हायचंय् अशा मुलांचं काय? आताच त्यांना शाळेची गोडी लागली पाहिजे. त्यांच्यासाठी आपल्याला काही करता येईल का? याच विचारांच्या तगमगीत केव्हा तरी त्यांना झोप लागली. नेहमीप्रमाणे पहाटे उठून पूजा, ध्यानधारणा वगैरे सर्व झाल्यावर दादा ओसरीवर आले. ताटक्यांचे वाईचे घर चांगले ऐसपैस आहे. अर्थात जुन्या पद्धतीचे. भली मोठी ओसरी आहे. या ओसरीकडे बघताच दादा मनाशी हसले. एकदम काही तरी कोडं सुटल्यासारखं त्यांना वाटलं. याच ओसरीवर लहान मुलांसाठी बालवाडी सुरू केली तर?

घर मोठे. मध्यन्तरीच्या काळात आई-वडील निवर्तले. बहिणी लग्ने होऊन सासरी गेल्या. तिघा भावंडांत दादा थोरले मुंबईला. एक भाऊ नारायण (नानू) नोकरीनिमित्त साताऱ्याला. तिसरा वसंता वाईत. भाऊंच्या वृद्धापकाळात तिघा भावांपैकी कोणी तरी एकाने त्यांच्याजवळ राहायचे असे आपसात ठरले होते. त्याप्रमाणे वसंता वाईतच स्थायिक झाला होता. त्याने तिथेच स्टेशनरीचे दुकान टाकले होते. तो दिवसा दुकानात. भावजय स्वयंपाकघरात किंवा माजघरात आपल्या कामात. ही ओसरी सोकळीच.

दादांनी भाऊ-भावजयींचा विचार घेतला. त्यांची संमती घेऊन

महिना रु. ३०/- भाडे ठरवून श्री रामकृष्ण चॅरिटीजतर्फे १ ऑगस्ट १९७९ रोजी लो. टिळकांच्या पुण्यतिथीला त्यांचे स्मरण करून ओसरीवर बालवाडी सुरू करण्यात आली. वेळ ठरली दुपारी १२ ते २. आता मुलांना शिकवायला कोणी पाहिजे. वाई गावातच शोध घेऊन दादांनी एक शिक्षिका नेमली. तिचा पगार मासिक रु. १००/-. मुलांना रोज दूध व एक खाद्यपदार्थ (पोहे, उपमा, खिचडी तर कधी पाव-बिस्किटे) देण्याचे ठरले.

परत मुंबईच्या वाटेवर असताना दादांनी पुण्यात थांबून एक फळा, खडू, लहान मुलांना उपयुक्त अशी खेळणी पाठवून दिली. ज्यांना शाळेचे दर्शन स्वप्नातही घडले नसते अशा गरीब कुटुंबांतील आणि मागासलेल्या वर्गातील मुलंच दादांनी मुद्दाम निवडली. संख्या मात्र ३० पर्यंतच मर्यादित ठेवावी लागली. रस्त्यात हुंदडणारी, चिखलात लोळणारी मुलं खाऊच्या आशेने का होईना, नियमित येऊ लागली. घरात 'कालवा' (आरडाओरडा) करणारी मुलं निदान काही वेळ तरी घराच्या बाहेर आणि चांगल्या ठिकाणी जात आहेत हे पाहून खेडूत पालक आनंदले. हळूहळू बालवाडी स्थिरावतेय, मुलं नियमितपणे येतात, रमतात हे पाहून दादांना आता बालवाडीसाठी कायमस्वरूपी जागेचे वेध लागले.

ताटक्यांच्या वाईच्या वडिलोपार्जित घराला लागून ४०'×५०' असा एक जमिनीचा पट्टा होता. ती जागा वापरात नसल्यामुळे त्यावर सदैव केरकचरा. त्याची साफसफाई करणे हेच एक मोठे काम. भाऊ हयात असताना दादांनी अशाच एका सामाजिक कार्याच्या निमित्ताने ती जागा मागितली होती. पण भाऊ नाही म्हणाले; कारण वाईच्या दादांच्या भावाचे दोन मुलगे शिकत होते. भविष्यकाळात त्यांना काही करावयाचे असल्यास जागा हाताशी असावी हा भाऊंचा सद्हेतू. पुढे नोकरीनिमित्ताने दोन्ही मुलगे वाई सोडून गेले. १९७८ मध्ये भाऊ आजारी झाल्यावर दादांना म्हणाले, 'मागे मी तुला जागा देण्यास नकार दिला होता. पण आता हवी तर घे. कारण आता कोणी या जागेचा उपयोग करीलसे वाटत नाही.'

भाऊंचे १९७८ च्या मे महिन्यात निधन झाल्यावर या जागेसाठी बाहेरील लोकांची मागणी येऊ लागली. वसंताने दादांना पत्राने विचारले की सदरहू जागा डॉ. देव ४००० रुपयांना मागत आहेत तेव्हा विकायची काय? दादांनी सविस्तर पत्र लिहून जागेला जास्तीत जास्ती किंमत किती मिळेल त्याची चौकशी करून कळवायला सांगितले. या किंमतीपेक्षा जास्ती किंमत येत नाही असे कळल्यावर दादांनी दोघा बंधूंची संमती घेऊन ही जागा स्वत:च श्री रामकृष्ण चॅरिटीजूसाठी विकत घेण्याचे ठरविले. मात्र पत्नीच्या नावे. हेतू हा की ताटक्यांची जागा ताटक्यांच्याकडेच राहावी. उपयोग सार्वजनिक कामासाठी करता यावा. किंमत देऊ केली रु. ४,५००/-. म्हणजे बाजारभावापेक्षा थोडी जास्तच. दादांच्या वैयक्तिक इच्छेनुसार त्यांनी जागा विकत घेण्यास आमची काहीच हरकत नाही असे दोन्ही बंधूंनी सांगितल्यावर दादांनी वाईचे त्यांचे स्नेही श्री. भा. द. प्रभुणे वकील यांना कायदेशीर खरेदीखत करण्यास सांगितले.

त्याप्रमाणे वडिलांच्या पश्चात या तिन्ही मालकांनी (बंधूंनी) वारसाहक्कानुसार रु. ४५००/- पैकी प्रत्येकाला रु. १५००/- मिळतील असे धरून ती जागा दादांच्या पत्नी सौ. इंदिराबाई ताटके (लीलाताईंचे कागदोपत्रीचे नाव) यांच्या नावे खरेदी केली. रजिस्ट्रारपुढे खरेदीपत्रावर सही करताना दोन्ही भावांना दादांनी त्यांच्या हिश्श्याचे रु. १५००/- प्रत्येकी असे रु. ३०००/- दिले. दादांनी स्वत:च्या वाट्याचे १५००/- बक्षीसपत्र करून पत्नीस दिले. म्हणजेच दादांच्या खिशातून प्रत्यक्षात असे रु. तीन हजारच गेले. जागा पुन्हा ताटक्यांकडेच राहिली. मग हीच जागा दादांनी श्री रामकृष्ण चॅरिटीजूला इमारत बांधण्याकरिता ३० वर्षांच्या कराराने रु. ४०/- मासिक भाडे ठरवून दिली. प्रत्यक्षात न भरलेल्या रु. १५००/- वर जागेची मालकी, त्यावर दरमहा रु. ४०/- प्रमाणे वार्षिक रु. ४८०/- ची वैयक्तिक उत्पन्नाची सौ. लीलाताईंची मिळकत झाली. अर्थात असे पैसे घेणे दोघांच्याही स्वभावाशी सुसंगत नसल्याने हे रु. ४८०/- सौ. लीलाताईंच्या इच्छेनुसार निरनिराळ्या संस्थांना देणगीदाखल दिले जातात.

जागा रीतसर ताब्यात आली. चॅरिटी कमिशनरची परवानगी मिळाली. ९ डिसेंबर १९७९ रोजी थाटात भूमिपूजन झाले. परकीय मदतीचा

ओघ होताच. आता लवकरच स्वत:च्या वास्तूत जाण्याची स्वप्ने दादा बघू लागले. पण सत्य आणि स्वप्न यांच्यामध्ये प्रचंड भिंत उभी असल्याचे दादांना आढळले. भिंत होती अक्षरश: सिमेंटची!

सरकारी लाल फितीचा दादांना अनुभव नव्हता असं नाही; पण या बालवाडीच्या बिल्डिंगच्या कामात इतका कमी होता की त्या 'कोट्याप्रमाणे' दादा बिल्डिंग बांधत बसले असते तर बालवाडीची मुलं हायस्कूल-प्रवेशाच्या उंबरठ्यावर त्यांना दिसली असती! त्याशिवाय भला मोठा खर्चाचा डोंगर! कारण कामाच्या दिरंगाईने मजुरी आणि तत्सम खर्चात तेवढी वाढ झाली असती. बालवाडीच्या इमारतीसाठी साधे आठशे पोती सिमेंट आणि तेसुद्धा युनोने जाहीर केलेल्या आंतरराष्ट्रीय बालक-वर्षात मिळू नये ह्याचे दादांना परमावधीचे वैषम्य वाटले. परदेशातून रामकृष्ण चॅरिटीज्‌चे काम बघण्यासाठी आलेली नॉर्वे-हॉलंडची मंडळी हा प्रकार बघून हतबुद्धच झाली. ती मंडळी म्हणाली, 'मि. ताटके, असल्या उदात्त (Noble) कामासाठी आम्ही रोज १०० सिमेंटची पोती दिली असती!"

तरी पण दादांची धावपळ चालू होतीच. सर्व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून हे बांधकाम वैयक्तिक नाही तर सार्वजनिक आहे; गोरगरिबांच्या मुलांसाठी आहे वगैरे परोपरीने समजावून सांगितले, तेव्हा नोकरशाहीने खूप मोठी दया दाखविली. सिमेंट उचलायची अखेर परवानगी मिळाली. पण कोठून? लांब मद्रासवरून! करणार काय? गरजवंताला अक्कल नसते. अखेर मद्रासच्या फॅक्टरीतून सरकारी परवान्याने एक ट्रक सिमेंट आणता आले.

बालवाडीच्या मूळ आराखड्यानुसार एकूण एक लाख रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित होता. पण दूर अंतरावरून आणावे लागलेले सिमेंट, त्यामुळे वाढलेला वाहतुकीचा, मजुरीचा खर्च यामुळे एकूण खर्च मारुतीच्या शेपटीसारखा लांबतच गेला. रामकृष्ण ट्रस्टकडे या कामासाठी रु. ५० हजार खर्च करण्याची ऐपत होती. बाकीची रक्कम दी नेरेलकिंड्रन नेदरलँड्स व अॅडाप्शन जॉन फोरम् या संस्थांकडून मिळायची होती. या कामासाठी दादांची झालेली परवड, मन:स्ताप ह्या सर्वांची जाणीव या परदेशातील

संस्थांना होती. या संस्थांचे हिंदुस्थानातील प्रतिनिधी १) मिसेस् ॲनी कूट डी विट् व मि. पीटर झ्युडेमा (नेदरलँड्स), २) मि. टॉरिल ज्युव्हेट हर्मनसन व मि. टार्केल मो ॲंडाप्शफोरम (नॉर्वे), ३) मि. जॉन कॅरिसन (स्वीडन) असे होते. (यांची मदत नंतर मुलांच्या पार्ककरिता घेतली होती.)

या सर्व प्रतिनिधींशी दादांची मुंबईत बोलणी झाली. ही सर्व मंडळी वाईला जाऊन आली. जातीने त्यांनी बांधकामासहित सर्व पाहणी केली, नंतर त्यांनी आपापल्या देशातील संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना अहवाल सादर केले. मि. ताटक्यांनी एक चांगले सामाजिक काम अंगावर घेतले आहे, त्यांना पैसा अपुरा पडू नये अशी आग्रहाची शिफारस केली.

दादांच्या परदेशदौऱ्यात त्या त्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी दादांची ओळख होतीच. त्यांना दादांच्या कामाचे कौतुक होते. त्यात त्या संस्थांच्या प्रतिनिधींचे शिफारसवजा अहवालही त्यांना मिळाले. त्यामुळे दादांना पुरेशी आर्थिक मदत मिळाली. बांधकाम ज़ोरात होऊ लागले. अखेर गंगेत घोडे न्हाले! बालवाडी स्वत:च्या वास्तूत स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर म्हणजे १५ ऑगस्ट १९८० पासून भरू लागली.

बालवाडीतील मुलांना आता युनिफॉर्मपण देण्यात आला. औषधे, पौष्टिक आहार वगैरेची सोय ट्रस्टतर्फेच केली जाते. या बालवाडीतील मोठी झालेली मुलं आजूबाजूच्या शाळांतून शिक्षणासाठी पाठविली जातात. या मुलांची वैद्यकीय तपासणी वेळोवेळी केली जाते. सुदैवाने अशी तपासणी करणारे बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रभुणे स्वत:च बालवाडीच्या मॅनेजिंग कमिटीवर होते. वाई गावातील पाच नागरिकांची कमिटी बनवली व तिच्या मार्फतच बालवाडीचा दैनंदिन कारभार बघितला! या स्थानिक समितीचे त्या वेळचे सदस्य असे-

१. डॉ. ए. व्ही. प्रभुणे - चेअरमन
२. श्री. बाबासाहेब पटवर्धन - सदस्य
३. श्री. अनिल जोशी - सदस्य
४. सौ. पूर्वा प्रभुणे - सदस्य
५. श्री. सुरेन्द्र ताटके - मानद सचिव

श्रीमती शैलजा कोठावळे यांनी वाई येथे सुरू करण्यात आलेल्या शिवणवर्गाचे काम अत्यंत निष्ठेने पाहिले होते. त्याचप्रमाणे भा. द. प्रभुणे यांनी कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहिले.

दादांना स्पॉन्सरशिप योजना कार्यान्वित करायला जो त्रास झाला त्यापेक्षा कितीतरी अधिक कष्ट या बालवाडीच्या उभारणीसाठी पडले. पण ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड!

## शिवणवर्ग

नव्या वास्तूत बालवाडी सकाळी १० ते दुपारी २॥ या वेळात भरायची. उरलेल्या वेळेत या जागेचे काय करायचे? एवढी सोन्यासारखी जागा, तिचा आणखी काही तरी सदुपयोग नको का व्हायला? श्रद्धानंद महिलाश्रमात अनेक प्रकारचे प्रकल्प राबविणारे दादा स्वस्थ थोडेच बसणार? दादांनी विचार करून बालवाडीच्या वेळेखेरीजच्या इतर वेळेत मग शिवणवर्ग सुरू केले. गरीब घरांतील गरजू स्त्रियांना शिवणकाम, विणकाम, भरतकाम शिकविण्यासाठी एका प्रशिक्षित शिक्षिकेची योजना केली. पाच नवी कोरी शिवणयंत्रे खरेदी केली. या शिक्षणासाठी फी तर नाहीच. उलट शिवणदोऱ्यांची रिळे, सुया, कात्र्या इत्यादी आवश्यक सामग्री पुरविली जाते. श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌तर्फे ट्रस्टने नेमून दिलेला अभ्यासक्रम पुरा करून त्यानुसार घेतलेल्या परीक्षेत पास होणाऱ्या स्त्रियांना ट्रस्टतर्फे सर्टिफिकेट दिले जाते. मार्च ९४ अखेर सुमारे २५० महिलांनी अशा तऱ्हेने ट्रस्टचा अभ्यासक्रम पुरा केला आहे. शिवणकाम शिकायचे, कपडे शिवून विकायचे. दादांनी वाई आणि परिसरातील गरजू स्त्रियांना जणू Learn and Earn चा वस्तुपाठच घालून दिला.



## १८.

### वेलीचा वटवृक्ष

मुळात ५ हजाराच्या 'निधी' वर सुरू केलेला हा श्री रामकृष्ण चॅरिटीज् ट्रस्ट लाखांच्या उलाढाली करत आहे. जगात सगळी सोंगे आणता येतात, पण पैशाचे आणता येत नाही. मात्र चांगल्या कार्याला पैसा कधीच अपुरा पडत नाही हे दादांचे अनुभवसिद्ध मत आहे. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इत्यादी देशांतील संस्थांकडून दादांनी आपले कर्तृत्व सिद्ध करून देणग्या मिळविल्या. त्यातील पै अन् पैचा हिशेब चोखपणे दाखविला. नंतर येथील संस्थांकडून / व्यक्तींकडून देणग्या येऊ लागल्या तरी परदेशी राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर पैसा येत असल्याने त्यांना संस्थेविषयीची सर्व माहिती मिळावी या सद्हेतूने आणि आग्रहाने दादांनी श्री रामकृष्ण चॅरिटीज्चे वार्षिक अहवाल सुरुवातीला मराठीतून छापले जात ते इंग्रजीत छापायला सुरुवात केली. Seeing is believing हे दादांनी अंगीकारलेले तत्त्व आहे.

श्रद्धानंद महिलाश्रम असो वा श्री रामकृष्ण चॅरिटीज् असो, जो जो देणगीदार असतो त्याला संस्था प्रत्यक्ष पाहण्याचा आग्रह दादा नेहमी करतात. जेव्हा देणगीदार येतो तेव्हा हातचे काही न राखता दादा प्रत्येक बारीकसारीक बाब त्या माणसाला समजावून सांगतात. त्यामुळे आपण दिलेलं 'दान' हे खरोखरच 'सत्पात्री' आहे ह्याची त्याला खात्री पटते. आवर्जून मदत करावी असं हे ठिकाण आहे या वस्तुस्थितीचा मनी विश्वास बाळगूनच तो परत जातो. कदाचित

परत गेल्यावर आणखी इतर कोणाला अशा संस्थांची माहिती सांगतो. आपसूकच त्यामुळे देणग्यांचा ओघ चालू राहतो.

दादांनी १९७३ आणि १९७५ च्या परदेशदौऱ्यांत नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क आदी पाश्चिमात्य देशांतील सेवाभावी संस्था जिंकून घेतल्या. He came, he saw, he conqured अशा ज्युलियस सीझरच्या आवेशात तेथील लोकांची मने दादांनी जिंकली. वेळप्रसंगी हे परदेशी पाहुणे आवर्जून भारतात येऊ लागले. जगाच्या काय पण भारताच्या नकाशावरसुद्धा न दिसणारं वाई गाव शोधू लागले. प्रत्यक्ष दादांबरोबर हिंडून दादांचे काम बघू लागले.

परदेशी पाहुण्यांचा प्रवास कधी सुखाचा नसायचा. वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुका म्हणजे डोंगराळ मुलूख. धड रस्ते नाहीत की प्रवासाच्या सुविधा नाहीत. सुरवातीला तर वाई गावात वेस्टर्न स्टाईल टॉयलेट्सची सोय नसल्याने सगळीकडे हिंडून घाईघाईने पांचगणी-महाबळेश्वरातील हॉटेलांत मुक्कामासाठी परतावे लागे. दादांनी या अडचणींवर मात करण्यासाठी बालवाडीला लागूनच एक सुसज्ज ब्लॉक बांधून घेतला. वेस्टर्न टॉयलेट, वॉशबेसीन, गिझर अशा सर्व अद्ययावत सोयी त्यात करून घेतल्या. त्यामुळे परदेशी पाहुण्यांची सरबराई आता चांगल्या प्रकारे करता येते. या ब्लॉकचा उपयोग परदेशी पाहुणे वा महत्त्वाच्या व्यक्तींसाठीच करायचा असा दंडकच दादांनी घालून दिला आहे.

नित्यनेमाने असे परदेशी पाहुणे आवर्जून येतात. खाचखळग्यांतून, प्रसंगी चिखलातून चालतात. खेड्यातील अनुग्रहीत विद्यार्थ्यांच्या झोपड्यांतून वाकून जातात. पाश्चात्त्य पोशाखांमुळे त्यांची नि विशेषत: स्त्रियांची, झोपडीत ओसरीवर बसताना किती पंचाईत होत असेल? पण दादांवरील श्रद्धेमुळे कोणताही अनमान न करता ही मंडळी सर्वत्र जातात. गरीब मुलांची, त्यांच्या पालकांची आणि एकूण परिस्थितीची जातीने माहिती करून घेतात. बालवाडीतील मुलांचे खेळ, नाच, गाणी बघतात. मिसेस् अँडरसन ह्या स्वीडनमधील बाई तर एवढ्या प्रभावित झाल्या, विशेषत: शिवणक्लास व शिवलेले कपडे पाहून, की त्यांनी डोक्याला घालायच्या ५० माकडटोप्यांची (Head-tops) ऑर्डर दिली. दोन दिवसांचा दौरा

आटोपून परत जाताना त्या टोप्या त्यांना मिळाल्यादेखील. परदेशात गेल्यावर आवर्जून त्यांनी दादांना पत्र टाकले आणि सर्व उपक्रमाची मुक्त कंठाने स्तुती केली.

जसजशी या चांगल्या कार्याची प्रचीती अनुभवाने लोकांना येऊ लागली तसतशी स्पॉन्सरर्स-शैक्षणिक पालक यांची संख्या पण वाढू लागली. परदेशांतून देणग्यांचा ओघ वाढला. सध्याचे ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अरुण किर्लोस्कर (जिच्यामुळे ट्रस्टची स्थापना झाली त्या कै. प्रमिला किर्लोस्करचे बंधू) यांच्यामुळे तर अमेरिकेतील कमिन्स इंजिन (Cummins) कंपनीने दहा हजार डॉलर्सची (म्हणजे त्यावेळच्या एक लाख पंचाऐंशी हजार रुपयांची) भरघोस देणगी दिली आहे. अजून काही वर्षे अशी देणगी देण्याचा त्या कंपनीचा इरादा आहे. त्या देणगीतून 'कमिन्स पारितोषिक योजना' सुरू करण्यात आली.

ही योजना १९८९-९० च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आली असून या योजनेअंतर्गत सुरुवातीला १०० मुले निवडण्यात आली असून या मुलांची दहावीपर्यंतच्या शिक्षणाची, कपडेलत्ते, औषधपाणी आदी सर्व बाबींची संपूर्ण जबाबदारी ह्या संस्थेमार्फत घेतली जाणार आहे. वाई आणि खंडाळा तालुक्यांतून जास्तीत जास्त– किमान शंभर– मुले घ्यायची आहेत.

परदेशांतून देणग्यांची संख्या वाढतेय तशी इथल्या संस्था / व्यक्ती आधिकाधिक संख्येने मदतीचा हात देण्यासाठी आपणहून पुढे येत आहेत. संस्थेचा राखीव निधी–कॉर्पस– एवढा 'सशक्त' झाला आहे की कोणाच्याही मदतीवाचून दोन हजार मुलांची सोय ट्रस्ट दर वर्षीच्या व्याजातून करू शकतो. 'देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी' अशी आता अवस्था झाली आहे. 'दुबळी' म्हणण्याचे कारण इतकेच की ट्रस्टचा कारभार आहे त्याच कार्यक्षमतेने चालावा ह्या सदिच्छेने स्पॉन्सर्ड अनुग्रहीत मुलांची संख्या दोन हजाराच्या पुढे न्यायची नाही असा धोरणात्मक निर्णय संस्थेने घेतला आहे. अधिक व्याप्ती वाढवून संस्थेचे आजवर झालेले नाव व कार्यकुशलता यांचा (Reputation & Efficiency) समतोल बिघडू नये हाच मुख्य हेतू. उगाच मिळते म्हणून घ्यायचे असा दृष्टिकोण दादांचा कधीच नव्हता.

वयाची ७५ वर्षे झाल्यावर दादांनी आपणहून स्वत:च्या जबाबदाऱ्या कमी करण्यास सुरुवात केली. दादांच्या माटुंग्याच्या जागेत असलेले संस्थेचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह व रजिस्टर्ड अशी दोन्ही ऑफिसेस पुण्यात हलविण्यात आली. संस्थेचे स्वत:चे ऑफिस तेथे उघडण्यात आले आहे.

श्री रामकृष्ण चॅरिटीज् या संस्थेची सर्व प्रकारची जबाबदारी आता पुण्यातील सर्वश्री अरुण किर्लोस्कर (अध्यक्ष व विश्वस्त), डॉ. मकरंद ताटके (डोंबिवली), श्री. ए. डी. काळे (विश्वस्त), श्री. ज्ञानेश्वर आगाशे व श्री. श्रीनिवास गोखले (विश्वस्त व खजिनदार) यांच्याकडे असून अलीकडच्या काही वर्षांत या संस्थेने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यांमध्ये कमिन्स स्कॉलरशिप या योजनेअंतर्गत खंडाळा व वाई तालुक्यांतील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविले जात असून अनुग्रहीत विद्यार्थी योजनेत वाई, खंडाळा व महाबळेश्वर तालुक्यांतील माध्यमिक विद्यालये समाविष्ट करण्यात आली आहेत. १९७६ पासून सुरू झालेल्या या अनुग्रहीत योजनेत ९४ मार्च अखेर हजारो विद्यार्थी लाभ घेऊ शकले. १९९० पासून सुरू करण्यात आलेल्या कमिन्स गुणवत्ता पारितोषिक योजनेअंतर्गत ३७ विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतरच्या शिक्षणासाठी अर्थसाहाय्य मिळाले आहे. श्री रामकृष्ण चॅरिटीज् या संस्थेने इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, गणित या विषयांच्या मार्गदर्शनासाठी उन्हाळी वर्ग चालविले; तर १९८० पासून संस्थेच्या वाई येथील बालवाडीच्या सुमारे ५०० बालकांना शिक्षणाचा आरंभ करता आला. वाई येथील मतिमंद मुलांच्या अक्षर इन्स्टिट्यूट या संस्थेस सकस आहार योजनेसाठी साहाय्य करण्यात आले असून अनुग्रहीत विद्यार्थी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या निवडक शाळांतील इंग्रजी व संस्कृत विषयांच्या शिक्षकांना उद्‌बोधन वर्गाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येत असून १९८० पासून वाई येथे गरजू महिलांसाठी मोफत शिवणकामाचा वर्ग चालविण्यात येत आहे. श्री रामकृष्ण चॅरिटीज् या संस्थेच्या कार्याची धुरा यशस्वीपणे सांभाळण्यासाठी दादासाहेबांचे मार्गदर्शन या संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त म्हणून लाभत आहे.

आपल्या समाजात दारिद्र्याबद्दल, शैक्षणिक अनास्थेबद्दल नुसती कोरडी

सहानुभूती (Lip sympathy) दाखविणाऱ्या समाजसुधारकांची वा व्यासपीठावरून समाजप्रबोधन (?) करणाऱ्या विचारवंतांची कधीच वाण पडली नाही. लंब्याचौड्या पोकळ नि सवंग घोषणा करून टाळ्या मिळवायच्या, स्वत:च्या मुलांना इंग्रजी शाळांतून पाठवायचे, मोठ्या डोनेशन्स भरून त्यांची शिक्षणे करायची, त्यांना परदेशी पाठवायचे. समाजाचे जाऊ दे, आपल्याच घरातील गडी-माणसं, मोलकरणी ह्यांची मुलं काय करतात? त्यांना शिक्षण घ्यायला मिळते की नाही? कोणती आर्थिक अडचण त्यांच्या मार्गात आडवी आली आहे? अशा बाबींची यत्किंचितही चौकशी करायची नाही. असले पोकळ पुढारी काय कामाचे? स्वातंत्र्योत्तर काळात समाजकारण पार बाजूला जाऊन पडलंय. जो तो सत्तेच्या राजकारणात गुंतून पडलाय. अशा सामाजिक नैराश्याच्या काळात दादांसारखा एक सामाजिक 'कणव' असणारा माणूस– आर्थिक दृष्ट्या सामान्य परिस्थितीतील माणूस– एकाकी अवस्थेत केवढे प्रचंड कार्य करून जातो त्याचे 'श्री रामकृष्ण चॅरिटीज्' हे एक बोलके उदाहरण आहे. दारिद्र्याच्या महासागरावर आपल्या परीने 'सेतू' बांधून त्यावरून लहानलहान मुलांना बोटाला धरून पैलतीरावरील शिक्षणमंदिरात पोचविण्याचे काम ते निरपेक्ष बुद्धीने करत आले आहेत.

सत्कार करून घेणे हे दादांना मुलीला सासरी पाठवण्यापेक्षा अधिक अवघड वाटते. वेळोवेळी त्यांनी असे सत्कार टाळले. पण ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्याचा मनोदय वाई परिसरातील त्यांच्या चाहत्यांनी व्यक्त केला तेव्हा त्याला नकार देणे दादांना जमले नाही. आपल्या गावासाठी आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीतील दीनदुबळ्यांसाठी धडपडणाऱ्या आणि त्यामुळे वाई गावाला भूषण ठरलेल्या दादांचा सत्कार करण्यासाठी वाई नगरपालिका, वाई, खंडाळा, महाबळेश्वर भागांतील शाळा आणि प्रमुख नागरिकांनी एक 'दादासाहेब ताटके अमृतमहोत्सव समिती' स्थापन केली. दि. १३ फेब्रुवारी १९९१ रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शुभहस्ते व खासदार प्रतापराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दादांचा भव्य असा सत्कार करण्यात आला.

वाई नगरपालिकेतर्फे त्यांना मानपत्र देण्यात आले. या समारंभात सर्वच

वक्त्यांनी, विशेषत: ग्रामीण भागातील पुढाऱ्यांनी दादांच्या कार्याची उत्स्फूर्त पोच दिली. नुसती शेळ्या-मेंढरांमागे, डुकरांमागे दगड मारीत, उनाडक्या करत धावणारी मुले, चिखलमातीत लोळणारी मुले, सुरेख स्वच्छ गणवेशात शाळेत जातात, येस्-फेस् करीत इंग्रजीत बोलतात, आपल्या अडाणी आईवडिलांना वर्तमानपत्र वाचून दाखवितात, नव्या बदलत्या जगाची माहिती सांगतात हे बघून वाई खोऱ्यातील दुर्गम भागात राहणाऱ्या खेडुतांना केवढी धन्यता वाटली असेल? या वेळी समारंभात बोलताना ज्ञानयोगी लक्ष्मणशास्त्रींनी उच्चारलेले एक वाक्य दादांच्या कार्याची सहज एक झलक दाखवून देते. दादांच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन करता करता तर्कतीर्थ म्हणाले होते, 'शेळीमागे धावणारी मुलं आज दादांमुळेच शाळेमागे धावू लागली आहेत.' खरोखरच केवढी क्रांतिकारक घटना आहे! तर्कतीर्थांनी दादांचा सत्कार करताना, 'एका देवमाणसाचीच पूजा आपल्या हातून होत असल्याची भावना' व्यक्त केली तेव्हा प्रत्येक उपस्थिताला आपल्याच मनातील भावना बोलली गेली असं वाटून गहिवरून आलं!

आजमितीस वाई, खंडाळा व महाबळेश्वर या सातारा जिल्ह्याच्या तालुक्यांतून तर मिरज, सांगली, सातारा, डोंबिवली इत्यादी भागांत तुरळक प्रमाणात अशा गावांतील शाळांतून सुमारे दोन हजारांवर गरीब होतकरू विद्यार्थी या अनुग्रहीत योजनेचा फायदा घेत आहेत. शेकडो विद्यार्थी याचा लाभ घेऊन आपल्या पायावर उभे राहून स्वाभिमानाने जगत आहेत. याच योजनेखाली शिकून मोठा झालेला खंडाळा तालुक्यातील राजू संपत भिसे, त्याच तालुक्यातील पंचक्रोशी विद्यालय, जवळे-लोहोम ह्या ठिकाणी कला-शिक्षक म्हणून काम करीत आहे. कुमारी सुनीता म्हेत्रे ही मुलगी एस्. एस्. सी. ला गुणवत्ता यादीत आली. संस्थेच्या आर्थिक सहकार्याने एम्. एस्सी झाली. विनायक पुराणिक हा विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या बी. एस्सी. परीक्षेत फर्स्ट क्लास फर्स्ट आला. अशा मनाला उमेद देणाऱ्या उत्साहवर्धक घटना पाहून दादांच्या मनाला किती सात्त्विक समाधान वाटत असेल?

इतकं करून दादांची भूमिका 'उरलो उपकारापुरता' अशीच आहे.

भगवद्‌गीता प्रत्यक्षात जगत असलेल्या ह्या कर्मयोग्याला कोणत्याही फळाची स्वत:साठी अपेक्षा नाही. परतफेडीची इच्छा नाही. अगदी असलीच तर एवढीच, की 'तुम्हाला कुणी तरी मदतीचा हात दिला, त्याला स्मरून तुम्ही कोणा तरी गरजवंताला यथाशक्ति मदत करा. समाजात त्याला सन्मानाने जगण्यास साहाय्य करा!'

'दीप से दीप जलाते चलो!'

कै. प्रमिला किर्लोस्कर ही दादांची मानसकन्या. म्हणजे एक प्रकारे दादा तिचे स्पॉन्सररच. तिने नकळत 'गुरुदक्षिणा' दिली. त्यातून निर्माण झालेल्या श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌ने आणखी हजारो 'स्पॉन्सरर्स'ना जन्म दिला!

खरंच, तिच्या स्मृतीला किती विलक्षण, उच्च कोटीची ही श्रद्धांजली.



## ११.

दिनांक ४ ऑगस्ट १९७५. दादांच्या आयुष्यातील नोकरीचा म्हणून हा अखेरचा दिवस. २० जून १९३४ रोजी दादा नशीब काढण्यासाठी म्हणून मुंबईत आले. उच्च महाविद्यालयीन शिक्षण घ्यायची हौस विपरीत परिस्थितीबरोबर कराव्या लागलेल्या झगड्यामुळे अपुरी राहिली. चाळीस-एकेचाळीस वर्षे खडतर कष्ट संसारासाठी उपसल्यावर एखादे छोटेसे घरकुल बांधून राहावे वा वाईसारख्या शांत ठिकाणी जाऊन निवांतपणे राहावे अशी इच्छा कोणत्याही सर्वसामान्य माणसाला झाली असती. पण स्वत:चे नशीब काढण्यासाठी म्हणून मुंबईत आलेल्या या सद्गृहस्थाला स्वत:चे असे वेगळे अस्तित्वच आता उरलेले नव्हते. अनेकांची नशिबे उजळविण्यासाठी आणि आयुष्यभर ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले असते, अशा हजारो निराधार बालकांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जणू नियतीने त्यांची योजना केली होती. दादांचे अस्तित्व या साऱ्यांच्या जीवनप्रवाहाबरोबरच बांधले गेले.

नोकरीचा शेवटचा दिवस पार पडल्यावर दादांनी अर्थार्जनासाठी म्हणून पुन्हा नोकरी केली नाही. सांसारिक गरजांसाठी म्हणून स्वत:ला ४०-४२ वर्षे राबविले; पण पैसा मिळावा, अधिक पैसा मिळवावा, छान सुसज्ज ब्लॉक घ्यावा, एखादे वाहन घ्यावे असे विचार त्यांच्या मनाला कधी शिवलेच नाहीत. ज्या माटुंग्याच्या भाटवडेकर बिल्डिंगमधील दोन खोल्यांत १ जानेवारी १९३७ रोजी त्यांनी संसाराला सुरुवात केली तिथेच आणि त्याच दोन खोल्यांत गेली पन्नास-पंचावन्न वर्षे ते निष्ठेने राहात आहेत.

ऐहिक प्रगती ही अशी. या दोन खोल्यांच्या घरात वेळेला दहा-दहा, पंधरा-पंधरा माणसं राहून गेली. मोठमोठे डॉक्टर्स, वकील, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, महापौर, मंत्रिमहोदयांपर्यंत अनेक नामवंत या घरात अनेकवार येऊन गेले. दादांना कधी आपल्या राहणीची खंत वाटली नाही. बड्या लोकांचे स्वागत करायचे म्हणजे आपणही बड्या घरात राहायला हवं असं त्यांना कधीच वाटलं नाही. किंवा अशा व्ही. आय. पी. पुढे आपली साधी चटई - सतरंजी पसरताना संकोच वाटला नाही. कारण त्यांचे कार्यच एवढे 'श्रीमंत' होते की त्यापुढे या आगत-स्वागताच्या साऱ्या गोष्टी गौण होत्या. येणारा माणूसही याच 'श्रीमंती'पुढे लीन होऊन यायचा!

या साऱ्या प्रकारात खरं कौतुक करायला हवं ते सौ. लीलाताईंचे. त्यांना वाटे, पुरुष म्हटला की त्याला विडी-काडी, पान-तंबाखू, सुपारी, सिगारेट असे कसले ना कसले तरी व्यसन असतेच. मग आपला नवरा असा कसा? समाजसेवा हे एकच व्यसन. कधीही न सुटणारे! संसाराला सुरुवात केल्यावर काही दिवसांतच लीलाताईंना आपल्या यजमानांचा वेगळेपणा जाणवला. आवडला. त्या स्वत:ही त्यात रमून गेल्या. कोणत्या दाग-दागिन्यांची हौसमौज, मोठ्या वेल-फर्निश्ड ब्लॉकची अपेक्षा अशा गोष्टी त्यांच्या मनात आल्याच नसतील असे कसे म्हणावे? पण आपल्या पतीची एकूण प्रवृत्ती बघितल्यावर कोणत्याही बाह्य डामडौलाचा स्पर्शही त्यांच्या मनाला भावला नाही! आपला पती समाजकार्यात एवढा गुंतून पडलाय, तर निदान घरच्या आघाडीवर त्याचा वळ खर्ची पडू नये ह्याची त्या अधिकाधिक काळजी घेऊ लागल्या.

घरी येणारे लोक, त्यांचे आगत-स्वागत, त्यांचे निरोप घेणे, ठेवणे ह्या गोष्टी त्यांच्या अंगवळणी पडल्या होत्याच; पण वेळप्रसंगी गरजेपोटी एखादी अनाथ स्त्री, बेघर मुलगी इतर व्यवस्था होईपर्यंत स्वत:च्याच घरी ठेवावी लागे. थोडक्यात, त्यांनी दादांची समाजसेवा म्हणजे कधी लष्करच्या भाकऱ्या भाजणे असे मानलेच नाही. दुधात खडीसाखर विरघळावी इतक्या नैसर्गिकपणे त्या दादांच्या सर्व कामांत मिसळून गेल्या.

त्यांना दादांबरोबर आश्रमातील मुलींच्या विवाहप्रसंगी कन्यादानास बसावे लागे. कारण अनाथ मुलींना कुठले माय-बाप? दादा आणि लीलाताईच अशा मुलींची माता-पितरे. एक कन्या खानदेश भागातील होती. तिकडच्या विशिष्ट परंपरेनुसार लग्नाच्या वरातीच्या वेळी नवऱ्यामुलीच्या आईने, नवऱ्यामुलाचा पोशाख-कपडे– अगदी जोड्यांसहित– एका मोठ्या परातीमध्ये घालून आपल्या डोक्यावर घेऊन चालायचे असते. तेव्हा अशा प्रसंगी लीलाताई हा सर्व जामानिमा आपल्या डोक्यावर घेऊन चालल्या. ते कन्यादान पार पडले! अशी अनेक उदाहरणे आहेत. सांगायचा मुद्दा इतकाच की दादांच्या कार्यात लीलाताईंचे असे ॲक्टिव्ह पार्टिसिपेशन असे.

दादा १९४०-४१ पासून वेगवेगळ्या संस्थांशी संबंधित होते. तसे त्यांचे प्रत्यक्ष सामाजिक कार्य असे १९४५-४६ पासून खऱ्या अर्थाने चालू झाले. जवळजवळ वीस-एकवीस सामाजिक संस्थांशी कार्यवाह, खजिनदार, अध्यक्ष, विश्वस्त अशा विविध नात्यांनी ते जोडले गेले. त्या अर्थाने त्यांना संस्थांचे संस्थानिकच म्हणायला हवे. ह्या साऱ्या संस्थांची आणि दादांच्या त्यामधील सहभागाची माहिती पुढे स्वतंत्रपणे दिली आहे.

१९७५ साली नोकरीच्या बंधनातून मुक्त झाल्यावर– म्हणजे वयाची साठी उलटल्यावर– कोणाही सर्वसामान्याच्या मनात एखादे घरकुल बांधून उर्वरित आयुष्य शांतपणे व्यतीत करावे असे आले असते. याउलट, श्रद्धानंद महिलाश्रमाबरोबरच दादांनी स्वत:च जन्माला घातलेल्या श्री रामकृष्ण चॅरिटीज् या संस्थेच्या कामाला अधिक जोमाने सुरुवात केली. त्यांच्या शब्दकोशात कंटाळा या शब्दालाच जणू टाळा लावलेला होता! आणि आवर्जून सांगावीशी वाटणारी गोष्ट म्हणजे ७५ वी पार करून गेल्यावरही ही 'टाळेबंदी' उठलेली नाही.

सुदैवाने आणि सौ. लीलाताईंच्या समर्पित वृत्तीमुळे घरच्या कौटुंबिक आघाडीवर बऱ्यापैकी स्थिरता निर्माण झाली. समाजसेवेचे व्रत घेतलेल्या समाजसेवकाने स्वत:च्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नये असा दंडक दादांनी स्वत:ला घालून घेतला असला आणि त्या उक्तीनुसारच त्यांची वर्तणूक असली तरी संसाराची, आल्यागेल्याच्या स्वागताची, आर्थिक ओढाताणीची,

सासर-माहेरच्या नातेसंबंधांची, त्यामधील मानापानाची खरी जपणूक सौ. लीलाताईंनाच करावी लागे! हे पूर्णसत्य आहे. दोन्ही कन्यांचे बाशिंगबळ चांगले. घरचे वळण चांगले. वर्तणूक उत्तम नि अगत्याची, यामुळे चि. मृणाल व दुसरी कन्या चि. मंगला ह्या दोन्ही कन्या सुस्थळी पडल्या. सौ. मृणाल अहमदाबादेस तर सौ. मंगला दादरला मुंबईत असते. धाकटे शेंडेफळ चि. मकरंद माटुंग्याच्या यु. डी. सी. टी. मधून डॉक्टरेटची पदवी— पीएच्. डी. — मिळविण्याच्या मार्गावर होता. श्रद्धानंद महिलाश्रमाचे पितामह म्हणून पुढे गौरविले गेलेले दादा निवृत्तीच्या सुमारास घरच्या आघाडीवर खरेखुरे आजोबा बनलेले होते. एकंदरीत घरच्या बाबतीत दादांना पुष्कळच स्वास्थ्य होते.

वसईला वृद्धांसाठीचा महिलाश्रम बांधून झाला होता. कुर्ल्याला कमी वेतनवाल्या तरुणींसाठी, मुंबापुरीत कोणाचाही आधार नसलेल्या महिलांसाठी हॉस्टेल बांधून झाले होते. आश्रमातील मुलांना कायदेशीरपणे दत्तक देण्यास सुरुवात झाली. बराच गदारोळ माजला. आश्रमावर व वैयक्तिकपणे दादांवर टीकेचा भडिमार झाला. त्या साऱ्याला दादांनी समर्पक उत्तरे दिली.

परदेशात दत्तक दिलेल्या मुलांना कसे वाढविले जाते? त्यांना तेथील वातावरणात सामावून घेण्यास किंवा जाण्यास काही त्रास पडतो का? भाषेचा प्रश्न निर्माण होतो काय? इतर मुलांच्या समवेत ते बालक कशा तऱ्हेने वागते किंवा इतर मुले त्याला कशी वागवतात? कुटुंबातील लोक, नातेवाईक, समाजातील एकूण मंडळी अशा मुलांकडे कशी पाहतात? भविष्यकाळात या मुलांना सामाजिक वा राजकीय अडचणींना तोंड द्यावे लागेल काय? अशा अनेक शंका-कुशंकांनी दादांचे मन पोखरून जाई.

त्या त्या देशातील पालक आश्रमाकडे रीतसर माहिती पाठवीत होते, पण मनाला स्वस्थता नव्हती. आपल्याच देशातील विघ्नसंतोषी मंडळी पूर्ण माहितीच्या अभावी धर्माच्या नावावर वा अन्य कोणत्या ना कोणत्या मुद्द्यांवर गैरसमज पसरवत असत. आश्रमात येणारी पाश्चात्त्य मंडळी प्रत्यक्षपणे, पत्रांद्वारे दादांना निमंत्रण देत होती. प्रत्यक्ष संस्थेची

पण इच्छा तशीच होती. या साऱ्या विचारमंथनातून दादांचे १९७३ व १९७६ असे दोन परदेशदौरे झाले. नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन आदी ११ युरोपीय देशांचे भ्रमण झाले.

आंतरदेशीय प्रवास, राहणे-जेवणे इत्यादी सर्व खर्च त्या त्या देशांनी (म्हणजे तेथील समाजसेवी संस्थांनी) केला. एकूण दादांसाठी त्यांनी किती खर्च केला ह्याची दादांनाच माहिती नव्हती, कारण आपण पैसे द्यायचे नाहीत तर नसती चौकशी करा कशाला? त्यामुळे 'मी जाताना पैसे नेले नव्हते व येताना माझ्यापाशी पैसे नव्हते', एवढ्या एकाच वाक्यात दादांच्या परदेशदौऱ्याचा 'जमाखर्च' बसू शकत होता!

दादांचा प्रवास अगदी वेळेनुसार झाला. जेवण्याखाण्याच्या सवयी, पूजा-अर्चेची वेळ वगैरे वैयक्तिक बाबींची सविस्तर कल्पना जेथे जेथे दादा जाणार होते तेथे तेथे दादांनी अगोदरच दिली होती. त्यामुळे दादांचे पहाटे ३॥ ला उठणे, संध्यास्नान, जपजाप्य यांमध्ये कोणतीही अडचण आली नाही. कित्येक वेळा सकाळचा चहा एके ठिकाणी, दुपारी ताक घेण्याचा कार्यक्रम दुसऱ्या ठिकाणी, रात्रीचे जेवण तिसऱ्या ठिकाणी असा कार्यक्रम असे. मुक्काम दोन रात्रींपेक्षा अधिक असा कोणाकडेच नव्हता. प्रत्येक ठिकाणचा यजमान आपल्या अमुकअमुक गोष्टींची अशी अशी व्यवस्था केली आहे, आणखी काही विशेष पाहिजे का? अशी पृच्छा करी. मोटारीने नेण्या-आणण्याची व्यवस्था करी. एक-दोन वेळेला तर दुसरा माणूस वेळेवर येऊ शकला नाही म्हणून त्या त्या गावचा डेप्युटी मेयरच दादांबरोबर गाडी हाकायला उभा! त्यामुळे दादांनाच ओशाळवाणे झाले!

परदेशातील मुक्कामात मुख्यत: सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था पाहणे, तेथील कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करणे हा मुख्य भाग असे. काही सभा-संमेलनांतून आंतरदेशीय कायदेशीर दत्तकविधान (International Adoption) या विषयावर सर्व बाजूंनी साधक-बाधक चर्चा होई. त्या चर्चांच्या ओघात दादा जाणीवपूर्वक दत्तक मुले देण्याबाबतच्या कायदेशीर अडचणी, सामान्य लोकांच्या मनातील भीती, आक्षेप या साऱ्या बाबींचा उल्लेख करून

वस्तुस्थिती जाणून घेत. या सर्व ठिकाणी दुभाष्याची व्यवस्था केलेली असे.

त्यानंतर आश्रमातून दत्तक गेलेल्या (त्यावेळी ११०) मुलांपैकी निम्म्यापेक्षा अधिक मुलांच्या कुटुंबांत जाऊन, राहून दादांनी मुलांची एकूण प्रगती, तेथील समाजाचा या मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोण, आई-वडिलांच्या अडचणी या सर्व बाबींची छाननी केली. काही ठिकाणी एकाहून अधिक कुटुंबे आपापली औरस अथवा दत्तक मुले घेऊन दादांना भेटण्यासाठी आली. प्रत्येक ठिकाणी वैयक्तिक रीत्या भेटणे शक्य नसल्याने चारपाच तासांचा एकाच ठिकाणी मेळावासदृश कार्यक्रम ठेवण्यात आला. अशा दत्तक घेतलेल्या पालकांचे एक-दोन देशांत संघ स्थापन झाले आहेत हे कळल्यावर दादांना आनंद वाटला. त्यांच्या सामाजिक जाणिवांचे कौतुक अधिक वाटले.

(Association of Parents of adopted children) अशा संस्थांतर्फे वर्षातून ठिकठिकाणी मेळावे (Get-together) आयोजण्यात येतात. हे सर्व बघितल्यावर आणि एकंदरीत दत्तक दिल्या गेलेल्या मुलांना दिली जाणारी वागणूक व सवलती (कौटुंबिक तशाच सार्वजनिक) पाहून दादांनी एका वाक्यात आपल्या परदेशवारीचा निष्कर्ष काढला. तो असा, की 'माझ्यासारखा मध्यमवर्गीय माणूस स्वत:च्या मुलाससुद्धा इतपत सवलती देऊ शकणार नाही.'

दादांच्या या दौऱ्याने आणि एकूण फलश्रुतीमुळे आश्रमाच्या कार्यकारिणीस आपली मुले 'सुस्थळी' पडलेली आहेत ह्याचे समाधान वाटले.

दादांचा दुसरा परदेशदौरा झाला तो १९७६ साली. एव्हाना भारतातील परिस्थिती बरीच बदललेली होती. आपली मुलं परदेशी दत्तक म्हणून का पाठविता? असे क्रोधाने विचारणारा समाज हळूहळू आपणहून आश्रमातून मुलं दत्तक घेण्याबद्दल पुढे येऊ लागला. परदेशांतून अद्याप मागणी होतीच. संपन्नता होती. मदत करण्याची इच्छा होती. दोनहून अधिक मुले दत्तक घेण्याची इच्छा, आर्थिक पाठबळ होते. तेव्हा दादांच्या दुसऱ्या परदेशदौऱ्यात दादांनी अशा परदेशी मंडळींच्या मानसिकतेचा ओघ 'स्पॉन्सरशिप' योजनेकडे वळविला.

म्हणजे असं की प्रत्यक्ष मूल दत्तक घ्यायचं नाही, पण ज्या मुलांना आई-वडील आहेत – म्हणजे रूढार्थाने ती निराधार नाहीत – पण त्यांची आर्थिक विपन्नावस्था त्यांना शिक्षणापासून वंचित करते अशा मुलांना शैक्षणिक रीत्या दत्तक घ्यायचे. प्रथम दादांनी ही कल्पना त्यांच्या मनी रुजविली. या विषयासंबंधात त्यांची व्याख्याने झाली. स्थानिक वृत्तपत्रांतून लेख-मुलाखती (अर्थात डॅनिश-स्वीडिश भाषेतून) प्रसिद्ध झाल्या. इतकेच नव्हे तर डेन्मार्कमधील दूरदर्शनच्या कार्यक्रमातूनही मुलाखत घेतली गेली. सर्वांना असलेला आदर यातून दुणावला. दत्तकाबरोबरच या स्पॉन्सरशिप योजनेसाठीही पैशाची गंगा दुथडी भरून वाहू लागली. सुरुवातीला ही योजना श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे कार्यान्वित करण्याची दादांची इच्छा होती; पण ते न जमल्यामुळे मग दादांनी ती स्वत:च स्थापन केलेल्या श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌तर्फे राबविली.

परदेशी जाणारा माणूस प्रेक्षणीय स्थळांच्या शोधात फिरतो. मौजमजेच्या ठिकाणी जाऊन चार घटका मजेत घालविण्याकडे त्याचा कल असतो. वास्तविक डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, स्वित्झर्लंड वगैरे देश म्हणजे युरोपचे नंदनवन. तिथे जायला मिळतेय या कल्पनेनेसुद्धा आपले मन रोमांचित होते. हे स्वाभाविकच आहे. पण दादांचा पिंडच निराळा! त्यांच्या दृष्टीने प्रेक्षणीय संस्था म्हणजे दीनदुबळ्यांसाठी, अनाथांसाठी कार्य करणाऱ्या संस्था.

परदेशात गेल्यावर कोणी माणूस शाकाहारी राहूच शकत नाही, मद्य घ्यावेच लागते इत्यादी सर्व दादांनी जाण्यापूर्वी अनेकांच्या तोंडातून ऐकले होते. दादांना अर्थातच हे पटणारे नव्हते. सुदैवाने अनुभवही वेगळा आला. स्वत:चा निश्चय पक्का असेल तर मनुष्य शाकाहारी राहू शकतो. चहा, कॉफी दूध, दही, ताक, उकडलेल्या भाज्या, फळे, बंद बाटल्यांतून मिळणारे मिनरल वॉटर यांवर दादा आरामात राहू शकले. मद्य घेण्याचा आग्रह होत असे पण Please excuse या दोन शब्दांनी सर्व संपत असे. यजमानाच्या हातातील मद्याच्या चषकाला दादा आपल्या हातातील ताकाचा पेला उंचावून 'चिअर्स' करीत तेव्हा पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतिरूपी बहिणी एकमेकींकडे आदरमिश्रित कौतुकाने पाहून हसल्या असतील!

दादांच्या या राहणीमानामुळे परदेशात येणाऱ्या कित्येक पाहुण्यांच्या तुलनेत दादांचा जेवणखर्च अगदीच किरकोळ असे. त्यामुळे पुन्हा आलात तर आमचेच पाहुणे (Guest) म्हणून या; कारण असा स्वस्त पाहुणा आमच्याकडे कधी आलाच नाही असे आमंत्रण दादांना प्रत्येक ठिकाणी मिळाले!

दादा परदेशातून परतल्यावर श्री रामकृष्ण चॅरिटीजूचे काम अधिक जोरात सुरू झाले. दादांच्या नि:स्वार्थी समाजोपयोगी कार्यामुळे पाश्चिमात्य देशातील संस्था अधिकच प्रभावित झाल्या. स्पॉन्सरशिप योजनेचे काम श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे होते का रामकृष्ण चॅरिटीजूतर्फे, हा मुद्दा त्यांच्या दृष्टीने अगदी गौण होता. हे काम दादा ताटके ही व्यक्ती करतेय ना, एवढेच त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. श्री रामकृष्ण चॅरिटीजूचे ऑफिस त्यांनी थाटले ते आपल्या माटुंग्याच्या दोन खोल्यांत. स्पॉन्सरशिप योजना कार्यान्वित केली ती वाईच्या परिसरात. वाई, खंडाळा आणि महाबळेश्वर तालुक्यांतील शाळांतून ही स्पॉन्सरशिप योजना सुरू झाली. त्यामुळे परदेशी पाहुणे आले की त्यांना वाई, महाबळेश्वरच्या दुर्गम भागातून हिंडवून आणणे, त्या ग्रामीण भागातील गरीब पालकांची स्थिती खरोखरीच काय आहे ते दाखवून देणे, त्यांच्या अहवालानुसार परदेशी संस्थांशी पत्रव्यवहार करणे, वाई भागातील खेड्याखेड्यांतून हिंडून शाळाचालक, पालक, विद्यार्थी यांच्या अडीअडचणींची, अपेक्षांची माहिती करून घेऊन तदनुसार कारवाई करणे अशी अनेक कामे दादा स्वत:च्याच अंगावर घेऊन पार पाडीत.

श्री रामकृष्ण चॅरिटीजूचे ऑफिस नंतर पुण्याला हलविले गेलेले आहे. नवीन मंडळी समाधानपूर्वक काम करीत आहेत. दोन हजारांहून अधिक मुलांना या योजनेप्रमाणे शैक्षणिक मदत मिळत आहे. त्यापेक्षा अधिक काम – म्हणजे अधिक विद्यार्थ्यांसाठी सोय – होण्यासारखे आहे. दादांच्या नुसत्या शब्दावर लोक, संस्था देणग्या द्यायला तयार आहेत. पण मग न आवरता येण्यासारखा पसारा मांडण्यापेक्षा जेवढा मांडलाय तेवढाच व्यवस्थितपणे चालवावा ह्या भूमिकेतून दादांनी आपणहून सर्व परदेशी व इथल्या संस्थांनी आता अधिक आर्थिक मदतीचा ओघ थांबवावा

अशी विनंती केली. त्यांच्या तडफेने, ताकदीने कामे तडीस लावणे सर्वांना जमणारे नाही. 'जे राज्य उभारले ते शर्थीने राखावे', हा विचार दादांनी पटवून घेतला असावा. आता तरुण मंडळींच्या खांद्यावर तो भार देऊन या श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌च्या कामातून दादा प्रत्यक्षपणे निवृत्त झाले आहेत.

दादा १९५३ साली श्रद्धानंद महिलाश्रमाचे प्रथम आजीव सभासद झाले. त्या वेळच्या रौप्यमहोत्सवी समारंभात साधे स्वयंसेवक म्हणून वावरले. १९५७ मध्ये कार्यकारिणीचे सभासद म्हणून निवडून आले, त्यानंतर १९९१ पर्यंत सतत या ना त्या नात्याने संस्थेशी संबंधित राहिले. सतत २५ वर्षे काम केल्यावर संस्थेत तरुण मंडळींनी कार्यकारिणीत यावे, आश्रमाच्या कामकाजात भाग घ्यावा या सदिच्छेने १९८४ साली आपणहून आपली 'खुर्ची' खाली करायचे दादांनी ठरविले.

नवीन नवीन मंडळी आली, पण मार्गदर्शन हवे असा हट्ट झाला; म्हणून दादांना पुन्हा विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी विश्वस्त अशा विविध नात्यांनी आश्रमाशी संबंधित रहावेच लागले. अगदीच आवश्यक (आश्रमाच्या एकूण कारभाराच्या दृष्टीने) झाले म्हणून १९८६ साली पुन्हा कार्यवाहपदाचा पदभार स्वीकारावा लागला. मानद कार्यवाह व कार्यकारी विश्वस्त या दोन्ही भूमिकांतून काम करायला लागले. खूप प्रयत्न करूनही दादांचा 'आश्रमवास' सुटेना!

१९९० च्या ऑगस्टमध्ये, कार्यकारिणीच्या वार्षिक सभेत संस्थेचे अध्यक्षपद पुन्हा त्यांच्यावर चक्क लादले गेले. श्रीमती मनोरमाबाई फडके या ज्येष्ठ भगिनीसमान असलेल्या व्यक्तीच्या वैयक्तिक आग्रहाखातर एकच वर्ष अध्यक्षपद सांभाळेन या अटीवर दादांनी पद स्वीकारले. वचनपूर्ती झाल्यावर ७ सप्टेंबर १९९१ रोजी चक्क एक छापील पत्रक पाठवून दादांनी स्वत:च आश्रमाचा निरोप घेतला, सभेला ते प्रत्यक्ष उपस्थित राहिले नाहीत.

हे थोडेसे विचित्रच होते. तीन तपे संबंधित असलेल्या, आपले हे दुसरे घरच या दृष्टिकोणातून आश्रमाकडे पाहणाऱ्या दादांनी आश्रमाच्या कार्यकारिणीच्या वार्षिक सभेला हजर न राहण्याचे का बरे ठरविले

असावे? पुन्हा कोणती ना कोणती जबाबदारी पडेल या भीतीने? छे! कामाला दादा सदैव वाघच राहिले. उन्हाळा, पावसाळा, कटु प्रसंग, घरगुती अडचणी यांपैकी कोणतीही गोष्ट या 'जिब्राल्टरच्या खडका' ला तिळमात्र हलवू शकली नाही. वयाची ७६-७७ वर्षे पार केल्यावरही दादांच्या कामाचा उत्साह एखाद्या पंचविशीतील तरुणाला लाजवेल असाच आहे. मेंदू पूर्वीसारखाच तल्लख. थोडंसं सांगितलं तरी त्यापलीकडील जाणणारा. मग १९९१ च्या वार्षिक सभेला जाणूनबुजून अनुपस्थित राहावे असे काय बरे घडले असावे? याचे उत्तर ७ सप्टेंबर १९९१ च्या त्यांच्या छापील पत्रकातून मिळते. आश्रमाशी संबंध आल्यानंतरच्या घटनांचे सिंहावलोकन करताना शेवटच्या परिच्छेदात त्यांच्या मनावर उमटलेल्या ओरखड्याचे दु:ख एखाद्या त्रयस्थालासुद्धा जाणवल्याखेरीज राहात नाही. उपदेशाचे म्हणण्यापेक्षा मार्गदर्शनाचे चार शब्द सांगितल्यावर दादा त्या निवेदनात म्हणतात :

'जाता जाता मी आजच्या वार्षिक सभेस हजर न राहण्याचा निर्णय का घेतला याचा खुलासा करणे आवश्यक वाटते. ऑगस्ट १९९० मध्ये झालेल्या वार्षिक सभेतील, आश्रमाच्या सुमारे ६३ वर्षांच्या इतिहासात, जी गडबडगोंधळाची परिस्थिती निर्माण झाली, ती अभूतपूर्व अशी होती. त्यातच माझ्या इच्छेविरुद्ध माझ्यावर १९९०-९१ या वर्षाचे अध्यक्षपद लादले गेले. ती सभा झाल्यानंतर लगेचच ८ / १० दिवसांत मला माझ्या मुलीच्या होणाऱ्या शस्त्रक्रियेनिमित्त अहमदाबादला जावे लागले व तेथे एक महिन्यापेक्षा अधिक काळ राहावे लागले. तेथे मला आश्रमाच्या कामासंबंधी पत्रव्यवहार येत असे व मी तेथून योग्य ते मार्गदर्शन पत्राने करीत होतोच. माझ्या घरी (माटुंग्यास) येणारे सर्व टपाल माझ्या अहमदाबादच्या पत्त्यावर माझा मुलगा आठवड्यातून दोन दिवस डोंबिवलीहून माटुंग्यास येऊन वक्तशीरपणे 'री-डायरेक्ट' करीत होता. या टपालात एक निनावी पत्र आले होते. ते कोणी लिहिले होते किंवा असावे, याबद्दल मी विचारच केला नाही. ते टंकलिखित इंग्रजी पत्र मी फाडून टाकले. कारण सही-पत्त्याशिवाय पत्र पाठवणे हे भ्याडांचे

काम आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या पत्रातील दोन मुद्दे मात्र मी तेव्हापासून लक्षात ठेवले. ते म्हणजे–

१) सभेत गोंधळ घालून लोकांनी एकमताने तुम्हाला अध्यक्ष केले. पण हार-गुच्छ अथवा एक फूलही कोणी, आपणच सुरू केलेल्या प्रथेनुसार आपल्याला मात्र दिले नाही!

२) प्रेक्षागृहात मागील बाजूस व विशेषत: महिला विभागात जेथे अल्प प्रमाणात पुरुषही मागून जाऊन बसले त्यांच्यामध्ये 'जातो जातो म्हणतात, पण राहतातच!' असे शेरे मारण्याचे काम चालू होते.

पहिल्या मुद्द्याबाबत मला काहीच म्हणावयाचे नाही. पण दुसऱ्या मुद्द्यास अनुसरून मी यंदाच्या वार्षिक सभेसच येण्याचे कटाक्षाने टाळले आहे. यामुळे दोन गोष्टी साध्य होतील. एक म्हणजे सभा शांततेत पार पडेल व दुसरे म्हणजे मी निश्चित जात आहे, गेलो आहे, याचे समाधान त्या पत्रलेखिका / लेखकास अथवा टीकाकारास मिळेल.

आज संस्थेच्या अध्यक्षपदावरून स्वेच्छेने निवृत्त होताना मला माझ्या दिवंगत सहकाऱ्यांचे स्मरण होणे साहजिकच आहे. कैलासवासी श्रीमती ताराबाई माणेकलाल प्रेमचंद, कुसुमबेन शहा, श्री. शं. नवरे, रावबहादूर बोले, के. एच्. ढमढेरे, ल. गो. विंझे, धडफळे, श्रीमती कमलाबाई साठे, एन्. एच्. पंड्या, जयंतीलाल जगजीवन मुळजी, भागवतबंधू, आर. एल. तेजपाल, एन्. एन्. पंड्या, सनत मेहता, आर. एन्. मोदी व इतर दिवंगत आणि अनेक वर्षे ज्यांच्याबरोबर आजपर्यंत कामे करीत आलो ते व इतर सर्व जे सुदैवाने आज हयात आहेत, त्या सर्वांस माझे मन:पूर्वक प्रणाम! ज्येष्ठ भगिनी श्रीमती मनोरमाबाई फडके यांना प्रणाम करूनच हे माझे लांबलेले निवेदन संपवितो.'

दि. ७ सप्टेंबर १९९१ — रा. शं. ताटके

**सोबत पुरवणी** — अध्यक्ष (१९९० - ९१)

दादांचे हे निवेदन इतके बोलके आहे की त्यावर कोणत्याही अधिक भाष्याची आवश्यकता नाही. तीन तपे काम केल्यावर संपूर्ण समाधानी वृत्तीने त्यांना 'आश्रमाबाहेर' (शरीराने) पडता आले असते तर बरे झाले असते! पण प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रासारख्या निष्कलंक चारित्र्याच्या देवालासुद्धा जिथे यःकश्चित् धोब्याचे 'बोल' जन्माच्या व्यथा देऊन गेले, तिथे या कलियुगातील कोण्या एका 'रामकृष्णाला' कोणी एक अनामिक अंतरीचा सल देऊन गेला त्याचे काय!



## २१.

### ‘ संस्थांचा संस्थानिक ’

‘ स्वत:साठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी मेलास तरच खरा जगलास ’ हे सुभाषित नियती जन्मत:च दादांच्या कानात कुजबुजून गेली होती की काय न कळे. श्रद्धानंद महिलाश्रम आणि श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌साठी त्यांनी तनमनधन वेचले, पण तशी त्यांच्या सामाजिक कार्याची सुरूवात खूप अगोदर झाली होती. संसाराला आर्थिक सुबत्ता आली ती एल्. आय्. सी. मधील नोकरीमुळे, त्याआधी प्रपंचासाठी दादांना अनेक उद्योग करावे लागले. कारण तोवर ‘ जगणे ’, स्वत:च्या पायावर उभे राहणे आवश्यक होते. समर्थभक्त असल्याने ‘ आधी प्रपंच करावा नेटका ’ हे दादा कधी विसरले नाहीत. दिनांक २० जून १९३४ या तारखेस मुंबापुरीत पाऊल टाकल्यापासून दादांचा ‘ कलह जीवनाचा ’ चालूच होता. पण सामाजिक कामाची ऊर्मी अनिवार होती. त्यामुळे १९३७ पासूनच त्यांच्या सामाजिक कामाची सुरूवात झालेली होती. अनेक सामाजिक संस्थांच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

हिंदीचा प्रसार देशभर व्हावा हा विचार स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच प्रबळ होता आणि त्यासाठी अनेक संस्था कार्यरत होत्या. त्यांपैकी राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा ही एक प्रमुख समिती होती. या संस्थेची माटुंग्यास १९३७ मध्ये एक शाखा स्थापन झाली होती.

स्वत: दादा व श्री. कल्याणसुंदरम् हे उभयता संयुक्त कार्यवाह म्हणून काम करीत. माटुंगा म्हणजे आपण मुंबईचे मद्रासच समजतो. दाक्षिणात्य वस्तीचा भरणा असलेल्या या भागाला लोक गंमतीने माटुंगम् असेही म्हणतात. दाक्षिणात्यांचा हिंदीविरोध हा कुविख्यातच आहे. आजच्या घडीला त्यात तिळमात्र फरक नाही. अशा परिस्थितीत त्या काळात माटुंग्यात हिंदीचा प्रचार करण्यासाठी संस्था निघावी ही बाब खचितच कौतुकास्पद होती.

संस्थेचे अध्वर्यू श्री. गुंडुराव हे स्वत: विशारद पास झालेले होते. ही सर्व मंडळी माटुंग्याला घरोघरी हिंडून हिंदीचा प्रचार करीत. फलस्वरूप हिंदी शिकण्यास उत्सुक असलेली तीस-चाळीस मंडळी मिळाली. त्यांच्यासाठी नप्पू हॉल, माटुंगा येथे हिंदीचे वर्ग भरत. दादांच्या पत्नी सौ. लीलाताई नियमितपणे या वर्गाला जात. (दादांनी सुरुवात अशी स्वत:च्या घरापासून केली होती.) त्यांनी हिंदीच्या परीक्षा दिल्या. त्या काळीसुद्धा अवघड समजली जाणारी 'कोविद' परीक्षा त्या उत्तम तऱ्हेने पास झाल्या, तिथेच इतरांना हिंदी शिकवू लागल्या. कौटुंबिक व्याप, बाळंतपण इत्यादी कारणांनी त्यांना प्रत्यक्ष वर्गात जाऊन शिकवणे जमेना. अध्यापनाचे काम त्यांनी घरीच सुरू केले. अर्थात विनामूल्य हे सांगायला नकोच. दादा संस्थेची इतर कामे बघत. ह्या संस्थेत दादांनी सात वर्षे काम केले. इतर व्याप वाढल्यावर त्यांनी हे काम सोडले.

**लोकसेवा विद्यालय, नायगाव - दादर**

माँटेसरीपासून ते एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षणाची सोय असलेल्या या संस्थेत आजमितीस पंधराशेच्या वर मुलं शिक्षण घेत आहेत. या शाळेच्या ऊर्जितावस्थेला प्रामुख्याने कै. डॉ. डी. बी. कुलकर्णी व त्यांच्या पत्नी प्रभावतीबाई यांचे अपरंपार कष्ट कारणीभूत आहेत. दादांचा संबंध ह्या संस्थेशी अगदी सुरुवातीपासूनच आला. १९४४ च्या सुमारास दादा बॉम्बे फार्मास्युटिकलमध्ये काम करीत असताना कंपनीचे कार्यालय परळच्या ज्या 'मथुरा भुवन' मध्ये होते तेथेच डॉ. कुलकर्णी राहात होते. दादा दुपारी जेवत नसत.

डॉक्टरही आपला दवाखाना बंद करून साडेबारा वाजता दादांकडे येत व तासभर दादांशी चर्चा करीत.

लोकसेवा संघाची घटना तयार करण्यापासून लोकसेवा विद्यालयाची 'स्थापना' होईपर्यंत दादांचा या संस्थेशी प्रत्यक्ष संबंध आला. सुरुवातीला खजिनदार, विश्वस्त आणि पुढे नुसते विश्वस्त अशा स्वरूपात दादांनी काम केले. डॉ. कुलकर्णी ह्याच भागातून पुढे मुंबई महापालिकेवर निवडून आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे पुढे अधिक प्रसिद्धीस आलेले डॉ. नरवणे ह्या संस्थेशी प्रथमपासून संबंधित होते. बालवाडी, प्राथमिक शाळा अशा क्रमाक्रमाने संस्थेची वाढ होता होता पुढे ही शाळा ऊर्जितावस्थेला आली.

डॉ. कुलकर्णी यांचे दु:खद निधन झाल्यानंतर दुखवट्याची सभा झाली. दादांचा इतर व्याप वाढल्यावर त्यांचा संस्थेशी प्रत्यक्ष संबंध असा नव्हता. कारणपरत्वे जाणे, वेळप्रसंगी मागितल्यास सल्ला देणे, मार्गदर्शन करणे ही कामे दादा करीतच. पण कै. डॉ. कुलकर्णींच्या दुखवट्याच्या सभेला जुन्या विश्वस्तांपैकी एक म्हणून दादा आवर्जून उपस्थित राहिले. तनमनधन अर्पून नि:स्वार्थी बुद्धीने कै. डॉक्टरांनी शाळेचे जे काम केले त्याबद्दल कृतज्ञता म्हणून सध्याचे लोकसेवा विद्यालय हे नाव बदलून 'लोकसेवा संघाचे डॉ. डी. बी. कुलकर्णी विद्यालय' असे नामकरण करावे ही या प्रसंगी दादांनी केलेली सूचना सर्वांना मान्य झाली. तसा नामफलक १९९१ च्या पाडव्याच्या मुहूर्तावर मंत्र्यांच्या हस्ते झालेल्या समारंभात लावण्यात आला. दादांच्या श्री रामकृष्ण चॅरिटीजतर्फे या शाळेतील ३०-४० मुलांना आर्थिक मदत देण्यात येते.

**लोकमान्य सहकारी भांडार लि., माटुंगा.**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात रेशनिंगचे दिवस सुरू झाल्यावर सदर भांडार ब्राह्मणवाडी, माटुंगा या भागातील लोकांनी चालू केले. धान्यवस्तूंखेरीज जनरल स्टोअर्समध्ये ठेवतात तशा साबण-चहा, स्टेशनरी, कापड इत्यादी वस्तू आणून त्यांचा योग्य भावात मध्यमवर्गीय लोकांना पुरवठा करणे हा मूळ हेतू. महाराष्ट्रीय लोक आरंभशूर.

सुरुवातीला उत्साह होता तोवर हे भांडार चांगले चालले. नंतर जसजसा उत्साह मावळू लागला तसतसा भांडाराला तोटा येऊ लागला.

दादा या संस्थेत सुरुवातीला नव्हते; पण भांडाराची स्थिती डबघाईला येऊ लागली तेव्हा सचोटीने, नि:पक्षपाती गृहस्थ म्हणून दादांना कमिटीवर पाचारण करण्यात आले. दादांनी एकूण परिस्थितीचा आढावा घेतला, तेव्हा त्यांना दोन-तीन महत्त्वाचे दोष आढळले– १) ठेवींवरील भरमसाट व्याज, २) माल प्रत्यक्ष दुकानात येण्यापूर्वी मधल्यामध्ये गायब होणे व ३) स्टॉक रजिस्टरमध्ये नीट नोंदी नसणे. दादांनी कारभारात लक्ष घातल्यावर विक्री वाढविण्याकडे प्रथम लक्ष पुरविले. आश्रमासारख्या संस्था, त्यांची रेशनकार्डे या भांडारात रजिस्टर करून विक्री वाढविली. माल दुकानात आला की प्रथम ऑर्डरप्रमाणे बरोबर आहे का नाही, हे चेक करून त्याची स्टॉकबुकात नोंद करणे, कॅशमेमो देणे, वरचेवर स्टॉक तपासणे अशा प्रकारचा कार्यक्रम सुरू केला. पूर्वीचे नोकर पगार तुटपुंजा म्हणून कमी-जास्त प्रमाणात मालच लंपास करीत. सकाळी दुकानाच्या चाव्या आपल्या घरातून न्यायच्या व रात्री दुकान बंद झाल्यावर घरीच आणून द्यायच्या असा दंडक दादांनी घातला. एका ओळखीच्या आणि विश्वासातील वाण्यालाच व्यवस्थापक म्हणून नेमला. कारण एक-दोन जुनी माणसं आता या 'करड्या' शिस्तीत आपलं काही निभावणार नाही ह्या भीतीपोटी निघून गेली.

हा नवा व्यवस्थापक मशीद बंदरला जाऊन नमुने पाहून दादांना विचारून माल आणू लागला. हळूहळू आठ दिवसांचे क्रेडिट मिळाले. त्यामुळे तेवढ्या मुदतीतच माल विकण्याची पराकाष्ठा दादांनी केली. भरमसाट व्याजाने मेंबर्सकडून पैसे घेणे बंद केले. त्यामुळे व्याजापोटीच हकनाक जाणारी रक्कम वाचली. अशा उपायांनी आणि अत्यंत काटेकोरपणाने त्यांचे अवलंबन केल्यामुळे हळूहळू भांडाराची स्थिती सुधारू लागली. प्रामाणिकपणे काम केले तर

दिवाळीला बक्षीस दिले जाईल असे आश्वासन दिले. या सर्व उपायांमुळे खरोखरच गैरकारभार सुधारला आणि नोकरवर्गाला पंधरा दिवसांचा पगार 'दिवाळी बक्षीस' म्हणून देता आला. भांडार उत्तम स्थितीत आणल्याबद्दल दादांचा सत्कारही करण्यात आला. त्यानंतर दादांनी कमिटीवरील अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पुढे २/३ वर्षे ठीक चालले. पण नंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या असा प्रकार सुरू झाला. पुन्हा दादांचा सल्ला.

व्याप वाढल्यामुळे फिरून लक्ष घालणे दादांना शक्यही नव्हते आणि इष्टही नव्हते. त्यामुळे सर्वांना मान्य झाल्यावर सदर भांडार मासिक ठरावीक रक्कम घेऊन काही अटींनुसार एका वाण्यासच चालविण्यास देण्यात आले. जन्मजात वाणीच तो. दोन-तीन वर्षांतच त्याने तोटा भरून काढून मेंबर्सना भाग-भांडवलावर ९ टक्के डिव्हिडंड देण्यास सुरुवात केली. एकूण या प्रकारच्या अनुभवाने धंद्याच्या बाबतीत महाराष्ट्रात 'चार डोकी आणि पाच विचार', त्यामुळे धंदा होत नाही ह्याची खात्री पटली. त्यामुळे 'जेणे काम तेणो ठाय और करेसो गोता खाय' ह्या म्हणीची सत्यता पटली.

**हिंद नाईट हायस्कूल, माटुंगा**

हे हायस्कूल पायोनिअर डे स्कूलच्या इमारतीत भरत असे. मुख्यत्वे कामगारवर्गातील मुले दिवसा काबाडकष्ट करून सायंकाळी ७ ते १० या वेळात शाळेत जात असत. ह्या शाळेच्या बाबतीतही लोकमान्य भांडाराच्या बाबतीत जो प्रकार चालला होता तसाच प्रकार चालला होता. कुणाकुणाची मनमानी चाललेली होती. पैशाचे गैरप्रकार, वाढती बेशिस्त, त्यामुळे मुलांचा दंगा, पोलिसात तक्रार जाण्यापर्यंतचा प्रकार अशा थराला गोष्टी आल्यावर काही सत्प्रवृत्त सालस विश्वस्तांना हा प्रकार सहन होईना. सालसतेपोटी या गोष्टी थांबविता पण येईनात. म्हणून त्यांनी दादांना गळ घालून विश्वस्तपदावर घेतले. दादांनी त्यांच्या नेहमीच्या शिस्तीनुसार कारभाराची छाननी केली, सर्व हिशेब व्यवस्थित तपासले. दोषी ठरलेल्या लोकांच्या गैरकारभाराचे माप सर्वांसमक्ष त्यांच्या पदरात घातले. कीड काढून

टाकली. सर्व काही आलबेल झालं, पण दादांनी विश्वस्तपदाचा राजीनामा अचानक दिला तो वेगळ्याच संदर्भात.

दादांचा मुलगा मकरंद १९७४ च्या सुमारास नुकताच बी. एस्सी. होऊन एम्. एस्सी. चा अभ्यास करत होता. रात्रीच्या शाळेचे एक शिक्षक निवृत्त झाले होते. मकरंद दिवसा कॉलेजात जाई. तेव्हा निवृत्त शिक्षकाच्या जागी सायन्स-टीचर म्हणून मकरंदला घेऊ या का? अशी मुख्याध्यापकांनी विचारणा केली. दादांनी 'मकरंदलाच या बाबतीत विचारा' असे सांगितले. तसे त्याला विचारले गेल्यावर त्याने दादांना विचारले. दादांनी 'तुझ्या अभ्यासात व्यत्यय येणार नसेल आणि शिकविण्याचे जमणार असेल तर तुझा तू निर्णय घे', असे सांगितले.

मकरंदने स्वत:च्या शिक्षणाकरिता चार पैसे मिळतील, अनुभव मिळेल या विचाराने होकार दिला. त्याचे नेमणुकीचे टाईप केलेले पत्र दादांकडे सहीस आले तेव्हा त्यांनी ते दुसऱ्या पदाधिकाऱ्याकडे सहीला पाठविले. दुसऱ्या दिवशी मकरंद कामावर रुजू झाला. दादांनी विश्वस्तपदाचा राजीनामा पाठवून दिला! (अधिक भाष्य नलगे!)

**इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी**

'इंडिया स्पॉन्सरशिप कमिटी' ची इंटरनॅशनल युनियन फॉर चाईल्ड वेल्फेअर या जिनेव्हा येथील आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे १९६४ मध्ये स्थापना झाली. श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे या कमिटीवर आश्रमाचा प्रतिनिधी म्हणून दादांनी काम केले. या योजनेखाली आश्रमातील सात ते दहा वयोगटातील वीस मुलींना शैक्षणिक खर्च, कपडे, खाद्यपदार्थ दिले जात. सुटीच्या दिवशी मुंबईतीलच एखाद्या पार्कमध्ये नेले जाई. योजना चांगली असली तरी दादांना क्लेश होत. आश्रमाच्या अशा वयोगटात ५०-५० मुली असत. त्यांतील फक्त २० मुलींना ह्या योजनेचा फायदा. त्यामुळे इतर मुलींच्या मनात निष्कारणच कडवटपणा निर्माण होई.

आश्रमासारख्या निवासी संस्थांमधून असा सवता सुभा केला जाऊ नये, दिला तर सर्वांनाच लाभ घेऊ द्यावा; अन्यथा खेड्यांमधील आई-वडील आहेत पण घरची आत्यंतिक गरिबीची स्थिती आहे अशा मुलांना या योजनेचा लाभ घेऊ द्यावा असे दादांचे मत होते. पण दुर्दैवाने ते इतरांना मान्य झाले नाही. १९७५ च्या दादांच्या परदेशदौऱ्यात दादांनी तेथील पदाधिकाऱ्यांना चर्चेद्वारा आपली मते पटवून दिली. आणि आश्रमाने नाकारल्यावर आपल्याच श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌द्वारे अशा योजनेंतर्गत हजारो मुलांना फायदा मिळवून दिला.

**बालकमंदिर, माटुंगा ( १९५४-५५ – ५८-५९ )**

ही संस्था डॉ. हुदलीकर यांनी व्हिन्सेंट रोडवर ( आत्ताचा डॉ. आंबेडकर मार्ग ) सुरू केली. या संस्थेत दादांनी जाण्याचे मुख्य कारण नेहमीप्रमाणे कारभार सुधारून देणे, संस्थेचा कोणाला व्यापारी दृष्टिकोणातून फायदा न घेऊ देणे एवढाच होता. शाळेचे हिंदी-मराठी माध्यम होते. काही मंडळींच्या प्रयत्नाने मराठी माध्यम बंद करण्याचे प्रयत्न हेतुपूर्वक चालले होते. त्याला दादांनी आव्हान देऊन असे प्रयत्न हाणून पाडले. या संस्थेतील कमिटीवर दादांना इतर कामांच्या व्यापामुळे फार काळ काम करता आले नाही.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई**

या संस्थेच्या कार्यकारिणीवर दादांनी काही काळ काम केले. देणग्या, सदस्यसंख्या वाढवून अधिकाधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे, ज्ञातिबांधवांस उपयुक्त होईल म्हणून वधू-वर सूची संपूर्ण माहितीसह तयार करणे इत्यादी कामांस दादांनी गती दिली. सुरुवातीला या संघाची संमेलने फक्त गिरगावातच भरत. दादांच्या लक्षात आले की यामुळे लांबवरच्या उपनगरांतील लोक येण्याचा आळस करतात. दादांनी प्रयोग म्हणून दादरच्या रुईया कॉलेजमध्ये भव्य मंडप उभारून एके वर्षी संमेलन भरविले. प्रतिसाद उत्तम मिळाला. त्यामुळे आता उपनगरांत वेगवेगळ्या ठिकाणी संमेलने

भरविण्याची पद्धतच पडून गेली आहे. दादांनी आपल्या वैयक्तिक ओळखींच्या जोरावर दत्तो वामन पोतदार, श्री. शं. नवरे, कवी गिरीश, प्रा. वसंत कानेटकर, ह. रा. महाजनी आदी मान्यवरांना संमेलनात प्रमुख पाहुणे बोलावले आणि त्यांच्या भाषणांचा लाभ सर्वांना करून दिला.

**ऑल इंडिया सोशल ॲन्ड मॉरल हायजिन असोसिएशन**

या संस्थेच्या एका ठरावान्वये श्रद्धानंद महिलाश्रमाचा एक प्रतिनिधी कार्यकारिणीवर असावा असे ठरले होते. नेहमीप्रमाणे ही जबाबदारी दादांवर आली. संस्थेच्या नावावरून व पहिल्या सभेच्या कामकाजावरून काहीतरी चांगले कार्य ह्या संस्थेमार्फत होईल अशी दादांची रास्त अपेक्षा होती. वेश्यावस्तीतील स्त्रियांचे जीवन, त्यांचे आरोग्य, पालन-पोषण, त्यांना होणाऱ्या मुलांचे शिक्षण, या महिला मुळात या व्यवसायात कशा येतात, त्यांच्यावर कशी जबरदस्ती होते, कोणत्या नरकयातनांतून त्यांना जावे लागते इत्यादी विषयांवर बरेचसे संशोधन झाले. ह्या निमित्ताने समाजाच्या या अंगाचे दादांना जे ‘दर्शन’ झाले त्याने ते व्यथित झाले. जनावरांपेक्षा ‘हीन’ अशी मानवाची स्थिती पाहून दादांना शरमेने मान खाली घालावीशी वाटली. दुर्दैवाने कार्यकारिणीवरील स्त्रियांच्या मतभेदांना व स्वत:कडेच महत्त्व घेण्याच्या अनिष्ट प्रवृत्तींना आणि मोलाचा वेळ घालविणाऱ्या भांडणांना कंटाळून दादांनी या संस्थेतून आपले अंग काढून घेतले. पुढे अंतर्गत भांडणापोटी कोर्टकचेऱ्या होऊन संस्थेचे काम पूर्णपणे थंडावले. दु:खात सुखाची बाब एवढीच की मिसेस् पेमास्टर या सुशिक्षित महिलेच्या पुढाकाराने मूळच्या ध्येयधोरणांना अनुसरून चेंबूर भागात ‘सुखशांति’ या नावाने एक संस्था उभी राहिली. दादा संस्थेच्या कार्यकारिणीवर नाहीत पण कारणपरत्वे त्यांचे जाणे-येणे असते.

**सिटी कौन्सिल फॉर चाईल्ड वेल्फेअर, मुंबई**

डी. डी. डी. चाळ, वरळी या भागात आजही ही संस्था कार्यरत आहे. या भागात प्रामुख्याने मराठी कामगारांची वस्ती होती.

काय करायचं ते शिकून, अशीच त्या वर्गातील लोकांची भावना असे. म्हणून लेडी जहांगीरनी डॉ. काशीताई साठे, श्रीमती साठे वगैरे महाराष्ट्रीय महिलांना हाताशी धरून बालवाडी, प्राथमिक शिक्षण देण्याकरिता या संस्थेची स्थापना केली. आश्रमातर्फे दादा, विशेषत: डॉ. म्हसकरांच्या आग्रहाने या संस्थेवर प्रतिनिधी म्हणून गेले. डॉक्टरांच्या प्रसूतिशास्त्र संस्थेतील प्रशिक्षित नर्सेस– ज्या सहसा बालविधवा असत व नोकरीनंतर नातेवाईकांचा आधार नसल्याने कोठे राहायचे, असा ज्यांना प्रश्न असे, अशा प्रशिक्षित नर्सेसना दादा आवर्जून आश्रमात घेत. एक तर त्यांच्या नर्सिंग कोर्सचा आश्रमाला उपयोग होई. त्यांनाही निवाऱ्याची सोय झाल्याचे समाधान लाभे.

### वडाळा रोड विठ्ठल मंदिर

आतापर्यंत उल्लेखिलेल्या संस्थांचे कार्यस्वरूप दादांच्या कार्याशी मिळतेजुळते होते. हे सगळे सोडून दादांचा देवस्थानाशी संबंध कसा आला ? ही अचंबा वाटणारी बाब प्रारंभी दादांनाही आश्चर्यचकित करून गेली. घडले ते अगदी अनपेक्षितपणे. आश्रमाच्या कामासंबंधात दादा एकदा त्या वेळचे चॅरिटी कमिशनर श्री. गोडसे ह्यांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेले होते. कमिशनरसाहेबांनी नुकतीच आश्रमाला भेट देऊन उत्तम प्रकारे काम चालले आहे असा शेरा दिला होता. कामाचे बोलून झाल्यावर त्यांनी चहा मागवला, आणि बोलता बोलता विषयांतर करून एकदम वडाळ्यातील विठ्ठल मंदिरातील गैरकारभाराचा विषय काढला. तिथे ट्रस्टी म्हणून काम करून तेथील कारभार सुधारण्यास मदत करा, अशी त्यांनी आग्रहाची सूचना केली. अचानकपणे आलेल्या या 'ऑफर' ने दादा पुरतेच गोंधळले.

कमिशनरसाहेबांनी तेथील देवस्थानचा गैरकारभार सविस्तरपणे सांगितला. या गैरकारभारामुळे कोर्टाच्या ॲवॉर्डप्रमाणे पाच विश्वस्त नेमावयाचे होते. त्यांतील दोन आगरी भंडारी, दोन नामदेव शिंपी व एक इतर हिंदू. तेव्हा इतर हिंदू म्हणून दादांनी विश्वस्तपदी काम

करावे असा आग्रह धरला. दादा खरं म्हणजे चक्रावलेच. होकार देण्याच्या मन:स्थितीत फारसे नसताना कमिशनरसाहेबांच्या आग्रहाने 'हो' म्हणून बसले.

दादांनी त्यांच्या पद्धतीने सर्व हिशेब-पुस्तके, मिनिटबुक (पोलिसांच्या कस्टडीत असलेले) व्यवस्थित तपासले. बँक बॅलन्स अगदी कमी होता. देवळात भाविकांची गर्दी तर भरपूर. लोक पेटीत पैसे टाकीत असत. मग पैसे जातात कुठे नि कसे? दादांनी पेटीचे कुलूप काढून बघितले तर एक काटकी अडकून पडलेली दिसली व तिच्या टोकाला डांबर चिकटलेले दिसले. अर्थ स्पष्ट होता. अशा पद्धतीने पेटीतील नोटा काढल्या जात. दादांनी गोदरेजकडून स्पेशल लोखंडी पेट्या करवून आणल्या. दर रविवारी सकाळी विश्वस्तांनी फेरी मारून सर्वांसमक्ष पैसे मोजून वहीत नोंद करून लागलीच सोमवारी बँकेत भरणा करण्याची पद्धत सुरू केली. अशा तऱ्हेने कामात शिस्त आणून तपासनीसाकडून हिशेब तपासून घेऊन सर्व तपशील चॅरिटी कमिशनरकडे दिला.

एक लाखाचे वर बँकेत शिल्लक होती, दादांनी आणखी काही सुधारणा– विशेषत: आजूबाजूला रिकाम्या असलेल्या मोकळ्या जागेवर 'स्त्रियांसाठी वसतिगृह, छोटेखानी हॉस्पिटल वगैरे – सुचविल्या; पण इतरांचा विशेष प्रतिसाद नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी तो नाद सोडून दिला व पाच वर्षांनंतर स्वखुषीने राजीनामा दिला.

पण खुद्द चॅरिटी कमिशनरना दादांच्या कार्यक्षमतेची, नि:स्वार्थी कामाची कदर एवढ्या प्रकर्षाने असावी हे विशेष.

**बयरामजी जीजीभॉय होम फॉर चिल्ड्रन्स**

ही संस्था श्रद्धानंद महिलाश्रमाच्या जवळच आहे. ही १८ वर्षांखालील मुलामुलींकरिता काम करणारी संस्था सुमारे सत्तर वर्षांहून अधिक काळ कार्यरत आहे. साधारणपणे दीडशेच्या आसपास मुलं-मुली ह्या संस्थेत आहेत. नावातच स्पष्ट होते त्याप्रमाणे पार्शी लोकांनीच पैसे घालून सरकारी अनुदान घेऊन चालविलेली ही संस्था.

आश्रमातील कार्यपद्धती बघून दादांना लाईफ-मेंबर करून घेऊन नंतर कमिटीवर घेण्यात आले. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन्ही राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रसंगी आश्रमातील मुलामुलींचे सांस्कृतिक कार्यक्रम नीटनेटकेपणाने बसवून प्रमुख पाहुणे म्हणून कोणी तरी बाहेरची मान्यवर व्यक्ती बोलावून साजरे करण्याची पद्धत दादांनी आश्रमात सुरू केली होती. महत्त्वाचा हेतू आश्रमातील मुलांना 'पोरके' वाटू नये हा. कोणी तरी कौतुकाची, शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारली की त्यांच्या जगण्याला काही प्रयोजन येई. बी. जे. होम, मानव सेवा संघ अशा आजूबाजूच्या संस्थांनाही अशा वेळी आवर्जून निमंत्रित केले जाई. पुढेपुढे यापासून स्फूर्ती घेऊन त्यांनीही असे कार्यक्रम बसविण्यास सुरुवात केली. मग दादांच्या मनात असा विचार आला की बी. जे. होम, श्रद्धानंद महिलाश्रम आणि मानव सेवा संघ अशा तिन्ही संस्थांनी एकेक वर्ष आळीपाळीने यजमानपद घेऊन असे कार्यक्रम सादर केले तर तिन्ही ठिकाणचा अध्यक्ष-समारंभ वगैरेचा खर्च वाटला जाईल; मुख्य म्हणजे तिन्ही संस्थांतील अनाथ मुलामुलींचा परस्पर-परिचय वाढेल, मित्रत्व वाढेल. ही कल्पना सर्वांना पसंत पडून काही वर्षे असे कार्यक्रम झाले. नंतर मात्र दुर्दैवाने ही परंपरा खंडित झाली.

याच संस्थेशी संबंधित असताना दादांमुळे एक गृहस्थ तुरुंगात जाता जाता वाचला. दादांच्या सूचनेवरून या संस्थेत एक प्रिंटिंग क्लास सुरू करण्यात आला होता. एक साऊथ इंडियन गृहस्थ तिथे असि. सुपरिन्टेडेंट म्हणून काम करीत होता, त्याची बायको तेथेच काम करीत होती. तो माणूस हुशार होता. कामाची माहिती होती. संस्थेत बरीच वर्षे काम केल्यामुळे लोकही त्याला ओळखत. विश्वास ठेवत. पुढे प्रिंटिंगची कामे खूप येऊ लागली. पैसा जमा होऊ लागला आणि त्या गृहस्थाची नियत बिघडली. पैशाच्या व्यवहारात तो चांगलाच पकडला गेला. चौकशी झाली. गुन्हा निश्चित होताच त्याला कामावरून काढण्याचा व त्याचा

फंड वगैरे काही न देण्याचा निर्णय तर झालाच. पोलिसात कळविले तर त्याला शिक्षा होणार हे निश्चित होते.

आश्रमाच्या या संस्थेवर विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या श्रीमती ताराचंद प्रेमचंदना मात्र ही गोष्ट बरी वाटेना. दादांवर विश्वास म्हणून त्यांनी इतरांच्या संमतीने दादा विश्वस्त नसतानासुद्धा त्यांना खास मीटिंगला बोलावले, सर्व प्रकरण समक्ष मांडले गेले. त्या गृहस्थाला शिक्षा झालीच पाहिजे असा निर्णय सर्वांनी जवळजवळ घेतलाच होता. दादांनी शांतपणे सर्व परिस्थितीचा ऊहापोह केला आणि मीटिंगला सांगितले की 'आपण एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. ती ही की हा गृहस्थ याच आश्रमात लहानाचा मोठा झाला. कारकून - टायपिस्ट - असिस्टंट सुपरिंटेंडेंट म्हणून जवळजवळ २५ वर्षे काम करत आहे. त्याची बायको याच आश्रमातील आहे, मुलगा-मुलगी शिकत आहे. दोघांचा पगार पुरत नाही, म्हणून पत्नी इतरत्र नोकरी करते. प्रिंटिंग प्रेसचा व्याप त्याने स्वतःच्या अक्कलहुषारीनेच वाढविला. त्याची बुद्धी फिरली ही गोष्ट खरी, पण तुम्ही म्हणता तशी शिक्षा दिल्यास तो आयुष्यातून उठेल, समाजात त्याला नोकरी सोडाच पण जगणे अशक्य होईल. त्यापेक्षा मी त्याचे मन वळवून राजीनामा द्यायला लावतो. म्हणजे त्याला फंडाचे पैसे देता येतील, बाहेर कुठं तरी त्याला कुटुंबियांसाठी हातपाय हलविता येतील. माझे नाही ऐकले तर भोगू दे त्याला शिक्षा. तो आणि त्याचे नशीब!' सर्वांना पटले. त्या साऊथ इंडियन माणसाला सर्व सत्य परिस्थितीची जाणीव करून दिल्यावर त्याने राजीनामा तर दिलाच पण दादांचे पाय धरले. जाताजाता ताराबाई प्रेमचंद आनंदाने म्हणाल्या 'A good and judicious solution for both the employee & employer!'

### डॉ. पाठक ट्रस्ट (अनाथ बालकाश्रम व महिलाश्रम)

दादांची सासुरवाडी मिरजेची डॉ. प्राणी यांजकडील. त्यामुळे दादांचे कारणपरत्वे मिरजेस जाणे-येणे नेहमी होई. अशाच एका भेटीत मिरजेच्या कै. डॉ. एन्. आर. पाठक यांची व दादांची भेट झाली. डॉक्टरांचे हॉस्पिटल

उत्तम चालले होते, घरच्या शेती-भातीचेही उत्पन्न चांगले होते. समाजकार्याची तळमळ होती. या तळमळीपोटीच त्यांनी महिलांसाठी व मुलांसाठी अनाथाश्रम काढला. स्वत:च्या पैशातून ते सर्व खर्च चालवीत.

अशाच एका भेटीत दादा डॉ. पाठकांसमवेत सर्व आश्रम व त्याची व्यवस्था पाहून आले. दादांना सर्व काही मनापासून आवडले. विशेषत: हॉस्पिटलमध्येच 'दाई व सुईणी' शिकवून तयार करीत. त्यांच्या या शिक्षणाचा डॉक्टर जवळपास नसेल अशा खेड्यांतून बराच उपयोग होई. ही गोष्ट दादांना विशेष कौतुकाची वाटली. पण दादांची भूमिका अनुभवामुळे अधिक व्यवहारी होती. म्हणून बोलता बोलता ते डॉक्टरांना म्हणाले, 'डॉक्टर, तुम्ही आहात तोवर ठीक आहे. पण तुमच्या पश्चात या मुलांचे कोण करणार? सरकारी मान्यता नाही, अनुदान नाही, आता जमिनीचे कायदे बदलत आहेत! (कुळकायदा, कसेल त्याची जमीन ही बिले विधानसभेत संमत होण्याच्या आधीची ही बाब आहे.) तसे झाले तर शेती टिकेल ह्याची खात्री नाही. घरातील माणसांनी नाही बघितले तर ही अनाथ मुलं अक्षरश: रस्त्यावर पडतील.'

डॉक्टरांनी विचारले, 'यासाठी काय काय करावे लागेल?' 'चिल्ड्रन्स ॲक्टखाली संस्था नोंदणी करा, सरकारी मान्यता मिळवा म्हणजे सरकारी अनुदानही मिळेल, ही सर्व मुले 'अनाथ' (पोरकी) म्हणून नोंदवून घ्या, म्हणजे ऑर्फनेज कायद्याच्या कक्षेखाली येतील. ही मुलं 'कोर्टाच्या ऑर्डरने' घेतलेली नसल्यामुळे चिल्ड्रन्स ॲक्टखाली 'सर्टिफाईड स्कूल' म्हणून मान्यता मिळेलच असं नाही.' तेव्हा डॉक्टर म्हणाले, 'तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे पण आम्हाला यातील काहीच माहिती नाही, तेव्हा तुम्हीच काय ते मार्गदर्शन करा.' दादांनी भराभर हालचाली केल्या. संस्था मिरजेला, दादा मुंबईत. कागदपत्रांवरील सह्यांसाठी कागदपत्रे सतत पोस्टाने पाठवायची म्हणजे कालापव्यय होणार म्हणून डॉक्टरांनी आग्रहाने दादांनाच ट्रस्टी व्हायची विनंती केली. मग ट्रस्टडीड करून दादा मुंबईहून दोन-तीन दिवसांची कॅज्युअल लीव्ह घेऊन मिरजेस गेले. पाठक ट्रस्टची सर्वसाधारण सभा झाली. दादांनी सर्व विषय समजावून देऊन योग्य ते ठराव संमत करून घेतले. लवकरच सर्व कायदेशीर

बाबींची पूर्तता झाली. तीस मुलांकरता मासिक अनुदान सुरू झाले, पुढे सर्व काही मार्गी लागल्यावर दादांनी विश्वस्तपदाचा राजीनामा दिला. डॉक्टरांचे व दादांचे संबंध जिव्हाळ्याचे राहिले. डॉक्टर मिरज विभागातून आमदार म्हणून निवडून आल्यावर विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी मुंबई-नागपूरकडे गेले की दादांना आवर्जून भेटत. दादाही मिरजेला सासुरवाडीला गेले की डॉक्टरांच्या आश्रमात अवश्य जाऊन येत, नवीन उपक्रमांसंबंधी बोलणी होत. या संस्थेतून बारा-तेरा वर्षांच्या मुली दादा श्रद्धानंद महिलाश्रमाकडे ट्रान्स्फर करून घेत, ही प्रथा पुढे बरीच वर्षे चालू होती.

डॉक्टरांचे पुढे निधन झाले, पण एकूण काम सर्वस्वी वा. रा. पाठक, डॉ. रा. न. पाठक व वा. गो. पाठक लक्षपूर्वक चालवतात व व्याप वाढवतात हे पाहून दादांना समाधान वाटले. अलीकडेच या संस्थेने 'वृद्धाश्रम' पण चालू केला आहे. आजही दादांना सल्ला विचारण्यात येतो आणि अशा चांगल्या प्रकारे वाढ होत असलेल्या संस्थेस गरज असल्यास मार्गदर्शन करण्यात दादांना आनंदच होतो.

० ० ० ०

ही झाली दादांनी ज्या ज्या संस्थांतून प्रत्यक्ष सहभाग घेतला अशा संस्थाची माहिती. याखेरीज कारणपरत्वे विशिष्ट हेतूने निर्माण झालेल्या संस्था वा कमिट्यांवरही दादांनी कामे केली. वेदमूर्ती पंडित सातवळेकरांचा सत्कार झाला तेव्हा स्थापन झालेल्या समितीचे दादा मानद सचिव होते. युद्धकाळात स्थापन झालेल्या डिफेन्स कमिटीवरही दादांनी काम केले. 'गोवा बॉर्डर करन्सी नोट्स' या एके काळी गाजलेल्या खटल्यात दादांनी हायकोर्ट ज्युरी आणि नंतर अंपायर म्हणून काम केले. नायगाव-दादर भागातील व्याघ्रेश्वर मंदिरासाठी जागा मिळविण्याच्या कामापासून प्रत्यक्ष मंदिर उभारणीपर्यंतच्या झालेल्या सर्व प्रक्रियांमध्येही दादांचा सक्रिय सहभाग होता. आजही अनेक संस्थांशी दादांचा अप्रत्यक्ष संपर्क आहे. अप्रत्यक्ष म्हणजे असे की वानप्रस्थाकडे वाटचाल करता करता दादांनी जाणीवपूर्वक विश्वस्त-सचिव अशा स्वरूपाचा प्रत्यक्ष संबंध संपुष्टात आणला. अर्थात सल्ला-मार्गदर्शन लागले तर आनंदाने ते देतात, घरातून नेण्या-आणण्याची व्यवस्था झाली तर प्रत्यक्ष जाऊन चार युक्तीच्या गोष्टी सांगतात.

दादांनी एक खबरदारी मात्र प्रत्येक ठिकाणी आवर्जून घेतली. ती म्हणजे पक्षीय राजकारणाशी संबंध असलेल्या संस्थांपासून ते कटाक्षाने दूर राहिले. श्री रामकृष्ण चॅरिटीज् व श्रद्धानंद महिलाश्रमाच्या कामासाठी दिवसाचे चोवीस तास बांधील राहूनही दादांनी अनेक संस्थांसाठी काम केले हे नवलाचेच. दादा मौजमजेसाठी कुठे कधी हिंडलेच नाहीत. पण कामानिमित्ताने जिथे गेले तिथे एखाद्या प्रेक्षणीय स्थळाची चौकशी करावी इतक्या आत्मीयतेने ते प्रथम जवळपास अनाथ बालकांसाठी, निराधार अबलांसाठी एखादा आश्रम वगैरे आहे का, ह्याची आवर्जून चौकशी करतील. दादा आग्र्याला गेलेत की नाहीत ह्याची माहिती नाही; पण यदाकदाचित गेलेच तर जगप्रसिद्ध ताजमहालचा रस्ता धुंडाळण्यापूर्वी जवळपास एखादा बालकाश्रम, महिलाश्रम किंवा वृद्धाश्रम आहे का? ह्याची आधी चौकशी करतील. बिचारा शहाजहान बादशहा! दादांच्या या 'सौंदर्यदृष्टी'ची त्याला कल्पना असती तर काही तरी वेगळी व्यवस्था त्याने केली असती!

अशा या संस्थाप्रेमी माणसाला आणि अनेक संस्थांतून नुसते 'फॅशन' म्हणून अध्यक्ष-उपाध्यक्ष न राहता अंगावर कामाचे डोंगर घेऊन काम करणाऱ्या या सद्‌गृहस्थाला संस्थांचा 'संस्थानिक'च म्हणायला हवं!



## २२.

### दादा आणि कुटुंबीय

वास्तविक दादांच्या बाबतीत मित्रपरिवार, कुटुंबीय वा परिचित मंडळी ही सारीच नात्याची माणसं. 'वसुधैव कुटुंबकम्' ही त्यांची स्थायी वृत्ती. त्यामुळे सर्वांच्याविषयी सविस्तर लिहिणे हा एक ग्रंथविषय होईल. वाई हे जन्मगाव. त्यांचे जन्मदाते वडील हे त्यांचे प्रमुख श्रद्धास्थान. त्यांना भाऊ म्हणत. ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे वेदशास्त्रसंपन्न वेदमूर्ती म्हणून ते वंदनीय होते.

७ मे १९७८ रोजी म्हणजे वयाच्या ९९ व्या वर्षी निधन होण्यापूर्वी तब्बल ८० वर्षे भाऊंनी वाई गावात वेदपठण व ६० वर्षे वेदविद्या शिकविण्यात घालविली. वाईचे अनेक शास्त्रीपंडित वाईसारख्या छोट्या गावातील तुटपुंज्या उत्पन्नाला कंटाळून पुण्यामुंबईकडे गेले. उत्तम धन जोडून त्यांनी उत्तम बस्तान बसविले. पण भाऊंनी तसं केलं नाही. जी काही मीठभाकर मिळेल ती आणि कृष्णामाईचे 'उदंड' पाणी पिऊन तृप्तीची ढेकर द्यायची वृत्ती. कोणत्याही प्रलोभनापोटी वाई गाव सोडायचं नाही ही जणू त्यांची भीष्मप्रतिज्ञा होती. त्यांच्या वैदिक ज्ञानावरील अधिकाराची यथार्थ जाणीव तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींना मात्र होती. 'गुणी गुणिनां वेत्ति' हे खरं; म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५०-५१ च्या सुमारास सोरटी सोमनाथ मंदिराच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी त्यांनी आवर्जून मदत घेतली ती शंकरभाऊंचीच.

## सोरटी सोमनाथ मंदिर - प्रतिष्ठापना

इतिहासकाळात महमूद घोरीने केलेल्या अनेक स्वाऱ्यांत मोडतोड केलेल्या सौराष्ट्रातील सोरटी सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीचा प्रश्न त्या काळात बराच उग्र बनला होता. भारत हे निधर्मी राज्य; मग असं मंदिराच्या प्रतिष्ठापनेचे काम आणि तेसुद्धा राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन? (त्या वेळी राष्ट्रपती कै. डॉ. राजेंद्रप्रसाद होते.) त्या काळात बऱ्याच मान्यवरांनी या योजनेला कडवा विरोध केला, पण या योजनेमागे खंबीरपणे उभे होते तत्कालीन गृहमंत्री कै. वल्लभभाई पटेल. भक्कम पोलादी पुरुष. नेटाने त्यांनी मंदिरबांधणीचे काम चालूच ठेवले. सर्वांचा उत्साह आणि उत्सुकता शिगेला पोचली होती. पण मध्येच माशी शिंकली. या मंदिरात हरिजनांना प्रवेश द्यायचे ठरले तसे काशीच्या पंडितांनी प्राणप्रतिष्ठापनाकार्याचे पौरोहित्य करण्यास साफ नकार दिला. मोठा पेचप्रसंग उभा राहिला! अशा बाक्या प्रसंगी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री पुढे सरसावले. ते मान्यवर पंडित होते तरी मूर्ती-प्रतिष्ठापनेच्या धार्मिक पूजा-तंत्राच्या बाबतीत वैदिक ब्राह्मण जितके प्रत्यक्षपणे परिचित असतात तसे ते नव्हते. त्यांनी त्यांचे गुरू ब्र. भू. केवलानंद सरस्वती यांच्याशी विचारविनिमय करून वाईला शंकरभाऊ ताटके यांच्या घरी वाईतील सर्व विद्वान पंडितांची बैठक घेतली. सर्वांनी सहकार्य देण्याचे मान्य केले. सोमनाथ मंदिराच्या धार्मिक कार्याचे प्रमुख पौरोहित्य स्वत: शंकरभाऊ व वे. शा. सं. काशीनाथभटजी महाबळेश्वरकर या उभयतांनी करण्याचे ठरले. या सर्वांची अट मात्र एकच होती की जोवर सर्व धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत तरी प्रत्यक्ष मूर्तीपासून ठरावीक अंतरापर्यंत कोणीही यायचे नाही. नंतर भले काही करा.

विद्वज्जनांच्या प्रखर विद्वत्तेचा दबदबाच एवढा दांडगा की त्यांची ही अट सर्वांनी पाळली. अगदी प्रत्यक्ष राष्ट्रपती राजेंद्रप्रसादसुद्धा या 'लक्ष्मणरेषे' पर्यंत येऊनच दर्शन-प्रसाद घेऊन गेले. विद्वानांची कदर करण्याचे सौजन्य सरकारदरबारच्या श्रेष्ठींना त्या काळात होते. ही घटना केवळ चाळीस वर्षांपूर्वीची. समाज आणि नीतिमूल्यं आजच्या घडीला किती बदलली आहेत किंवा खरं म्हणजे ढासळली आहेत हे पाहून कोणालाही खंत वाटेल!

वाईचा हा सारा ब्रह्मवृंद मुंबईमार्गेच सोमनाथला जायचा होता. काही आकस्मिक कारणांमुळे समारंभ दोन दिवस पुढे ढकलला गेला. तेव्हा अचानक या ६-७ ब्रह्मजनांचा मुक्काम दादांच्या माटुंग्याच्या घरीच झाला. दोन खोल्यांची जागा. सर्वांचे सोवळे-ओवळे सांभाळायचे. दादांना मोठा प्रश्न पडला. पण सौ. लीलाताईंनी अत्यंत अगत्याने आणि जबाबदारीने सर्वांचे आदरातिथ्य केले. सर्वांचे सोवळे-ओवळे सांभाळले. दादांनी त्यातही थोडीशी चतुराई केली. घरी 'बाका' प्रसंग शक्यतो ओढवू नये म्हणून मित्राची मोटारगाडी घेऊन सर्वांना मुंबईदर्शन घडविले. शंकरभाऊ आणि सर्वजण आनंदले. सर्वांचे आशीर्वाद मिळाले म्हणून दादा-लीलाताईंनाही धन्यता वाटली.

### शंकरभाऊंची अखेर

भाऊंच्या अंतिम क्षणी दादा अगदी योगायोगाने त्यांच्याजवळ होते. कामाचा व्याप वाढल्यावर दादांना वाईत निवांतपणे राहण्याइतकी सवड मिळायची नाही. तरीपण जमेल तेव्हा दादा वाईच्या घरी जाऊन सर्वांची वास्तपूस्त करून येत. १९३४ साली दादांच्या समवेत मॅट्रिक झालेल्या सर्व मित्रगणांनी १९७८ च्या मे महिन्याच्या उन्हाळ्याच्या सुटीत एकत्र जमायचे ठरले. त्याप्रमाणे सर्वजण जमले. दादांना त्या वेळी भाऊंची प्रकृती काही चांगली दिसली नाही. ताटकेकुटुंबियांचे डॉक्टर मराठे नेहमी येऊन-जाऊन भाऊंना तपासत असत. पण दादा मित्रमंडळींच्या समवेत संध्याकाळी गप्पागोष्टी-भोजन करून आले तेव्हा त्यांना भाऊंची प्रकृती अधिकच क्षीण झालेली दिसली. धाकटी भावजय म्हणाली, की सकाळपासून काही खाल्लं नाही. सर्वांचा आग्रह झाला तरी इच्छा नाही एवढेच म्हणत. खावेसे वाटले तर मीच मागून घेईन असे म्हणाले. पण मागितले मात्र काहीच नाही. दादा डॉ. मराठेंना घेऊनच आले. डॉ.मराठेंनी तपासले. त्यांच्याशी बोलले, 'पोटात सकाळपासून काही नाही. निदान झोपताना थोडेसे दूध तरी घ्या.' भाऊ 'बरं' म्हणाले. डॉक्टरांनी जाताना दादांना खूण केली. बाहेर आल्यावर म्हणाले,

'रात्री तू कुठे झोपतोस?'

'माडीवर. का?'

'मला काही लक्षण ठीक वाटत नाही. रात्रीत मधून मधून लक्ष ठेवा. सकाळी मी काही इंजेक्शनूस घेऊन येईन. जवळच्या कोणाकोणाला बोलावून घ्यायचे असेल तर बोलावून घ्या. रात्रीत काही कमीजास्त वाटलं तर मला कळवा.'

एवढे बोलून डॉक्टर गेले. दादा भाऊंपाशी जाऊन बसले. 'भाऊ, डॉक्टरांनी थोडसं दूध घ्यायला सांगितलं आहे. घेता ना?'

'बरं, आणा थोडेसे.'

दादांचा धाकटा भाऊ दूध घेऊन आला. त्यातील जेमतेम दोन-तीनच घोट त्यांनी घेतले व बस् म्हणाले. दादा पाच-दहा मिनिटे तेथे बसले. तेवढ्यात भाऊंना झोप लागली. थोडा वेळ थांबून त्यांना शांत झोप लागल्याचे बघून त्यांच्या अंगावरील पांघरूण नीट करून दादा माडीवर गेले.

रात्री झोपण्यापूर्वी फोनने संध्याकाळी कळविल्याप्रमाणे दादांची धाकटी बहीण सौ. विमल व तिचे यजमान श्री. तात्या कानेटकर रात्री अकराच्या सुमारास पुण्याहून आले. त्या वेळी भाऊ झोपलेले होते. भावजयीने खाणे-पिणे केल्यावर सर्वजण पुन्हा एकदा भाऊंना झोपलेले बघून झोपावयास गेले. पहाटे ५-५। च्या सुमारास दादा माडीवरून खाली आले त्या वेळी भाऊंना किंचित जाग आलेली दिसली. किती वाजले असतील वगैरेची काहीच कल्पना भाऊंना नसावी. ते दादांना म्हणाले, 'का रे एवढ्या लवकर उठलास?' दादा म्हणाले, 'काही नाही. नेहमीप्रमाणे जाग आली म्हणून उठलो इतकंच.' ५-१० मिनिटांनी भाऊ म्हणाले, 'एकदा शौचाला जाऊन येतो.' त्यावर दादा म्हणाले, 'काल सबंध दिवसात पोटात काही नाही. कशाला उगाच कष्ट घेताय?' 'वेळेवर जाऊन यावे हे उत्तम.' भाऊंच्या सवयी दादांना माहीत होत्याच. ठरावीक गोष्टी ठरावीक वेळी झाल्याच पाहिजेत. तेवढ्यात रात्रीच आलेले तात्या उठून खाली आले. त्यांना पाहून भाऊ म्हणाले, 'ऑ? तुम्ही केव्हा आलात?' तात्या म्हणाले, 'मी व विमल रात्रीच आलो. तुम्हाला गाढ झोप लागली होती म्हणून उठविले नाही.' त्यावर भाऊ म्हणाले, 'एकदम असे अचानक कसे आलात?' दादांनी तात्यांना हळूच खूण

केली तेव्हा तात्या म्हणाले, 'बाळासाहेब (म्हणजे दादा) इथं आल्याचे कळलं म्हणून म्हटलं आपणही यावं. त्यांचं उद्याचं व्याख्यानही अनायासे ऐकायला मिळेल.' तेवढ्यातसुद्धा भाऊंनी त्यांच्या चहाची वगैरे चौकशी केली. दादांचे धाकटे बंधू वसंतराव तेथे होते, त्यांचा आधार घेत त्यांच्याकरता व्यवस्था केलेल्या खोलीत प्रातर्विधीसाठी गेले. काही वेळाने वसंताचा आधार घेत, त्यांच्या पद्धतीप्रमाणे काठीचा आधार घेत घेत ओसरीवरील त्यांच्या नेहमीच्या खुर्चीत बसले. पायाखाली ठेवलेल्या घमेल्यावर पाय ठेवले. संडासला जाऊन आल्याचे कष्ट फार झाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. ऊर धपापत होता.

भाऊंच्या एकंदर अवस्थेवरून वसंताला सांगून दादा डॉक्टरांना बोलावण्यास गेले. भाऊंच्या पायांवर त्यांची वाईची सूनबाई पाणी घालणार तोच भाऊंनी खुर्चीतच मान टाकली. वसंताने 'भाऊ भाऊ' म्हणून ओरडून हाका मारल्या, पण कोणताच प्रतिसाद नव्हता. वसंताने ताबडतोब मुलाला दादांपाठोपाठ डॉक्टरांकडे पाठविले. तो धावतच गेला व डॉक्टरांना त्याने भाऊंना खुर्चीतच घेरी आल्याचे सांगितले. डॉक्टरांनी काय जे जाणले. दाढी करण्यासाठी तोंडाला साबण लावलेला होता तो तसाच पुसला. खुंटीवरची रात्रीच इंजेक्शनस भरलेली बॅग घेतली, दादांसह ते लगबगीने घरी आले. तोपर्यंत वसंताने इतरांच्या मदतीने भाऊंना त्यांच्या बिछान्यावर आणून झोपविले होते. डॉक्टरांनी तपासले. छाती जरा चोळली तसा तोंडातून 'फस्स्' असा आवाज आला. डॉक्टर म्हणाले, 'संपले सारे. आता इंजेक्शनचा पण काही उपयोग व्हायचा नाही.'

इतका वेळ दाबून धरलेला सगळ्यांचा शोक अनावर झाला. भाऊंचे कष्टमय जीवन दादांच्या नजरेसमोर येत होते. भाऊंनीच शिकविलेला 'जातस्य हि ध्रुवो मृत्यु:... वासांसि जीर्णानि यथाविहाय...' वगैरे सारा वेदान्त त्यांना समजत नव्हता असे नाही. पण मूळच्या भावनाप्रधान मनाला शोक आवरत नव्हता. शोकाकूल मनाला काबूत आणायला मदत केली ती डॉक्टरांच्या आश्वासक शब्दांनी. पाठीवर फिरलेल्या त्यांच्या हाताच्या ममतेच्या स्पर्शाने. ते नुसतेच डॉक्टर नव्हते तर

ताटकेकुटुंबियांशी घरोब्याचे संबंध असलेले हितचिंतक होते. भाऊंच्या माघारी आता या वाईत 'राम' म्हणून एकेरी नावाने दादांना हाक मारणारे तेवढे एकच वडीलधारे माणूस उरले होते.

दादांनी स्वत:ला सावरले. घरात आता तेच सर्वांत मोठे. सर्वांना शांत केले. पुढील व्यवस्थेला लागले. मुंबई, सातारा येथील बहिणींना तारा केल्या. शक्य तिथे फोन लावले. दादांच्या पत्नी सौ. लीलाताई त्या वेळी माहेरी मिरजेस गेल्या होत्या. सकाळीच बातमी सगळीकडे पसरली. लोक अंत्यदर्शनासाठी येऊ लागले. दादांच्या सायंकाळच्या भाषणापूर्वी सकाळी मित्रमेळाव्याचा संमेलनस्वरूपाचा कार्यक्रम होता. उद्घाटन तर्कतीर्थांच्या हस्ते व्हायचे होते. भाऊंच्या निधनाची बातमी कळल्यावर सर्व कार्यक्रम स्थगित करून सभेचे दुखवट्याच्या सभेत रूपांतर झाले. तर्कतीर्थांनी सभेला 'वाईचे वयोवृद्ध, तपोवृद्ध वेदशास्त्रसंपन्न श्री. शंकरभटजी ताटके ह्यांच्या दु:खद निधनाची' माहिती सांगितली. तेथून सर्व मंडळी दादांच्या घरी अंत्यदर्शनासाठी आली.

कै. भाऊंनी मृत्यूच्या दिवसाच्या आधीच्या दिवशीही अंघोळ, संध्या, व इतर आन्हिके तास-दोन तास बसून केली होती. संध्याकाळी संध्या केली होती. शेवटपर्यंत स्मृती चांगली होती. चाळिशीनंतर लागलेला चष्मा सत्तरी उलटल्यानंतर पार पळाला. ऐकू येण्याचे प्रमाण कमी झाले होते एवढेच. अखेरपर्यंत जवळजवळ सर्व दैनंदिन कार्यक्रम चालू होते. ९८ वे वर्ष उलटून गेल्यावरही त्यांच्यावर नितांत श्रद्धा असणारे परिचित आग्रहपूर्वक धार्मिक कृत्यांसाठी रिक्षातून त्यांना घेऊन जात व आणून पोचवीत. कधी आजारपणात खितपत पडले नाहीत की जरुरीपेक्षा अधिक कोणावर अवलंबून राहिले नाहीत. स्वत:ची सर्व कामे स्वत:च करण्याकडे त्यांचा आग्रह असे. आणखी केवळ सात-आठ महिने जगते तर साऱ्या कुटुंबियांनी केवढ्या कौतुकाने आणि आनंदाने त्यांची शताब्दी साजरी केली असती. पण.... ईश्वरेच्छा बलीयसी हेच खरे!

दादांचा जन्म शुद्ध बीजापोटी झाला. वाई क्षेत्र, शंकरभाऊ आणि आई अंबिकाबाई ह्यांच्यासारख्या सात्त्विक माता-पित्यांच्या पोटी जन्म

हे त्यांना आपले सद्भाग्य वाटते. तसाच सत्प्रवृत्त वारसा त्यांना श्वशुरगृहाकडूनही मिळाला. ताटके आणि प्राणी या दोन घराण्यांचा संबंध जुळून येणे म्हणजे एक प्रकारे मूर्तिमंत सात्त्विकता, सद्भावनांचा प्रीतिसंगमच!

दादांचे व्याही कै. रा. द. प्राणी हे व्यवसायाने डॉक्टर. पण हा व्यवसाय त्यांनी कुटुंबियांच्या चरितार्थापुरताच मर्यादित ठेवला. मिरज संस्थानच्या राजेसाहेबांचे ते फॅमिली डॉक्टर. तेव्हा ऐहिक माया जोडणे त्यांना सहज साध्य होते. पण त्यांची मनाची जडण-घडणच आध्यात्मिक प्रवृत्तीची. गांधीहत्येनंतर महाराष्ट्रात साऱ्या ब्रह्मवृंदांवर संकट कोसळले त्या वेळी डॉक्टर मुंबईला होते. ते राहात असलेला डॉ. भडकमकरांचा वाडा समाजकंटकांच्या क्षोभापोटी जळून खाक झाला. त्या वेळी त्या अग्निदिव्यातून आश्चर्यकारक रीत्या सुरक्षित राहिली ती ब्रह्म आणि माया! एका वळचणीखाली श्रीदत्तप्रभूंच्या पादुका आणि श्री जगदंबेची सालंकार मूर्ती सुरक्षित होती. सारा संसार जळून राख झाला; मग हे अघटित कसे काय घडले असेल? डॉक्टरांची मनोवृत्ती त्या प्रसंगाने आणखीनच आध्यात्मिक बनली. होते नव्हते ते सारे अग्निदेवाने स्वाहा केल्यामुळे शोकाकूल झालेल्या कुटुंबियांना धीर देत शांतपणे ते म्हणाले, 'काही काळजी करू नका. अग्निप्रलयातून आपली उपास्य देवतेची मूर्ती मिळाली ना? मग ती आपल्या पाठीशी उभी आहे हे निश्चित समजा.'

२३ जून १८९२ साली जन्मलेल्या या डॉक्टरांनी १९२२ साली वैद्यकीय पदवी ग्रँट मेडिकल कॉलेजातून मिळवून १९५६ सालापर्यंत वैद्यकीय व्यवसाय केला. मुलगा (अरविंद) हा डॉक्टर होऊन प्रॅक्टिस करू लागला. एका वर्षात त्याचा उत्तम जम बसल्यावर डॉक्टरांनी आपल्या व्यवसायातून निवृत्ती घेऊन अखेरपर्यंतचा काळ आवडत्या अध्यात्मसेवेत व्यतीत केला. त्यांचे परममित्र बोडस यांच्या साथीने मिरजेच्या प्राचीन भवानी मंदिरात भजन-निरूपणे चालू झाली. त्यांचे पहिले प्रवचन २८ फेब्रुवारी १९६५ रोजी झाले. श्रीसमर्थांच्या मनाच्या श्लोकांवर प्रवचने सुरू झाली. ती प्रवचने श्रोत्यांना एवढी आवडली की, मिरजेतील अध्यात्मप्रेमी नागरिकांच्या आग्रहापोटी १९६६ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. नंतर जवळजवळ २५ वर्षांनी ह्या पुस्तकाचा व डॉक्टरांनी

श्रीदासबोधातील प्रत्येक समासातील एक ओवी निवडून निरनिराळ्या दहा विषयांवर संकलित केलेला 'दशबोध' या सर्वांचे एकत्रित पुनर्मुद्रण करून 'स्वाध्याय मनोबोध' नावाचा ग्रंथ अलीकडे डिसेंबर १९९१ मध्ये प्रकाशित करण्यात आला.

असे हे विद्वान डॉक्टर श्वशुर, त्यांचे धाकटे बंधू वकील. दादांना यामुळे मिरजेला श्वशुरगृही जायचे म्हणजे एक प्रकारचा न्यूनगंड वाटे. इतका की जवळजवळ पहिली चार-पाच वर्षे त्यांनी मिरजेला जाण्याचेसुद्धा टाळले. लग्नानंतरच्या सणा-समारंभाच्या वेळी नोकरी नवी आहे, रजा मिळत नाही, अशा सबबी सांगून वेळ मारून नेली! पण मौज म्हणजे याच दादांनी आपल्या डॉक्टर श्वशुरांना त्यांच्या वकीलभावाने आणलेल्या मानहानीकारक प्रकरणातून मोठ्या शिताफीने वाचविले.

दादांचे चुलत सासरे श्री. व्ही. डी. प्राणी मिरजेस वकिली करत. वकिली विशेष चालली नाही. अनेक उद्योग केले पण यश असे कुठेच मिळाले नाही. शेवटी 'व्हरायटीज् इंडिया लिमिटेड' या भारदस्त नावाची एक कंपनी त्यांनी काढली. मोठे डॉक्टर बंधू चेअरमन. स्वत: मॅनेजिंग डायरेक्टर, त्यांचे मेहुणे दादा आणि दादांचे साडू डायरेक्टर्स. प्रत्येकाने काही ना काही भांडवल घातले. दादांनी नुकतीच व्ही. जे. टी. आय्. सोडली होती. (ही गोष्ट आहे १९४५-४६ सालची.) तिथे मिळालेला रु. १५००/- चा फंड दादांनी या कंपनीत घातला. बाकीची मंडळी नात्यातीलच, उच्च विद्याविभूषित आणि चार पैसे जास्तीच मिळतील ही भाबडी आशा, म्हणून ह्या फंदात पडली.

काही दिवसांतच दादांना कळून आलं की ह्या चुलत श्वशुरांची पावले काही सरळ पडत नाहीत. त्यांचे वकिली ज्ञान हे प्रत्येकाला बुडवून स्वत:चा स्वार्थ साधण्याचेच आहे. थोरल्या बंधूंच्या निष्कपटी, सरळ स्वभावाचा त्यांनी गैरफायदा घेतला. त्यांच्याकडून त्यांनी पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी घेतली. कंपनीच्या नावे एक इमारत भाड्याने घेतली. मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून दरमहा पगार, वेगवेगळे भत्ते घेऊन कंपनीच्याच खर्चाने सर्व सुखसोयी करून, ऐषारामात दिवस-महिने काहीतरी मोठे करीत असल्याचा आव आणून राहू लागले. प्रत्यक्ष उद्योग काहीच नाही.

खर्च मात्र बेसुमार वाढत चालला. इतका की कंपनीच्या नावे कर्ज वाढू लागले.

दादांनी जसजशा या गोष्टी बघितल्या, तसतशा त्या आपल्या श्वशुरांच्या (डॉ. प्राणी) कानावर घातल्या. त्यांच्या सरळ मनाला काही या बाबी पटेनात. एकीकडे लहानपणापासून एकत्र वाढलेला भाऊ तर दुसरीकडे जेमतेम दहा वर्षांचाच आणि त्याहूनही प्रत्यक्ष संबंध कमी आलेला असा जावई! त्यामुळे दादांना त्यांना पटवून देणे कठीण पडायला लागले. इतरांना पटले म्हणून दादांसह बाकीच्या डायरेक्टर्सनी कंपनीतून आपले अंग काढून घेतले. त्यामुळे प्रत्यक्षात कंपनीत आता दोनच डायरेक्टर्स– दोन्ही प्राणीबंधू– उरले. थोरले डॉ. प्राणी अध्यक्ष हे मिरजेस तर धाकटे वकीलबंधू मुंबईत कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर! परिणाम व्हायचा तोच झाला. पैसे संपले. पत गेली. कर्जाचे इमले उभे राहिले. एक दिवस अचानक घरावर जप्ती आली. मग मात्र पाचावर धारण बसली. डॉ. प्राणी धावतपळत जावयाकडे म्हणजे दादांकडे आले.

दादांनी कंपनीच्या सर्व परिस्थितीचा तपशीलवार अभ्यास केला. अगदी कंपनी लॉची पुस्तके वाचून काढली. आणि आपल्या वकीलश्वशुरांशी रामदासी शिकवणुकीप्रमाणे 'धटासी धट उद्धटासी उद्धट' अशी वर्तणूक ठेवली. दादांनी काय काय केले हा मोठा इतिहास आहे. तो सांगणे अप्रस्तुत आहे. सारांश एवढाच की सर्वांनी गुंतविलेले पैसे गेले, पण दादांनी आपल्या श्वशुरांची अब्रू वाचविली. 'सर्वनाशेसमुत्पन्ने अर्धं त्यजति पंडित:' या उक्तीनुसार सर्वांनी गुंतविलेल्या पैशावर पाणी सोडले पण अडकलेली मान वाचविली. संतप्रवृत्तीच्या श्वशुरांना दादा अवलंबत असलेले साम - दाम - दंड - भेद हे मार्ग मानवत नव्हते. पण दादा करतात तेच योग्य आहे अशी खातरजमा त्यांच्यावर श्रद्धा असणाऱ्या अधिकारी संन्याशी पुरुषाने केली तेव्हा त्यांना पटले, त्यानंतर मात्र त्यांचा अखेरपर्यंत दादांवर अढळ विश्वास बसला.

सर्वांत मौजेची बाब म्हणजे सर्व व्यवहार तपासताना हे दोन्ही

प्राणीबंधू हे एकमेकांचे सख्खे बंधू नाहीत हे कळल्यावर दादा अचंबितच झाले! सात्त्विक प्रवृत्तीच्या श्वशुरांनी ही वस्तुस्थिती कोणालाच सांगितली नव्हती. वकीलबंधूंची आई वारल्यानंतर 'ज्येष्ठो भ्राता पितु:सम:' या भूमिकेतून त्यांना सख्ख्या भावाप्रमाणे वागवून त्यांचे पालन-पोषण-शिक्षण सर्व काही ममतेने केले. त्याचे त्यांना असे फळ मिळाले.

अशा या अध्यात्म जगलेल्या दादांच्या श्वशुरांचा अंत त्यांच्याच डॉक्टर मुलाच्या (डॉ. अरविंद) मांडीवर ज्येष्ठ शुद्ध दशमी शके १८९१ रोजी (१९६९ साली) झाला. मृत्युसमयी त्यांचा मुलगा चि. अरविंद वडिलांच्या उजव्या कानात 'गुरुदेव दत्त' हा मंत्र उच्चारीत होता. दत्तमाऊलीच्या दर्शनानेच तृप्त होऊन त्यांनी देहत्याग केला. सौ. लीलाताईंना आपल्या वडिलांच्या निधनाचे दु:ख आणि दादांना आपल्या सात्त्विक, सज्जन, सरळ मनाच्या श्वशुरांच्या मृत्यूचे दु:ख झाले.

दादांच्या आयुष्यावर आपले वडील आणि सासरे या दोघांचा प्रभाव पडला. पण आजवरच्या आयुष्यात त्यांनी जे प्रचंड कार्य केले त्याचे मोठे श्रेय सौ. लीलाताईंना दिले पाहिजे. दुर्दैवाने आपल्या समाजात – निदान जुन्या काळात तरी – स्त्रियांच्या कष्टाला, त्यागाला योग्य असा न्याय फारच क्वचित दिला गेला. सौ. लीलाताईंच्या बाबतीतही हेच घडले. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीशी एक स्त्री असते हे वापरून वापरून चोथा झालेले सुभाषित आपण अशा पुरुषांच्या गौरवसमारंभांत उच्चारतो आणि त्या यशस्वी पुरुषाच्या सहधर्मचारिणीच्या बाबतीतले आपले 'कर्तव्य' संपले अशा भावनेत राहतो. पण अशा स्त्रियांना किती खस्ता खाव्या लागतात, किती मन:स्ताप सहन करावे लागतात, ह्याची कल्पना 'जावे त्याच्या वंशा' तेव्हाच येऊ शकते!

वास्तविक लीलाताई या एक डॉक्टरकन्या. तसं बघायला गेलं तर बालपण सुखातच गेले. जुन्या काळाच्या रीतीनुसार त्यांचे मराठी ५ वीपर्यंत शिक्षण झाले. १९२५-३० च्या त्या जुन्या

काळात मुलींसाठी अशा वेगळ्या शाळा अपवादानेच असत. पुण्यामुंबईकडील सुधारक म्हणविणारे सुशिक्षितसुद्धा आपल्या मुलींना मुलांच्या शाळांतून पाठविण्यास राजी नसत. मिरजेसारख्या दूर संस्थानी गावात तर पुढील शिक्षण अशक्यच. लग्न झाले ते जून १९३५ मध्ये आणि स्वतंत्रपणे संसार मुंबईत मांडला गेला तो सप्टेंबर १९३६ मध्ये! लग्नानंतरचे हौसेमौजेचे वर्ष पार पडले ते असे!

लीलाताई तोवर वाईच्या घरीच होत्या. माहेरची धार्मिक शिकवण, मूळची समंजस वृत्ती यांमुळे त्या बघता बघता ताटक्यांच्या घरातीलच एक अशा तऱ्हेने एकरूप होऊन गेल्या. लग्नानंतर आपला नवरा, त्याचे विचार, वसुधैव कुटुंबकम् वृत्ती या गोष्टींची त्यांना ओळख झाली. माटुंग्यांच्या दोनच खोल्या. ताटक्यांच्या घरी एकूण राबता फार. वाईला मोठे एकत्र कुटुंब. कोणी शिक्षणासाठी तर कोणी नोकरीनिमित्ताने येत राहत. वाईला वडिलधाऱ्यांची वृत्ती एक– मुंबईला आपला बाळू (दादा) आहे, तो करील काही तरी व्यवस्था. नोकरी बघून दे म्हणून अनेकजण - कुटुंबीय - घरोब्याचे येत असत. सर्वांचा दादांवर विश्वास! आणि विश्वास काही उगाच योगायोगाने बसला नव्हता. दादा चार ठिकाणी हिंडत, ओळखी काढीत, ज्याच्यात्याच्या कुवतीनुसार जमेल तशी नोकरी लावून देत. अशा सर्वांचे लीलाताई हसतमुखाने करीत. कडक सोवळे-ओवळे असणाऱ्या चुलत सासूपासून दंगा-धोपा करणाऱ्या मुलांपर्यंत अशी प्रसंगी दहा-दहा, पंधरा-पंधरा माणसे माटुंग्याच्या त्या दोन खोल्यांतून असत. अशा वेळी घरची कर्ती म्हणून लीलाताईंना किती कष्ट उपसायला लागले असतील! पण या सर्वांचा ताळमेळ सांभाळून संसाराची सम त्या व्यवस्थित गाठत. प्रसंगी लय चुके; नाही असे नाही.

एकदा आई-वडिलांचे, छत्र नसलेली एक मुलगी त्यांच्या घरी राहायला होती. एका प्रसंगी अंघोळ झाल्यावर कपड्यांचे बोळे बाथरूममध्ये तसेच टाकून ती आली म्हणून लीलाताई तिच्यावर

ओरडल्या. त्या मुलीला तिची चूक कळली. तिने निमूटपणे सर्व कपडे काठीने दांडीवर वाळत टाकले आणि मग ती शाळेला गेली. प्रसंग अगदी साधा. पण लीलाताईंच्या स्वात्त्विक मनाला तो फार लागला. त्यांच्या मनात आले की हिच्या जागी माझी मृणाल-मंगला असती तर मी त्यांच्यावर अशी ओरडले असते का? या विचाराने त्यांना स्वत:चीच निर्भर्त्सना करावीशी वाटली. असा निर्मळ स्वभाव असल्यानेच ही सर्वांना सांभाळण्याची आणि त्याचबरोबर स्वत:ला सांभाळून ठेवण्याची 'सर्कस' त्यांना जमली.

सुरुवातीच्या काळात आर्थिक ओढाताणही फार होती. दादांची मिळकत तुटपुंजी, जबाबदाऱ्या प्रापंचिक तशाच सामाजिक. प्रत्येक अभ्यागताचे चांगले स्वागत करावे ही मनीची इच्छा, पण अंत:करणातील मायेला खिशातील मायेचे पाठबळ हवे ना? बाहेर आलेला पाहुणा घाईत आहे, चहाकॉफी घेण्याइतका त्याच्याकडे वेळ नाही आणि त्याच्यादेखतच दादा सरबत आण म्हणत, तेव्हा लीलाताईंची तारांबळ उडे. दर खेपेस घरात लिंबू असेलच असे नाही. मग मागच्या दाराने (होते हे नशीबच) छोट्या मकरंदाला पळतपळत लिंबे आणावी लागत!

पुढे आर्थिक स्थैर्य आले. मुलाबाळांना घेऊन दादांसह कुठे प्रवासाला जावे, चार लोकांसारखी मौज-मजा करावी असे त्यांना कधी वाटले नसेल का? किंवा दोन खोल्यांच्या जागेऐवजी एखादा मोठा ब्लॉक घ्यावा, छानपैकी सजवावा असे त्यांच्या कधी मनात आले नसेल का? पण एक तर मुळात त्यांची आहे त्यातच समाधान मानण्याची वृत्ती. दादांच्या समाजसेवेला त्यांनी कधीच लष्करच्या भाकऱ्या मानले नाही. जमेल तेव्हा आणि जमेल तसे त्या कामात त्या प्रत्यक्षच सहभागी झाल्या. दादांच्या बरोबरीने अनेक कन्यादानांना बसल्या. दादांच्या प्रोत्साहनामुळे हिंदीच्या परीक्षा देत देत 'कोविद' झाल्या. विनामूल्य हिंदी शिकवू लागल्या. पण मनात असलं तरी याहून अधिक काही करणे त्यांना शक्यच नव्हते. कारण घरच्या जबाबदाऱ्या आणि दादांच्या सामाजिक

कामांच्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या निभावता निभावता त्यांना दिवसाचे चोवीस तास पुरत नसत.

वेळप्रसंगी काही तांत्रिक कारणाने वा अन्य कारणाने एखाद्या निराधार मुलीची-स्त्रीची व्यवस्था लीलाताईंच्या हवाली असे! म्हणजे नुसत्या कन्यादान करण्यापुरत्या त्या माता बनत नव्हत्या तर वेळप्रसंगी खरोखरीच्या माता त्या बनत असत.

दादांनी श्रद्धानंद महिलाश्रमात प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली तेव्हा त्यांनी नुकतीच चाळिशी ओलांडली होती. सारा वावर स्त्रियांच्या मध्ये. घरी 'राम' आणि बाहेर 'कृष्ण' अशी या रामकृष्ण ताटकेंची (दादांची) संभावना काही तथाकथित हितसंबंधी लीलाताईंसमोर करीत. बोलताना वरवरचे आलवण विनोदाचे दिसले तरी त्यातील 'बोच' लीलाताईंपर्यंत पोचावी ही सुप्त इच्छा. इतरही अनेक प्रकार होत. पण आपला पती 'राम' आहे आणि त्याची कृष्णाची भूमिका तुरुंगवासात खितपत पडलेल्या गोपींची म्हणजेच सर्वस्वी निराधार बनलेल्या स्त्रियांची सुटका करण्यासाठीच आहे ह्याची सौ. लीलाताईंना खात्री होती. दोघांचाही जन्म 'शुद्ध बीजापोटी' झालेला असल्याने क्षुद्र विचार त्यांच्या मनास स्पर्श करू शकत नसत. त्यांना तुम्ही फार छेडलेत, तर त्या एवढेच सांगतील की लग्नानंतर झालेल्या गाण्याच्या बैठकीच्या वेळी दादांना प्रथम पाहिल्यावर त्यांच्या मनात नवऱ्याविषयी जो भाव उमटला, श्रद्धा वाटली तोच भाव आजच्या क्षणीही तसाच कायम आहे!

यावर बिचारा विचारणाराच ओशाळवाणा होऊन जातो.

अलीकडे अलीकडे मात्र दादांनी आपली सामाजिक कामे बंद करावीत असे लीलाताईंना फार वाटायला लागले. दादांचे वय झाले, थकले अशापैकी प्रकार नव्हता; तर नव्या जमान्यात बदलत चाललेल्या किंबहुना ढासळत चाललेल्या नीतिमूल्यांच्या पोटी उद्भवलेली ती एक सार्थ भीती होती. प्रत्येक क्षेत्रात घुसलेल्या

राजकारणामुळे, लाचलुचपतीमुळे समाजकारण करणे सरळसाध्या माणसाला कठीण होत चालले आहे. पूर्वीची नीतिमूल्यांची कदर करणारी, आदर ठेवणारी जाणीवच या समाजातून नष्ट होत असल्याने दादांनी आता अधिक फंदात पडू नये असे लीलाताईंना वाटे. दादांना ते पटे! पण पुन्हा असे काही काम निघे की दादांची गरज भासे आणि दादा पुन्हा गुरफटले जात. मध्यंतरी दादांवर जिवावर बेतणारे प्रसंग गुदरले होते.

दादा लीलाताईंच्या आणि इतर कुटुंबियांच्या आग्रहानुसार सर्व संस्थांतून आदरपूर्वक निवृत्त झाले आहेत. पण नेहमीप्रमाणे माणसांचा राबता चालूच राहिला. फरक एवढाच पडलाय की आता मकरंदला कोपऱ्यावर जाऊन लिंबे आणायला लागत नाही. सरबताच्या बाटल्याच भरलेल्या असतात!



## २३.

### ‘ जीवेत् शरदः शतम् ’

२० जून १९३४ रोजी दादा मुंबईत आले. सुरवातीच्या काळातील धकाधकीच्या जीवनानंतर थोडं ‘ सेट ’ झाल्यावर त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक संस्थांतून कामे करायला सुरुवात केली. ४ जून १९७५ पर्यंत नोकरी सांभाळून आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडल्या. नंतर निवृत्तीनंतरच्या काळात तर अष्टौप्रहर आवडत्या कामात स्वतःला झोकून दिले. मात्र या काळातच त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या आपणहून कमी करण्यास सुरुवात केली. एक तर ज्या संस्थांची जबाबदारी त्यांनी यथायोग्य पार पाडली, त्या त्या संस्थांना एक प्रकारचे, विशेषतः आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले. नवीन नवीन माणसं तयार केली. अशाच प्रकारे नवीन पिढीला वाव मिळावा, जुन्या माणसांचे त्यांना ‘ ओझे ’ वाटू नये म्हणून १९८४ पासून श्रद्धानंद महिलाश्रमातील आपली खुर्ची, तेथील कार्याला २५ वर्षे पूर्ण केल्यावर खाली करण्याचा प्रयत्न केला. सर्वांच्या आग्रहाला मान देत १९९१ पर्यंत दादा संस्थेशी पुन्हा संबंधित राहिले. ७ सप्टेंबर १९९१ च्या वार्षिक सभेच्या वेळी मात्र जाहीर पत्रक काढून निरोप घेतला. श्री रामकृष्ण चॅरिटीज् ही तर घरचीच संस्था. विश्वस्त म्हणून असले तरी आता ते प्रत्यक्ष काम करीत नाहीत. कुटुंब ही पण तशा अर्थाने संस्थाच. पण समर्थांच्या उक्तीनुसार ‘ नेटका प्रपंच ’ करून आता

सांगेन युक्तीच्या गोष्टी चार अशाच स्वरूपाचा त्यांचा सहभाग असतो. अशा प्रकारे त्यांनी स्वत:हून वानप्रस्थाश्रम स्वीकारला.

एवढं प्रचंड काम करून ते सारं 'इदं न मम' अशा बुद्धीने समाजाकडे परत करायचे, ही दिसते तेवढी सोपी बाब नक्कीच नाही. दादांची मानसिक बैठकच मुळी आध्यात्मिक प्रवृत्तीची आहे. वेदशास्त्रसंपन्न वडील आणि समर्थभक्त श्वशुर अशा आदर्शांमुळे दादा पूर्णत: निर्मोही राहू शकले. लहानपणी मुंबईला जाण्याची परवानगी वडिलांनी दिली नसती तर परंपरागत भिक्षुकी सांभाळत जास्तीत जास्त म्हणजे दादा एक विद्वज्जड याज्ञिकी ब्रह्मवृंद झाले असते. भोवतालचे वातावरण असे वेगळे असताना दादांच्या मनात सामाजिक प्रेरणेचा स्रोत कसा स्रवत राहिला याचे नवल वाटते. एखादी फार मोठी घटना, दुर्घटना काळीज चिरून आरपार गेली आणि मग त्यांच्या आयुष्याचा ओघ बदलला असेही दिसत नाही. घरात असलेल्या विधवा नातेवाईक स्त्रिया, त्यांच्या आयुष्यांची झालेली परवड, आजूबाजूच्या परिसरातील दारिद्र्य नि या दारिद्र्यापोटी आयुष्यातील संधी गमावून बसलेली होतकरू मुलं, यांनी लहानपणापासून दादांच्या मृदू अंत:करणावर कुठं तरी एक ओरखडा काढून ठेवला असावा. आतल्या आत ती जखम त्यांना पोखरून काढीत होती.

आयुष्याचा पूर्वार्ध सर्वसामान्य माणसासारखा परिस्थितीशी झगडण्यात गेला. लग्न वडिलांनी परस्पर ठरविलं. आर्थिक परिस्थितीची अनुकूलता नसताना लग्न झालं आणि अक्षरश: शून्यातून त्यांना सारा पसारा मांडावा लागला. पण प्रतिकूल परिस्थितीचा त्यांनी कधीच बाऊ केला नाही. त्यातून सावरल्यावर, थोडसं स्थिरस्थावर झाल्यावरच त्यांनी सामाजिक कार्यात स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले. मग मात्र कधी मागे वळून बघितले नाही. संसाराकडे, प्रापंचिक गरजांकडे कधी त्यांनी दुर्लक्ष केले नाही. कुणाचे आजारपण, कुणाचे शिक्षण, कुणाचे पालन-पोषण ह्या साऱ्या गोष्टी निव्वळ कर्तव्य म्हणून नव्हे तर जबाबदारी अंगावर घेऊन केल्या.

सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. वि. आ. बुवा दादांचे तसे कोणी

आप्तसंबंधी नव्हते. दादांच्या मिरजेच्या सासुरवाडीला दादांच्या मेहुण्याबरोबर असलेल्या मित्राकडे बुवांचे जाणे-येणे असे. दादांचे श्वशुर कै. डॉ. प्राणी सहज दादांना म्हणाले की हा गरीब, होतकरू मुलगा आहे. कुठं नोकरीचे जमले तर पहा. दादांनी ह्या बुवाला मुंबईला नेले. अगदी साबणाच्या कारखान्यापासून नोकऱ्या बघितल्या आणि संधी मिळताच ते त्या वेळी काम करीत असलेल्या व्ही. जे. टी. आय. मध्ये प्रिन्सिपॉलसाहेबांकडे शब्द टाकून चिकटवून टाकला. बुवा मार्गी लागले. पुढे आपल्या गुणांवर मोठे झाले. एका षष्ट्यब्दीपूर्तीच्या जाहीर समारंभातच त्यांनी मोठ्या मनाने दादांनी मुंबईत आणून मदतीचा हात कसा दिला, आयुष्यात उभा कसा केला ह्याचा आदरपूर्वक उल्लेख केला. एक पुस्तकही त्यांनी दादांना अर्पण केले. उल्लेख कराव्यात अशा अनेक हकीगती आहेत.

मात्र सामाजिक कामाचा रेटा जसजसा वाढू लागला तसतसे घरगुती समारंभांना उपस्थित राहणे त्यांना कठीण व्हायचे. इच्छा असायची, पण ऐन वेळी कोणती तरी समस्या दत्त म्हणून पुढे उभी राहायची. त्यांच्या धाकट्या बहिणीने (सौ. विमल कानेटकर, पुणे) या संबंधात एका पत्रात लिहिले आहे की अशा वेळी आई (दादांची) खूप रागवायची. दादांची चांगली कडक हजेरी घेईन असं म्हणायची. पण प्रत्यक्षात दादा समोर आल्यावर यातील काहीच व्हायचे नाही. मग आई म्हणायची, 'तू समोर नसलास की खूप राग येतो, पण समोर आलास की रागावताच येत नाही!'

दादा एरवी कितीही 'वज्रादपि कठोराणि' असले तरी त्यांचा पुरुषी देह हा खरा मातृहृदयी आहे. आईच्या मायेचा अखंड झराच त्यांच्या अंत:करणातून वाहात असतो. त्यांनी आयुष्यात जे काही कार्य केले, त्याला कारणीभूत आहे त्यांच्या ठायी असलेली मातेची ममता.

आपल्या कामावर जिवापाड प्रेम असणाऱ्या माणसाला अशा

आवडीच्या कामापासून दूर होणे किती कठीण! वृक्षापासून त्याची छाया बाजूला काढण्याइतकेच कठीण काम. तरीसुद्धा दादांनी मनाचा निग्रह करून स्वत:ला सर्व सामाजिक कार्यापासून बाजूला काढले आहे. त्यांनी जरी उच्च हिंदू परंपरेनुसार वानप्रस्थाश्रम स्वीकारला असला तरी लोक त्यांना थोडेच स्वस्थ बसू देणार? मार्गदर्शनासाठी, नवीन संस्थांच्या उभारणीसाठी, परिसंवादांसाठी म्हणून त्यांच्याकडे माणसांची ये-जा चालूच राहिली. दादा नाही म्हणत नाहीत. तसा त्यांचा स्वभावच नाही. वार्धक्याची खूण म्हणाल तर लोकल-बसच्या प्रवासाची दगदग त्यांनी टाळली. कोणी नेण्या-आणण्याची सोय केली तर मार्गदर्शन करायला त्यांची तयारी असते.

खरं म्हणजे श्री रामकृष्ण चॅरिटीज्‌खेरीज बाकीच्या सर्व सामाजिक संस्थांमधून निवृत्तीनंतरच हळूहळू अंग काढून घ्यायला त्यांनी सुरुवात केली होती. १९८४ मध्ये आश्रमात काम करावयास लागून २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवृत्त होण्याचे आपणहून ठरविले होते. पण त्यांना कोणी सोडायलाच तयार नव्हते. दादांच्या सततच्या २५ वर्षांच्या सहवासाने दादा आणि आश्रम म्हणजे श्वास आणि उच्छ्‌वास इतके अतूट समीकरण निर्माण झाले होते. पण रामायणात धोब्याच्या रूपाने काय किंवा महाभारतातील शकुनीमामाच्या रूपाने काय, कोणी तरी 'कली' निर्माण होतोच. आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'जातो जातो म्हणतात नि जात नाहीत' ही कोणा मंथरेची वाणी दादांच्या मानी स्वभावाला डंख मारून गेली.

त्यापेक्षाही अधिक प्रक्षोभ दादांच्या कुटुंबियांचा झाला. ज्या ताठ मानेने दादा जिथे वावरले तिथे अशा अवमानित अवस्थेत वावरण्यास दादांच्या कुटुंबियांनी मनाई केली. पुन्हा पुन्हा आग्रह होईल आणि नेहमीच्या भिडस्त स्वभावानुसार दादांना कोणती ना कोणती जबाबदारी घ्यावी लागेल या शंकेने त्यांनी दादांना ७ सप्टेंबर १९९१ च्या आश्रमाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू दिले नाही.

काही दिवस गेले. दादांची अनुपस्थिती अनेकांना अस्वस्थ करून

गेली. दादांची तीन तपांची निरलस सेवा ज्यांनी जवळून पाहिली होती, आश्रमासाठी रक्ताचे पाणी करून देशात व परदेशांत वाढविलेली दिगंत कीर्ती ज्यांनी अनुभवली होती, राष्ट्रपती पारितोषिक आश्रमाला मिळावे म्हणून ज्यांनी स्वत:चे वैयक्तिक पारितोषिक-मानसन्मान क्षणाचाही विचार न करता बाजूला ठेवला ही वस्तुस्थिती ज्या मोजक्या व्यक्तींना ज्ञात होती त्या निष्ठावंताना दादांनी असं unwept, uncrowned आश्रमाबाहेर पडावे हे सतत सलत होते. त्यांनी पुढाकार घेऊन दादांचा सत्कारवजा निरोपसमारंभ आयोजित करण्याचे ठरविले.

या गोष्टीला दादांचे कुटुंबीय राजी होईनात. दादा तर मुळातच प्रसिद्धी-पराङमुख व कुटुंबियांना पुन्हा पुन्हा आश्रमात सत्कार व्हावा ही गोष्ट मानवेना. आश्रम म्हणजे दादांचे घरच. तेव्हा घरच्या घरीच घरच्याच माणसाचा किती वेळा सत्कार करायचा? १९७३ साली दादा प्रथमच परदेश-दौऱ्यावर निघाले म्हणून व १९८४ साली सतत २५ वर्षे आश्रमात काम केले म्हणून असा दोनदा सत्कार झालाच होता. आता पुन्हा कशाला सत्कार? अशी कुटुंबियांची रास्त भूमिका होती.

इकडे दादांच्या चाहत्यांनी 'दादासाहेब ताटके सत्कार समिती' स्थापन केली. अध्यक्ष डॉ. रमेश पोतदार आणि निमंत्रक श्री. मुळगावकर आणि सौ. अचला जोशी यांच्या प्रेमळ व कळकळीच्या आग्रहामुळे व हा सत्कार केवळ श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे नसून दादांचा ज्या ज्या सामाजिक संस्थांशी संबंध आला त्या सर्व संस्थांमार्फत आहे याची खातरजमा झाल्यावर ताटकेकुटुंबियांनी सत्कारसमारंभास मान्यता दिली.

हा सत्कारसमारंभ सर्वार्थाने हृद्य असा झाला. शनिवार, २५ जानेवारी १९९२ च्या सायंकाळी दादांनी आश्रमात पाऊल टाकले तेव्हा आश्रमकन्यांनी त्यांना उत्स्फूर्त असा 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. त्यांच्या भवितव्यासाठी सतत लढलेल्या त्या चिरयुवा सेनानीला ती मानवंदना होती. ज्या ज्या अनाथ, उघड्यांवर टाकलेल्या 'शकुंतलां'चे दादांनी कण्वमुनींच्या वात्सल्याने पालनपोषण करून कन्यादान केले होते, त्यांच्यापैकी अनेक शकुंतला आता 'कण्वमुनी'च आश्रम सोडून चाललेत म्हणून व्यथित अंत:करणाने त्यांचा निरोप घेण्यासाठी आल्या होत्या.

पाहणाऱ्याला नवल वाटायचे ते हे, की अशा प्रत्येक शकुंतलेची दादांना नावनिशिवार माहिती असायची. दादा अगत्याने प्रत्येकीची चौकशी करायचे. प्रत्येकजण दादांचे चरणस्पर्श करायला बघायची, दादा संकोचाने मागे सरकायचे. आता या शकुंतलांना विवाहानंतर मुलंपण झालेली होती. त्यांनाही त्या दादांच्या पायांवर घालायच्या. आश्रमकन्या तर साश्रू नयनांनी पुढे येऊन दादांना नमस्कार करीत होत्या. कार्यक्रम सुरू होण्याआधी पटांगणाच्या एका बाजूला जी लहान बालके दुसऱ्या मजल्यावरच्या बाल्कनीत होती ती पण 'दादाऽ दादा' करून ओरडत होती. त्या अजाण बालकांना काय समजत होते कोणास ठाऊक, पण त्यांच्या नजरेत मात्र 'बघा, दादा तुम्ही आम्हाला टाकून चाललात ना?' असा काहीसा व्याकूळ भाव होता.

कार्यक्रमाला चांगलीच गर्दी होती. त्यात कुणी लखपती असतील तर कुणी करोडपती. पण त्यांच्याही मनाला क्षणभर नक्कीच वाटले असेल की आपल्या खात्यावरील बँक-बॅलन्स काही खरा नाही; खरी 'श्रीमंती' मिळविली ती दादांनीच. याच दादांच्या प्रेमापोटी जी काही आपण देणगी दिली ती 'सत्पात्री' होती ह्याची पुन्हा एकदा त्यांना प्रचीती आली असेल!

केसरीचे तत्कालीन संपादक व समाजशास्त्राचे गाढे व्यासंगी डॉ. शरच्चंद्र गोखले व डॉ. राम बेलवडी यांच्या हस्ते दादांचा व सौ. लीलाताईंचा जवळजवळ २८-२९ संस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. त्यांना २५००१ रुपयांची थैली व चांदीची उपकरणे आणि अनेक वस्तू भेटीदाखल देण्यात आल्या. एकाने तर चंदनासारखे स्वत: झिजून दुसऱ्या दीनदुबळ्यांच्या घरात सौख्याचा सुगंध फुलविला म्हणून एक भव्य चंदनी हारच दादांना घातला.

अत्यल्प मुदतीत आणि कोणत्याही प्रकारची जाहिरात करण्यात आलेली नसतानाही समारंभ भव्य प्रमाणात साजरा झाला. काही संस्थांना, व्यक्तींना उशिरा या समारंभाची माहिती मिळाल्याने त्यांचेकडील, भेटवस्तू आर्थिक देणग्या अजून येत आहेत असे जाहीर करावे लागले. सर्वच वक्त्यांनी, डॉ. गोखले, बेलवडी, आश्रमाचे पदाधिकारी ह्यांनी दादांच्या एकूण कार्याचे,

अंगभूत गुणांचे यथोचित मूल्यमापन केले. श्रोत्यांच्या भावना हेलावून गेल्या त्या एका माजी आश्रमवासी कन्येच्या हृदयंगम भाषणाने. दादांनी आपल्याला आश्रमात आणून कसे लहानाचे मोठे केले ते सांगता सांगता ती भूतकाळातच शिरली आणि भावनावेगाने गहिवरून आल्याने तिला काही बोलताच येईना. कंठ दाटून आला. डोळ्यांवाटे घळाघळा वाहणारे अश्रूच पुढे बोलत राहिले. त्या अश्रूंनीच त्या आश्रमकन्येला काय सांगावयाचे होते ते श्रोत्यांपर्यंत बरोबर पोचविले! त्याचा उल्लेख करून डॉ. शरच्चंद्र गोखले म्हणालेसुद्धा, की दोन तास बोलूनही आम्हाला जे काही सांगता आले नसते ते या आश्रमकन्येच्या अश्रूंनी दोन मिनिटांत सांगितले! पुष्पगुच्छांच्या आणि हारांच्या भाराआड संकोचून गेलेल्या दादांना पाहून प्रत्येकजण जाताना अनेकविध भावनांनी हेलावून गेला.

० ० ० ०

दादा कृतार्थ आहेत. त्यांच्या कार्याचे सन्मान झाले वा न झाले ह्याची त्यांना क्षिती नाही. अगदी अलीकडे म्हणजे २८ मे १९९२ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने सावरकरांच्या ध्येयधोरणानुसार आयुष्यभर कार्यरत राहणाऱ्यांना सावरकर स्मृतिचिन्हे देण्यात आली. त्यातील सामाजिक सेवेबाबतचे स्मृतिचिन्ह दादांना देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांचे असे सन्मान व्हावे असे त्यांचे लाखमोलाचे कार्य आहे. ते स्वत: आपल्या कार्यासंबंधाने कोणाकडे बोलत नसल्याने दुसऱ्यांना ढोल बडवून त्यांच्या कार्याची महती लोकांसमोर ठेवावी लागते.

दादांनी जे काही कार्य आयुष्यभर केले ते निव्वळ स्वत:च्या अंत:प्रेरणेने, भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे 'मा फलेषु कदाचन' या निखळ भावनेने. दादा कुटुंब हीपण एक संस्थाच मानतात. इतर संस्थांची इमाने-इतबारे सेवा केली; आता या संस्थेकडे सर्वस्वी लक्ष.

त्यांची १४ वर्षांची नात (मुलाची मुलगी चि. गौरी) अहमदाबादला तिच्या आत्याकडे (दादांच्या थोरल्या मुलीकडे) जायची होती. गौरी चलाख आहे. धीट आहे. स्वत:च्या हिंमतीवर सहज जाऊ शकत

होती. तरी दादांनी हाकेमारे उठवितात तसे अक्षरश: रान उठविले. दादरच्या मुलीला, मंगलेला फोन– तू तिला वेळेवर गाडीवर बसवून द्यायला जा. अहमदाबादेच्या मुलीला, मृणालला फोन– तू तिला नीट उतरवून घे. पुन्हा सुखरूप पोचली की नाही ह्याचा फोन. सौ. मृणालची मुलगी अमेरिकेला गेली तर तिच्या आई-वडिलांपेक्षा दादांनाच काळजी जास्त. वयाचा परिणाम आणि आंतरिक माया यांमुळे दादा अधिकाधिक हळवे बनत चालले. सावलीसारखी प्रत्येक भल्याबुऱ्या प्रसंगात गेली ५५ वर्षे साथ देणारी धर्मपत्नी, वडिलांविषयी अत्यंत आदर नि अभिमान वाटणारी सुविद्य मुले - सून - जावई, दादा दादा करून बिलगणारी नातवंडे हे सर्व गेली जवळजवळ ६० वर्षे जिवलग मित्राच्या नात्याने जवळून पाहणाऱ्या त्यांच्या श्री. द. प. कर्वे ह्यांना समर्थांच्या श्लोकांची आठवण होते–

'मनासारखी सुंदरा ते अनन्या
मनासारखे पुत्र, जामात कन्या
सदासर्वदा बोलतो राम वाचा
जनी जाणिजे योग हा सुकृताचा ॥

दादा तरीही कार्यरत राहिले. अनेकजण मार्गदर्शनासाठी माटुंग्याच्या त्या दोन खोल्यांत येतात. मुलगा मकरंद डोंबिवलीस स्थायिक झाला. त्याच्याकडे अधूनमधून वास्तव्यासाठी जावे लागे. दादांनी आश्रम सोडला, ही वस्तुस्थिती आजी-माजी आश्रमकन्यांना मानसिक दृष्ट्या मान्य नव्हती. दादांकडे त्यांचे येणेजाणे राहिले ते अडीअडचणी सांगण्यासाठी.

आश्रमाच्या माहेरवाशिणी आश्रमात प्रसंगाने येत तेव्हा हक्काने दादांकडे येऊन राहू लागल्या. परदेशी दत्तक म्हणून पाठविलेली डेन्मार्क-स्वीडनमधील मुलं मोठी झाल्यावर आपल्या खर्चाने सुटीसाठी भारतात आली होती. अगदी अजाण वयात 'दादा ताटके' नामक सद्गृहस्थाने त्यांना दत्तक म्हणून परदेशी पाठविले. पण त्या मुलांना दादा कसे माहीत असणार? मुंबईत आल्यावर आश्रमात प्रथम त्यांनी दादांची चौकशी केली. ते तेथे नसून डोंबिवलीत आहेत हे कळल्यावर पत्ता घेऊन लोकलच्या गर्दीत प्रवास करीत ती डोंबिवलीला येऊन थडकली. आपल्या 'भाग्यविधात्याचे

दर्शन' घ्यावे, त्याच्याशी चार शब्द बोलायला मिळावेत एवढीच इच्छा. आश्रम सोडला तरी दादांच्या डोक्यात आश्रम सतत घर करून राहिला. मनात विषय असतात ते सतत आश्रमाच्या उन्नतीचे आणि भरभराटीचे. ह्याविरुद्ध काही घटना घडली की ते व्यथित होत असत. त्यामुळे 'घार फिरते आकाशी, परी तिची नजर पिलांपाशी' अशीच त्यांची स्थिती. इवल्याशा वेलूचा एवढा वटवृक्ष झाला तेव्हा त्याला कुठे कीड लागू नये हीच सदैव त्यांची इच्छा.

श्री रामकृष्ण चॅरिटीज्चे अर्थसाहाय्य घेऊन मुलं मोठी होतात. चांगल्या ठिकाणी मानाच्या पदावर नोकरीला लागतात. अशी मुलं आवर्जून दादांना भेटून जातात. त्यांचे आशीर्वाद मागतात तेव्हा दादांना फलप्राप्ती झाल्याचाच आनंद होत असे. कष्ट कारणी लागल्याचेच समाधान होत असे.

एका संस्कृत सुभाषिताची आठवण होते–

> 'वदनं प्रसादसदनं हृदयंसदयं सुधमुचो वाक्।
> करणं परोपकरणं येषा केषां न ते वंद्या:।।

म्हणजे प्रसन्नमुख आहेत, दयार्द्र अंत:करणाचे आहेत, अमृताप्रमाणे ज्यांची वाणी गोड आहे व जे परोपकार करणारे आहेत असे लोक कोणास वंदनीय असणार नाहीत? अर्थात सर्वांसच वंदनीय असणार.

दादांना हे सुभाषित तंतोतंत लागू पडते. निरोपसमारंभात शेकडो लोकांनी आणि त्यांचे कार्य जाणणाऱ्या हजारोंनी प्रकटपणे-अप्रकटपणे एकच इच्छा व्यक्त केली की परमेश्वराने या दादांना उदंड आयुष्य द्यावे.

'जीवेत् शरद: शतम्!'

★ ★ ★

## २४.

### असे आहेत दादा!

पुण्याच्या चतु:श्रृंगी भागात एक टुमदार बंगली आहे. बंगलीच्या चारी बाजूंना भरपूर रिकामी जागा आहे. त्यावर सर्व प्रकारची झाडे, फुलझाडे अगदी कलमी आंबा, पेरू, नारळ, सीताफळ, चिकू, जांभूळ, कवठ, रामफळ, चिंचेपासून ते अगदी गुलाब, जाई-जुई, झेंडू, तगर, सोनचाफा इत्यादी आहेत. या फळाफुलांखेरीज पुन्हा बंगलीची शान वाढविणारे दोन गुलमोहर उन्हाळ्यात लालचुटूक फुलांनी डवरलेले दिसतात. या घरात राहणाऱ्या एका मुलाला 'माझे घर' ह्या विषयावर शाळेत निबंध लिहायचा प्रसंग आला. तेव्हा घराचे वर्णन लिहिता लिहिता त्याने सर्व फुलझाडांची, फळझाडांची नावे लिहिली. निबंध तपासणाऱ्या बाई चकित झाल्या. त्यांना अतिशयोक्ती वाटली. अशी घरं आजकाल कुठं असतात का? एवढी जागा असलेले घर बिल्डरच्या केव्हाच घशात गेले असते. असा विचार करून केवळ कुतूहलापोटी त्यांनी त्या मुलाच्या नकळत शाळेच्या मधल्या सुटीत इतर दोन मुलांना त्याच्या घरी पाठविले. सगळ्या वृक्षवल्लींची यादी करायला. मुलं परत आली. बाईंना म्हणाली, 'अहो त्यांच्या अंगणात याहूनही अधिक झाडे आहेत. कितीतरी नावे लिहायला हाच विसरलाय.' हे आठवायचं कारण म्हणजे दादांचे गुणविशेष!

'दादा' ह्या व्यक्तिमत्त्वाविषयी जो जो विचार करावा,

ज्यांना ज्यांना विचारावे, भेटावे तो तो त्यांचे अधिकाधिक गुण नजरेस यायला लागतात! प्रकर्षाने जाणवतं ते हे, की दादा ही एक व्यक्ती नसून संस्था आहे. अनेक गुणसमुच्चयाचा हा एक खजिना आहे. दादांच्या साऱ्या कार्याचा व्याप बघितला, जीवनपट उलगडून त्यांच्या व्यक्तित्वाचा वेध घ्यायचा प्रयत्न केला की छाती दडपून जाते. मनापासून जाणवतं ते हेच की हे सारं शब्दबद्ध करायला तसेच समर्थ हात हवेत! येरागबाळ्याचे हे काम नोहे!

तसं पाहिलं तर दादा एक सामान्य गृहस्थ. पण सामान्यांतील असामान्यत्व त्यांच्यात दडलेले आहे. सार्वजनिक जीवनात एवढे मानदंड त्यांनी उभे केले ते त्यांच्या ठायी असलेल्या अनेक लोकोत्तर गुणांच्या आधारावरच. कष्टाळू वृत्ती, दीर्घोद्योग, शिस्तप्रियता, धवल चारित्र्य, निस्पृहता, निरपेक्ष आणि निर्मोही वृत्ती. असे अनेक गुण सहजी नजरेस येतात.

### वक्तशीरपणा

एखाद्या गर्भश्रीमंत माणसाच्या बाबतीत इंग्रजीत Born with a silver spoon in his mouth असे वर्णन करतात. दादांच्या बाबतीत श्रद्धानंद महिलाश्रमातील त्यांचे एके काळचे सहकारी श्री. चंद्रकांत मुळगावकरांनी गमतीने म्हटलेय, की 'हा माणूस जन्मत: आपल्या इवल्याशा मुठीत घड्याळ घेऊनच जन्माला आलेला असावा.' दादांच्या बाबतीत ही उक्ती यत्किंचितही अतिशयोक्तीची नाही.

माटुंग्याच्या भाटवडेकर बिल्डिंगमधील आपल्या घरातून हातात ब्रीफकेस सांभाळत रुबाबदार पावले टाकत हा भव्य व्यक्तिमत्त्वाचा माणूस श्रद्धानंद महिलाश्रमाच्या प्रवेशद्वारातून आत शिरला की आजूबाजूचे लोक बिनदिक्कत आपली घड्याळे लावत. घड्याळात बरोबर सात वाजले असतील तर ठीक, पण थोडे पुढेमागे असेल तर तो दोष निव्वळ घड्याळाचा. घड्याळ एकवेळ पुढेमागे होईल, पण दादा चुकायचे नाहीत. जुन्या जमान्यातील न्यायमूर्ती मंडलिकांच्या बाबतीत जी गोष्ट त्यांच्या वक्तशीरपणाबद्दल

सांगितली जाते, ती दादांच्या बाबतीत शंभर टक्के खरी आहे. हा वक्तशीरपणा दादांनी अगदी कटाक्षाने पाळला.

मुंबईत राहणाऱ्या माणसाला लोकलगाड्या, बसेस ह्यांची एकंदरीत वर्तणूक माहीत असताना असा जगावेगळा वक्तशीरपणा म्हणजे नक्कीच थाप वाटेल. पण या साऱ्या संभाव्य अडचणींची 'अडगळ' लक्षात घेऊनच आपल्या कार्यक्रमांची आखणी त्यांनी केली. व्याख्यान असो, परिसंवाद असो, वा मंत्रालयात कोणाची अपॉईंटमेंट असो; दादा नियोजित वेळेच्या आधीच पाच मिनिटे हजर. वक्तशीरपणाबद्दल एके काळी नाव कमावलेल्या 'ललित कला दर्श'च्या कै. बाबूराव पेंढारकरांनी एवढ्या एका गुणासाठीसुद्धा दादांना आपल्या कंपनीत येण्याचे आमंत्रण धाडले असते!

वसई गाव माटुंग्यापासून किती दूर. आधी लोकलने जायचे. त्यात वृद्धाश्रमाची जागा स्टेशनपासून दूर. पण एकदा तेथे वृद्ध स्त्रियांसाठी आश्रम बांधायचे ठरल्यावर आणि ते काम स्वत:च्या खांद्यावर घेतल्यावर उन्हातान्हाची, धुवांधार पावसाची पर्वा न करता दादा बांधकाम चालू झाल्यावर ठरावीक वेळेवर 'साईटवर' जाऊन उभे राहणार म्हणजे राहणारच. उशिराने येणारा मजूरवर्ग, कंत्राटदार, मुकादम या साऱ्यांना त्यामुळे दादांचा वचक वाटायचा. त्यामुळे सारीच मंडळी वेळच्या वेळी येऊन कामाला लागायची.

१९७५ साली नोकरीतून निवृत्त झाल्यावर दादांना पुष्कळ वेळ मोकळा असायचा. पण नोकरीत असतानासुद्धा दादा नित्यनेमाने सकाळी सात ते नऊ व संध्याकाळी ऑफिसातून पुन्हा ६॥ ते ८॥ आश्रमात जाऊन ऑफिसविषयक सर्व कामकाज पहात असत.

### शिस्त व टापटीप

वक्तशीरपणाबरोबरच शिस्त आणि टापटीप हे दोन्ही गुण दादांनी बालपणापासूनच आत्मसात केलेले असावेत. त्यामुळेच त्यांच्या शालेय जीवनात शिस्तीचे अत्यंत कठोर पालनकर्ते म्हणून विद्यार्थिवर्गात दबदबा असलेल्या वाईच्या द्रवीड हायस्कूलच्या कै. ढवळीकर मास्तरांची छडी कधी दादांच्या हाताला स्पर्श करू शकली नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक ठिकाणी इंग्रज साहेबाच्या हाताखाली दादांनी काम केले. त्यामुळे त्यांच्या मूळच्या शिस्तशीर आणि टापटिपीच्या गुणांना अधिकच खतपाणी मिळाले. श्रद्धानंद महिलाश्रम आणि श्री रामकृष्ण चॅरिटीज् ह्या दोन मोठ्या संस्थांखेरीज कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ग्राहक संघ, नाईट स्कूल इत्यादी अनेक कामांमध्ये दादा एकाच वेळेस गुंतलेले असत. पण त्यांच्या अंगभूत टापटिपीमुळे कोणत्याही कामांची कधी गल्लत झाली नाही. प्रत्येक विषयाची त्यांची फाईल व्यवस्थित मेंटेन केलेली असायची. केलेली कामे, करावयाची कामे, कशी करायची, केव्हा करायची ह्या साऱ्यांची जंत्री व्यवस्थित ठेवलेली असायची. त्यामुळे सगळी कामे अगदी वेळच्या वेळी होतच होत. म्हणूनच दादांनी ज्या ज्या कमिटीवर काम केले तिची कधीही 'पोस्टपोनमेंट' कमिटी झाली नाही.

संस्थांची कामे, ऑफिसची कामे ज्या शिस्तीने आणि टापटिपीने दादा करतात, तशीच शिस्त ते अगदी घरगुती बाबतीतही पाळतात. घरी आलेले अगदी कितीही बिनमहत्त्वाचे पत्र असले तरी ते वाचले असण्याची खात्री व्हावी म्हणून त्यावर आद्याक्षरे टाकतील; ज्याच्याकडून पत्र आले असेल त्या व्यक्तीला न चुकता पत्रोत्तर देतील वा पोच देतील. पत्रोत्तर महत्त्वाचे असले तर त्याची स्थळप्रत (Office copy) ठेवतील अथवा कमीत कमी काय पत्रोत्तर धाडले असेल त्याचा थोडक्यात गोषवारा लिहितील. या साऱ्या बाबी ते अगदी कटाक्षाने करतात. त्यांची ती प्रतिक्षिप्त क्रियाच बनली आहे. सगळ्या संस्थांच्या जबाबदाऱ्या त्यांनी आपणहून सोडल्या असल्या तरी मार्गदर्शनासाठी, परिसंवादांच्या निमित्ताने त्यांचा पत्रव्यवहार चालूच असतो.

बालपणापासून जडवून घेतलेली पहाटे ३॥ ला उठण्याची शिस्त त्यांनी मोठ्या निग्रहाने पाळली. त्यात कधी आळस नाही. पण त्यामुळेच त्यांचा 'दिवस' सर्वसामान्य माणसापेक्षा 'मोठा' असतो. स्वीडन, नॉर्वे आदी युरोपियन देशांत भौगोलिक परिस्थितीमुळे दिवस मोठा असतो. रात्र लहान असते. या देशांच्या दौऱ्यावरून दादा जाऊन परत आले तेव्हा त्यांना मुद्दाम विचारावेसे वाटले, की 'का हो दादा, तिथला

दिवस मोठा असतो खरा; पण तुमच्या दिवसापेक्षा मोठा असतो का?' अर्थात हे विचारणे मनातल्या मनातच! कामाच्या बाबतीतील ही शिस्त व टापटीप दादा अगदी कपड्यांच्या बाबतीतसुद्धा पाळतात. इंग्रज साहेब हा देश सोडून गेला त्याला चाळीस-पंचेचाळीस वर्षे उलटून गेली तरी त्याच्या सर्व चांगल्या गुणांची सवय जडवून घेतलेल्या 'दादा' साहेबांची नेकटायची गाठ काही सुटलेली नाही!

## अभ्यासू वृत्ती

आपण फक्त मॅट्रिकच आहोत असे दादा स्वत:च वेळोवेळी सांगतात म्हणूनच केवळ विश्वास ठेवायचा. दत्तकविषयक त्यांचा अभ्यास, त्या अनुषंगाने हिंदू कोड बिल, मेंटेनन्स ॲक्ट या साऱ्यांमधील कायदेशीर तरतुदींचा त्यांनी एवढा प्रचंड अभ्यास केला, की या बाबतीत त्यांचा शब्द अखेरचा मानला गेला. ही वस्तुस्थिती अनेकांच्या तोंडून अनेकवार ऐकलेली आहे. दत्तकविधान, विधवांचे प्रश्न, पतित स्त्रियांचे वा निराधार बालकांचे पुनर्वसन आदी विषयांवर अनेक मासिकांतून, नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले त्यांचे इंग्रजी लेख वाचले, सेमिनारमधील त्यांची इंग्रजी भाषणे ऐकली, परदेशांतील संस्थांबरोबर असलेला त्यांचा प्रचंड पत्रव्यवहार बघितला, की त्यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाच्या दर्शनाने अनेक पदवीधर थक्क झालेले आहेत. टेक्स्टाईल क्षेत्रातील एक मान्यवर श्री. ए. जी. कुलकर्णी, ज्यांनी महिलाश्रमात दादांचे काम जवळून पाहिले त्यांनी म्हटले आहे,

> 'Dada claims that he is not even a graduate-arising perhaps from unfavourable pecuniary circumstances during his student days– however, his grasp of even intricate legal matters, administrative capacities and command over the English language, would put many of the highly qualified persons to shame!'

पूर्वी इंग्रज साहेबाकडे स्टेनो म्हणून काम करीत असताना दादांनी कधी 'डिक्टेशन' नुसतेच उतरवून घेतले नाही, तर साहेबांचे सारे

इंग्रजीच डोक्यात ठेवले! त्यामुळेच दत्तकाच्या बाबतीतील कोर्टापुढील त्यांच्या अभ्यासपूर्ण साक्षींची त्या त्या न्यायाधीशांना जशी 'नोंद' घ्यावी लागली तशी दादांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचीही उत्स्फूर्त 'दाद' द्यावीशी वाटली!

दादांनी लौकिक अर्थाने विश्वविद्यालयीन शिक्षण घेतले नाही, पदवी धारण केली नाही. पण जो जो विषय त्यांच्या सार्वजनिक (वा घरगुतीसुद्धा) कामानिमित्ताने त्यांच्यापुढे आला, त्या त्या विषयाचा त्यांनी सदोदित अभ्यास केला. नुसते थातूरमातूर बोलणे त्यांना कधीच मंजूर नव्हते. वास्तविक दत्तकविषयक कायदे, हिंदू कोड-बिलातील तरतुदी या सगळ्या गोष्टी किचकट, गुंतागुंतीच्या आणि मेंदूला मुंग्या आणणाऱ्या. पण आश्रमाच्या कार्याच्या प्रगतीच्या दृष्टीने ह्या कायदेविषयक बाबींचा अभ्यास करणे आवश्यक आहे, दुसऱ्या कोणावर अवलंबून राहणे म्हणजे निष्कारण विलंब हे ध्यानी आल्यावर दादा स्वतःच कायद्याचे सर्व ग्रंथ आणून रात्रंदिवस टिप्पणे काढीत राहिले. जेठा मारून अभ्यासाला बसले. त्या विषयात एवढी पारंगतता मिळविली, की केवळ 'काळा झगा न घालणारे वकील' अशाच आदराने सर्वजण त्यांच्याकडे पाहू लागले.

कोणत्याही प्रश्नाच्या पार मुळाशी जाऊन शोध घेणारी– जिला इंग्रजीत आपण probing nature म्हणू– अशी वृत्ती असल्याने कायदाविषयक सर्व पुस्तके त्यांनी काळजीपूर्वक अभ्यासली. त्यांची सुव्यवस्थित टिपणे काढली. संबंधितांना लिहायचे मसुदे (drafts) तयार केले. त्यांच्या दृष्टीने ज्या त्रुटी होत्या त्या पूर्णपणे Expose केल्या. आणि या साऱ्या जबरदस्त 'होमवर्क'च्या बळावर त्यांनी दत्तकविषयक कोर्टे, संबंधित सरकारी खाती इथपासून तो थेट भारत सरकारच्या कायदेमंत्र्यांशी (त्या वेळी कै. हरिभाऊ पाटसकर) झुंज घेतली. प्रत्यक्ष कामाचा (field work) अनुभव पाठीशी असल्याने त्यांनी कायदेविषयक त्रुटींवर सुचविलेले व्यावहारिक उपाय ध्यानात घेऊन भारत सरकारला योग्य ती 'दखल' घ्यावी लागली. उगाच नाही दादा दत्तकविषयक संबंधातील दिग्गज मानले गेले!

आता दगड - विटा, वाळू आणि सिमेंट ह्या काही समाजसुधारकांनी अभ्यासायच्या गोष्टी आहेत का? पण दादांनी हेसुद्धा केलं! वसईचा वृद्धाश्रम, श्रद्धानंद महिलाश्रमाच्या दोन बाजूच्या विंगवरील बांधकाम, कुर्ल्याच्या स्त्रियांच्या वसतिगृहाचे बांधकाम ही सारी बांधकामे चालू असताना प्रत्येक इंच न् इंच जागा कशी उपयोगात आणता येईल हे पाहण्यासाठी दादा बांधकामाचा प्रत्येक कोपरा न् कोपरा अभ्यासून घेत. कोठे इंचभरसुद्धा जागा वाया जात नाही ना, ह्याची खात्री होण्यासाठी वाळू नि सिमेंटच्या मिश्रणापासून सगळीकडे लक्ष देत. अकौंटन्सी हा काही त्यांचा विषय नाही. पण सार्वजनिक कामात एक पैसुद्धा नाहक खर्चिली जाऊ नये, अनाठायी खर्च टाळावा ह्या हेतूने त्यांनी या विषयातील बारकावे स्वत: समजून घेतले. एकदा एका मोठ्या उद्योगसमूहाला महिलाश्रमाला मोठी देणगी द्यायची होती. पण त्यांच्या अकौंट्समध्ये ती दाखवायला अडचणी येत होत्या. तेव्हा दादांनीच ती देणगी नियमाच्या चाकोरीत कशी बसविता येईल ते दाखवून दिले. संस्थेला ती देणगी मिळाल्याने दादांच्या या अभ्यासाचा आर्थिक फायदा झाला.

त्यांच्या या विलक्षण अभ्यासू वृत्तीमुळेच समाजशास्त्राशी संबंधित असलेल्या अनेक मान्यवर संस्थांकडून दादांना व्याख्यानाची आवर्जून बोलावणी येऊ लागली. व्याख्याने व्हायची ती पदवीधर विद्यार्थ्यांपुढे! आहे की नाही गंमत? म्हणजे पदवी घेता आली नाही म्हणून खंत बाळगणाऱ्या दादांची व्याख्याने मात्र पदवीधर विद्यार्थ्यांसमोर! जुन्या काळातील कै. हरिभाऊ आपटे, वि. स. खांडेकर ही मंडळी पदवीधर नव्हती. पण त्यांनी लिहिलेली पुस्तके मात्र बी. ए., एम्. ए. च्या अभ्यासासाठी लावली जात. तसाच प्रकार दादांच्या बाबतीत घडला. समाजशास्त्रात पदव्युत्तर अभ्यास करणारे, पीएच्. डी. साठी संशोधन करणारेसुद्धा दादांकडे सल्ल्यासाठी, मार्गदर्शनासाठी येऊ लागले. त्यांच्या अभ्यासू वृत्तीला ती मानवंदनाच होती.

### लोकसंग्राहक व समन्वयवादी वृत्ती

दादांनी आयुष्यात जे काही काम केले ते त्यांच्या लोकसंग्राहक वृत्तीमुळेच शक्य झाले. एकटा-दुकटा माणूस मनात कितीही असले तरी सर्वच

गोष्टी काही स्वत: करू शकत नाही. मनुष्यबळ हे आवश्यकच आहे. मनमिळाऊ स्वभाव, नि:स्वार्थी वृत्ती, कामातील सचोटी, तळमळ ह्यामुळे दादांच्या सहवासात जो कोणी आला तो पूर्णपणे भारून गेला. ह्या माणसाच्या कामात आपणही काही 'खारीचा वाटा' उचलावा अशी भावना त्याच्या मनात उत्पन्न होत राहिली. अनुभवामुळे दादांना मनुष्यस्वभावाची, त्याच्यातील गुणावगुणांची उत्तम पारख होती. त्यामुळे सहवासात येणाऱ्या विविध थरांतील व्यक्तींची योग्य ती 'नोंद' त्यांच्या डोक्यातील 'कॉम्प्युटरने' घेतलेली असे. त्यामुळे सचोटीची माणसे हिशोबाच्या कामी, वकिली ज्ञान संपादन केलेली कायदेविपयक सल्लागार समितीत, बुद्धिमंत, विद्याविभूपित व शिक्षणविषयक प्रश्नात आस्था असणारी माणसे शैक्षणिक समितीत यावीत यासाठी हरतऱ्हेची माणसं दादा आश्रमाच्या वृद्धीसाठी शोधत राहिले.

आश्रमासाठी दूधवाला, भाजीवाला, किराणा धान्य पुरविणारा अशी माणसंसुद्धा दादांनी खुबीने जोडली. त्यामुळे दूध, दही, चक्का वाया जाणार किंवा मागणीपेक्षा माल जास्ती शिल्लक आहे असे वाटले की सारा जास्तीचा माल आश्रमकन्यांसाठी रवाना. श्रावणात शुक्रवारी गरमागरम चणे तर आंब्याच्या दिवसांत आश्रमवासीयांना चक्क आंबे! हे सारं त्यांनी जोडलेल्या माणसांमुळेच होऊ शकलं.

वसईला वृद्धाश्रमाची इमारत बांधून तयार झाली तेव्हा उद्घाटन समारंभाला दादांनी आजूबाजूला असणाऱ्या मुसलमान रहिवाशी व ख्रिश्चन मिशनरी अशा दोन्ही मंडळींना आमंत्रण दिले. एक तर वसई गाव लांब. वृद्धाश्रम स्टेशनपासूनही दूर अंतरावर. वृद्धाश्रमात राहणार त्या जराजर्जर वृद्ध स्त्रिया. पुरुपमाणसे म्हणजे रखवालदार आणि माळी. वृद्धांच्या बाबतीत कोणता प्रसंग कधी येईल ह्याची काही शाश्वती नाही. तेव्हा ऐनवेळेला उपयोगी पडतील ती आजूबाजूची स्थानिक मंडळीच. ही सर्व परिस्थिती लक्षात घेतली की दादांच्या विलक्षण लोकसंग्राहक वृत्तीची नि दूरदृष्टीची कमाल वाटते.

आश्रमवासीयांची पोटातून वाटणारी काळजी कशी सदोदित त्यांच्या अंतर्यामी वसत असे ह्याचे केवळ हे एक उदाहरण. त्यांच्या श्री रामकृष्ण

चॅरिटीज् ट्रस्टतर्फे वाई, खंडाळा, महाबळेश्वर, सातारा भागातील अगदी दुर्गम डोंगराळ ठिकाणीसुद्धा शालेय विद्यार्थ्यांना आर्थिक मदत जात असते. इतक्या दूर खेडेगावांतूनसुद्धा त्यांच्या रामकृष्ण चॅरिटीजूची यंत्रणा सुरळीतपणे चालली आहे. त्याचे पुष्कळसे श्रेय दादांच्या या लोकसंग्राहक वृत्तीला आहे. श्रद्धानंद महिलाश्रमाला मोठ्या प्रमाणावर देणगीदार तसेच श्री रामकृष्ण चॅरिटीजूला स्पॉन्सरर्स मिळवून देण्याचे मोठे श्रेय दादांच्या या लोकसंग्राहक वृत्तीलाच द्यायला हवं.

या लोकसंग्राहक वृत्तीला जोड मिळाली ती त्यांच्या समन्वयवादी वृत्तीची. त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची तयारी ठेवली. आपल्या सहकाऱ्यांपेक्षा अनेकदा 'अंगुळे'भर वर असूनसुद्धा त्यांनी कोणालाही तसे आपल्या वागण्याबोलण्यातून दर्शवू दिले नाही. प्रत्येक काम पुढे रेटताना सहकाऱ्यांचा सल्ला घेतला. आपल्याबरोबर नेहमी काम करणारा सहकारी, कार्यकारिणी सदस्य वा महानगरपालिकेतील, मंत्रालयातील अधिकारी असो, जर त्यांना आपले म्हणणे पटले नाही तर दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्याची, पटवून घेण्याची सतत तयारी ठेवली.

'पटवून द्या अथवा पटवून घ्या' हा त्यांच्या कार्याचा सतत मंत्र असे. आश्रमातील पहिले मूल १९६६ मध्ये कायदेशीरपणे परदेशात दत्तक देण्याच्या प्रसंगी दादांवर बाहेरच्या मंडळींचा जसा रोष झाला तसा कार्यकारिणी-सदस्यांचाही प्रथम विरोध झाला. विरोध प्रामाणिक होता. दादांवर वैयक्तिक रीत्या नव्हता. पण त्यामुळे आश्रमाच्या भवितव्यावर काही दुष्परिणाम होईल का? अशी साधार भीती होती. दादांनी अर्थातच ती रास्त मानली. म्हणून तळमळीने त्यांनी आपली दत्तकयोजना सर्वांना पटवून दिली. नाइलाजाने का होईना, सर्वांनी ती पटवून घेतली. हळूहळू ती योजना यशस्वी झाल्यावर सर्वांनीच दादांना एकमुखी पाठिंबा दिला; नव्हे, सर्वजण दादांच्या पाठीशीच राहिले. सारांश, दादांच्या या 'पटवून द्या वा पटवून घ्या' या मंत्रामुळे कामे तडीस जात.

कोणत्याही कामाच्या बाबतीत भिजतघोंगडं पडलंय असं कधी झालं नाही. अर्थात त्यांच्या अखत्यारीबाहेर एखादी बाब असेल तर दादांचा नाइलाज व्हायचा. पण सरकारदरबारी वा अन्यत्र सार्वजनिक कामासाठी

बाहेर पडताना वैयक्तिक प्रतिष्ठेची झूल त्यांनी कधीही अंगावर बाळगली नाही. अपमान झाला, समोरच्या माणसाने ऐकूनच नाही घेतले, पुन्हा पुन्हा एखाद्या कामासाठी त्याच त्याच ठिकाणी त्याच त्याच माणसाकडे हेलपाटे मारावे लागले, तरी वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न न करता अगदी जाळे विणणाऱ्या कोळ्याच्या चिकाटीने ते काम करीत राहिले, म्हणून तर सार्वजनिक कार्याचे एवढे मोठे 'जाळे' ते उभे करू शकले!

वक्तृत्व

सार्वजनिक आयुष्यात पडायचे ठरविल्यावर दादांनी स्वत:पुरती तीन मार्गदर्शक तत्त्वे ठरवून ठेवली होती. ती म्हणजे १) सार्वजनिक व्यासपीठावरून भाषण करायचे नाही, २) स्वत:ची प्रसिद्धी कटाक्षाने टाळायची आणि ३) राजकारणात प्रवेश करायचा नाही.

समाजकारण आणि राजकारण हातात हात घालून जाऊ शकत नाहीत हे दादांनी अनेकांच्या उदाहरणावरून बघितले होते. त्यामुळे भल्याभल्यांनी गळ घालूनसुद्धा दादा राजकारणापासून कटाक्षाने दूर राहिले. या संपूर्ण अलिप्तपणामुळेच त्यांच्यावर कोणत्याही पक्षाचा शिक्का बसला नाही. या बाबतीत त्यांची पाटी कोरी राहिल्यामुळेच त्यांच्या समाजकारणाला, समाजाच्या सर्व थरांतून पक्षातीतपणे सर्वांचेच सहकार्य लाभले. पण व्यासपीठांवरून भाषण करण्याची प्रतिज्ञा त्यांना आपद्धर्म म्हणून मोडावी लागली. परिणामी प्रसिद्धी आपोआपच येऊन चिकटली.

पूर्वी श्रद्धानंद महिलाश्रमातून लहान मुलं इतर कुटुंबांत संगोपनासाठी, पालनपोषणासाठी म्हणून दिली जात. दादांच्या कारकीर्दीत दादांनी १९६६ साली आश्रमातून पहिले मूल 'कायदेशीरपणे' दत्तक दिले. तेसुद्धा परदेशात फ्रान्समध्ये. तेव्हा मोठाच गदारोळ माजला. आश्रमावर आणि वैयक्तिक रीत्या दादांवर टीकेचे मोहोळ उठले. अशा परिस्थितीत गप्प राहणे म्हणजे नामुष्कीला निमंत्रण! त्यामुळे स्वाभिमानी दादांना जाहीरपणे बोलावे लागले.

दत्तक देण्यावरील कायदेशीर, सामाजिक, राजकीय टीका अभ्यासपूर्वक तपासून दादांनी समर्पक उत्तरे दिली. तो मोठाच इतिहास आहे. मुख्य

आक्षेप धर्म बदलतो असा राजकीय स्वरूपाचा होता. मातापित्यांनी कचराकुंडीत, रस्त्यावर टाकलेली जी अर्भके असतात त्यांना कुठला आलाय धर्म? असे मूल पोलिसांकरवी वा न्यायालयाकडून आश्रमात आणले आणि दुर्दैवाने तिथे ठेवायला जागा नसली तर एखाद्या ख्रिश्चन किंवा मुस्लिम संस्थेत जाते. म्हणजे ज्या मुलाचा मुळातच धर्म माहीत नाही त्याचे दत्तक दिल्यावर धर्मांतर झाले असे कसे म्हणायचे? अशा तऱ्हेच्या अनेक आक्षेपांचे खंडन करण्यासाठी दादांना वृत्तपत्रे, मासिके, परिसंवाद, आकाशवाणी, दूरचित्रवाणी या सर्व माध्यमांना सामोरे जावे लागले. सर्व माध्यमांतून त्यांनी आपली भूमिका समर्पकपणे मांडली. त्यांच्या भूमिकेतील तळमळ व प्रामाणिकपणा सर्वांना पटला. कोणत्याही धर्मापेक्षा 'मानवताधर्म' हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. उकिरड्यावर मरणाच्या दारात पडलेले मूल जगणे महत्त्वाचे. त्याचा 'अमर' होतो, 'अकबर' होतो की 'अँथनी' होतो हा प्रश्न दुय्यम आहे.

दादांच्या अशा कळकळीच्या प्रतिपादनानंतर मात्र विरोधाचा धुरळा खाली बसला. पण त्यानंतर दादांच्या मागे एक कायमची खटखट लागली. ती म्हणजे व्यासपीठाची. त्यातूनच त्यांचे 'वक्तृत्व' जन्माला आले. एकदा हा माणूस 'बोलतो' आणि चांगलेच बोलतो हे समजल्यावर त्यांना कोण स्वस्थ बसून देईल? सगळेजण अक्षरश: त्यांना 'पकडून' व्याख्यानाला न्यायला लागले. तेव्हापासून सभा-संमेलने, सेमिनार्स त्यांच्या मागे लागली. दादांना आपल्या वक्तृत्वगुणाची नव्याने जाण आली; पण त्याहीपेक्षा त्यांना जाणवले ते हे की त्यांचे बोलणे नीटपणे ऐकले जात आहे. उगाच ह्या कानाने ऐकले नि त्या कानाने सोडून दिले असा प्रकार होत नाही! ह्याचा तात्कालिक दृश्य परिणाम म्हणजे आश्रमवासी निराधार पतित स्त्रिया, मुले दत्तक घेणे, कुमारी मातांचे प्रश्न या सर्व बाबतीत समाजमन झपाट्याने बदलू लागले. दृष्टिकोण अधिक सहानुभूतीचा बनला. निपुत्रिक मातापिता आपणहून आश्रमाकडे वा अन्य संस्थांकडे दत्तक घेण्यासाठी पुढे येऊ लागले.

पूर्वी आपल्या हिंदू समाजात दत्तक घेत नसत असे नाही. पण शक्यतो

आपल्याच घरातील भावा-बहिणीची मुलं दत्तक घेण्याकडे कल असे. मुख्य उद्देश घरातील इस्टेट घरातच राहावी हा असे. त्या दत्तक मुलाने आपल्या दत्तक मातापित्यांची त्यांच्या वृद्धापकाळात देखभाल करावी ह्याचा अनेकदा सोयीस्करपणे विसर पडू लागला. एकदा इस्टेटीचे धनी बनल्यावर बऱ्याच मातापित्यांना अतिशय वाईट अनुभव येऊ लागले. अशा मुलांचा ओढा हा आपल्या मूळ आई-वडिलांकडेच राहू लागला. याउलट, आश्रमासारख्या ठिकाणाहून लहान वयातच मुलं दत्तक घेतली की त्याला दत्तक मातापित्याची ओढ लागते, कारण जगात त्याला दुसरे कोणतेच 'पाश' नसतात. दादांच्या भाषणांनी वर उल्लेखिलेल्या सर्वच प्रश्नांच्या बाबतीत जनमन खूप 'समंजस' झाले. पण या सर्व प्रकारांमुळे दादांची पहिली दोन तत्त्वे– व्यासपीठावरून भाषण न करण्याचे व स्वत:ची प्रसिद्धी टाळण्याचे– पार धुळीला मिळाली. पण हे सर्व दादांना शमीच्या झाडावरील शस्त्रे काढण्यास भाग पडलेल्या अर्जुनाप्रमाणे अगदी नाइलाज म्हणूनच करावे लागले हे लक्षात घेतले पाहिजे. पण एका परीने ही इष्टापत्तीच ठरली!

व्याख्याने जसजशी गाजू लागली, तसतसा त्यांचा बोलबाला होऊ लागला. अर्थात आपल्या व्याख्यानांची व्याप्ती त्यांनी निराधार स्त्रिया-मुले, त्यांचे पुनर्वसन, दत्तकविधान, वृद्धांचे प्रश्न, स्वेच्छामरण इत्यादी विषयांपुरतीच मर्यादित ठेवली होती. उगाच लोक बोलावतात म्हणून ऊठसूट वाटेल त्या विषयावर बोलत बसण्याचा प्रकार केला नाही.

प्रसिद्धी वाढू लागली तसे वाईच्या वसंत व्याख्यानमालेत दादांनी बोलावे म्हणून तेथील संचालकांचे निमंत्रण आले. त्यात म्हटले होते, की 'दादा, तुम्ही आमच्या वाईचेच आहात हेच आम्हा बऱ्याच लोकांना परवापरवापर्यंत माहीत नव्हते. सगळ्या जगाला तुमच्या व्याख्यानांचा लाभ होतोय आणि आम्ही वाईकर, तुमचे गाववाले मात्र अद्याप वंचितच राहिलो हे काही बरं नाही.' तेव्हा दादा वाईला पहिल्या जाहीर व्याख्यानासाठी म्हणून गेले.

साधारणपणे वसंत व्याख्यानमालेचा प्रकार सर्वांना माहीत आहेच. जी काही श्रोतेमंडळी जमतात ती थोडा वेळ येऊन बसण्यासाठी. साधारणपणे वक्त्याचा 'मगदूर' पाहून हळूहळू मागच्या मागे पसार व्हायची प्रवृत्ती. पण त्या दिवशीच्या व्याख्यानाची तऱ्हाच न्यारी. दादांनी बोलायला सुरुवात केली. अनेक निराधार, पतित स्त्रियांच्या, मुलांच्या करुण कहाण्या सांगितल्या. आपल्याच समाजातील भीषणतेचे सत्यदर्शन, दादांचे अनुभवाचे बोल आणि तळमळीचे शब्द या साऱ्यांनी त्यांच्या वाक्गंगेत श्रोते इतके आकंठ बुडून गेले की नियोजित वेळेचे श्रोत्यांना भानच राहिले नाही. श्रोते रंगले होते. दादा प्रथेप्रमाणे एका तासात भाषण आटोपते घेणार होते. पण हळूच संचालकांची चिट्ठी आली– तुमच्या भाषणाला वेळेचे बंधन नाही. ही घटना आहे १९७३ च्या मे महिन्यातील.

दादांच्या वक्तृत्वाला उपमा-उत्प्रेक्षांचा हव्यास नाही की मोठमोठी 'कोटेशन्स-संदर्भ' देऊन श्रोत्यांच्या मनावर वक्ता म्हणून आपली 'इमेज' ठसविण्याचा अभिनिवेश नाही. समाजातील जे दारिद्र्य-दुःख त्यांनी बघितलं, अनुभवलं, ते दूर करण्यासाठी जे अल्प-स्वल्प प्रयत्न केले तेच सारे साध्यासरळ शब्दांत ते श्रोत्यांपुढे मांडतात. त्यांच्या कार्यामागची तळमळ, कळकळ आणि प्रामाणिकपणा श्रोत्यांना भावून जातो.

## २५.

समाजकार्यकर्त्याला निर्भय असावेच लागते. समाजात काम करताना सर्व थरांतील माणसांशी संबंध येतो. त्यात गुंड आले, समाजकंटक आले. त्यातून महिलांच्या संस्थेत काम करायचे म्हणजे काय काय प्रकार होऊ शकतात, ह्याची सहज कल्पना करता येण्यासारखी आहे.

गुंडांच्या तावडीतून सोडविलेल्या मुलींना आश्रय देणे, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे आणि त्यांचे विवाह लावून देणे म्हणजे केवढे धोक्याचे काम. अशा गुंडांकडून दादांना सदैव धोका. धमकीची पत्रे तर नेहमीच येत. अनेकदा काहीजण आश्रमकन्येशी विवाह करण्याचे कबूल करायचे नि नंतर पाठ फिरवायचे. अशा भ्याड तरुणांवर दादांनी फसवणुकीबद्दल आणि आश्रमकन्यांच्या भावनांशी खेळल्याबद्दल नुकसानभरपाईचे दावे लावले. नुकसानभरपाईची रक्कम वसूल केली. ती रक्कम वेगळी, बँक अकौंटमध्ये ठेवीत. अशा मनःस्ताप झालेल्या मुलींची नंतर लग्ने होत तेव्हा ती रक्कम त्यांना देण्यात येत असे.

उद्या एखाद्या आश्रमकन्येचा विवाह आणि आज जर ज्याच्याशी लग्न व्हायचे त्या तरुणाची प्रेयसी येऊन सांगायला लागली की त्या तरुणाचे आणि माझे प्रेमसंबंध आहेत तर काय दुर्धर प्रसंग ओढवत असेल? अशा तरुणांना दादांनी चांगलेच धडे शिकविलेले आहेत. पोलिस अधिकाऱ्याला भेटायचे. त्याला सगळी वस्तुस्थिती समजावून सांगायची. विवाह जणू काय होणारच आहे अशी

तयारी ठेवायची. विवाहाच्या प्रसंगी तक्रार करणाऱ्या प्रेयसीला आणि पोलिस अधिकाऱ्याला बोलावून ठेवायचे. आणि तो आश्रमकन्येशी विवाहेच्छू तरुण आला की पोलिस अधिकाऱ्यासमोर त्या तरुणाची 'हा सूर्य, हा जयद्रथ' अशी अवस्था करून टाकायची! प्रत्यथ प्रेयसीच समोर तक्रार घेऊन उभी राहिल्याने त्या तरुणाचे पितळ उघडे पडायचे! मग आश्रमकन्येशी विवाहाऐवजी त्याला वेगळ्याच प्रकारे 'चतुर्भुज' होऊन पोलिस अधिकाऱ्याबरोबर जावे लागायचे! एरवी 'कुसमादपि कोमलानि' अशा तऱ्हेचे वाटणारे दादा अशा प्रसंगी 'वज्रादपि' कठोर व्हायचे. त्यामागे आपल्या एका कन्येला फसविल्याची चीड, सात्त्विक संताप असायचा. आश्रमात काम करताना त्यांना असा मन:स्ताप अनेकदा झालाय. कितीही पूर्वचौकशी केली तरी असे प्रसंग अपवादाने का होईना, समोर उभे ठाकायचेच.

एकदा तर दादांच्या जिवावरच बेतले होते. एका परधर्मीयाने पहिले दोन विवाह झाले असतानाही एका असहाय तरुणीला गोड गोड भूलथापा देऊन वश केले. तिच्याशी लग्न करण्याचा घाट घातला. त्या तरुणीला सत्य परिस्थितीची जाणीव झाल्यावर रातोरात ती पळाली. मुंबईत जिवाच्या भीतीने लपत-छपत आली. कोणी तरी श्रद्धानंद महिलाश्रम आणि दादांचे नाव सांगितल्यावर आश्रमात आली. दादांनी तिची सर्व हकीगत ऐकून घेतली. ती सत्यकथन करत आहे अशी खातरजमा झाल्यावर एका वेगळ्याच नावाने आश्रमाच्या दप्तरात तात्पुरती नोंद करून कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन बंदोबस्तात ठेवली. कोणत्याही परिस्थितीत तिने आश्रमाच्या चार भिंतींच्या बाहेर यायचे नाही अशी तिला सक्त ताकीद दिली. कारण तो 'माणूस' तिचा शोध घेत हिंडत असणार ह्याची खात्री त्यांना होतीच. झालेही तसेच.

दादा ऑफिसात गेले होते. घरी दोन-तीन पुरुष येऊन धमकीवजा बोलून गेले. आश्रमात त्यांनी चौकशी केली होती. ज्या नावाच्या स्त्रीची ती माणसं चौकशी करीत होती तशी स्त्री आश्रमात

नाही असे (दादांनी सांगितल्याप्रमाणे) आश्रमाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. पण त्या माणसांना कुठून तरी सुगावा लागला होता की ती स्त्री नक्कीच आश्रमात आश्रयाला आली आहे. संध्याकाळी दादा घरी आले. हात-पाय, तोंड धुऊन नेहमीप्रमाणे आश्रमात जाण्यास निघाले तेव्हा सौ. लीलाताईंनी व घरातील इतर मंडळींनी त्यांना न जाण्याचा आग्रह केला. पण समाजसेवकाने असे भिऊन वागणे दादांसारख्याला कधीच पटणे शक्य नव्हते. ते निघाले. आश्रमाच्या दाराशीच एक माणूस उभा असलेला आणि दोन-तीन माणसं आश्रमाच्या कोपऱ्याशी मिळणाऱ्या तीन बाजूंच्या रस्त्यांवर उभी असलेली दिसली. पण या कशाचीच दखल न घेता ते आश्रमाच्या प्रवेशद्वाराशी आले. एका माणसाने हटकले—

'हमारी औरत आश्रममें आयी है। उसे हमको सौंप दो!'

'नाव काय?'

'x x x'

'नाही. अशा नावाची कोणीच स्त्री आश्रमात आलेली नाही.'

'तुम झूठ बोलते हो। हमे पक्का मालूम है कि ये औरत इधरही आयी है।'

दादांनी फार वाद घातला नाही. रस्त्यावर वाद घालणे इष्टही नव्हतं. त्यांनी त्या माणसाला सांगितलं की मी आताच ऑफिसातून आलोय. त्यामुळे मला आत जाऊन रजिस्टर वगैरे पहायला लागेल. आपण ऑफिसातच बोलू. तो माणूस दादांबरोबर आत आला. आणखी एक-दोन माणसं इतर कामासंबंधात दादांशी बोलण्यासाठी आली होती.

पहिल्या माणसाला त्यांनी बाहेर बाकड्यावर बसायला सांगितले. ते त्याला म्हणाले, की 'ही माणसं आधीपासून आली आहेत. तुमचं काम मोठे आहे. पाच मिनिटांत ह्यांची कामं उरकतो आणि मग तुम्हाला बोलवतो.' दादा आतील ऑफिसातील खोलीत बसले. प्रथम त्यांनी माटुंगा पोलिस स्टेशनला फोन करून तेथील इन्स्पेक्टरला सर्व हकीगत थोडक्यात सांगितली. दादांना सर्वजण ओळखत होतेच. पोलिस

स्टेशनला नवीन कोणी इन्स्पेक्टर बदलून आला की दादा आवर्जून त्याची ओळख करून घेत. त्या इन्स्पेक्टरने सांगितले, की 'मी साध्या वेशातील दोन-तीन माणसं ताबडतोब पाठवून देतो. जो माणूस तुमच्या आश्रमाच्या ऑफिसात येऊन तुम्हाला सलाम करेल, तो माणूस आमचा समजा.'

दादांनी आधी आलेल्या दोन माणसांची कामे उरकली. नंतर 'त्या' माणसाला बोलावले. त्याच्यासमोर ऑफिसचे दप्तर बघितले. तो माणूस x x x नामक स्त्रीची चौकशी करीत होता, त्या नावाची कोणी स्त्री आश्रमाच्या रेकॉर्डप्रमाणे नव्हती. (असणार कशी? कारण तिचे नाव दुसऱ्याच नावाने दाखल केले होते.) तो माणूस अधिकच भडकला. त्या स्त्रीच्या प्राप्तीसाठी तो अगदी वेडापिसा झाला होता. तो दादांना सगळा आश्रम तपासायचा आहे, असे म्हणायला लागला. (दरम्यानच्या काळात पोलीस स्टेशनचा माणूस तिथे आलेला होता. दादांना सलाम करून तो जवळच उभा होता.). दादांनी नम्रपणे पण ठामपणे त्या माणसाला सांगितले, की 'बाबा रे, आश्रमातील स्त्रिया म्हणजे काही प्रदर्शनातील वस्तू नाहीत, की कुणीही यावे आणि बघायला मागावी?'

त्या माणसाचा पुरा तोल सुटला. तो मोठमोठ्याने दरडावून बोलायला लागला. फूस लावून आमची बाई तुम्ही आश्रमात आणली आहे, वगैरे वगैरे. दादांनी आपला तोल अजिबात ढळू न देता त्याला सांगितले, की 'तू जर पोलीस डिपार्टमेंटकडून 'सर्च वारंट' आणशील तरच तुला आश्रमात राहणाऱ्या स्त्रियांचा तपास घेता येईल, अन्यथा अजिबात नाही.' मग मात्र त्या माणसाचा संताप अनावर झाला. रागाच्या भरात त्याने खिशातील सुरा बाहेर काढला; दादांची मान तो धरणार एवढ्यात त्या साध्या वेशातील पोलिसाने त्या माणसाला पकडले. शिट्टी फुंकली. तत्क्षणी बाहेर उभ्या असलेल्या त्या माणसांच्या साथीदारांनाही पोलिसांनी पकडले. हे सर्व होईतो दादा निश्चल उभे होते. त्या असहाय स्त्रीने दिलेल्या जबानीनुसार त्या माणसाचा पुढे पोलिसांनी बंदोबस्त केला.

पुढे ती स्त्री बरीच वर्षे आश्रमात होती. मानसिक धक्क्यातून सावरल्यावर

दादांनी तिला पुढे टेलरिंग-एम्ब्रॉयडरीचे शिक्षण तिच्या आवडीनुसार दिले. यथावकाश तिचा विवाह करून दिला. सारांश, अशा वानगीदाखल सांगितलेल्या एका हकीगतीवरून दादांना कोणकोणत्या 'दिव्यांतून' जावे लागले असेल ह्याची सहज कल्पना यावी. दादांना अनेक कठीण प्रसंगांतून अनेकवार जावे लागले. समाजकंटकांच्या धमक्यांनी आणि निनावी पत्रांनी दादांची आणि त्यांच्या कुटुंबियांची मानसिक अवस्था कशी झाली असेल, कोणत्या प्रचंड ताणतणावांतून त्यांना काळ गुजारावा लागला असेल ह्याची आपण केवळ कल्पनाच करू शकतो!

ह्या परिस्थितीची यथार्थ कल्पना असल्यामुळे एका मोठ्या पोलीस अधिकाऱ्याने दादांनी रिव्हॉल्व्हर बाळगावे अशी कळकळीची सूचना केली होती. लायसन्स मिळवून देण्याचीही व्यवस्था केली होती. अर्थात दादांनी ह्यातील काहीच केले नाही ही गोष्ट अलाहिदा. सार्वजनिक कामात असताना अत्यंत निर्भयपणे ते सर्वत्र वावरले. रात्री-बेरात्री एकाकीपणे जावे लागे. अनोळखी माणसांत, अनोळखी प्रदेशात. पण कोणत्याही भीतीपोटी त्यांनी कोणत्याही कामातून कधी माघार घेतली नाही.

### मानवतावाद

नखशिखान्त सुटाबुटात वावरणारे, झोकदार नेकटाय बांधणारे दादा बाहेरून 'साहेबी' वाटले तरी अंतर्यामी अगदी परंपरागत पिढीजात दशग्रंथी ब्राह्मण आहेत. पहाटे ३॥ ला उठून त्यांची पूजा-अर्चा होते. नॉर्वे-स्वीडनसारख्या देशांत, शून्याखाली तापमान असणाऱ्या कडाक्याच्या थंडीतसुद्धा पहाटे उठून ते देवपूजा करत. नेहमीचे देवघर समोर नसल्याने 'साकार' पूजेऐवजी 'निराकार' आणि मानसपूजेवरच त्यांना भर द्यावा लागे!

परदेशातील परिसंवादांत, मीटिंगच्या वेळी यजमानाच्या हातात मद्याचा चषक असला तरी दादांच्या हातात असे ताकाचा एकच प्याला! तोच उंचावून दादा 'चिअर्स' करीत. मुळातच मिताहारी असणाऱ्या दादांचे परदेशातील जेवणखाण, दूध, फळे, ताक यांवरच बव्हंशी

चालायचे. 'परदेशात गेल्यावर 'त्या' शिवाय चालतच नाही हो', असा दांभिकपणा करणाऱ्यांनी हे जरूर लक्षात ठेवावे. पण दादांनी आपल्या धार्मिकतेची 'बेडी' स्वत:च्या पायात कधी अडकवून घेतली नाही. पूजा-अर्चा, व्रतवैकल्ये सारे घराच्या चार भिंतींत. एकदा घराबाहेर पडले की दादांचा धर्म एकच. तो म्हणजे मानवधर्म. 'विधवांचे अश्रू पुसतो आणि पोरक्या मुलांना घासभर अन्न देतो तोच धर्म आणि तोच ईश्वर', ह्या स्वामी विवेकानंदांच्या वचनावर त्यांची नुसती श्रद्धाच नव्हती तर त्याबरहुकूम आचरण ठेवण्यात त्यांचा खरा 'श्रद्धानंद' होता.

वाई, खंडाळा आणि महाबळेश्वरच्या दुर्गम, डोंगराळ भागातील दीन-दुबळ्यांच्या झोपड्या-झोपड्यांतून हिंडताना, त्यांच्या पडवीत बसून त्यांच्याशी त्यांच्या अडीअडचणींच्या गप्पा करताना, त्यांच्या हातचे खाताना दादांना कधीही त्यांच्या जन्मजात धर्माने कधी अडवले नाही की सोवळ्या-ओवळ्याने कधी मनात शंका-कुशंका उत्पन्न होऊ दिली नाही. मंडल-कमिशनच्या निमित्ताने आज एवढा गदारोळ माजतो. पण आर्थिक दृष्ट्या दुर्बल तो खरा पीडित, तो खरा दलित. त्याला मदतीचा हात देऊ करण्यातच खरा मानवधर्म आहे हे दादांनी वीस वर्षांपूर्वीच दाखवून दिले. पण त्याची कधी त्यांनी वाच्यता केली नाही!

दादांचे सगळेच गुण विलोभनीय आहेत. मनापासून त्यांना वंदन करावेसे वाटते ते त्यांच्या नि:स्वार्थी आणि निर्मोही स्वभावाबद्दल. आश्रमाच्या कामासाठी आपले तन, मन आणि प्रसंगी धनसुद्धा वेचून त्यांनी आश्रमाच्या कामात स्वत:ला झोकून दिले ते अत्यंत निरपेक्ष बुद्धीने. कोणत्याही मोबदल्याची, मानधनाची अपेक्षा न ठेवता. सकाळी ७ ते ९ आश्रमात जायचे. संध्याकाळी ऑफिसातून आल्यावर पुन्हा दोन तास जायचे. आवश्यक कामे बघायची. महत्त्वाच्या सूचना करायच्या. पत्रव्यवहार बघायचा. आवश्यक पत्रांना उत्तरे लिहायची वा डिक्टेट करायची. कामे फार साचली असे वाटले तर एक नैमित्तिक सुटी घ्यायची. साचलेल्या कामांचा

फडशा पाडायचा. असा त्यांचा अनेक वर्षांचा परिपाठ होता. रात्री-बेरात्री पोलिसांकडून, कोर्टाकडून नवजात अर्भके येत. गुन्हेगार स्त्रिया येत. तेव्हा चालले आश्रमात ड्युटीला!

श्रद्धानंद महिलाश्रम काय किंवा तत्सम इतर संस्था काय, त्या मुख्यत्वे चालतात त्या तुटपुंज्या सरकारी अनुदानावर आणि मुख्यत्वे लोकाश्रयावर. अशा परिस्थितीत आश्रमाच्या खर्चातील पै नि पै वाचविण्याकडे आणि अत्यावश्यक तेथेच खर्च करण्यावर दादांचा कटाक्ष असे. त्यामुळे आश्रमाच्या कामासाठी कुठे जायचे असेल तर दादा आधी पायी निघतील, अंतर जास्तीचे असेल तर बस किंवा लोकलच्या मार्गाने जाण्यासच प्राधान्य देतील. पण उगाच टॅक्सीने जाण्याचे टाळतील! अगदी वेळेचीच निकड आहे, वा बरोबर कुणी अभ्यागत मंडळी असतील तरच टॅक्सीचा विचार. देणगीदार आश्रमाच्या सत्कार्यासाठी पैसा देतात तेव्हा अशा पैशाचा थोडासादेखील दुरुपयोग झालेला त्यांना मानवत नसे.

व्याख्याने जशी गाजू लागली तशी त्यांना आकाशवाणी, दूरदर्शन, निरनिराळ्या ठिकाणच्या परिसंवादांसाठी, व्याख्यानांसाठी आमंत्रणे येत. मानधन मिळे. 'दलितमित्र' किताब महाराष्ट्र सरकारकडून मिळाला तेव्हा रोख रु. १००० चे मानधन मिळाले. अशा अनेक प्रसंगांतून वैयक्तिक रीत्या मिळालेले पैसे ते तत्परतेने संस्थेच्या खाती जमा करीत. कोणी म्हणालं की, 'अहो, हे पैसे तुम्हाला म्हणून मिळालेले आहेत तेव्हा ते पैसे तुम्ही स्वत:जवळ ठेवण्यास काहीच हरकत नाही.' त्यावर दादा म्हणत, की 'ही जी भाषणांची, मुलाखतींची बोलावणी येतात ती श्रद्धानंद महिलाश्रमामुळे. मग तो पैसा बाळगायचा मला कोणताच नैतिक अधिकार नाही. एक तर विनावेतन काम करायचे आणि वर वैयक्तिक रीत्या मिळालेले धन संस्थेच्या दप्तरी जमा करायचे.'

एका समारंभात एका पदाधिकाऱ्याने बोलता बोलता सांगितले, की 'आज दोन सेक्रेटरींसाठी संस्था वर्षाला लाखभर रुपये खर्च करते. ते काम दादा एकटे पार पाडत.' ह्यावर अधिक भाष्याची

आवश्यकताच नाही! पण याहून उच्च कोटीचा दादांचा स्वार्थत्याग फारच थोड्यांना माहीत असेल. त्याची हकीगत अशी–

स्त्रिया व मुले यांच्याकरिता उत्तम काम करणाऱ्या व्यक्तीला व संस्थेला १९९० सालचा भारत सरकारचा पुरस्कार द्यायचा होता, तेव्हा श्रद्धानंद महिलाश्रमातर्फे संस्थेतर्फेचा एक व वैयक्तिक रीत्या रा. शं. ताटके असा दादांच्या नावे दुसरा, असे दोन अर्ज सरकारकडे पाठविण्यात आले होते. सर्व माहिती, निरनिराळे तक्ते, कागदपत्रांची जोडणी यांसाठी सारे कष्ट दादांनी स्वत:च घेतले होते. यथाकाळ संबंधित सरकारी खात्याकडून विचारणा झाली की पुरस्कार द्यायचे नक्की झालंय, फक्त संस्थेला द्यायचा की व्यक्तीला? कारण एका संस्थेकडून दोन अर्ज गेले तरी पुरस्कार एकाच अर्जाला मिळणार होता. कोणाही माणसाला वैयक्तिक रीत्या असा राष्ट्रीय सन्मान होणे खचितच आवडले असते! पण इथेच तर दादा सर्वसामान्यांपेक्षा वेगळे कसे ते दिसतात.

दादांनी विचार केला की वैयक्तिक पुरस्कार स्वीकारला तर त्यांचा सन्मान होईल, राष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा लाभेल हे खरं. पण रोख पुरस्कार फक्त ३०,०००/- रुपयांचाच लाभेल. नाहीतरी त्यांच्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे ही रक्कम ते आश्रमाच्याच हवाली करणार! याउलट, पुरस्कार संस्थेला मिळाला तर आश्रमाला दोन लाख रुपयांचा रोख पुरस्कार मिळेल. दादांनी क्षणाचाही विचार न करता कळविले की पुरस्कार व्यक्तीला न मिळता संस्थेलाच मिळावा. तेव्हा १९९० च्या पुरस्काराची दोन लाखांची घसघशीत रक्कम संस्थेला मिळाली. त्यातून कितीतरी अनाथांना आधार मिळणार होता. हा जो पराकोटीचा स्वार्थत्याग आणि मनाचा मोठेपणा आहे त्याची फारच थोड्यांना माहिती होती. २५ जानेवारी १९९२ रोजी दादांच्या निरोपाच्या निमिताने झालेल्या सत्कार-समारंभात एका वक्त्याने ही हकीगत सांगितली तेव्हा अनेकांचे डोळे पाणावले.

सत्कार-समारंभ करून घेणे दादांच्या स्वभावधर्मात बसतच नाही. त्यातील स्तुतिपर भाषणे आणि गळ्यातील हारांच्या ओझ्याने

त्यांचे त्यांनाच दबून जायला होते. गुदमरल्यासारखे होते. 'स्तुती करावी परमेश्वराची। करू नये व्यर्थ नराची' ही शिकवण बालपणापासून मनावर ठसलेली असल्याने ते शक्यतो सत्कार-समारंभांपासून दूरदूरच राहतात. तरीपण त्यांच्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या प्रियजनांनी त्यांचे असे सत्कार दोनचारदा तरी घडवून आणलेच!

दादांनी वयाची पंचाहत्तरी पार केली तेव्हा त्यांना पितृवत् मानणाऱ्या सौ. अचला जोशी (संस्थेच्या पदाधिकारी, सध्याच्या अध्यक्षा श्रीमती मनोरमाबाई फडके ह्यांची कन्या) ह्यांनी दादांना जिव्हाळ्याच्या भावनेने ओथंबलेले असे एक पत्र लिहिले. दादांपासून आपण कशी स्फूर्ती घेतली वगैरे लिहिले व पत्रासोबत 'गुरुदक्षिणा' म्हणून रु. ७५० चा चेक पाठवला. दादा साहजिकच त्या पत्राने, त्यातील ओतप्रोत भरलेल्या जिव्हाळ्याने गहिवरले. पत्र वाचताना त्यांच्या डोळ्यांत अक्षरश: अश्रू तरळले! इतपत ठीक झालं. पण एवढी मोठी गुरुदक्षिणा स्वीकारायची कशी? सौ. अचलाच्या भावनांचा अवमान करणेही त्यांच्या मनाला भावेना. तिला लिहिलेल्या पत्रोत्तरात दादा म्हणतात, ....'गुरुदक्षिणा' म्हणून किती घ्यायची याला मर्यादा नाही. कारण शिवरायांनी सारे राज्यच श्रीसमर्थांच्या चरणी अर्पण करण्याकरिता देऊ केले होते. पण श्रीसमर्थांनी ते परत शिवरायाच्या ओटीत घालून 'राजा' म्हणून कर्तव्यतत्परतेने त्याची व्यवस्था पहा असे सांगितले. मी 'समर्थ' नाही तर मृत्युलोकात वावरणारा एक साधा वाटसरू आहे. तेव्हा 'तुझे' गुरुपद घेण्याइतपत माझी पात्रता नाही. तरीही ज्या पूज्य भावनेने तू हे केलेस, तिचा आदर करणेही कर्तव्य ठरते. त्यामुळे वरील रकमेतील 'पूज्य' (०) काढून टाकून फक्त रु. ७५/-च (७५ वर्षे झाली म्हणून) दुसरा चेक दिल्यास मी त्याचा आदराने स्वीकार करेन.' असे किती तरी प्रसंग दादांच्या आयुष्यात आढळतात. आणखी काही वर्षांनी नीतिमूल्ये एवढी ढासळलेली असतील, समाज स्वार्थाने एवढा बरबटलेला असेल की 'त्या' काळातील दुनियेला अशा कथा कपोलकल्पित नि अतिशयोक्तीच्या वाटल्या तर त्यात यत्किंचितही नवल वाटायला नको.

दादांचा इतक्या संस्थांशी संबंध आला. श्रद्धानंद महिलाश्रमाच्या आणि श्री रामकृष्ण चॅरिटीज्च्या कामात तर त्यांनी स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले होते. त्यामुळे साहजिकच दादांचे आपल्या कुटुंबियांकडे दुर्लक्ष झाले असणार अशी अटकळ कोणी बांधली तर ते स्वाभाविकच मानले पाहिजे. इथे तर ते आपल्याला सपशेल चकित करतात. समाजसेवा करणाऱ्या माणसाने आपल्या कुटुंबियांकडे कधीच दुर्लक्ष करू नये असे दादांचे आग्रहाचे सांगणे असते. त्यामुळे त्यांची स्वत:ची ज्यांच्या शिकवणुकीवर आत्यंतिक श्रद्धा आहे त्या श्रीसमर्थांचा 'आधी प्रपंच करावा नेटका' हा उपदेश त्यांनी तंतोतंत पाळला.

माटुंग्याच्या त्यांच्या दोन खोल्यांच्या जागेत एकेका वेळी पंधरा-पंधरा, सोळा-सोळा माणसं राहिली. मुंबईत लग्नानंतर बिऱ्हाड मांडल्यावर वाईच्या त्यांच्या एक काकू त्यांच्याकडेच होत्या. नातेवाईकांत कोणी मॅट्रिक झाले, ग्रॅज्युएट झाले की भाऊंनी (दादांच्या वडिलांनी) सांगावयाचे की जा, मुंबईला बाळूकडे (दादांना ते बाळू म्हणत) जा. तो लावेल तुला नोकरी. ४/६ महिने प्रयत्न केल्यावर त्या काळच्या जुन्या दिवसांत नोकरी मिळे. तोपर्यंत दादाच त्या नातेवाईकांचा (चुलतभाऊ, मावसभाऊ, पुतणे वा भाचेकंपनी) खर्च चालवीत. पण कधी कुरकुर नाही की अमक्यातमक्याला सांभाळले असा गाजावाजा नाही. सर्वांनाच दादांचे घर हक्काचे वाटे.

या बाबतीत मोठे श्रेय सौ. लीलाताईंनाच दिले पाहिजे. दोन खोल्यांची जागा, त्या काळातील तुटपुंजी मिळकत, घरातील चुलत सासुबाईंचे कडक सोवळे-ओवळे ह्या साऱ्या अडचणी त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य हिरावू शकल्या नाहीत. भांड्याला भांडे लागले की थोडी खणाखणी व्हायचीच. ती तर जगरहाटीच आहे. पण तरीसुद्धा भाऊ, भावजय, बहिणी, मेहुणे, श्वशुर, मुलगा, सून, मुली-जावई ह्या साऱ्यांच्या भावसंबंधांचा खराखुरा 'समतोल' राखण्याचे दिव्य सौ. लीलाताईंनीच 'लीलया' पेललेले आहे!

कौटुंबिक संबंधात दादांनी कोणतीच गोष्ट निव्वळ कर्तव्यभावनेपोटी कधीच केली नाही. कुणाचं शिक्षण, कुणाचं लग्न तर कुणाची नोकरी हे सारं त्यांनी मनापासून केलं आहे. याचं मुख्य कारण त्यांना साऱ्यांचे मनापासून प्रेम आहे. ह्या प्रेमापोटी कितीही कष्टाची, प्रसंगी पदरात वाईटपणा देणारी कामे अंगावर पडली तरी त्यांनी कधीही पाय मागे घेतला नाही. आपले नातेवाईक आणि बायकोकडील नातेवाईक असा दुजाभाव त्यांच्या मनालासुद्धा कधी शिवणे शक्य नव्हते. एकदा सौ. लीलाताईंकडील एका नातेवाईकाने हॉस्पिटलमध्ये आपला अंत्यसमय जवळ आल्याचे जाणवून त्यांच्या पश्चात् त्यांच्या मुला-मुलींचे सर्व काही करेन असे दादांकडून वचन घेतले व मगच प्राण सोडला. केवढा दादांवरील विश्वास! दादांनीही त्या साऱ्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले. त्यांची लग्नेकार्ये करून देऊन वचनपूर्ती केली.

त्यांचे श्वशुर मिरजेचे कै. डॉ. प्राणी यांच्यावर एकेकाळी मोठीच तोहमत आली होती. त्यांच्याच आप्तांनी विश्वासघात करून त्यांची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी तोट्यात आणली आणि तोंडघशी पडले ते मात्र कै. डॉ. प्राणी. तेव्हाचा पेचप्रसंग सोडविण्यासाठी दादांनी कंपनी लॉची पुस्तके आणून अभ्यास केला आणि आपल्या श्वशुरांना न्याय्य मार्गाने संकटमुक्त केले. ज्यांनी ज्यांनी त्या वेळी मदत केली त्यांना त्यांना त्यांचे नुकसान न होऊ देता त्यांच्या पदरात योग्य मोबदला घातला.

दादांच्या श्वशुरगृही श्री. प. प. अवधूतस्वामी नावाचे संन्यासी येत. ते व्यासबेटावर नर्मदातटाकी राहात असत. ते पुराणमतवादी होते. दादांचे आश्रमकार्य, दत्तक प्रश्न इत्यादींबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. एकदा सहज ते मुंबईत आले असताना दादांनी त्यांना आश्रम पाहण्याची विनंती केली. कसे कुणास ठाऊक, पण ते हो म्हणून गेले. दादांनी त्यांना सारा आश्रम स्वत: हिंडून दाखविला. आश्रमातील निराधार स्त्रिया, छोटीछोटी लहान मुलं, त्यांच्यावर घडविले जाणारे संस्कार पाहून स्वामीजी गहिवरले.

त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते म्हणाले, 'बाळासाहेब, तुमचे कार्य ही परमेश्वरी सेवाच आहे. परमेश्वर सदैव तुमच्या पाठीशी राहील. हेच काम करीत रहा.' असा आशीर्वाद देऊन कार्याचा गौरव केला. कोणी त्यांच्या कार्याबद्दल नाराजी, नापसंती दर्शविली तरी दादा 'मला काय त्याचे?' असे म्हणून सोडून देत नसत. वितंडवादही घालत नसत. आपण तोंडाने बोलण्यापेक्षा आपले कामच 'बोलेल', अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. या श्रद्धेमुळे त्यांचे अनेक कुटुंबीय व स्नेही त्यांच्या कामाकडे आदराने बघू लागले.

एवढ्या कामाच्या गर्दीतसुद्धा आपली आवश्यक गृहस्थाश्रमी कर्तव्ये ते नित्यनेमाने पार पाडत. वाईला आई-वडील असेतो नित्यनेमाने जात. धाकट्या भावा-बहिणीची लग्नकार्ये, त्यांच्या अडीअडचणींकडे त्यांचे सावधपणे लक्ष असे. पुढे रामकृष्ण चॅरिटीज्चे काम सुरू झाल्यावर तर त्यांच्या वाईकडील फेऱ्या बऱ्याच वाढल्या.

श्रद्धानंद महिलाश्रम आणि रामकृष्ण चॅरिटीज् अशा दोन्ही कामांचा व्याप वाढल्यावर दादांना आपल्या बहिणींकडे भाऊबीजेला नेमक्या वेळेला जाता येईल अशी स्थिती उरली नाही. मग ते आधी मनिऑर्डर करू लागले. पुढे पुढे ते आपल्या कामात इतके गुरफटले गेले की तेही वेळच्या वेळी जमेना. तेव्हा आपल्या बहिणींना लिहिलेल्या एका छोट्या पत्रात त्यांनी म्हटलंय, 'कामाच्या व्यापामुळे व गाड्यांच्या गर्दीच्या त्रासामुळे अलीकडे मी प्रतिवर्षी भाऊबीज मनिऑर्डरनेच पाठवीत असतो. कामानिमित्त वरचेवर परगावी जात असल्याने, ठरावीक वेळी मुंबईत असतो असे नाही. ठरलेल्या दिवशी पोस्टात जाऊन मोठ्या गर्दीच्या रांगेत तासन् तास घालवून मनिऑर्डर करणे अशक्य वाटू लागले आहे. त्यामुळे आता या व्रताचे उद्यापन करण्याचे ठरवले आहे.' दादांनी एक ठरावीक रक्कम बहिणींच्या नावे बँकेत व्याजी लावण्यासाठी दिली. प्रतिवर्षीचे व्याज हीच भाऊबीज. अर्थात सवड मिळाल्यावर जमेल तसे दादांचे बहिणींकडे जाणे-येणे मात्र सुरू राहिले.

ज्या भाटवडेकरांच्या बिल्डिंगमध्ये दादा ५०-५५ वर्षे राहिले तिथले सर्वजण त्यांना मामा मानतात. त्या मंडळींचे आजोळगावही वाई आहे. तिथे राहणाऱ्या डॉ. सुलभा भाटवडेकरांनी ( ह्या १९९० - ९१ मध्ये आश्रमात मानद सहसचिव होत्या. ) दादांची एक आठवण सांगताना म्हटलंय, की 'साधारण ३५ वर्षांपूर्वी मी M.D. परीक्षेस बसायचा निर्णय अचानक घेतला. माझा प्रबंध तयार होता पण एका दिवसात तो टाईप करून द्यायलाच हवा होता. मी काय करावे ह्या काळजीत होते. ही गोष्ट माझ्या वडिलांनी ती. दादांना सांगितल्यावर रात्रीच बसून सारा प्रबंध त्यांनी रातोरात टाईप करून दिला. ही गोष्ट मी कधीच विसरणार नाही.'

एरवी गंभीर आणि काहीशा जाड चष्म्यामुळे दादा कठोर भासतात. पण त्यांची विनोदबुद्धी अत्यंत तरल आहे. श्रद्धानंद महिलाश्रमात दादा प्रथम आले तेव्हा कामाची मुख्य धुरा सुप्रसिद्ध समाजसेवक व पत्रकार कै. श्री. शं. नवरे सांभाळत असत. पूर्वीच्या नोकऱ्यांतून अनेक युरोपियन मंडळींच्या सहवासात काम केल्यामुळे दादा त्या वेळी नखशिखान्त पाश्चात्त्य पोशाख करीत. डोक्यावर हॅट असे. पुढे आश्रमाच्या कामाला लागल्यावर कामाच्या भ्रमंतीत कुठे गेलं की हॅट बाजूला काढून ठेवावी लागे. बरेचदा विसरून हॅट त्याच ठिकाणी राहात असे. शेवटी कंटाळून दादांनी आपल्या 'शिरस्त्राणाला' कायमचीच रजा दिली. उघड्या डोक्याने केसाचा भांग पाडून दादा आश्रमात आले तेव्हा कै. नवरे त्यांच्याकडे बघत हसत म्हणाले, 'काय दादा, आज टोपी सोडलीत वाटतं.' तेव्हा मिस्किलपणाने दादा म्हणाले, 'टोप्या बदलण्यापेक्षा सोडलेली बरी. नाही का?'

ही कोटी कै. नवऱ्यांच्या बाबतीत भलतीच चपखल बसली. कारण नवरे पडले राजकारणी गृहस्थ. हिंदुमहासभा, काँग्रेस असे दलबदल करत त्यांनी काळी टोपी, गांधी टोपी असे अनेक फेरफार केले. त्यांच्या या भूतकाळाची माहिती असल्याने दादांनी हातोहात त्यांची टोपी उडविली आणि नवऱ्यांनी पण तितक्याच दिलखुलासपणे त्यांना दाद दिली.

सुप्रसिद्ध समाजसेविका श्रीमती लीलाताई मुळगावकर ह्यांचे रक्तदान-पेढीच्या बाबतीतील महान कार्य सर्वश्रुतच आहे. हजारो रक्तदान शिबिरे चालवून रक्तपेढ्या स्थापन करून अनेक मरणोन्मुख रोग्यांना रक्तपुरवठा मिळाल्याने जीवनदान मिळालेले आहे. रक्त 'गोळा' करण्याच्या त्यांच्या या कामाची स्तुती करताना नि लीलाताईंची ओळख करून देताना दादा गंमतीने म्हणाले, की, 'या बाई म्हणजे भारतातील एक नंबरची जळू आहे.' तेव्हा जो हशा पिकला त्यात लीलाताईंसह सर्वच जण सामील झाले.

अनेक संस्थांमध्ये दादांनी कामे केली. त्यांच्या अविश्रांत श्रम करण्याच्या स्वभावामुळे त्यांच्यावर कार्यवाहपदाचा भार पडे. भिडस्त स्वभावाची कल्पना असणारा कोणी स्नेही आपुलकीने दादांना म्हणे, 'कशाला एवढ्या जबाबदाऱ्या घेता?' तेव्हा वृषभ रास असणारे दादा म्हणत, 'अहो, कार्यवाह म्हणजे खरा तो भारवाहकच. वृषभ राशीच्या माणसाच्या नशिबी दुसरं काय असणार म्हणा!'

ताटकेकुटुंबात एकंदरीत स्त्रियांचे प्रमाण अधिकच. दादांना स्वत:ला सहा बहिणी, त्यांना स्वत:ला मुली दोन व मुलगा एक. पुढच्या पिढीत मुलगी सौ. मृणालला दोन मुली झाल्या. सौ. मंगलेला एक मुलगी झाली आणि जेव्हा मकरंदला पण दोन मुलीच झाल्या तेव्हा सर्वजण दादांच्या मागे लागले, 'दादा, आता लवकर महिलाश्रम सोडा. एकापाठोपाठ आपल्याकडे मुलीच मुली होत आहेत.' पण परमेश्वराला काळजी. हा प्रकार जर थांबला नाही आणि दादांना खरोखरच आश्रम सोडायला लागला तर! हे परवडण्यासारखे नव्हते. कारण त्यानेच निर्मिलेल्या या मानवसृष्टीत 'नराधमांचा' सुकाळ आणि 'नरोत्तमांचा' दुष्काळ! तेव्हा दादांची आश्रम सोडायची वेळ त्यानेच टाळली! कारण लवकरच मकरंदाला आणि मंगलेला पुत्ररत्ने झाली!

या 'दादा-दर्शनाचा' उद्देश असा नाही की दादा हेच एकमेव सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व आहे. जगाच्या पाठीवर संपूर्ण सद्गुणी अशी एकच व्यक्ती म्हणजे संत. सर्वसामान्य माणसात असणाऱ्या रागलोभांपासून दादाही मुक्त नसतीलच. पण सम्यक् दृष्टीने पूर्णत्वाने विचार केला तर मानवी

स्वभावातील जन्मजात दोषांवर त्यांच्यातील सद्‌गुणांनी संपूर्ण मात केलेली दिसते.

दादा हे एक प्रकारचे ज्याला आपण इंग्रजीत 'परफेक्शनिस्ट' म्हणतो तसे आहेत. काम हाती घेतले की ते त्यात कोणत्याही उणिवा न ठेवता ते पूर्णत्वास नेण्याचा त्यांचा स्वभाव आहे. ते स्वत: तशी कामे करतात हे ठीक आहे. पण इतरांपासूनही तशीच अपेक्षा ठेवतात हा त्यांचा भाबडेपणा म्हणावा लागेल. कोणत्याही कामाची त्यांना जशी आतून आच लागलेली असते तशी इतरांना नसते हे ते विसरतात. घड्याळाच्या काट्याचे महत्त्व त्यांना जेवढे भावते तसे ते इतरांच्या लेखी असेलच असे नाही. त्यामुळे नेमून दिलेली कामे नेमक्या वेळात करणे, कोणत्याही त्रुटी न ठेवता पूर्णत्वाने करणे ह्या बाबी इतरांकडून होत नाहीत तेव्हा दादा संतापतात. यामुळेच त्यांच्याविषयी अनेकदा इतरांचे गैरसमज होतात. दादांनी स्वत: मात्र आयुष्यातील प्रत्येक क्षणाचे सोने केले. त्यांचे निकटवर्तीय सांगतात त्याप्रमाणे त्यांना कधी कोणी स्वस्थ, निवांतचित्त बसलेले बघितलेले नाही. एक काम पुरे करून दुसरे हाती घेणे म्हणजे कामातील बदल एवढीच त्यांच्या दृष्टीने विश्रांती असते. 'कंटाळा आला बुवा' ही 'चीज' सतत आळविणाऱ्या मंडळींना त्यांच्या आयुष्यभरातील कार्याचा आढावा घेताना त्यांच्या अंगी काहीतरी दैवी शक्ती असल्याचा भास व्हावा यात काहीच नवल नाही.

प्रतिसृष्टी स्थापू पाहणारा विश्वामित्र आणि स्वर्गलोकीची अप्सरा मेनका यांच्या संबंधातून शकुंतला जन्माला आली. 'अंगाशी' आल्यावर आपली जबाबदारी झटकून टाकण्याची पुरुषपरंपरा अगदी पुराणकालीन 'विश्वामित्री' पवित्र्यापासून समाजात चालत आली आहे. स्वर्गलोकी परतणे क्रमप्राप्त असल्याने आजकालच्या असहाय स्त्रीप्रमाणेच मेनकेलाही आपल्या पोटच्या गोळ्याला उघड्यावर टाकून जावे लागले. अशा या दोघाही मातापित्यांनी वाऱ्यावर सोडलेल्या पोरक्या, निराधार शकुंतलेचे कण्वमुनींनी मायेने आपल्या आश्रमात संगोपन केले. निराधार शकुंतलांचे दादांसारख्या आधुनिक कण्वमुनींनी असेच महिलाश्रमात लालनपालन केले. लहानाच्या मोठ्या करून त्यांचे स्वत: कन्यादान करून विवाह लावून दिले. या कण्वमुनींनी 'शाळेमागे'

धावायला लावले. शैक्षणिक मदत देऊन त्यांच्या स्वत:च्या पायावर त्यांना उभे केले. काही मुलांना निपुत्रिकांच्या ओटीत घालून त्यांना हक्काचे घर दिले. अशा अनेक मुली व मुले आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत, परप्रांतांत इतकेच नव्हे तर काही नॉर्वे, स्वीडनसारख्या परदेशांतसुद्धा सुस्थिर समाधानी जीवन जगत आहेत.

दादा व्याख्यानाला जावोत वा परिसंवादाला, कार्यक्रम संपल्यानंतर दादा 'आल्याची' बातमी कळताच अशा अनेक निरनिराळ्या ठिकाणी दादांची मुलं, कन्या आवर्जून त्यांना भेटण्यासाठी येतात. सुखदु:खं सांगतात. या गृहस्थाश्रमी माणसाची नातीगोती अशी दूरदूर पसरलेली दिसतात. विश्वबंधुत्व यापेक्षा वेगळे ते काय? 'वसुधैव कुटुंबकम्' ही उक्ती दादांनी प्रत्यक्ष कृतीत उतरविली.

आपल्या श्रेष्ठ हिंदू संस्कृतीने जगाला ज्या अनेक चांगल्या कल्पना दिल्या त्यांतील एक कल्पना म्हणजे वानप्रस्थाश्रमाची. दादांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांच्या दशग्रंथी घराण्यातील आध्यात्मिक वारशाचा फार मोठा भाग आहे.

कार्यालयीन सेवेतून निवृत्त झाल्यापासून एकेका संस्थेची जबाबदारी त्यांनी हळूहळू आपणहून सोडण्यास सुरुवात केली. अर्थात संस्था आर्थिक दृष्ट्या बलवान झाल्याची खात्री झाल्यावरच त्यांनी आपले पद खाली केले. श्रद्धानंद महिलाश्रमातून ते जरी प्रत्यक्षात ७ सप्टेंबर १९९१ पासून निवृत्त झाले असले तरी 'खुर्ची' खाली करण्यासाठी गेली किती तरी वर्षे ते धडपडत होते. ज्येष्ठ, मान्यवर व्यक्तींच्या प्रेमापोटी त्यांना अनिच्छेने कार्यभार सांभाळावा लागला.

कुठल्याही सामाजिक संस्थेतून वर्षानुवर्षे काम करणे मुळात कठीण. त्यातून महिलांच्या संस्थेत वर्षानुवर्षे कार्यरत राहणे महाकर्मकठीण. विघ्नसंतोषी मंडळी सर्वत्र असतातच. शकुनीमामांची आणि पुतनामावशींची आपल्या समाजात कधीच वाण पडलेली नाही! अशा परिस्थितीत धवल चारित्र्य, शुद्ध आचरण, शुद्ध मन असणारी दादांसारखी माणसं सन्मानाने निवृत्त होतात तेव्हा फक्त मनापासून सहजोद्गार निघतात, 'तेथे कर माझे जुळती!'

दादांचा जीवनपट उघडून पाहताना लक्षात येते, की त्यांचे व्यक्तिमत्त्व पाऱ्यासारखे पारदर्शी आहे. पारा दिसतो स्वच्छ, स्पष्ट; पण पकडायचा प्रयत्न करावा तर हाती लागत नाही. तसाच प्रकार दादांच्याबाबत घडतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सारे पैलू गोळा करून शब्दांकित करणे म्हणजे शिवधनुष्यच उचलण्यासारखे अवघड काम! अशा कामासाठी खरोखरीच 'समर्थ' हातांची गरज आहे. नपेक्षा आपल्याच घरातील सगळ्या वृक्षवल्लींची मोजदाद करता न येणाऱ्या त्या बालकासारखी स्थिती व्हायची!





दलितमित्र श्री. दादासाहेब ताटके यांच्या विविधांगी समाजकार्यास व त्यागमय जीवनास श्री. अविनाश टिळक (डोंबिवली) यांच्या लेखणीने शब्दबद्ध केले. अत्यंत औचित्यपूर्ण असेच हे कार्य घडले. शब्दांच्या कवेत न बसणारे प्रसंग महान प्रयासाने बसविण्याचा श्री. टिळक यांचा हा प्रयत्न प्रशंसनीय ठरतो.

ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (मुंबई) मध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

साहित्यवाचन व लेखन यांचा अखंड व्यासंग.

लोकप्रभा, मार्मिक, स्वप्ना, नव-उद्घोष, स्त्री आदी मासिकांतून अनेक कथांना प्रसिद्धी.

लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स्, मुंबई सकाळ, तरुण भारत, केसरी आदी वृत्तपत्रांतून विविध विषयांवर स्फुट लेखन.

कथास्पर्धेत अनुक्रमे पु. भा. भावे व मार्मिक यांची पारितोषिके.

ग्रंथ परीक्षण स्पर्धेत पारितोषिक संपादन.

कला, साहित्य, संगीत, समाजकार्य यांची आवड.

लेखनामध्ये लालित्य, भावनोत्कटता, सांस्कृतिक निष्ठा आदींचे दर्शन.

श्री. दादासाहेब ताटके यांच्या 'आधारवड' या चरित्र-ग्रंथाचे प्रयत्नपूर्वक व यशस्वी लेखन ही त्यांची मराठी वाचकांस आगळीवेगळी देणगी ठरावी.

**श्री यशोदा प्रकाशन, पुणे.**